दीपावली २०१९


# मेहता मराठी ग्रंथजगत

पृष्ठे : १६० । किंमत : ₹ १००



नवं कोरं

'आयसिस'सारख्या क्रूर आणि अतिरेकी संघटनेविरुद्ध वांशिक व धार्मिक संरक्षणासाठी संयुक्त राष्ट्रसंघासमोर कैफियत मांडणाऱ्या पीडित धैर्यशालिनीची आत्मकथा...




नादिया मुराद । अनुवाद - सुप्रिया वकील

पृष्ठसंख्या : ३२० । किंमत : ₹३९५

Book Available

# मेहता मराठी ग्रंथजगत

## दिपावली २०१९

ऑक्टोबर-नोव्हेंबर २०१९ जोडअंक

वर्ष एकोणिसावे

किंमत ₹ १००

संपादक
**सुनील मेहता**

कार्यकारी संपादक
**शंकर सारडा**

संपादन साहाय्य
**अंजली पटवर्धन**

मुखपृष्ठ
**सतीश भावसार**

मांडणी
**मेहता पब्लिशिंग हाऊस**

संपादक-मुद्रक-प्रकाशक
सुनील मेहता
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड टेलिफोन भवनसमोर, पुणे ४११०३०.
फोन : ०२०-२४४७६९२४, २४४७५४६२

या अंकातील लेखांतील मते त्या त्या लेखकाची असून संपादक त्यांच्याशी सहमत असतीलच असे नाही.



# अंतरंग

**संपादकीय** /६

**‘आयर्नमॅन’ मेघ ठकार**
शब्दांकन आणि संकलन :
माधवी ठकार आणि प्रतिनिधी
(मेहता मराठी ग्रंथजगत) / ९

**‘झाडं मला तपश्चर्येला बसलेले ऋषी वाटतात.’**
सयाजी शिंदे / १५

**माझी शेती, माझी माणसं**
अजित आपटे / २३

**‘अनू’प : गोठवून टाकणाऱ्या अनुभवांनी भरलेली अनू अगरवालच्या आयुष्याची शब्दयात्रा**
अनू अगरवाल / ३१

**कॉर्पोरेटला रामराम, शेतीला सलाम**
वेंकट अय्यर / ४१

**सागरी परिक्रमेचा पराक्रम**
कॅप्टन दिलिप दोंदे / ४७

**तिमिरातून तेजाकडे...**
भावेश भाटिया / ५३

**प्रशम : सांत्वन, समाधान, विश्रांती : विशाल परुळेकर**
स्वाती चांदोरकर / ५९

**यशोवाणीची यशोगाथा साकारणारी प्राची गुर्जर**
वर्षा वेलणकर / ६३

**सैनिकमय जीवन : अनुराधा प्रभुदेसाई**
शब्दांकन आणि संकलन :
प्रतिनिधी (मेहता मराठी ग्रंथजगत) / ६७

**मनोरुग्णांच्या सेवेचं व्रत घेतलेले भरत वाटवानी**
शब्दांकन आणि संकलन :
प्रतिनिधी (मेहता मराठी ग्रंथजगत) / ७१

**कृषी क्षेत्रातील कर्मयोगिनी : स्वाती शिंगाडे**
शब्दांकन आणि संकलन :
प्रतिनिधी (मेहता मराठी ग्रंथजगत) / ७५

**वंचितांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणाऱ्या संस्था**
रजनी परांजपे आणि प्राजक्ता रुद्रवार / ७९

**प्रयोगशीलतेतून विकास साधणाऱ्या मंगलताई**
यशोधरा काटकर / ८५

**जीवन त्यांना कळले हो! : विवेक नवरे**
वामन देशपांडे / ८९

**वाया जाणारे अन्न सत्कारणी लावणारी संस्था : रॉबिनहूड आर्मी**
शब्दांकन आणि संकलन :
प्रतिनिधी (मेहता मराठी ग्रंथजगत) / ९३

**सायकलस्वार परांजपे काका**
ज्योती आफळे / ९७

**वाचनातून देशसेवा : प्रदीप लोखंडे**
प्राचार्य श्याम भुर्के / १०१

**अमरगीत : बाबा आमटे यांचं जीवनचरित्र**
निशा मीरचंदानी / १०५

**स्टोन्स इन्टू स्कूल्स**
ग्रेग मॉर्टेन्सन / ११३

**'भोगले जे दुःख त्याला...'**
आशा आपराद / १२१

**शारदाताईंच्या अमोघ जिद्दीची कहाणी**
विलास पंढरी / १२५

**दिव्यगुणी**
सुधा मेनन आणि व्ही.आर.फिरोज / १२९

**अण्णा हजारे**
संपादन : प्रदीप ठाकूर /पूजा राणा / १३७

**चाकाची खुर्ची**
नसीमा हुरजूक / १४३

**खाली जमीन, वर आकाश**
डॉ. सुनीलकुमार लवटे / १४७

**वुइ आर पुअर बट सो मेनी**
इला भट्ट / १५१

**दिनविशेष** / १५५



## संपादकीय

# मानवतेचा दीप...

माणसाला जन्माला घालण्यामागे परमेश्वराचं काहीतरी प्रयोजन असतं; पण ते प्रयोजन काय आहे, हे सगळ्यांनाच समजत नाही. ज्यांना ते समजतं ते सर्वसामान्य माणसांपेक्षा वेगळे असतात. अशा वेगळ्या माणसांच्या विश्वात डोकवायचं आम्ही ठरवलं आणि मानवतेचं, अफाट कर्तृत्वाचं, अदम्य जिद्दीचं जे दर्शन आम्हाला झालं, ते नक्कीच आशादायक आणि स्फूर्तिदायक होतं. आशेच्या आणि स्फूर्तीच्या या किरणांनी आम्ही या वेळचा दिवाळी अंक सजवला आहे.

मी आणि माझं, याच्यापलीकडे जायला माणसं सहसा तयार नसतात. किंबहुना, आपल्यापलीकडेही जग आहे, याची जाणीव त्यांना नसते; पण रस्त्यावरच्या मनोरुग्णांवर उपचार करून त्यांचं पुनर्वसन करणारे डॉ. भरत वाटवानी किंवा सैनिकांसाठी आपलं जीवन समर्पित करणाऱ्या अनुराधा प्रभुदेसाई, पर्यावरणरक्षणाचं महत्त्व ओळखून देवराया निर्माण करणारे सयाजी शिंदे यांच्यासारखी स्वतःपलीकडे बघणारी माणसंही समाजात आहेत. समाजातील वंचितांच्या समस्या जाणून, त्यांची गरज ओळखून काम करणारी अनेक माणसं आहेत. जसं... प्राची गुर्जर यांनी अंधांची वाचता न येण्याची समस्या ओळखली आणि त्यांच्यासाठी पुस्तकं रेकॉर्ड करण्याचा उपक्रम सुरू केला. तर 'दि सोसायटी फॉर डोअर स्टेप स्कूल्स'आणि 'सहगामी फाउंडेशन' यांनी शाळाबाह्य मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचं काम सुरू केलं, ज्यांना पोटभर जेवण मिळत नाही, अशा लोकांसाठी 'रॉबिनहूड' या संस्थेनं हॉटेल्स, मोठे समारंभ इथून वाया जाणारं अन्न गोळा करून ते गरिबांमध्ये वाटण्याचा वसा घेतला. बालपणी अनाथपण आणि दारिद्र्याचे चटके सोसलेल्या विशाल परुळेकरनं आर्थिक मागासांचा/अनाथांचा सांभाळ करायला सुरुवात केली. तर निःस्वार्थपणे समाजसेवा करणाऱ्या काही व्यक्ती/संस्था यांची ही उदाहरणं आहेत.

काही व्यक्ती ध्येयवेड्या असतात, तर काही संकटांना तोंड देत खंबीरपणे उभ्या असतात. पोलीस खात्यातील नोकरी सोडून अविरत परिश्रमांनी पॉलिहाउस उभारणाऱ्या स्वाती शिंगाडे अशाच ध्येयवेड्यांपैकी एक. वयाच्या पस्तिसाव्या वर्षी डॉक्टर व्हायचं ठरवून बेचाळिसाव्या वर्षी एम.बी.बी.एस. होणाऱ्या शारदाताई बापट हे ध्येयासक्तीचं एक अचंबित करणारं उदाहरण. मंगलताई वाघमारे मात्र आजूबाजूच्या शेतकऱ्यांची आणि त्यांच्या स्वतःच्या घरातील परिस्थिती पाहून शहाण्या झाल्या आणि सेंद्रिय शेती करण्याचा निर्णय घेऊन त्याची यशस्वीपणे अंमलबजावणी केली. **शेतीच्या संदर्भातील आणखी एक सकारात्मक उदाहरण म्हणजे सातारा जिल्ह्यातील सायगावचे अजित आपटे. एमबीएसारखी पदवी घेऊनही केवळ आईच्या सांगण्यावरून त्यांच्या घरात परंपरेने चालत आलेल्या शेती या व्यवसायात ते उतरले. नुसते उतरलेच नाही, तर हळद आणि कांद्याच्या बियाण्यांवर विशेष परिश्रम घेऊन, शेतकऱ्यांमध्ये या बियाण्यांविषयी एक विश्वास निर्माण केला. एकूण, शेतीतही नवनवीन प्रयोग करून त्यांनी तरुणांसमोर एक आदर्श ठेवला आहे. गावाने त्यांना सरपंच म्हणून बिनविरोध निवडून दिलं. गावासाठीही बरीच कामं (जसं शाळा सुरू करणे, सांस्कृतिक कामांसाठी सभागृह बांधणे इ.) त्यांनी केली आहेत.**

ज्या व्यक्तींनी समाजासाठी, समाजातील एखाद्या घटकासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिलं, अशा व्यक्तींच्या कार्याची नोंद घेणारी अनेक पुस्तकं आम्ही प्रकाशित केली आहेत. 'अमरगीत : बाबा आमटे यांचे चरित्र' या पुस्तकातून बाबा आमटे यांनी कुष्ठरोग्यांसाठी केलेल्या कामाचं दर्शन घडतं, तर 'स्टोन्स इन्टू स्कूल्स' हे पुस्तक 'सेंट्रल एशिया इन्स्टिट्यूट' या सेवाभावी

संस्थेमार्फत पाकिस्तानातल्या आणि अफगाणिस्तानातल्या दुर्गम आणि उपेक्षित अशा दूरदूरच्या कोपऱ्यांमध्ये शाळा बांधणाऱ्या ग्रेग मॉर्टेन्सन यांच्या कार्यावर प्रकाश टाकतं. 'दिव्यगुणी' हे पुस्तक म्हणजे पंधरा अपंगांच्या विलक्षण जिद्दीच्या कहाण्या आहेत. यातील काही अपंगांनी अपंगत्वावर मात करत समाजासाठीही योगदान दिलं आहे.

'खाली जमीन वर आकाश' हे सुनीलकुमार लवटे यांचं आत्मचरित्र. अनाथ असूनही स्वतःला त्यांनी जाणीवपूर्वक घडवलं. खाचखळग्यांतूनही त्यांनी सन्मार्गानं केलेली वाटचाल त्यांचं वेगळेपण दर्शवते. आशा आपराद यांनी चौथी मुलगी झाल्यानंतर दहावी ते एम.फिल. हा शिक्षणाचा टप्पा अविरत परिश्रमांनी पार पाडला, तसंच त्यांना कौटुंबिक पातळीवरही खूप शारीरिक, मानसिक वेदना सोसाव्या लागल्या; पण सहनशीलतेने सगळं भोगत त्या जीवनाला सामोऱ्या गेल्या. त्यांचं हे जगणं त्यांनी 'भोगले जे दुःख त्याला...' या आत्मचरित्रातून मांडलं आहे. आपराद यांचा शिक्षणाचा ध्यास त्यांना इतर पीडित मुस्लिम स्त्रियांपासून वेगळं काढतो.

'अनू'प या आत्मचरित्रातून 'आशिकी'फेम अनू अगरवाल यांनी ग्लॅमर ते योगसाधना-मृत्यूकडून जीवनाकडे-संन्यास-समाजसेवा असा त्यांचा विलक्षण जीवनप्रवास सांगितला आहे. तोही अनन्य आहे. 'वुइ आर पुअर, बट सो मेनी' या पुस्तकातून इला भट्ट यांनी गरीब स्त्रियांचं उपेक्षित आणि कष्टमय जिणं यावर प्रकाश टाकला आहे; पण या स्त्रियांना संघटित केल्यावर त्यांची ताकद कशी वाढली आहे, त्यांच्यामधील 'स्व' कसा जागृत झाला आहे, हे सांगितलं आहे. या स्त्रियांमधील परिवर्तन आणि इला भट्ट यांनी त्या स्त्रियांसाठी केलेलं काम, या दोन्ही गोष्टी त्यांच्या जीवनातील वेगळेपण दर्शवतात. 'सागरी परिक्रमेचा पराक्रम' हा असा अनवट अनुभव आहे, जो लाखातून एखादाच माणूस घेऊ शकतो. दिलिप दोंदे यांनी शिडाच्या बोटीतून एकट्यानं केलेल्या पृथ्वीप्रदक्षिणेच्या पूर्वतयारीचे आणि प्रत्यक्ष परिक्रमेचे अनुभव या पुस्तकातून सांगितले आहेत. हा प्रवास खरंच निराळा आहे.

या वाटेवर अन्यही प्रवासी आहेत. 'नाम' फाउंडेशनच्या माध्यमातून शेतकऱ्यांना दिलासा देणारे नाना पाटेकर आणि मकरंद अनासपुरे, अनेक अनाथांवर मायेची पाखर घालणाऱ्या सिंधूताई सपकाळ, 'पाणी' फाउंडेशनद्वारा खेड्यापाड्यांतील पाण्याची स्थिती सुधारायचा प्रयत्न करणारे आमिर खान, तर 'बॉर्डरलेस वर्ल्ड फाउंडेशन'च्या माध्यमातून काश्मीरच्या सीमावर्ती भागातील मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात आणणारे आणि एकूणच तिथल्या अस्थिर परिस्थितीत तेथील नागरिकांना विविध प्रकारे मदत करणारे अधिक कदम, पूर, भूकंप अशा नैसर्गिक आपत्तींमध्ये आणि अन्य संकटांच्या वेळीही जिवाची पर्वा न करता धावून जाणारे एनडीआरएफचे जवान, पोलिसांच्या विविध प्रश्नांवर (जसे, पोलिसांना स्वतःची घरं मिळवून देणे) काम करणाऱ्या आणि त्यांना उत्सवांदरम्यान बंदोबस्तात मदत करणाऱ्या पोलीसमित्र संघटना... ही यादी खूप लांबू शकते. जेव्हा आपण या अनवट वाटेवरच्या प्रवाशांचा एकत्रितरीत्या विचार करतो, तेव्हा जग हे दहा वाईट माणसांपेक्षा चार चांगल्या माणसांवर चालतं, याचा प्रत्यय येतो.

काहींना जीवनातील अनुभव समाजसेवेकडे घेऊन जातात, तर काहींना समाजासाठी काहीतरी करण्याची तळमळ उपजतच असते. काहींनी समाजासाठी प्रत्यक्ष काही केलं नाही तरी त्यांचं जीवन इतरांसाठी प्रेरणादायी ठरतं. दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवर 'दुसरी बाजू' नावाचा एक कार्यक्रम लागायचा (अजूनही त्याचं पुनःप्रक्षेपण सुरू असावं). ज्येष्ठ अभिनेता विक्रम गोखले त्या कार्यक्रमात विविध क्षेत्रांतील लोकांच्या मुलाखती घ्यायचे. व्यक्ती कोणत्याही क्षेत्रातील असो, त्या मुलाखतींमध्ये एक प्रश्न कायम असायचा,' तुम्ही समाजासाठी काय करता?' हाच प्रश्न प्रत्येक व्यक्तीने स्वतःला विचारायला पाहिजे.

आजही वंचित, उपेक्षित असंख्य आहेत. त्यांना आधाराची गरज आहे. पाणीटंचाई, प्रदूषण, वाढतं शहरीकरण, बेरोजगारी, वाहतूक कोंडी इ. सर्वांना भेडसावणाऱ्या समस्या आहेत. त्यांच्या निवारणासाठी व्यापक प्रमाणावर काम व्हायला पाहिजे. किंबहुना, प्रत्येक माणसाने हव्यास सोडून स्वतःवर काही बंधनं घातली, नियम पाळले, शिस्त लावून घेतली, तर या समस्यांचं निवारण व्हायला वेळ लागणार नाही आणि ती एक समाजसेवाच ठरेल. उपरोल्लेखित व्यक्तींना, संस्थांना आणि समाजासाठी उल्लेखनीय योगदान देणाऱ्या अशा ज्ञात/अज्ञात व्यक्तींना, संकटांवर मात करून स्वतःचं जीवन घडवणाऱ्या प्रेरणादायी व्यक्तींना मनःपूर्वक अभिवादन! कोणीच उपेक्षित, वंचित राहणार नाही, अशा मानसिकदृष्ट्या सुदृढ समाजनिर्मितीची आज खरी गरज आहे. त्या दृष्टीने जर पावलं पडली तर समाजसेवेची गरजच उरणार नाही.

उपरोल्लेखित व्यक्तींनी मानवतेचा जो दीप लावला आहे, तोच तुमच्या-आमच्या मनातही प्रज्वलित होवो, हीच सदिच्छा आणि शुभेच्छा!



ही दीपावली आणि नूतन वर्ष
आपणा सर्वांना सुखसमृद्धीचे जावो, ही कामना !

# पुरस्कार




## संवादु अनुवादु
### आत्मकथन

उमा कुलकर्णी लिखित
'संवादु अनुवादु' या आत्मकथनास
मुंबई मराठी संग्रहालयातर्फे
सर्वोत्कृष्ट आत्मकथनासाठी
'प्रा. वि. ह. कुलकर्णी पुरस्कार २०१८'

## डॉ. आनंद यादव
### - एक साहित्यिक प्रवास

डॉ. कीर्ती मुळीक आणि अप्पासाहेब जकाते-यादव संपादित 'डॉ. आनंद यादव : एक साहित्यिक प्रवास' या संदर्भ ग्रंथास आपटे वाचन मंदिर आणि इचलकरंजी साहित्य संमेलन स्मृती ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने 'उत्कृष्ट मराठी गद्य साहित्यकृती पुरस्कार २०१८'







## मरी मरी जाय सरीर

योजना यादव लिखित
'मरी मरी जाय सरीर' या काव्यसंग्रहास
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त
विद्यापीठ, नाशिक तर्फे 'विशाखा पुरस्कार
२०१८' (द्वितीय पुरस्कार)

## अफलातून मेंदू

डॉ. अनिल गांधी लिखित
'अफलातून मेंदू' या पुस्तकास
अखिल भारतीय मराठी प्रकाशक संघातर्फे
'उत्कृष्ट ग्रंथनिर्मिती पुरस्कार २०१८'







## रेड टेप

अभिजित कुलकर्णी लिखित
'रेड टेप' या कादंबरीस
सार्वजनिक वाचनालय, नाशिक
यांच्या वतीने उत्कृष्ट कादंबरीसाठीचा
'स्व. धनंजय कुलकर्णी पुरस्कार २०१८'

## रेझोनान्स

अजय पांडे लिखित आणि उज्ज्वला
गोखले अनुवादित 'रेझोनान्स' या
कादंबरीस पुणे मराठी ग्रंथालयातर्फे
साहित्यिक कै. श्री. मधुसूदन मुकुंद
शारंगपाणी यांचे स्मरणार्थ
'उत्कृष्ट साहित्यकृती पुरस्कार २०१८'







## नववर्षाची अनपेक्षित भेट!

'कांगारू देशीच्या गोष्टी' या मालिकेतील 'नववर्षाची अनपेक्षित भेट!'
या ख्रिस्तोफर चेंग आणि दी वू लिखित पुस्तकास 'द फेडरेशन ऑफ इंडियन पब्लिशर्स'तर्फे
'प्रादेशिक भाषेतील बालसाहित्याचा सर्वोत्कृष्ट निर्मिती प्रथम पुरस्कार (वार्षिक) २०१८'



# ‘आयर्नमॅन’ मेघ ठकार

**शब्दांकन आणि संकलन : माधवी ठकार आणि प्रतिनिधी (मेहता मराठी ग्रंथजगत)**

*स्थळ होतं अमेरिकेतलं २९व्या क्रमांकावरचं सर्वांत लोकप्रिय शहर लुईविल... तारीख होती १४ ऑक्टोबर २०१८... मेघ त्याच्या धावपट्टीवरचं शेवटचं काही मीटर्सचं अंतर पार करत होता... आणि ते अंतर पार होत असतानाच एक जागतिक विक्रम प्रस्थापित होत होता.... 'Here comes the birthday boy, record holder, of IRONMAN' हा होता जगातला सर्वांत लहान आणि सर्वांत तरुण... आणि तोही भारतीय... आपल्या महाराष्ट्रातला ‘आयर्नमॅन मेघ ठकार.’*

*मेघ म्हणजे पाऊससरींचा दाता... आकाश आणि धरेला जोडणारा दुवा. त्याचं जितकं आकाशाशी नातं, तितकंच धरेशी आणि तितकंच पाण्याशी...असं अद्‌भुत नाव लाभलेला ‘मेघ ठकार’...ज्यानं आपल्या नावाला साजेसं कर्तृत्व केलं आहे. वयाच्या अठराव्या वर्षी जगातील सर्वांत कठीण मानली जाणारी ‘आयर्नमॅन’ ट्रायथलॉन त्यानं पूर्ण केली आहे. आणि तो जगातला सर्वांत तरुण ‘आयर्नमॅन’ ठरला आहे.*

‘आयर्नमॅन’चा शब्दशः अर्थ सांगायचा तर तो होतो ‘लोहपुरुष’... लोखंडासारख्या दणकट ताकदीचा माणूस म्हणजे ‘आयर्नमॅन’आणि ‘आयर्नमॅन’ ही स्पर्धा तुमच्या फक्त शारीरिक शक्तीचीच नाही, तर मानसिक ताकदीचीही परम सीमा अजमावते. या स्पर्धेचं गांभीर्य लक्षात येण्यासाठी तिचं स्वरूप समजून घेणं आवश्यक आहे. ‘आयर्नमॅन’ ही वर्ल्ड ट्रायथलॉन कॉर्पोरेशन (डब्ल्यूयूटीसी)द्वारा आयोजित एक लांब अंतराची ट्रायथलॉन रेस आहे. ही स्पर्धा सोळा तासांत पूर्ण करावी लागते. या स्पर्धेमध्ये ३.८ कि.मी. पोहणे, १८०.२ कि.मी. सायकल चालवणे आणि ४२.२० कि.मी. धावावे लागते. ही स्पर्धा याच क्रमाने आणि विश्रांतीशिवाय पूर्ण करावी लागते. आणि या स्पर्धेत सहभागासाठीही किमान वय १८ वर्षं पूर्ण असावे लागते. मेघने त्याच्या अठराव्या वाढदिवशी म्हणजे १४ सप्टेंबर २०१८लाच पूर्ण केली. त्यामुळे तो जगातला सर्वांत तरुण ‘आयर्नमॅन’ ठरला आहे. जगातील सर्वांत कठीण एकदिवसीय स्पर्धा म्हणून या स्पर्धेकडे पाहिले जाते. स्पर्धकांच्या सहनशक्तीचा आणि ताकदीचा अंत पाहणारी म्हणून या स्पर्धेची ओळख आहे.

‘आयर्नमॅन’चं हे स्वरूप पाहिल्यावरच तिच्या खडतरपणाची जाणीव होते. ज्या वयात मुलं दोस्तमंडळींसोबत मौजमजेची स्वप्नं पाहत असतात, त्या वयात अशा धाडसाची कल्पनाही एखादाच करेल; पण मेघनं हे स्वप्न पाहिलं आणि अवघ्या चार-पाच महिन्यांत प्रत्यक्षातही आणलं. मेघचं साहसी खेळांवरचं स्वप्न जन्मजात आहे, असं म्हटल्यास वावगं ठरणार नाही. मेघ लहानपणापासूनच पट्टीचा पोहणारा आहे. त्यानं बालवयातच राष्ट्रीय स्पर्धांमध्ये बाजी मारत जलतरणात अव्वल स्थान पटकावलं आहे. त्यामुळे मेघचे वडील विदुर ठकार यांना मेघनं त्याच्या ‘आयर्नमॅन’ होण्याच्या स्वप्नाविषयी सांगितलं, तेव्हा त्याच्या कुटुंबीयांनी त्याच्या निर्णयाचं खुल्या मनानं स्वागत केलं. मुलाविषयी वाटणारी काळजी वरचढ न होऊ देता त्याच्या स्वप्नांना बळ देण्यासाठी मेघचे वडील पुढे सरसावले. त्यातूनच मेघचं स्वप्न अख्ख्या कुटुंबाचं स्वप्न झालं.

या प्रवासात मेघच्या वडिलांना जणू ‘मेरा नाम करेगा रोशन...जग में मेरा राजदुलारा..’ अशी खात्री होती. मेघच्या वडिलांची पुण्यात सायकलची शोरूम आहे. त्यामुळे मुळातच सायकलिंग आणि इतर खेळांशी निगडित व्यक्तींशी त्यांचा संपर्क येतो. त्यामुळे ‘आयर्नमॅन’शी संबंधित काही लोकांशीही त्यांचा संपर्क होता. त्यांना या स्पर्धेची नेमकी जाणीव होती. आणि आपल्या मुलावरही तितकाच विश्वास होता. त्याच विश्वासानं ते मेघच्या सरावातही सहभागी झाले. आणि मेघ ठकार लुईविल इथं होणाऱ्या ‘आयर्नमॅन’ स्पर्धेत सहभागी होईल, हे पक्कं झालं. मेघच्या आई माधवी ठकार पूर्ण वेळ नोकरी करतात. त्यांनीही मुलाच्या निर्णयाला पूर्ण पाठिंबा दिला. मेघचे आजोबा निवृत्त एअरफोर्स पायलट विंग कमांडर शरद ठकार यांनी तर नुसता पाठिंबाच दिला नाही, तर ते मेघबरोबर सरावातही सहभागी झाले. ते स्वतः मेघबरोबर सकाळी सहा वाजता व्यायामाला जाऊ लागले. मेघची आत्याआजी शशीताई ठकार म्हणजे मेघचं आणखी एक प्रेरणास्थान. पाचगणी येथील संजीवन विद्यालयाच्या चेअरमन असणाऱ्या शशीताईंनी स्फूर्तिदायी गोष्टी सांगत मेघला आणखी बळ दिलं. मेघची स्पर्धा सुरू असताना त्याची आई, आजोबा, शशीआजी, प्रसादमामा आणि अंबिकामामी यांच्याबरोबर त्यांचे अनेक हितचिंतक रात्रभर जागून मेघची स्पर्धेतील आगेकूच अनुभवत होते.

मेघच्या वडिलांनी पुण्यातील ‘आयर्नमॅन’ कौस्तुभ राडकर यांच्या मदतीनं मेघच्या सरावास सुरुवात केली. मेघनं कौस्तुभ राडकर यांचे ट्रेनिंग प्लॅन्स अमलात आणले. कौस्तुभ यांनी मेघच्या शारीरिक क्षमतांचा आढावा घेत सरावाची रीतसर योजना आखली. फिटनेस फर्स्टच्या विजय गायकवाड यांनी मेघच्या फंक्शनल ट्रेनिंग आणि स्ट्रेंग्थ ट्रेनिंगवर जातीनं लक्ष दिलं. मेघच्या स्वीमिंगचं श्रेय त्याच्या स्वीमिंग मार्गदर्शक कल्पना आगाशे यांना जातं. मेघच्या लहानपणापासून त्या त्याला स्वीमिंगचे धडे देत आहेत. स्वीमिंगचं बाळकडू प्यालेल्या मेघसाठी स्वीमिंगचा सराव तसा फार कठीण नव्हता; पण धावणं आणि सायकलिंग मात्र जीवघेणं होतं. त्यात ट्रायथलॉनमध्ये एकाच दिवशी तिन्ही गोष्टी न थांबता



करायच्या होत्या. १८०.२ किलोमीटरचं सायकलिंग म्हणजे अगदी मुंबई ते पुणे असा सायकल प्रवास. या सायकलिंगच्या सरावासाठी मेघनं 'लोणावळा आणि लव्हासा' हा मार्ग निवडला. हा मार्ग मुळातच डोंगर चढणीचा. या मार्गावर गाडी चालवणाराही थकून जातो; पण हाच चढा मार्ग मेघच्या सरावासाठी पूरक ठरला. मेघचा हा मार्गावरचा सराव सुरू झाला. या सरावात मेघ सायकलवर असायचा, तर त्याचे वडील कार चालवत त्याला सोबत करायचे. या सरावातही मेघचे प्रशिक्षक त्याला संयम बाळगायला सांगायचे; पण मेघचं तरुण रक्त जास्तीत जास्त खडतर सरावासाठी आसुसलेलं असायचं. सोमवार ते शुक्रवार रोज सकाळी दोन ते अडीच तास तो पुणे विद्यापीठात सराव करायचा. शनिवार, रविवार त्याचा सराव तब्बल चार ते सहा तासांचा असायचा. यात लांब पल्ल्याचं सायकल रायडिंग आणि रनिंगवर तो भर द्यायचा. या सरावादरम्यान त्याला रोज सकाळी साडेचारला उठावं लागे. तर रोजची साडेसात ते आठ तासांची झोप घ्यावी लागे. त्यानं जून ते सप्टेंबर असे चार महिने असा कसून सराव केला. स्वतःचं डाएट सांभाळलं. त्याचा हा धाडसी, जगावेगळा उपक्रम बघून Scotts Sports Ltd. या स्वित्झर्लंड आणि युरोपमधील अग्रणी कंपनीनं त्याला हार्डवेअर आणि इक्विपमेन्ट स्पॉन्सरशिपही दिली.

पण इतक्या सरावानंतरही प्रत्यक्ष स्पर्धे वेळी या सायकलिंगनंच मेघपुढे आव्हानं उभी केली. प्रत्यक्ष स्पर्धेच्या दिवशी अमेरिकेतील हवामान अगदीच प्रतिकूल झालं. तापमानाचा पारा तीन ते चार अंशांवर आला. अचानक पाऊस सुरू झाल्यानं हवेत गारठा पडला. अमेरिकेतल्या चार डिग्री तापमानात सायकल चालवताना ८० किलोमीटरचं अंतर पार केल्यानंतर मेघचे पाय साथ देईनासे झाले. अचानक बदललेल्या वातावरणाशी जुळवून घेताना आणि सततच्या शारीरिक तणावामुळे आणि शरीरातील पाण्याची व क्षारांची पातळी खालावल्यामुळे त्याच्या पायात




**मेघचे स्पर्धेपूर्वीचे छायाचित्र**

**आयर्नमॅन स्पर्धेत स्वीमिंगसाठी सज्ज होताना मेघ**



**याच स्पर्धेत धावताना मेघ**





**वडील विदुर ठकार यांच्यासमवेत मेघ**

गोळे येऊ लागले. त्याला त्या जागेवरच जवळपास ४७ मिनिटं बसून राहावं लागलं. क्षारासाठीच्या टॅब्लेट्स आणि पाणी पिऊन तो स्वतःला पुन्हा स्पर्धेसाठी तयार करत होता. एक मन त्याला मागे खेचत होतं तर दुसरं मन त्याला असंख्य जखमा होऊनही स्पर्धा पूर्ण करणाऱ्या माणसांच्या गोष्टी सांगत होतं आणि पुढे जाण्याची प्रेरणा देत होतं. मेघनं दुसऱ्या मनाचं मनावर घेतलं आणि पुन्हा आपला प्रवास सुरू केला.

आयर्नमॅनच्या रेकॉर्डमधील मेघच्या कामगिरीवर नजर टाकली की त्याच्या अगम्य जिद्दीची साक्ष पटते. लुईविल स्पर्धेत २७०० स्पर्धकांनी सहभाग नोंदवला. मेघ १८ ते २४ वयोगटातला सर्वांत तरुण स्पर्धेक. त्याची ओव्हरऑल रँक १५०६ तर जेंडर रँक ११२८ आहे. तर स्वीमिंगमध्ये त्याच्या वयोगटात त्याची रँक तिसरी आहे, तर सर्वसाधारण गटात नववी आहे. आयर्नमॅनच्या रेकॉर्डमध्ये त्याच्या नावावर १४४४ पॉइंट जमा आहेत. त्यानं १३ तास ५३ मिनिटं आणि २० सेकंदांत ही स्पर्धा पूर्ण केली. त्यातील १२ मिनिटं ३८ सेकंद त्यानं स्वीमिंग केलं. ७ तास, ४६ मिनिटं आणि ११ सेकंद त्यानं सायकल चालवली, तर ५ तास २७ मिनिटं आणि २९ सेकंद त्यानं धावण्याचा विक्रम केला. हे सारंच मेघला सलग करायचं होतं. बारा मिनिटं स्वीमिंग केल्यानंतर अवघ्या दहाएक मिनिटांत त्यानं सायकलिंग सुरू केलं आणि सायकलिंगचा सुमारे १८० किलोमीटरचा टप्पा पूर्ण केल्यानंतर पंधरा मिनिटांनी धावायलाही सुरुवात केली.

अशक्यप्राय आयर्नमॅन पूर्ण केल्यानंतरही मेघचा प्रवास तितक्याच जिद्दीनं सुरू आहे. आतापर्यंत त्यानं तीन हाफ मॅरेथॉनमध्ये सहभाग नोंदवला आहे. टाटा मुंबई मॅरेथॉन आणि सातारा हिल मॅरेथॉनमध्येही त्यानं सहभाग नोंदवला आहे. ऑक्टोबर २०१९मध्ये गोव्यात होत असलेल्या हाफ आयर्नमॅनमध्येही तो सहभागी होणार आहे.

उणापुरा अठरा वर्षांचा मेघ ठकार. पहिली ते बारावी पुण्यातील सेनापती बापट रोडवरील विखे-पाटील मेमोरिअल स्कूलमध्ये शिकलेला मराठी मुलगा. मे २०१९मध्ये नीट परीक्षा देऊन तो फर्ग्युसन महाविद्यालयात फिजिओथेरपी विषयात पदवी शिक्षण घेतो आहे. त्यानं आयर्नमॅन स्पर्धेत सहभागासाठी महाविद्यालयात सुट्टीसाठी अर्ज केला, तेव्हा त्याच्या शिक्षकांनी आयर्नमॅन हा शब्दही ऐकला नव्हता; पण आयर्नमॅन पूर्ण केल्यावर त्याच महाविद्यालयात मेघचा खास सत्कार करण्यात आला. त्याच्या विखे-पाटील स्कूलमध्ये वार्षिक क्रीडा स्पर्धांना त्याला प्रमुख पाहुणा म्हणून बोलावण्यात आलं. ज्या शाळेत आपण शिकलो, त्या शाळेत प्रमुख पाहुणा म्हणून झालेला हा सत्कार चिरंतन लक्षात राहणार असल्याचं मेघ सांगतो. आपल्या शाळेला, महाविद्यालयाला आपला अभिमान वाटावा, अशी कामगिरी आपल्या हातून घडल्याचं समाधान त्याच्या चेहऱ्यावर झळकतं.

आजच्या जीवघेण्या स्पर्धेच्या युगात मुलं करिअरच्या मार्गावर धावत राहतात. हे धावणंही संयमाची परीक्षा पाहणारंच असतं; पण संयम या शब्दाचीच परीक्षा पाहणारी कामगिरी मेघ ठकारनं पूर्ण केली आहे. साहसी खेळांमध्ये भारताला आजही युरोप-अमेरिकेच्या तुलनेत फार यश मिळालेलं नाही. मुळात अशा साहसाचं बाळकडूच आपल्याकडे दिलं जात नाही. त्यामुळे अशा साहसी स्पर्धांना आवश्यक असणारं मार्गदर्शन आणि साधनसुविधा आपल्याकडे उपलब्ध नाहीत. अशा परिस्थितीत मेघसारखी मुलं मोठ्या जिद्दीनं अनवट वाटा निवडत आहेत. त्यांच्या धैर्याला सलाम!

madhavithakar@gmail.com



नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी आजच वर्गणीदार व्हा.

# मेहता मराठी ग्रंथजगत

## 'मेहता मराठी ग्रंथजगत' दिवाळी अंकास मिळालेले पुरस्कार

महाराष्ट्र साहित्य परिषद अ.स. गोखले स्मृत्यर्थ **'रत्नाकर पुरस्कार' २००९**

मराठी वृत्तपत्र लेखक संघ, मुंबई यांच्या वतीने **'उत्कृष्ट अंक पारितोषिक' २००९**

**'उत्कृष्ट अंक पारितोषिक' २०११**

रोटरी क्लब ऑफ पुणे, पर्वती आणि लोकमान्यनगर तर्फे

**'रोटरी लोकमान्य पुरस्कार' दिवाळी अंक स्पर्धा २०१०**

**'रोटरी लोकमान्य पुरस्कार' दिवाळी अंक स्पर्धा २०११**

नंदा फाउंडेशनचा राज्यस्तरीय **'नविवा दर्जेदार दिवाळी अंक पुरस्कार २०१०'**

दिनमार्क पब्लिकेशन तर्फे **'छंदश्री आंतरराष्ट्रीय दिवाळी अंक पुरस्कार २०१७'**

दिनमार्क पब्लिकेशन तर्फे **'छंदश्री आंतरराष्ट्रीय दिवाळी अंक पुरस्कार २०१८'**

**३ वर्षांची वर्गणी ₹४५०**

**५ वर्षांची वर्गणी ₹६००**

**३ वर्षांची वर्गणी ₹३००**

'मेहता मराठी ग्रंथजगत'
डिजिटल अंक


**५ वर्षांची वर्गणी ₹४००**

**वर्गणीदारांना आमची सर्व पुस्तके सवलतीत मिळतील.**


**पोस्टखर्चासह रक्कम मनीऑर्डर अथवा डिमांड ड्राफ्टद्वारा पाठवावी.**

**लवकरच वर्गणीदार व्हा व सवलतीचा लाभ घ्या**

**तीन वर्षांना २५% | आमच्या पुस्तकांवर वर्गणीदारांसाठी सवलत | पाच वर्षांना ३०%**








Available on
**play.google.com / store / books**
**www.amazon.in**

## नवं कोरं




आशिकी सिनेमाच्या यशानं यशोशिखरावर असतानाच जीवघेण्या अपघातात तिच्या देहाची चाळण झाली... पण तिनं मृत्यूलाही नतमस्तक व्हायला भाग पाडलं... गोठवून टाकणाऱ्या अनुभवांनी भरलेली अनू अगरवालच्या आयुष्याची शब्दयात्रा..


# 'अनू' प

मूळ लेखक - अनू अगरवाल
अनुवाद - सुप्रिया वकील

पृष्ठसंख्या : १५२
किंमत : ₹२५०

Book Available

---




सागरावर स्वारी करत 'म्हादेई'या शिडाच्या बोटीतून पृथ्वीपरिक्रमेचा पराक्रम करणाऱ्या पहिल्या भारतीय दर्यावर्दीची विलक्षण जलयात्रा...


# सागरी परिक्रमेचा पराक्रम

मूळ लेखक - दिलिप दोंदे
अनुवाद - मुक्ता देशपांडे

पृष्ठसंख्या : ३००
किंमत : ₹३९५

Book Available

---





डोंगरदऱ्यांना पायतळी तुडवणारा एकटा वाटाड्या.. मृत्यूच्या खाईत लोटला जातो..विस्तीर्ण दरीच्या मध्यात अवाढव्य खडकाखाली अडकलेला हात आणि मैलोनमैल एकही माणूस नाही..ते फक्त १२७ तास नव्हते, तर मृत्यूशी खुला लढा होता.. काल्पनिक साहसकथांना लाजवेल अशी जिगरबाज ॲरन राल्स्टनची अद्वितीय सत्यकथा...

# ते १२७ तास!

मूळ लेखक - ॲरन राल्स्टन
अनुवाद - रेश्मा कुलकर्णी-पाठारे

पृष्ठसंख्या : २६४
किंमत : ₹३६०



# ‘झाडं मला तपश्चर्येला बसलेले ऋषी वाटतात.’

**- सयाजी शिंदे**

*पाचवी-सहावीत असेन. जळण आणायला डोंगरावर जावं लागायचं, तेव्हा तिथल्या झाडांवर मी मारलेल्या ठोका आणि त्या झाडाची थरथर...तेव्हा पहिल्यांदा जाणवली. ती थरथर अस्वस्थ करत राहिली आणि ती थरथर त्या वयात एका कवितेत अवतरली. त्या झाडावरचा प्रत्येक घाव...त्या घावाचा काळीज चिरत जाणारा आवाज... त्या झाडाचं हतबल होऊन पडणं...त्याला घरी आणणं... वाळवणं...जाळणं...त्याची राख होणं...हे सारं मला मानवी जगण्याहून वेगळं वाटत नव्हतं. तिथे जन्म होता... जगण्यासाठीचा संघर्ष होता...मरणयात्रा होती... अंत्ययात्रा होती...आणि ते सारं त्या कवितेत अवतरलं. आज माझ्याजवळ ती कविता नाही; पण त्या कवितेतल्या प्रतिमांनी झाडांचं जिवंत असणं माझ्या मनःपटलावर कायमचं कोरलं. त्या कवितेत उतरलेला तो खट्ट..खर्र...हा नाद अजूनही मेंदूत नोंदवला गेला आहे, ज्यातून मला नवं बी रुजवण्याची प्रेरणा सतत मिळते. झाडं मला तपश्चर्येला बसलेले ऋषी वाटतात. त्यांचं मरण मला स्वस्थ बसू देत नाही.*

**- सयाजी शिंदे**

नऊवारीच्या सुतासारखी मऊ आणि तिच्या काठासारखी तेजस्वी माझी आई. भूमिपुत्राचा वारसा कायम अंकुरत ठेवण्याचं वरदान घेऊन आलेली. तिला या धरेचा संसार नेमकेपणानं उमजलेला. झाडांनी अंग धरल्याशिवाय माणसाचं जगणं मूळ धरू शकत नाही, ते तिला उमगलेलं. तिची ती समज तिच्या व्यवहारात प्रतिबिंबित व्हायची. आई विदर्भात जावो नाहीतर गोव्यात...ज्या मातीत पाय टाकायची, तिथली आठवण म्हणून कायम तिथून बिया घेऊन यायची. आणि त्या आमच्या मातीत मूळ धरायच्या. असं बाळकडू मिळालेलं तिचं पोर आणखी कोणत्या वाटेवर जाईल? त्याची वाट त्याच्या मायनंच निश्चित केलेली असेल ना ? ...रानावनातली वाट...झाडाझुडपातली वाट..शेतातली वाट...वनराईतली वाट...माझ्या आईनं मला ही वाट दाखवली...मी 'सयाजी' त्याच वाटेवरून पावलं टाकतो आहे.

शेतकऱ्याच्या पोराची माय माती असते आणि बाप झाड. खऱ्या मायबापासोबतच या मायबापांसोबत आयुष्याची बाराखडी गिरवायला सुरुवात झाली. लहानपण डोंगरदऱ्यांमधल्या निर्मळ हवेत गेलं. पाचवी-सहावीत असेन. जळण आणायला डोंगरावर जावं लागायचं, तेव्हा तिथल्या झाडांवर मी मारलेल्या ठोका आणि त्या झाडाची थरथर...तेव्हा पहिल्यांदा जाणवली. ती थरथर अस्वस्थ करत राहिली आणि ती थरथर त्या वयात एका कवितेत अवतरली. त्या झाडावरचा प्रत्येक घाव...त्या घावाचा काळीज चिरत जाणारा आवाज...त्या झाडाचं हतबल होऊन पडणं...त्याला घरी आणणं...त्याला वाळवणं...त्याला जाळणं...त्याची राख होणं..हे सारं मला मानवी जगण्याहून वेगळं वाटत नव्हतं. तिथे जन्म होता... जगण्यासाठीचा संघर्ष होता...मरणयात्रा होती... अंत्ययात्रा होती...आणि ते सारं त्या कवितेत अवतरलं. आज माझ्याजवळ ती कविता नाही; पण त्या कवितेतल्या प्रतिमांनी झाडांचं जिवंत असणं माझ्या मनःपटलावर कायमचं कोरलं. त्या कवितेत उतरलेला तो खट्ट..खर्र...हा नाद अजूनही मेंदूत नोंदवला गेला आहे, ज्यातून मला नवं बी रुजवण्याची प्रेरणा सतत मिळते.

झाडं मला तपश्चर्येला बसलेले ऋषी वाटतात. त्यांचं मरण मला स्वस्थ बसू देत नाही. त्या अस्वस्थतेतूनच मी 'तुंबारा' हे नाटक लिहिलं. 'तुंबारा' हे मुक्त छंदातलं काव्यनाट्य होतं. या नाटकातही माणसाच्या उत्क्रांतीचा प्रवास मांडताना निसर्गाचं महत्त्व मला स्पष्ट करायचं होतं. माणूस आधी प्राणी होता. त्यानं झाडं तोडली आणि घरं बांधली. एकेका टप्प्यावर तो विकासाच्या नावावर झाडांच्या कत्तली करत राहिला. आणि या विकासानंतर पुन्हा त्याला रानात जावंसं वाटू लागलं आणि तो म्हणू लागला,

आता रानात जाऊया...
आता डोंगरात जाऊया...
तिथं एक कोंब...
दोन कोंब...
कोंबच कोंब...
एक आपलं झाड,
त्याची तिथंच होणार वाढ...
खरखरीत मायाळू कडा,
त्याला झाडाचा पडलाय वेढा...
दगडाचं झाड विशाल,
त्यावर झाडाची एक मशाल...

तर अशा पद्धतीनं संपूर्ण मानव जातीला सारं सोडून हे कोंब रुजवावे लागणार आहेत. तोच आपल्या अस्तित्वाचा संघर्ष असणार आहे, अशा संकल्पनेवर आधारित ते नाटक होतं; पण हे नाटकही पुरेसं वाटत नव्हतं. त्यातून माझी स्वतःपुरतीच एक चळवळ सुरू झाली. वाढदिवसाला



**आपल्या आईसमवेत सयाजी शिंदे**

किंवा कुठल्याही समारंभात भेट म्हणून मी झाडं घेऊन जाऊ लागलो. हे सुरू असतानाच २०१६मध्ये पांढरवाडीला एका दुष्काळी गावाला भेट द्यायला गेलो. तिथली मीटिंगच एका उघड्याबोडक्या माळावर होती. माळरानातल्या तळपत्या उन्हात ती मीटिंग सुरू होती आणि या मीटिंगमध्ये 'पावसासाठी काय करायचं, शेतकऱ्यांनी काय करायचं,' अशी चर्चा सुरू झाली. त्या मीटिंगमध्ये बोलतानाच माझ्या लक्षात आलं की आपण नक्की काय करायला हवं. मी तिथल्या जाणत्या म्हाताऱ्यांना विचारलं, 'हा माळ पूर्वापार असाच उघडाबोडका होता का?' त्यावर त्यांनी सांगितलं, 'नाही...इथं भरपूर झाडंझुडपं होती.' हे उत्तर ऐकताच मी त्यांना सुचवलं की, सर्वांत आधी आपण इथं सर्वांनी पाच-पाच झाडं लावायला सुरुवात करू. तिथंच ही संकल्पना उदयाला आली आणि मी माझ्या गावी पहिल्यांदा दोन हजार झाडं लावली. त्यातून या चळवळीला उत्तेजन मिळालं.

ही चळवळ सुरू करताना मनाशी एक पक्कं होतं- आपण उपदेश करायचा नाही. कुणी काय करायला हवं, हे सांगायचं नाही. फक्त आपल्या कृतीतून दाखवून द्यायचं. आपण फक्त काम करायचं. आणि चार-पाच वर्षांनी ती झाडंच आपली गोष्ट सांगू लागतील. आपल्या कामाची प्रचिती देतील. हे काम हळूहळू स्वतःच विस्तारू लागलं. एका गावापुरतं मर्यादित न राहता इतर जिल्ह्यांमध्ये याचा प्रसार होऊ लागला.

वृक्षसंवर्धनाची मोहीम सुरू झाली; पण त्यातही आव्हानं होती. सर्वांत मोठं आव्हान होतं, झाडांबद्दलच्या अज्ञानाचं. आपल्या मातीला पोषक ठरतील, आपल्या निसर्गाला पोषक ठरतील अशा देशी झाडांचं महत्त्व पटवून देण्याचं हे आव्हान होतं. साताऱ्यात गुलमोहर महोत्सव भरवला जात होता. हा उपक्रम चांगला असला तरी लोकांना गुलमोहर लावू नका, हे सांगणं अवघड होतं. गुलमोहराच्या जागी निसर्ग समतोलासाठी आवश्यक असणारी झाडं रुजवणं अधिक गरजेचं होतं; पण तिथल्या लोकांना उपदेश देत बसण्यापेक्षा मी स्वतःच साताऱ्यात 'काटेसावर महोत्सव' भरवला. काटेसावराचं झाड म्हणजे जणू आधारवड. हे झाड सुमारे चाळीसभर पक्ष्यांना निवारा देतं. आठ-दहा जनावरांना त्यातून अन्न मिळतं. त्यामुळे मी 'काटेसावर महोत्सव' भरवत माझ्या कृतीतून उत्तर दिलं. तसंच, 'बेल महोत्सव', 'लिंब महोत्सव' अशा देशी झाडांच्या संगोपनाला चालना दिली.

देशी झाडं आपल्या मातीचं इमान राखणाऱ्या पोरांसारखी असतात. लिंबच बघा ना..आपल्या किती पिढ्या या लिंबाच्या सोबतीत वाढल्या. त्याला कोणत्याही मातीत, कशाही परिस्थितीत टाका. त्याच्या बिया प्रतिकूल परिस्थितीतही मूळ धरतात; पण आपली तथाकथित सुशिक्षित माणसं गुलमोहर लावत सुटतात. मग आपण हा कसला विकास करत आहोत. आपल्या विचारांचा पायाच चुकीचा आहे. जणू आपण अक्कल गहाण ठेवून पदव्या घेतल्या आहेत, अशी परिस्थिती आहे. तर हे सगळं कसं बदलायचं, ते बदलण्यासाठी प्रत्यक्ष कृतीच महत्त्वाची आहे. त्यातूनच काय योग्य आहे, याचा प्रसार होईल. म्हणूनच आपली मूळ भारतीय झाडं वड, पिंपळ, बोरी, बाभळी, जांभूळ, बकुळ ही झाडं लावण्यावर आमचा भर आहे. गिरिपुष्पसारख्या संकल्पनेतून जी विदेशी झाडं आपल्याकडे आली आहेत, ते आपल्या जमिनीवर झालेलं मोठं आक्रमण आहे आणि हे छुपं युद्ध आहे. ज्यामुळे शेतकऱ्यांच्या जमिनीची वाताहत होत आहे; कारण आपल्या समृद्ध डोंगरदऱ्यांमध्ये जी झाडं आहेत, ती आजही अगदी

**वृक्षारोपण प्रसंगी उपस्थितांशी संवाद साधताना सयाजी शिंदे**





**वृक्षारोपण करताना सयाजी शिंदे**

किरकोळ पाच-पन्नास रुपयांसाठी तोडली जात आहेत. हे युद्ध नियंत्रणाबाहेरचं युद्ध आहे. आणि यावर नियंत्रणासाठी सर्वांत आधी सरकारी धोरणात बदल होणं गरजेचं आहे. रोपवाटिकेची संकल्पना मुळापासून बदलण्याची गरज आहे.

**झाडावरचा निबंध नको, मुलांच्या हाती सोपवा बी**

वृक्षारोपणाच्या नावावर हे एक मोठं रॅकेट राबवलं जातं आहे, निसर्गसंवर्धन केवळ घोषणांमध्ये अडकून पडलं आहे, याचं प्रत्यंतर अगदी शालेय स्तरापासून येतं. मुलांना निव्वळ 'झाडे लावा, झाडे जगवा' असल्या घोषणा द्यायला लावण्यात काय हशील आहे? मुलांच्या हातात सरळ बिया दिल्या, त्यांना एकेक रोप लावायला तयार केलं, त्यांनी ते वाढवलं आणि दहावीपर्यंत त्यांचं झाड वाढलं तर त्याला जे दहा-बारा मार्क्स मिळतील, ते त्याचे खरे मार्क्स असतील. ते मार्क्स तो आयुष्यभर विसरू शकणार नाही. ते बी फक्त शाळेच्या प्रांगणात रुजणार नाही, तर प्रत्येक विद्यार्थ्याच्या मनात रुजेल. झाडावरचा निबंध लिहून मुलांना मार्क्स देण्याला काहीच अर्थ नाही. शालेय पातळीवरच निसर्गसंवर्धनाचं महत्त्व अधोरेखित न केल्यानं पर्यावरणाचा ऱ्हास झाला आहे. शिक्षणपद्धतीनं विद्यार्थ्यांची मातीशी असणारी नाळ तोडली आहे. ती जोडली गेली पाहिजे.

**झाडाची गोष्ट सांगणारं 'ट्री स्टोरी' फाउंडेशन**

वृक्षसंवर्धनासाठी आधी सह्याद्री वनराईचा प्रकल्प सुरू झाला. त्याचंच विस्तारित रूप म्हणजे 'ट्री स्टोरी फाउंडेशन.' सह्याद्रीच्या प्रकल्पावेळी लोकांना प्रकल्पाची संकल्पना समजावून सांगणं थोडं कठीण जात होतं. म्हणून त्याचं 'ट्री स्टोरी'त रूपांतर झालं. 'ट्री स्टोरी' म्हणजे झाडाची गोष्ट. प्रत्येकानं आपलं झाड लावायचं आणि त्याची गोष्ट सांगायची, ही त्यामागची मूळ संकल्पना. अशा विविध संकल्पनांची निर्मिती करण्यावर प्रकल्पाचा भर आहे.

**पुरेसा ऑक्सिजन मिळणं हीच 'श्रीमंती'**

अभिनेता असो वा सामान्य माणूस, प्रत्येकासाठी मनाचा आनंद सर्वांत मोठी गोष्ट आहे. माझ्या जगण्याचा मूलाधार शोधताना मला सर्वांत प्रथम आई आठवते. आईनं मला जन्म दिला. मला वाढवलं; पण आईबरोबरच कुणी मला जिवंत ठेवलं असेल, तर ती झाडं आहेत. मी जो ऑक्सिजन घेतो आहे, मी जो भाजीपाला खातो आहे, ते सगळं झाडांकडून मिळतं. झाडांसारखं निःस्वार्थी कुणीच नाही. एका झाडाची फांदी तोडली, तरी दुसरं झाड फळं देतं. मरेपर्यंत ऑक्सिजन देतं. असा पुरेसा ऑक्सिजन मिळणं, हीच माझ्यासाठी 'श्रीमंती'ची व्याख्या आहे. मी पन्नास हजारांच्या खोलीत राहिलो काय किंवा पन्नास लाखांच्या, मला मिळणारा ऑक्सिजन मोफतच मिळतो. म्हणून मला वाटतं, आपण श्रीमंतीची व्याख्याच बदलायला हवी. तुमच्याकडे कितीही पैसे असतील, पण तुम्हाला पुरेसा ऑक्सिजन मिळाला नाही, तर तुमचं आयुष्यच संपतं. त्यामुळे झाड ही सर्वांत अमूल्य गोष्ट आहे; पण त्या झाडाच्या जिवावरच सगळे उठले आहेत. माळच्या माळ, डोंगरच्या डोंगर उजाड करून टाकले आहेत. त्यामुळे आयुष्यात मोकळ्या जागा भरत राहिलं तरी पुरेसं आहे.

शाळेत मोकळ्या जागा भरणं सर्वांत जास्त मार्क्स मिळवून देणारा प्रकार होता. शिक्षक सांगायचे, मोकळ्या जागा नीट भरा, सोपे प्रश्न सोडवा, भरपूर मार्क्स मिळतील. तसंच आताही आपण मोकळ्या जागा भरायला शिकायला हवं. हाच सर्वांत सोपा उपाय आहे. मोकळ्या जागांवर झाडं लावत गेलो तर आपण आयुष्याची परीक्षा नक्की पास होऊ. मोकळ्या रानांवर लिहा. तिथं देशी झाडं लावा.

परदेशी झाडं दुश्मन नाहीत; पण दोस्त तरी आहेत का?

आपल्या देशी झाडांचं संवर्धन अतिशय महत्त्वाचं आहे. परदेशी झाडं दुश्मन नाहीत; पण ज्या झाडांमुळे आपल्या पर्यावरणाला कसलाच आधार मिळत नाही, ती झाडं आपण का आणतो? दुधाची ॲलर्जी असल्यावर जसं दूध पिऊ नये, तसंच आपल्या मातीला ज्या झाडांची ॲलर्जी आहे, ती झाडं आपण का लावतो? आपल्या प्रकृतीला जे सोसत नाही, ते आपण का करतो? ज्या झाडांचा स्वभावधर्मच वेगळा आहे ती झाडं आपल्याकडे लावली जातात. आणि ती सरकारी धोरणातून लावली जातात, यासारखं दुसरं दुःखं नाही. आपल्याकडच्या तथाकथित सुशिक्षितांना त्याचं कौतुक वाटतं, यासारखी दुर्दैवी गोष्ट नाही.

**लोकप्रियतेचा फायदा**

मी जेव्हा ही मोहीम हाती घेतली तेव्हा काही समविचारी माणसं सोबतीला आली. माणसं सोबत जोडली जात असताना लक्षात आलं की आपली लोकप्रियता, आपला चेहरा एका विधायक कामासाठी महत्त्वाचा ठरतो आहे. चित्रपटसृष्टीनं मला दिलेली ओळख जर अशा पद्धतीनं उपयुक्त ठरत असेल, तर आणखी काय हवं? मला हेच माझं खरं यश वाटतं. त्यामुळे कामातून वेळ मिळेल तसा आणि कधी कधी कामं कमी करून मी या कामात स्वतःला समर्पित करायचा प्रयत्न करत आहे.

**झाडांचा वाढदिवस**

सुमारे तीन-चार वर्षांपूर्वी प्रत्यक्ष कामास सुरुवात झाली. आज सुमारे तीन ते चार लाख झाडं आम्ही लावली आहेत. २३ ठिकाणी हे वृक्षारोपण सुरू आहे आणि आपली सर्व झाडं सुदृढ अवस्थेत जिवंत आहेत. अनेकदा वृक्षारोपण केलं जातं; पण पुढे त्या झाडांचं संगोपन होत नाही. त्यामुळे आम्ही झाडांचा वाढदिवस साजरा करायला सुरुवात केली. मुलांचा वाढदिवस साजरा केला जातो, तसाच आम्ही झाडांचा वाढदिवस साजरा करतो. त्यामुळे दर वर्षी झाडांच्या वाढीवर लक्ष पुरवलं जातं. आपण लावलेली झाडं नीट पोसली जात आहेत का, यावर जातीनं लक्ष पुरवलं जातं. असे जितक्या झाडांचे वाढदिवस साजरे होत जातील, निसर्ग तितकाच बहरत जाईल. त्यामुळे आम्ही दर वर्षी दर ठिकाणी जायचा प्रयत्न करतो. २३ही जागांवर जाऊन तिथल्या झाडांचे वाढदिवस साजरे करतो. जिथे जाणं शक्य होत नाही, तिथे कार्यकर्ते जातात. तिथले व्हिडिओ मला पाठवतात. प्रत्येक वेळी नवी आठ-दहा झाडं लावली जातात. आणि आलेल्या माणसांना झाडं भेटही दिली जातात. झाडांच्या वाढदिवसांबरोबरच आता घोषणाही बदलण्याची वेळ आली आहे. आताच्या घोषणा 'लिंबाच्या नावानं चांगभलं'अशा असायला हव्यात. आता असेच जुलूस निघायला हवेत. शाळेतल्या मुलांच्या रॅली निघायला हव्यात. आणि त्यातल्या घोषणा 'येऊन येऊन येणार कोण..झाडांशिवाय येणार कोण' अशा असायला हव्यात; कारण इथे इतर कसलीही स्पर्धा नाही. इथं जात नाही. धर्म नाही आणि वादही नाही. लिंबाच्या नावानं घोषणा दिल्या तर मुलांमधील सजगता वाढेल. लिंब आपल्याला किती सुदृढ करतो, किती शुद्ध हवा देतो, याबाबतची जाणीव वाढेल.

**वृक्षारोपणाचे महत्त्व सांगताना सयाजी शिंदे**



**आईच्या चिरंतन सोबतीसाठी बियांची तुला**

माझी आई माझ्या जगण्याचा आधार आहे. ती माझ्या आयुष्यात नसण्याची मी कल्पनाही करू शकत नाही. त्यामुळे मी माझ्या आईलाही चिरंतन केलं आहे. आईच्या वाढदिवशी आम्ही तिची बियांची तुला केली. तिच्या वजनाच्या बिया रुजवण्याचा संकल्प केला. आणि आईला सांगितलं, 'या झाडांच्या रूपात तू कायम असशील. त्या झाडांच्या पानांच्या फडफडण्यात तुझा आवाज असेल. त्यावर बसलेल्या पक्ष्यांच्या किलबिलाटात तुझं हसणं असेल...अशी तू कायम माझ्या सोबत असशील.' आणि मला खरंच वाटतं की हे बी ज्या ज्या मातीत रुजेल, त्या त्या जागेवर माझ्या आईचं प्रतिबिंब उमटेल. माझी आई त्या झाडांच्या रूपात कायम माझ्या सोबत राहील.

**सणांचं स्वरूप बदलू या...**

आपले सर्व सण निसर्गाची पूजा करण्याची शिकवण देणारे आहेत; पण आपण मात्र विध्वंस चालवला आहे. सणांमधील पर्यावरणपूरकता आपण नष्ट केली आहे. त्यामुळे आपल्या सणांचं स्वरूपच बदलण्याची वेळ आली आहे. दसऱ्याला आपण आपट्याची पानं तोडून सोनं लुटतो; पण सोनं ही लुटण्याची गोष्ट नसून जपण्याची गोष्ट आहे. त्यामुळे आपण सोनं लुटण्याऐवजी सोनं उगवू या. आपट्याची पानं खुडण्याऐवजी आपट्याची झाडं लावू यात. गणेशोत्सवातही नवी संकल्पना राबवू. दोन-चार फुटांचे मातीचे गणपती तयार करू. त्या गणपतींमध्ये बिया पेरू आणि विसर्जनाऐवजी त्यांना मातीत रुजवू. त्यातून आपले सगळे गणपती जिवंत राहतील. त्यातून आपल्या सगळ्या गणपतींचं चैतन्य अनुभवता येईल. आपले दर वर्षीचे गणपती आपल्याला वाढताना दिसतील आणि ते गणपती नदीनाल्यांचं प्रदूषण करण्याऐवजी निसर्गाला पोषक ठरतील.

**झाडांची सकारात्मकता घेऊ**

जाता जाता इतकंच सांगेन...माणसांमध्ये नकारात्मकता असते. त्यामुळे त्यांच्या सहवासातून नकारात्मक ऊर्जा मिळते. आपल्याला सकारात्मक ऊर्जा हवी असेल तर आपल्याला झाडांकडे जावं लागेल. झाडांची सकारात्मक ऊर्जाच माणसाचा थकवा घालवू शकते. शुद्ध श्वास देते. पुरेसा ऑक्सिजन देते. जगण्याचं बळ देते.


म्हणून पुन्हा तेच सांगेन...'एकच आपलं झाड...आपली तिथेच होणार वाढ...'




**आईची तुला करताना सयाजी शिंदे आणि अन्य उपस्थित**


**शब्दांकन - योजना यादव**
editorial@mehtapublishinghouse.com

# बेस्ट सेलर्स


स्वामी



श्रीमान योगी


राधेय


पावनखिंड



ययाति




अमृतवेल



झोंबी




वपुर्झा



संभाजी


रुचिरा भाग-१



रुचिरा भाग-२


अदम्य जिद्द



नागकेशर




टर्निंग पॉइंट्स




द मॅजिक ऑफ थिंकींग बिग




प्लेइंग इट माय वे




मी मलाला



आवरण


संवादु अनुवादु



हाच माझा मार्ग



लज्जा




नागासाकी



बाजिंद



रेड टेप




प्रभू रामचंद्र आणि श्रीकृष्ण या दोन्ही अवतारांच्या कित्येक कथा आजच्या तरुण पिढीच्या कधी कानावरही पडलेल्या नाहीत वा विस्मृतीच्या पडद्याआड गेल्या आहेत. ख्यातनाम कथालेखिका सुधा मूर्ती वाचकांना अशाच सुरस आणि चमत्कृतीपूर्ण प्रवासाला घेऊन जातात.


## त्रिशंकू

मूळ लेखक - सुधा मूर्ती
अनुवाद - लीना सोहोनी

पृष्ठसंख्या : १७६
किंमत : ₹१९०

Book Available

---




सत्तेच्या मलिद्यासाठी प्रत्येक राजकारणी घरात पेटलेले नवे 'पानिपत'... ज्याला झेंड्याचे आणि पक्षाचे बंधन नाही


## नागकेशर

लेखक - विश्वास पाटील

पृष्ठसंख्या : ४०४
किंमत : ₹४५०

Book Available

---





वयाच्या पाचव्या वर्षी हरवलेला सरू तब्बल २५ वर्षांनी आईला शोधून काढतो... सरू ब्रायर्लींचा तस्मानिया ते इंडिया व्हाया गुगल अर्थ प्रवास...

## घरपरतीच्या वाटेवरती...

मूळ लेखक - सरू ब्रायर्ली
अनुवाद - लता रेळे

पृष्ठसंख्या : १८४
किंमत : ₹२५०

Book Available



# माझी शेती, माझी माणसं

- अजित आपटे

*एमबीएसारखी पदवी घेऊनही शेतीचा पिढीजात चालत आलेला वारसा समृद्धपणे पुढे चालवणारे अजित आपटे. त्यांनी शेतीचं व्यवसायमूल्य तर जाणलंच, पण वाडवडिलांचं समाजसेवेचं व्रतही पुढे चालू ठेवलं. एमबीएची पदवी हाती असली तरी त्यांना शहरातल्या ग्लॅमरस करिअरची भुरळ पडली नाही. तर आपला गाव, आपली माणसं आणि आपली माती त्यांनी जवळ केली आणि गावचा रस्ता धरला. शेतीच्या आणि सायगावच्या विकासाची ही यशोगाथा...*

डेक्कन एज्युकेशन संस्थेची न्यू इंग्लिश स्कूल (सातारा) ही माझी शाळा. या शाळेतून माझ्या शिक्षणाला सुरुवात झाली. दहावीनंतर चांगलं शिक्षण मिळावं, या हेतूनं आई-वडिलांनी पुण्याला ठेवलं. डेक्कन एज्युकेशनच्याच बीएमसीसीमध्ये ॲडमिशन मिळाली. नाटकातून काम करणं मला प्रचंड आवडायचं. अंगात तसे गुणही होते; पण घरी हे चालणार नाही म्हणून १०० टक्के सहभाग टाळत आलो; पण हौस म्हणून शाळा-कॉलेजात गॅदरिंग्ज गाजवली. मजा यायची. कॉलेजमधल्या पाच-सहा प्राध्यापकांच्या, सिनेकलावंतांच्या हुबेहूब नकला करायला जमायच्या. त्यामुळे गेट टुगेदरची मजा आणखी वाढायची. बीएमसीसीमधून मी बी.कॉम. झालो आणि एमबीएही केलं डेक्कन एज्युकेशनच्याच आयएमडीआरमधून. एकूण, माझा संपूर्ण शैक्षणिक प्रवास डेक्कन एज्युकेशनबरोबर झाला.




एम.बी.ए. केल्यानंतर किमान दोन-तीन वर्षं नोकरी करावी, असा बेत होता; पण सातारहून आईचं पत्र आलं, 'अरे, आपल्या घरच्याच उद्योगात तू यावंस असं मला तरी वाटतंय.' मग मी विचार केला आणि सातारला 'शेती क्षेत्रात' यायचं ठरवलं. घरची तशी बऱ्यापैकी शेती होती; पण एम. बी.ए.केल्यानंतरही व्यवहार म्हणून हे क्षेत्र निवडणं, हेसुद्धा ८०-९०च्या दशकात तशी अवघड गोष्ट होती. शेतातील उत्पादनाची, बाजारभावाची कशाचीच खात्री देता येत नव्हती; पण मी चक्क शेती करायची असं ठरवलं, की जे मी कधी स्वप्नातसुद्धा योजलं नव्हतं.

ऊस, आलं, हळद आणि कांद्याचं बियाणं बनवणं, असा आमच्या पिकांचा पॅटर्न होता, जो अजूनही आहे. वडिलांची चाळीस म्हशींची डेअरी होती. आम्ही पारंपरिक पद्धतीनं हळदीचं पीक घ्यायचो; पण मग माझ्या लक्षात आलं की, हे हळद शिजवणं हा जो यातील मुख्य भाग आहे, त्यामध्ये काहीतरी सुधारणा करणं गरजेचं आहे. माझ्या डोक्यात प्रेशर कुकर आला. भात जर कुकरमध्ये शिजतो, तर हळद का बरं शिजणार नाही, म्हणून मी माझ्या साडूंना (अनंत सोमण, ज्यांचा कारखाना आहे पुण्यामध्ये) बोललो आणि हळद शिजवण्यासाठी कुकरचा वापर आपण करू या, असं ठरवलं. त्यांनी भला मोठा, म्हणजे एका वेळेला जवळजवळ ८०० किलो ओली हळद शिजेल, एवढा प्रेशर कुकर बनवून दिला. त्यावर हळद छान शिजू लागली. वाफेवर हळद शिजवणं, हा महाराष्ट्रात सगळ्यात पहिला प्रयोग आम्ही केला. यामध्ये जळणाची बचत, वेळेची बचत आणि कामगारांना त्या मानानं कष्ट कमी, अशी ती त्रिसूत्री होती. नेहमीपेक्षा कमी जळणात म्हणजे एक तृतीयांश जळणात हळद शिजू लागली आणि हळदीची प्रत खूप सुधारली. आता जी हळद शिजवण्याची वाफेची यंत्रं सगळीकडे दिसतात, त्याची खरी सुरुवात आमच्यापासून झाली, असं म्हटलं तर वावगं होणार नाही.

शेतीमध्ये दुसरं नगदी पीक आम्ही घेतो ते म्हणजे 'कांदा बियाणं'. माझ्या आजोबांनी हे पीक घेणं सुरू केलं. मग पुढे वडीलही हे पीक घेऊ लागले आणि शेजारच्या दहा-पंधरा शेतकऱ्यांकडूनही ते हे बियाणं करवून घेऊ लागले. मी शेतीत आल्यानंतर पहिली पाच-सात वर्षं शिकण्यातच गेली; पण मग हळूहळू काय केलं पाहिजे, हे लक्षात आलं. कांदा बियाण्याचा व्याप वाढवायला हरकत नाही, असं वाटलं आणि मग 'कॉन्ट्रॅक्ट फार्मिंग' ही संकल्पना मनामध्ये आली.

उत्तम प्रतीचा कांदा खरेदी करायचा, आजूबाजूच्या गावातील शेतकऱ्यांना तो लागणीसाठी द्यायचा आणि त्यांच्याकडून कांद्याचं बियाणं बनवून घ्यायचं, त्यांना योग्य तो मोबदला द्यायचा आणि आपण आपल्या म्हणजे, आपटे सातारा सीड्स या ब्रँडखाली बियाणं विकायचं. या सगळ्या योजनेमध्ये तिघांचा फायदा झाला. प्रथमतः आमच्या शेतकऱ्यांना १०० टक्के पैसा मिळवून देणारं पीक मिळालं, विक्रीची काळजी मिटली, तसंच कांदालागवड करणाऱ्या शेतकऱ्यांना उत्तम प्रतीचं बियाणं मिळू लागलं आणि आम्हाला या उद्योगामुळे चार पैसे मिळू लागले.

win-win पोझिशन होती. मग हळूहळू व्याप वाढायला लागल्यावर बियाणं ग्रेडिंग करण्यासाठी हरयाणामधून दोन मशिन्स आणली, जेणेकरून निवडून, हलकं- बारीक बियाणं बाजूला काढून उत्तम प्रतीचं बियाणं आपण कांदा पिकवणाऱ्या शेतकऱ्यांना देऊ शकू. आता जवळजवळ २५ वर्षं हा उद्योग सुरू आहे आणि बियाणं

बनवणाऱ्या शेतकऱ्यांनी व बियाणं घेणाऱ्या शेतकऱ्यांनी मला व मी त्यांना सोडलेलं नाही. आमचा 'फेव्हिकॉल का जोड है, टूटेगा नहीं'. आमच्यामध्ये एक प्रकारचं नातं निर्माण झालं आहे; विश्वास, की जो या धंद्यामध्ये सर्वांत महत्त्वाचा आहे, तो आम्ही नक्कीच निर्माण केला आहे. बियाणं घेणाऱ्यांनी आमचं बियाण्यांचं पोतं, मला आठवत नाही की कधी उघडून बघितलं आहे. दर्जा, गुणवत्ता राखण्यात आम्ही यशस्वी झालो आहोत. यामुळे आमच्याकडे उत्तम प्रतीचा कांदा पुरवणारेसुद्धा अर्थात येतातच. टिकाऊ, रंगाला सुरेख, चमकदार, डबल पत्ती असलेला आमचा कांदा बंगळुरूच्या मार्केटमध्ये बघितल्यावर शेतकरी मंडळी खूश होतात आणि आमच्या कांद्याला त्याच्या गुणवत्तेमुळे, दर्जामुळे इतर कांद्यापेक्षा एक रुपया का होईना अधिक मिळतो, हे नक्की. आज दोन-अडीचशे शेतकऱ्यांचा आमचा संघ आहे आणि आम्ही 'मिलजुलके' छान काम करतोय, असं मला वाटतंय.

आज कर्नाटकमध्ये 'आपटे सातारा सीड्स' हे नाव ज्या त्या शेतकऱ्याच्या तोंडी आहे. गंमत सांगायची म्हणजे नामांकित कांदा बियाणं विक्री करणाऱ्या कंपनीला त्यांच्या बियाण्याच्या पुड्यावर चक्क लिहावं लागलं, की आतील बियाणं हे 'सातारा सीड्स' सारखंच आहे. अमुक अमुक सीड्स, पण सातारा व्हरायटी. मला वाटतं हा आमचा विजय आहे. सातारा हा जसा कंदी पेढ्यांसाठी, कास पठारावरच्या फुलांसाठी प्रसिद्ध आहे, तसाच तो कांद्याच्या बियाण्यासाठीसुद्धा आहे. याचं संपूर्ण श्रेय माझ्या आजोबांना आणि माझ्या वडिलांना जातं की ज्यांनी या उद्योगाची मुहूर्तमेढ रोवली. अशा उद्योगाला मोठं करण्याची जबाबदारी माझी होती. आम्ही तिघांनी आपापल्या परीनं योग्य तो सहभाग घेऊन या उद्योगाला एका उंचीवर नेऊन ठेवलं.

शेती करत असताना आपण आजूबाजूलासुद्धा बघितलं पाहिजे. माझे आजोबा कै. अप्पासाहेब आपटे यांनी खरं तर आयुष्यभर समाजसेवा केली. राष्ट्रीय काँग्रेसचे ते सच्चे कार्यकर्ते होते. खरं तर घरची सावकारी होती; पण त्यांनी आजूबाजूच्या गावांतील बऱ्याचशा शेतकऱ्यांची कर्जे त्यांच्या प्रॉमिसरी नोट्स फाडून टाकून संपवून टाकली. त्यांना गरिबीची जाणीव होती. त्यांच्या हयातीमध्ये त्यांनी त्यांच्या शेतावर काम करणाऱ्यांना थोडी का होईना, पण जमीनसुद्धा दिली. त्यांना जावळी तालुक्यामध्ये खूप मान होता. जिल्हा परिषद सदस्य म्हणून ते एकदा निवडून गेले, तर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत ते संचालक म्हणून होते. (कै.) बाळासाहेब देसाई, (कै.) यशवंतरावजी चव्हाण, (कै.) वसंतदादा पाटील, साताराचे (कै.) किसन वीर ही त्यांची अगदी जवळची माणसं. एक गोष्ट इथे जरूर नमूद करावीशी वाटते, की गांधीवधानंतर

**अजित आपटे यांच्या प्रयत्नांतून सायगाव येथे उभे राहिलेले सभागृह आणि मंदिर**



**बा**बांचा विचार मनात जरी आला तरी डोळ्यांसमोर एक loving, caring, positive, simple, cultured, प्रामाणिक, hard working, emotional, मिस्कील माणूस म्हणून माझे बाबा उभे असतात.

मला बाबांचं सर्वांत आवडणारं वाक्य म्हणजे, 'It takes many good deeds to build a reputation, and only one bad one to lose it.' किंवा 'Be responsible for your own action.' बाबांनी आत्तापर्यंत 'कष्टांना पर्याय नाही,' या विचारावर कायम जोर दिला. त्यांना Politics कधीच जमलं नाही (चांगल्या अर्थानं). जरी ते गावाचे सरपंच झाले असले तरीही फायदा घेऊन काम करणं त्यांना कधीच पटलं नाही आणि जमलं नाही.

सर्व गावकऱ्यांना एकत्र आणून, त्यांच्या समस्या व मूलभूत गरजा जमेल तशा सोडवून गावाचा विकास कसा करता येईल, याचा विचार सतत त्यांच्या डोक्यात चालू असतो. असं म्हणायला हरकत नाही, की बाबा आधी समोरच्या माणसाचा विचार करतात, मग स्वतःचा. त्यांचा निगेटिव्ह गोष्टीकडे पॉझिटिव्हली बघण्याचा दृष्टिकोन खूप इन्स्पिरेशनल आणि टेरिफिक आहे.

बाबा, जरी तू दुनियेच्या नजरेत एक मोठा माणूस झाला असलास, तरी तू माझ्यासाठी एक प्रेमळ बाबा, मित्र म्हणूनच राहणारेस.

**-अश्विनी आपटे**

कित्येकांचे वाडे, घरे जाळली गेली; पण अप्पासाहेबांच्या चार ठिकाणी असणाऱ्या कोणत्याही वास्तूला धक्कासुद्धा लागला नाही. हा त्यांचा नैतिक विजय होता.

सायगावच्या हायस्कूलला ग्रँट मिळत नव्हती, त्या वेळी (कै.) अप्पासाहेबांना घेऊन गावकरी त्या वेळचे मुख्यमंत्री (कै.) वसंतदादा पाटील यांना भेटायला गेले. गावकरी आजही सांगतात, की दादांनी अप्पासाहेबांना मिठी मारली आणि तुम्ही कशाला एवढ्याशा कामाला स्वतः मुंबईला यायचं, असा प्रश्न विचारून दोन मिनिटांत ग्रँट मंजूर केली. हासुद्धा अप्पासाहेबांच्या मोठेपणाचाच भाग होता. त्यांची गावासाठी सतत धडपड चालू असायची. गावकऱ्यांसाठी आरोग्यकेंद्र सुरू करायचं असो किंवा जनावरांसाठी गावात दवाखाना आणायचा असो, अप्पासाहेब कायम पुढे असायचे आणि ते घेतलेलं काम पूर्ण करायचे. बारा बलुत्यांच्या गावात अप्पांना खूप मान होता. बौद्ध विकास सेवा संघाचा बुद्ध जयंती/आंबेडकर जयंतीचा कार्यक्रम मला वाटत नाही की एकही वर्ष अप्पासाहेबांविना किंवा अनुपस्थितीत पार पडलाय. त्यांच्या रक्तात कधीच जातिभेद नव्हता.

सायगावच्या हायस्कूलमध्ये दहावीच्या वर्गाला इंग्रजी शिकवायला ते आवर्जून जात. मला आठवतंय अगदी नववीपर्यंत ते 'टाइम्स ऑफ इंडिया' वाचत असत आणि अडलेले शब्द लिहून ठेवत असत. डिक्शनरीतून ते त्याचा अर्थ काढून लिहून ठेवत असत. फार कमी शब्द त्यांना अडायचे; पण तरीसुद्धा त्यांचा शिरस्ता कधी चुकला नाही. इंग्रजी-मराठी-संस्कृत-गणित सगळ्याच विषयांत त्यांना गोडी होती आणि त्यांचा पाया पक्का होता.

गावामध्ये सरपंचनिवडीच्या वेळी अप्पासाहेबांनी फक्त नाव सांगायचं, एवढंच काय ते असायचं.

गावामध्ये एक कळकाई नावाचं धरण होतं, त्या पाण्याच्या बाऱ्यासुद्धा अप्पासाहेबांनी प्रत्येक शेतकऱ्याला नेमून दिल्या होत्या. फारच व्यवस्थितपणा होता त्यांच्या अंगी. गावातली मुंबईला राहणारी मंडळी सायगावला आली की अप्पा आणि वहिनींना भेटल्याखेरीज जात

**अजित आपटे यांच्या सहभागातून उभे राहिलेले विद्यालय**









**सायगाव येथील लोहिया विद्यालय व ज्युनिअर कॉलेजचे कर्मचारी आणि विद्यार्थ्यांबरोबर अजित आपटे**

नसत. नवपरिणीत जोडपी या दोघांच्या पाया पडायला मुद्दाम येत असत.

अप्पासाहेबांचा व आजीचा एक सगळ्यात मोठा गुण म्हणजे त्यांनी त्यांच्याकडे आलेल्या कित्येक नातेवाइकांचे संसार उभे केले. त्यांना सगळ्या प्रकारे मदत करून त्याचा उच्चारसुद्धा या दोघांनी केला नाही. आप्पा व आजी मधाचं पोळं होतं. कोणत्याही व्यक्तीला त्यांनी कधीच अंतर दिलं नाही. जे करायचं ते मनापासून केलं. दोघांनी मुलांची शिक्षणंसुद्धा व्यवस्थित केली.

गावातील रस्ते असोत की पिण्याचं पाणी, गावाच्या कोणत्याही प्रश्नात अप्पासाहेबांनी पुढाकार घेतला नाही, असं झालं नाही. त्यांनी १९२२मध्ये सायगावला सायफन पद्धतीनं पिण्याचं पाणी उपलब्ध करून दिलं. दोन मोठे हौद बांधले. नवीन जातीचं उसाचं बियाणं आणून आमच्या भागात ऊसशेती विकसित केली. मग ऊस गाळण्यासाठी म्हणून एक मोठं 'गुऱ्हाळ' सुरू केलं. त्यामुळे शेतकऱ्यांची चांगली सोय झाली. शेतकऱ्यांना तेल गाळण्यासाठी म्हणून त्यांनी तेलाची चक्की सुरू केली. पिठाची गिरणी टाकली. गावाला कोणत्या गोष्टींची गरज आहे, हे ओळखून त्यांनी खूप काम केलं. माझ्या काकांच्या म्हणजे एन.डी.आपटे यांच्या मदतीनं त्यांनी गावासाठी एस.टी. बस सुरू केली. १९६५मध्ये त्यांनी सायगावात वीज आणली. १९७५मध्ये त्यांच्या प्रयत्नांतून गावात 'बँक ऑफ महाराष्ट्र'ची शाखा सुरू झाली. हे सगळं मी लहानपणापासून बघत आलोय. त्यामुळे सामाजिक बांधिलकीची जाणीव मला झाली नसती तरच नवल!

माझी समाजासाठी काम करायची सुरवात येरुणकरवाडीपासून झाली. त्या वेळी या वाडीला प्यायला पाणी नव्हतं. त्या गावातील बायका आमच्या शेतावर काम करण्यासाठी यायच्या. त्यांनी माझ्या कानावर ही गोष्ट घातली. त्या वर्षी पाऊस खूपच कमी झाला होता. मग मी माझ्या ट्रॅक्टर ट्रॉलीमध्ये दोन मोठ्या पाण्याच्या टाक्या ठेवल्या. त्यात रोज आमच्या विहिरीवरून पाणी भरून मी त्या वाडीला पाठवायला लागलो. महिनाभर मी हे काम करत होतो. मला खूप समाधान मिळालं आणि समाजासाठी आपण काहीतरी केलं पाहिजे, ही भावना या प्रसंगानंतर वाढीला लागली.

गावामध्ये कोयना एज्युकेशन सोसायटीचं जागृती विद्यालय होतं. शाळेला इमारतीची गरज होती. एनडींच्या ओळखीमुळे आम्ही पुण्याच्या मुकुंदशेठ लोहियांना जाऊन भेटलो. त्यांनी मला विचारलं की, तुम्ही स्वतः लक्ष घालून इमारत पूर्ण करणार असाल तर देतो तुम्हाला साडेबारा लाख रुपये. मी 'हो' म्हटलं आणि दोनच दिवसांत माझ्या खात्यात पैसे जमा झाले. आज सायगावला 'लोहिया विद्यालय व ज्युनिअर कॉलेज'ची इमारत मोठ्या दिमाखात उभी आहे. आणि सुमारे चारशे मुलं इथं शिकत आहेत. काम केल्याचं समाधान मिळतं. दर वर्षी ४० ते ५० गरीब होतकरू विद्यार्थ्यांना गणवेशवाटप, विधवांना आर्थिक मदत, साड्यावाटप असे काही कार्यक्रम चालू असतात. गावामध्ये छोट्या छोट्या कार्यक्रमांसाठी एका हॉलची गरज होती. मग आम्ही आपटे कुटुबीयांनी मिळून 'कै. अप्पासाहेब आपटे सभागृह' बांधून दिलं. माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या हस्ते ते गावाला सुपूर्त करण्यात आलं.

ही सगळी केलेली कामं आणि अप्पासाहेबांबाबत गावकऱ्यांचं असलेलं प्रेम गावानं मला 'सरपंच' बनवून दाखवून दिलं. राजकारण हा माझा पिंड नव्हे; पण समाजकारणात रस असल्यामुळे आणि गावकऱ्यांच्या आग्रहामुळे मी हे पद स्वीकारलं. काम करणाऱ्याला पदाची अपेक्षा नसते किंवा पद असलं म्हणजेच तो काम करतो असं नाही; पण सरपंच झाल्यावर बांधिलकीच्या भावनेतून सरकारी योजनांच्या मदतीनं अंतर्गत रस्ते, गटारं, विजेची सोय या गोष्टी ओघानं आल्याच.

मी कामाची सुरवात एका सुंदर लायब्ररीनं केली. मेहता पब्लिशिंग हाऊसचे सर्वेसर्वा अनिलजी मेहता व सुनील मेहता यांच्यामुळे ते शक्य झालं. मला वाचनाची आवड सुनीलमुळे लागली. सुनील आणि मी बीएमसीसीला पाच वर्षं एकत्र होतो. सहाध्यायी म्हणून आणि हॉस्टेलमध्येही. त्यामुळे अधिक घट्ट मैत्री. तो मला वेगवेगळी पुस्तकं वाचायला द्यायचा. त्यामुळे वाचनाची गोडी वाढत गेली. त्याला विचारून, सल्ला घेऊन मी सुरवातीला अडीचशे पुस्तकं घेतली आणि सायगावला लायब्ररी सुरू केली. मग माझ्या लक्षात आलं, की गावातल्या मुलांना अभ्यास करण्यासाठी, स्पर्धा परीक्षांना बसवण्यासाठी काही पुस्तकांची गरज आहे. मग मी पुन्हा सुनीलला भेटून एमपीएससी, यूपीएससी, तलाठी, ग्रामसेवक, पोलीसभरती, सैन्यभरती अशी जवळजवळ अडीचशे पुस्तकं आणली. आज आमच्या गावातील बरीचशी मुलं शिक्षक, पोलीस, ग्रामसेवक झाली आहेत. सायगाव हे बारा बलुत्यांचं गाव; पण सध्याच्या भाषेत बोलायचं झालं तर 'मार्केट प्लेस', मध्यवर्ती ठिकाण असल्यामुळे लोकांची ये-जा भरपूर आहे.

**गावासाठी केलेली काही कामं-**

१) दिशादर्शक फलक लावले.

२) महिलांना प्रोत्साहन मिळावं म्हणून मंगळागौरीच्या खेळांचं आयोजन केलं.

३) श्रावणात पुण्याचे कीर्तनकार श्रेयस बडवे यांच्या कीर्तनाचे कार्यक्रम केले.

४) लोहिया विद्यालयामध्ये आजोबांच्या स्मृतिदिनानिमित्त विविध क्षेत्रांतील लोकांच्या व्याख्यानाचं आयोजन करतो. सिंधूताई सपकाळ, नितीन बानुगडे, अपर्णा रामतीर्थकर, डॉ. अनिल अवचट, हास्यसम्राट दीपक देशपांडे, कीर्तनकार चारुदत्त आफळे, मनोज अंबिके यांनी आपल्या व्याख्यानांचा लाभ सायगावकरांना दिला आहे. समाजाला एक वेगळा विचार मिळावा, ही या व्याख्यानांच्या आयोजनामागची भूमिका आहे.

५) स्मशानभूमीत शवदाहिनी बसवून घेतली.

६) प्लॅस्टिकच्या वापराला प्रतिबंध करण्यासाठी शाळेतल्या ५०० मुला-मुलींना कापडी पिशव्यांचं वाटप केलं.

७) दर वर्षी लायन्स क्लब ऑफ पुणे यांच्या सहकार्यानं डोळ्यांवर उपचारांचं शिबिर घेतो. आजूबाजूच्या गावांतील दोन-तीनशे लोक शिबिराचा फायदा घेतात. त्यांना चष्म्यांचं वाटप करतो व पुण्याच्या देसाई रुग्णालयात मोतिबिंदू शस्त्रक्रियांसाठी अर्थसाह्य करतो.

८) एक वर्षभर गरीब आणि होतकरू मुलांसाठी स्वतः दर रविवारी सकाळी पोषण आहार देत होतो.

पिण्याच्या पाण्याच्या विहिरीचं पाणी गावाला कमी पडत होतं. मग आम्ही घरातल्या मंडळींनी विचार केला आणि आमचीच दोन गुंठे जमीन गावाला दिली व तिथेच मी गावकऱ्यांना घेऊन नव्या विहिरीची संकल्पना मांडली. सगळी कामं वेगानं झाली. विहीर तयार झाली. गावापर्यंत पाइपलाइनसुद्धा गेली. पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी मिटला. सँड फिल्टर बसवला.

अंगणवाडीमधील मुलांसाठी बाक दिले. त्यामुळे आधीपासूनच छान असलेल्या आमच्या गावाच्या आंगणवाडीला आणखीनच शोभा आली.

गावामध्ये जी काही चांगली कामं झाली ती सरकारी योजनांमधून व आमचे आदरणीय आमदार छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले आणि खासदार छत्रपती उदयनराजे भोसले यांच्या सहकार्यानं पार पडली.

आता जी गावामधून सरपंचाची थेट निवडणूक होते, ती पद्धत

**जे**व्हा 'लोकमत'ने 'कर्तृत्ववान सरपंच' या पुरस्कार विजेत्याचं नाव जाहीर केलं, तेव्हा माझा आनंद गगनात मावेना; कारण ते नाव 'मा. अजित आपटे (सायगाव)' असं होतं. जो माणूस MBA करून शेतीकडे वाळू शकतो, तो माणूस काहीही करू शकतो, याच्यावर माझा खऱ्या अर्थाने विश्वास बसला.

सायगावमध्ये सुविधा कशा उपलब्ध करता येतील, हा विचार करत असताना त्यांनी स्वखर्चातून दिशादर्शक फलक बसविण्याचा निर्णय घेतला तेव्हा मला असं जाणवलं, की बाबा स्वतःच एक दिशादर्शक आहेत आणि त्यांनी आम्हाला सगळ्यांनाच एक दिशा दाखवली आहे, ती म्हणजे पॉझिटिव्हिटी, डेडिकेशन आणि हार्ड वर्क. गुरूनं योग्य वेळी आपल्या शिष्याचं बोट सोडलं, तर तो चांगला शिष्य घडतो, हीच philosophy त्यांनी फॉलो केली. त्यांनी आम्हाला कधीच स्पूनफीडिंग केलं नाही. त्यामुळे आमच्यावरील संस्कारांनी आम्हाला घडविण्यात ते यशस्वी ठरले.

खरं तर मला आणि माझ्या बहिणीला घडविण्याचं श्रेय मी आई आणि बाबा दोघांनाही देईन; परंतु बाबा बॅकएन्ड लढतात अँड आई फ्रन्ट एन्ड. त्यामुळे बॅकेन्डचे कष्ट किती आहेत हे त्यांनी आम्हाला कधीच जाणवू दिलं नाही. सदैव हसतमुख, विनोदी स्वभावाने खिंड लढविणारे, पॉझिटिव्ह व्यक्तिमत्त्व, सर्वांचा लाडका अज्या, काहींचा साहेब, काहींचा भैया, तर काहींचा अगदी जिवलग असा हा अजित.

'अहो बाबा' अशी हाक मारली की अगदी आपलंसं वाटतं; कारण, त्यात एक आदरयुक्त भीती, प्रेम आणि आपुलकी लपलेली आहे. बाबा आणि माझी निखळ मैत्री आहे. त्यामुळे मी त्यांना कधी कधी सल्ले देत असते आणि मजेमजेत का होईना ते स्वीकारतातही. त्यामुळे आमच्यात कायमच प्रॉडक्टिव्ह डिस्कशन होत आलं आहे. 'तू तुझे डिसिजन घे. तू चाल पुढे बंड्या, आमची काळजी करू नकोस आणि मी तुझ्या पाठीशी आहे,' या वाक्यांमुळेच आज मी स्वतंत्र विचारांची झाले आहे.

माझ्यात काही विनोदाचे व लिखाणाचे गुण आलेत ते माझ्या प्रिय बाबांकडूनच, असं म्हणायला हरकत नाही; कारण त्यांचं प्रचंड वाचन, अफाट विचारशक्ती व त्यांचं लिखाण हे कायमच inspiring ठरले आहेत! ते माझे आदर्श आहेत आणि मला त्यांची मुलगी असण्याचा अभिमान आहे.

**-देविका आपटे**

आमच्या गावात चार वर्षांपूर्वीच अमलात आणली गेली. लोकांनी मला बिनविरोध त्या खुर्चीवर बसवलं आणि इतर आठ सदस्य तुम्हीच निवडा, असंही सांगितलं. हा या गावकऱ्यांच्या मनाचा मोठेपणा आहे.

माझ्या मते नवीन पिढीने जरूर शेतीमध्ये पडावं. शेतीमध्ये नवनिर्मितीचा खूप आनंद मिळतो. वेगवेगळी पिकं घेता येतात. नवनवीन प्रयोग करता येतात. आत्ताची पिढी खूप हुशार आहे आणि नवीन तंत्रज्ञान वापरून शेतीतून नक्की पैसे मिळवता येतील. माझ्या पाहण्यांत असे कितीतरी नवीन तरुण आहेत, जे खूप चांगली शेती करत आहेत. आमच्या भागात आणि आजूबाजूच्या गावातील तरुण खूप चांगलं उत्पादन घेत आहेत.

कांदा, बटाटा, टोमॅटो, कोबी, फ्लॉवर, हिरवी व ढब्बू मिरची, कारलं, काकडी इत्यादी पिकांमध्ये उत्पन्नाचं रेकॉर्ड करत आहेत. आत्ताचे काही हुषार शेतकरी स्वतःचा माल स्वतः विकतात. त्यामुळे त्यांना चांगला बाजारभाव मिळतो. कोणीच विक्रीसाठी मध्यस्थ नाही.

ऊस, हळद आणि आले या नगदी पिकांमध्येसुद्धा ८० ते ९० टन एकरी ऊस, २५ ते ३० क्विंटल हळद आणि कमीत कमी १५ टन आले एकरी असे उत्पन्नाचे आकडे आपल्याला शेतीकडे आकृष्ट करायला पुरेसे आहेत.

मी तर नवीन पिढीला सांगतो, तुम्ही एखाद्या चांगल्या कंपनीत नोकरीला आहात असं समजा. सकाळी आठ ते संध्याकाळी ५ तुम्ही तुमच्या शेतात काम करा. रविवारी सुट्टी घ्या. आपल्या कुटुंबासमवेत वेळ घालवा. नवीन पिढी खूप कष्टाळू, विचारी, रिस्क घ्यायची क्षमता असलेली आहे. आणि मुख्य म्हणजे सकारात्मक विचारांची आहे, असं मला वाटतं.

मला दोन मुली आहेत. मोठी अश्विनी बी.कॉम. एमसीए आहे. जर्मन भाषा शिकली. दुसरी मुलगी देविका. तिने डिझायनिंगमध्ये ग्रॅज्युएशन केलं आणि आता 'यूजर इंटरफेस आणि यूजर एक्स्पिरिअन्स' या कोर्ससाठी सध्या ती परदेशी शिक्षण घेत आहे. शेतकऱ्याच्या मुलीसुद्धा शिकून परदेशी जाऊ शकतात. त्यामुळे पहिली गोष्ट, तुम्हाला मुली असल्या तरी नाराज होऊ नका. मुली म्हणजे आनंदाचा ठेवा आहेत. आई-बापावर जिवापाड प्रेम करतात मुली आणि इतक्या छान, गुणी, कष्टाळू मुली असणं हे भाग्यच.


या व्यवसायात आई-वडिलांची जशी मोलाची साथ आहे, तशीच माझ्या पत्नीची मोहनाची. बियाण्यांची गुणवत्ता, उगवणक्षमता ही 'प्रयोगशाळा' ती सांभाळते. सर्व शेतकऱ्यांना त्यांचं बियाणं किती उगवणक्षमतेचं आहे, पिकाला किती उतारा मिळाला, या सगळ्याची गणितं ती मांडते. खूप मदत होते तिची. बँकिंग खातंसुद्धा तीच सांभाळते. त्यामुळे व्यवसायात सगळ्यांची मदतही लागते. तो एक प्रकारचा आधार असतो.

ajitapte.30@gmail.com

**गावातील पाणीपुरवठा प्रकल्प**



## नवं कोरं




अमेरिकेबरोबर युद्धाची वेळ आलीच तर चिनी लष्कराने सर्वंकष युद्धाची योजना आखून ठेवली होती; पण ती भलत्यानेच चोरली आणि...?

मूळ लेखक - ब्रॅड थॉर
अनुवाद - बाळ भागवत

### फुल ब्लॅक

पृष्ठसंख्या : ३८८
किंमत : ₹४५० Book Available

TBC 28 - 1





अध्यात्माची नवी मांडणी करता करताच संन्याशांच्या श्रेणीव्यवस्थेतील भयावह संदर्भ मांडणारी... आणि श्रद्धेच्या बाजारातल्या मिथकातून अद्भुत कलाविष्कार घडवणारी.. गुंतागुंतीच्या रहस्यांची अफलातून मांडणी..

### सँक्टस

मूळ लेखक - सायमन टॉएन
अनुवाद - उदय भिडे
पृष्ठसंख्या : ५२४
किंमत : ₹६००

TBC 28 - 2




एका क्षणात सात विद्यार्थी एखाद्या जंतूसदृश सूक्ष्म होतात.. आणि त्यांच्या वाट्याला येतो विस्मयकारक जीवनसंघर्ष.. मायक्रो झालेल्या मुलांची विस्तृत कहाणी..

### मायक्रो

मूळ लेखक - मायकेल क्रायटन आणि रिचर्ड प्रेस्टन
अनुवाद - डॉ.प्रमोद जोगळेकर
पृष्ठसंख्या : ३७२
किंमत : ₹४५०

TBC 28 - 3




अफलातून कथानकांची विलक्षण मांडणी आणि कलाटणी देणारा शेवट.. अचाट कल्पनाशक्तीचा बादशहा जेफ्री आर्चरच्या १२ दमदार कथा...

मूळ लेखक - जेफ्री आर्चर
अनुवाद - डॉ. देवदत्त केतकर

### ट्वेल्व्ह रेड हेरिंग्ज

पृष्ठसंख्या : २२८
किंमत : ₹३०० Book Available

TBC 28 - 4





एका शवविच्छेदनापासून सुरू होतो एक थरार.. जो अखेरच्या पानापर्यंत श्वास रोखून धरायला भाग पाडतो.. उत्कंठावर्धक वैद्यकीय थरारनाट्य...

### क्युअर

मूळ लेखक - रॉबिन कुक
अनुवाद - अनिल काळे
पृष्ठसंख्या : ३९२
किंमत : ₹४८०

TBC 28 - 5



# ‘अनू’प : गोठवून टाकणाऱ्या अनुभवांनी भरलेली अनू अगरवालच्या आयुष्याची शब्दयात्रा..

*किती छान... मी विचार करत होते. मला नि:सत्त्व, निर्जीव आयुष्य नुसतंच जगत राहायचं नव्हतं. जर माझ्यात या तिन्ही शक्ती एकवटलेल्या असतील, तर मी ‘परम’पदी पोहोचू शकते, असं मला खात्रीनं वाटलं. त्या क्षणी माझ्या मनात आलं की, मी अगदी हॉलिवूडमध्ये काम केलं तरी, फक्त आंतरराष्ट्रीय स्टार बनू शकेन; पण जर योग जे कबूल करतोय ते देऊ शकत असेल, तर मी वैश्विक अस्तित्व बनू शकेन. आंतरराष्ट्रीय विरुद्ध वैश्विक. निवड सोपी होती– वैश्विक.*


## प्रेमात पडताना...

### योगाच्या

*सेक्स ही गरज नाही. फार फार तर ती मोसमी इच्छा असते.*

आदल्या रात्री मी विचारात होते की, जर मी तुळतुळीत मुंडण केलं आणि बौद्ध साध्वी-साधूंच्या परंपरेत गेले तर काय होईल...? आणि मग पुन्हा मला कधी हॅम्बर्गर किंवा कॅमेम्बर्ट सुफले किंवा सेक्स किंवा म्हैसूर मसाला डोसा किंवा शोभेची बाहुली बनून कोट्यवधींची रोख रक्कम मिळवणं या गोष्टींची तळमळ वाटणं बंद झालं तर?

लेट गो... सोडून द्यावं... भावबंध भय निर्माण करतात. भयामुळे तुम्ही त्यांना बिलगून राहता. बिलगून राहण्यानं अधिकच भय निर्माण होतं... अधिक भय विनाश घडवतं.




काही चाहते अनू अगरवालच्या गायब होण्याबद्दल आश्चर्य आणि शोक व्यक्त करत होते, त्या वेळी त्यांना हे माहीत नव्हतं की, मी समजून उमजून हिमालयाच्या कुशीत फुलांच्या ताटव्यांवर पडून उगवणारे तारे मोजत होते... काळ्याभोर आभाळातले... नीरव शांततेत. प्रदूषणमुक्त वातावरणात. तिथे पुरुषांचं नकोसं करणारं लक्ष किंवा फाजील चौकशा करणाऱ्या मीडियाचा उपद्रव नव्हता.

'आशिकी'मध्ये एक प्रसंग आहे – माझा प्रेमी माझी अनाथाश्रमातल्या जुलमी अधिकाऱ्यापासून – ज्याला मी साकारत असलेल्या त्या पात्राबद्दल विकृत प्रकारचं आकर्षण असावं– सुटका करायला मदत करतो. आम्ही दोघं पळून जातो. आम्ही पर्वताच्या टोकापर्यंत पळत राहतो. तिथे मी धापत, किंचित कापत उभी असते... समोर नयनमनोहर निसर्ग पाहते... फक्त दऱ्या, डोंगर आणि वर आभाळ... मी श्वास रोखून माझ्या प्रेमीला विचारते, ''हा स्वर्ग आहे का?''

''हो, अनू, हा स्वर्ग आहे.''

असं म्हणून तो माझा श्वासावरोधित चेहरा त्याच्याकडे वळवून घेतो... चुंबन घेण्यासाठी.

आता इथे योगाश्रमात, दुधी आभाळाखाली, मी एकटी, नैसर्गिकरीत्या व लयबद्ध श्वासोच्छ्वास करत पहुडलेली असताना... ही गोष्ट अगदी सुस्पष्ट होती... हो, हा 'स्वर्ग' आहे. आणि मी त्या स्वर्गात आहे.

■

अनूनं मुंबईत ज्यांचं भाषण ऐकलं होतं त्या स्वामीग्लींनी अर्जाच्या फॉर्मवर तिचा पासपोर्ट साइझचा फोटो पाहिला, तेव्हाच ते तिच्या सौंदर्यानं मोहित झाले होते. हे केवळ शारीरिक आकर्षण नाही, हे त्यांना माहीत होतं. तिच्या नाजूकशा मानेवर डेनिमची कॉलर आमंत्रण देत पसरली होती. त्या कॉलरचा टोकदार कोपरा तिच्या निश्चयी जबड्याला स्पर्श करत होता. तिचे तेजस्वी, हरणासारखे डोळे पांढऱ्या कागदावरून उडी मारून बाहेर आल्यासारखे वाटत होते. त्या चित्तवेधी प्रतिमेत सुगंधांच्या गुप्त कुप्या दडल्या होत्या. तिच्या स्नेहपूर्ण स्मितामागे त्यांना दिसली – एक साधी, मेहनती मुलगी... अतिशय सत्कर्मी. त्यामुळे त्या विवेकवीराची नजर तिच्यावरून हटता हटेना, यात आश्चर्य नव्हतं!

अर्जातील प्रश्नावलीमध्ये मला माझ्या व्यवसायाबद्दल विचारलं होतं, त्याचं उत्तर मी 'विद्यार्थिनी' असं लिहिलं होतं. त्या वेळी मला माझ्या 'मूव्ही आयकॉन' स्टेटसचा वैताग आला होता. माझा प्रवेश माझ्या 'स्टार' असण्यावर आधारित असू नये असं मला वाटत होतं, तिथे गुणवत्ता हा निकष असावा. कुठलेही 'लाभ' दिले जाऊ नयेत, अशी माझी इच्छा होती. मला पुन्हा विद्यार्थिनीची भूमिका करायची होती... खऱ्या आयुष्यात... तीसुद्धा पूर्ण ताकदीनिशी. अगदी सर्वसामान्य व्यक्ती बनून... विद्यार्थी बनून.

अलीकडे मला तेच तेच बोलताना स्वत:चाच आवाज ऐकायचा कंटाळा येऊ लागला होता. मला विश्रांतीची गरज होती. तो १९९३ सालचा ऑक्टोबर महिना होता. मी 'सिने ब्लिट्झ' मासिकाच्या मुखपृष्ठासाठी अखेरचं शूटिंग केलं होतं. त्यासोबत माझी पाचपानी मुलाखतही होती. त्या मुलाखतीत मला विचारलं होतं :

''अनू, तुला स्त्रिया आवडतात?''

मी तो प्रश्न टाळला नाही, किंवा त्याचं वाईटही वाटून घेतलं नाही. मी ओढूनताणून चेहऱ्यावर स्मित आणून म्हणाले,

''अर्थातच, मला स्त्रिया आवडतात. माझं पहिलं प्रेम एक स्त्रीच होती – माझी आई.''

मी वस्तुस्थिती सांगितली.

वेल, सामान्यत: मला माणसं आवडतात.

लैंगिकदृष्ट्या?

माझी पुरुषांना पसंती असते.

का?

आपणा बायकांजवळ नसणारी गोष्ट त्यांच्याजवळ असते.





**तळागाळातील मुलांमध्ये रमलेल्या अनू आगरवाल**

म्हणजे, सर्वप्रथम पुरुषाची शरीररचना.

इतकी साधी-सरळ उत्तरं होती.

मला नेहमी आश्चर्य वाटतं की, असले खोदून चौकशा करणारे प्रश्न येतात कुठून? मीडियाचा बनाव?

मीडियाला ती आवडायची. ग्लॅमर उद्योगातल्या अवघ्या तीन वर्षांच्या धमाल यशस्वी कालखंडानंतर तिचं अदृश्य होणं हे त्यांच्यासाठी नवल होतं.

काही दिवसांतच मला योगाश्रमातून पत्र आलं. माझा अर्ज निवडला गेला होता. मला उत्तराखंडमधील देवगिरीवनला बोलावण्यात आलं होतं. हा अतिशय सुंदर प्रदेश आहे.

३० सप्टेंबर, १९९७. आकाश निरभ्र होतं. अतिशय भव्य व प्रशस्त परिसरानं शांतपणे माझं स्वागत केलं. मी ज्ञानकिल्ल्याच्या भव्य लोखंडी प्रवेशद्वारातून आत प्रवेश केला.

त्यानंतर अर्ज तपासणीची पहिली फेरी झाली... यामध्ये आम्हाला लेखी परीक्षेत उत्तीर्ण व्हावं लागणार होतं. माझे कॉलेजमधले मार्क्स – जे समाजशास्त्र/मानववंशशास्त्रातील सर्वोत्कृष्टतेचा अभिमान बाळगून होते – इथे प्रवेश मिळण्यासाठी पुरेसे ठरणार नाहीत ही गोष्ट मला फार विशेष वाटली.

या फेरीतून पार होणाऱ्या काही लोकांना वैयक्तिक मुलाखतीसाठी बोलावण्यात आलं.

"योग कशासाठी? तुला तो का शिकायचा आहे... कशासाठी?"

हडकुळ्या शिक्षक/मुलाखतकार, योगी व्यक्तीच्या चेहऱ्यावर प्रश्नचिन्ह होतं. लाल रंगाची लांब कफनी घातलेल्या त्या माणसाला टक्कल होतं.

स्टार-मॉडल अनू? तिला दूरवरच्या शांत, प्रसन्न खेड्यात राहून योगसाधना शिकायची आहे?

"मी असं वाचलं आहे की, सामान्य मनुष्यप्राणी त्याच्या मेंदूच्या एकूण सामर्थ्याच्या १० टक्क्यांपैकी फक्त २ टक्के सामर्थ्य वापरतो. मला संपूर्ण दहाच्या दहा टक्के वापरायचे आहेत. ते कसे वापरायचे ते मला योगातून शिकता येईल, असं मला वाटतं," मी अतिशय तळमळीनं उत्तर दिलं... पापणी न पाडता.

फलकावर प्रवेशयादी लावली होती. शंभरपैकी ज्या पंचेचाळीस विद्यार्थ्यांची निवड झाली होती, त्यांची नावं त्या यादीत होती. त्यामध्ये निरनिराळ्या देशातील उत्सुक विद्यार्थी होते.

त्या यादीत अनू अगरवालचं नाव दुसऱ्या क्रमांकावर होतं.

■

योगाश्रमात माझी पहिली रात्र होती. तिथे मला जी खोली दिली होती, ती पाहून मला अतिशय आश्चर्य वाटलं... योग विद्यापीठात कोळिष्टकांनी भरलेली खोली बघायला मिळेल असं मला चुकूनही वाटलं नव्हतं. भिंतींवर, छताला सगळीकडे कोळ्याच्या जाळ्यांचे पुंजकेच्या पुंजके

लटकत होते. मी ताबडतोब योगाश्रमात झाडू आणि फडकं शोधू लागले.

''ही खोली बंद पडून होती. गुरुजींनी तुला ही खोली द्यायला सांगितलं होतं.''

महिला-निवासाचं काम बघणारी स्वामी तोंड वाकडं करून सांगत होती. तिची तुच्छता अस्वस्थ करणारी होती.

''साफसफाईच्या वस्तू सकाळी मिळतील. सहा वाजता. इथे आम्ही वेळेच्या बाबतीत अतिशय काटेकोर आहोत,'' पोलिश स्वामीचे केस गळलेले दिसत होते, कर्करोगाच्या रुग्णांचे केमोथेरपीनंतर गळतात तसे.

''शिवाय, आत्ता संध्याकाळचे सात वाजले आहेत. ही मौनाची वेळ आहे. या वेळात आपण मनाची शांतता अनुभवतो. सकाळी सातपर्यंत कसलाही मौखिक संवाद नाही. ७ ते ७ मौन असतं, रिसेप्शनजवळच्या बोर्डवर वेळापत्रक लावलं आहे, ते वाचलं नाहीस का?''

मी तत्क्षणी माघारी वळून चालू लागले.

व्वा! या फालतू सबबी होत्या.

असं होतं तर! 'स्वामी कडवटयोगी'नं मला ती खोली देण्याआधीच स्वच्छता करून घ्यायला हवी होती ना? मी त्या कोळिष्टकांत झोपावं अशी अपेक्षा कशी करते ती? योगानं काही मूलभूत स्वच्छता शिकवायला हवी ना?

मी असहाय होते. मी नम्रपणे शहरी पद्धतीनं साफसफाई करण्याची साधनं मागितली होती. पण ती स्वामी इतकी उद्धट वागली याचं आश्चर्य वाटत होतं... जसं काय मी तिच्या खासगी जागेत घुसले होते. अशाप्रकारे 'प्रथमग्रासे मक्षिकापात' अशी अवस्था झाल्यामुळे मला दिलदार ताऱ्यांच्या छताखाली उघड्यावर झोपावं लागलं, पण ती रात्र तितकी असुखावह नव्हती.

■

तिथे कालचक्र मागे फिरल्यासारखं होतं. त्या स्थानाच्या नैसर्गिक रूपात गैरसोय होण्याइतका साधेपणा होता... उदाहरणार्थ, तिथे टॉयलेट रोल्सचा कुठे पत्ताच नव्हता आणि संन्यासी गटाचा श्रेष्ठत्वाचा खोटा आव घृणास्पद होता.

आमच्या योग अभ्यासक्रमाची व्यवस्थापिका एक अमेरिकन बाई होती. ती उरलेल्या चॉकलेटच्या वड्या तिच्या गादीखाली लपवून ठेवते, असं म्हटलं जात असे. संन्यासीजनांना जे दिलं जात नाही त्याची त्यांना उणीव भासता कामा नये, असं मानलं जात असल्यामुळे, त्यांचं आयुष्य खडतर होत असणार. आम्ही तिला 'चार्ली चॉकलेटोगा' म्हणत असू– तिचा देह पेअरच्या आकाराचा होता आणि तिच्या चेहऱ्यावर प्रचंड कष्टानं स्मित उमटलं असल्यासारखं वाटत असे.

आमच्या शिक्षकांचं अ-भारतीयत्व फक्त त्यांच्या मुंडण केलेल्या गोऱ्या डोक्यावरूनच नव्हे तर थिअरीच्या वर्गात त्यांच्या हिंदी व संस्कृत शब्दांच्या चुकीच्या उच्चारांवरून दिसत असे.

माझा जन्म सखोल आध्यात्मिक परंपरेचा पाया असलेल्या उदारमतवादी कुटुंबात झालेला असल्यामुळे, मी माझ्या आजीचं – वडिलांच्या आईचं – श्रीमद्भगवद्गीता पठण ऐकत लहानाची मोठी झाले... माझी 'बेडटाइम स्टोरी' तीच असायची. माझे आजोबा – आईचे वडील – रोज सकाळी प्रसन्न चेहऱ्यानं, अत्यंत पूज्यभावानं कृष्णप्रार्थना




व्यासपीठावरून योगाचा प्रचार करताना अनू आगरवाल

म्हणतच उठत असत. माझ्या आजोबांनी मी सहा वर्षांची असताना मला स्वामी योगानंदांच्या 'ऑटोबायॉग्रफी ऑफ अ योगी' या पुस्तकाची ओळख करून दिली होती. चिरंजीव संत बाबाजींबद्दल माझ्या मनात खूप आदर निर्माण झाला होता.

अकस्मात मी स्वत:चाच आधी गमावलेला वारसा शोधू लागले होते... त्या वेळी मला कधी नव्हे इतकं भारतीय असल्यासारखं वाटत होतं.

संध्याकाळी पाच वाजता रात्रीचं जेवण झाल्यानंतर, संध्याकाळचा कार्यक्रम असे. अजून ऑक्टोबरचे तीव्र उन्हाळ्याचे काही दिवस बाकी होते. तिथे नजारा मोठा विलक्षण होता : झाडं, खारोट्या, जंगलातील फळफळावळ आणि गंगेचा प्रवाह. मी रात्रीचं जेवण आणि कीर्तन या दरम्यानच्या पंधरा मिनिटांत, त्या शांततेत आजूबाजूला भटकून यायचे... भारल्यासारखी. माझ्या अंगावरचा सैल मलमली कपडा अंगापासून दूर उडत असायचा... निर्वस्त्र आध्यात्मिकता.

संध्याकाळी सहा ते सात या दरम्यान आम्ही शांतपणे स्वामींचं कीर्तन ऐकायचो. त्यांना हिंदू देवदेवता नवीन होत्या. ते संवादिनी वाजवायचे आणि भक्तिगीतं गायचे. देवांच्या नावाचे चुकीचे उच्चार... र्‍ ऽऽऽऽ मा, कीश्ना ऽऽऽ... माझ्या कानात विष ओतल्यासारखं वाटायचं आणि मला घरी परत जावं असं वाटायचं.

मला आश्चर्य वाटायचं की, आश्रमात फक्त हे चारच शिक्षक सगळ्या गोष्टी कसे काय करतात... शिकवण्यापासून ते गाण्यापर्यंत?... आणि जेवणाच्या वेळात आम्ही त्यांना स्वयंपाकघरातसुद्धा पाहायचो. त्यामुळे जर एखाद्या शिक्षकाला तुम्ही आवडत नसाल, तर त्यांच्यापासून लांब राहण्याचा काही मार्गच नव्हता – ना तुम्हाला ना त्यांना.

तिथलं अन्न म्हणजे तर भयंकर प्रकार होता. 'सात्त्विक' अन्नाच्या नावाखाली आम्हाला सकाळी साडेदहा वाजता न्याहारीला काळाकुट्ट बचकभर साखर घातलेला चहा मिळत असे. त्यानंतर अकरा वाजता जेवण– त्यात 'दाल' आणि बटाटा किंवा घेवडा – ते तिथे पिकवत असत. संध्याकाळी पाच वाजता रात्रीचं जेवण– त्यात पुन्हा बटाट्याचा रस्सा, आणि तुम्ही जर लवकर जाऊन रांगेत उभे राहिलात तर तुम्हाला नशिबानं ब्रेडचा एखादा तुकडा मिळू शकत असे.

शाळेत असल्यापासून आणि नंतर मॉडलिंग करत असताना माझा आहार हा अतिशय महत्त्वाचा मुद्दा असे. माझ्यातला खवय्या व सर्जनशील स्वयंपाकिणीचं चीज व दही यावर खूप प्रेम होतं. 'ते कॅल्शिअम घे', असं मा नेहमी सांगायची.

आश्रमात अशी बातमी पसरली होती की, खूप खूप वर्षांपूर्वी या आश्रमात एक ऑस्ट्रेलियन संन्यासी दूध घातलेला चहा पिऊन आजारी पडला आणि त्याला रक्ताची उलटी झाली. मग स्वामीग्लींचे गुरू – बडे स्वामीग्ली – यांनी योगाश्रमात फक्त दुधावरच नव्हे तर दुग्धजन्य उत्पादने आणण्यावर बंदी घातली.

आणि त्यांना सॅलड्सची उपयुक्तता मान्य नव्हती, ही गोष्ट अर्थातच धक्कादायक होती.

जर मला त्या अभ्यासक्रमाची गोडी लागली असती– ज्यासाठी मी अगदी मनापासून आतुर होते– तर मी अन्न, वस्त्र, निवारा या गोष्टींकडे, अगदी त्या संन्यासी मंडळींकडेसुद्धा दुर्लक्ष केलं असतं.

पण शिक्षकांच्या गुणवत्तेमुळे सगळा विचका झाला होता. व्यक्तिश: मला त्या योग अभ्यासक्रमाची रचनाच अपेक्षाभंग करणारी वाटली. मला ते वर्ग कंटाळवाणे वाटू लागले आणि मी दहा दिवसांच्या आत माझं सामानसुमान गुंडाळलं.

मी तिथून निघायची तयारी केली. आश्रमाचे प्रमुख स्वामीग्ली गोंधळून गेले होते. (त्यांनी याआधी असं उदाहरण कधी पाहिलं नव्हतं. वीस निरनिराळ्या देशांतून निवडलेल्या पंचेचाळीस खास विद्यार्थ्यांपैकी मी एक असणं अपेक्षित होतं. शिवाय, त्यांच्या परवानगीविना एक पानसुद्धा फडफडत नसे.)

''का?'' त्यांनी विचारलं.

त्यांनी माझ्यावर नजर रोखली होती. ते शांत, अविचल आणि विश्रब्ध दिसत होते.

मग मी त्यांना अगदी आत्मविश्वासानं सांगितलं की, ''माझ्याकडे यापेक्षा चांगल्या गोष्टी करण्याजोग्या आहेत.''

मी नजर गंगेकडे वळवली, कारण मला तिचा विरह जाणवणार होता. मला आठवलं... अवघ्या आठ महिन्यांपूर्वी माझा जेविश वंशाचा दुसरा बॉयफ्रेंड हार्वेनं (जॉर्जिओ आरमानीचा मॉडल डॅनिएलनंतरचा) ऑस्ट्रेलियाच्या फ्रेजर आयलंडवर माझा एक फोटो काढला होता... मी काळ्या रंगाच्या पोहण्याच्या पोशाखात नदीपात्रात उतरले आहे... माझी पाठ कॅमेऱ्याकडे... मी नदीत चालतेय... पाणी माझ्या मांडीपर्यंत आलं आहे. इथे येण्यापूर्वी ग्रेट बॅरिअर रीफमध्ये 'डीप-सी डायव्हिंग' हा माझा एक अखेरचा ऐहिक उपक्रम होता.

''तू अर्धवट सोडून का निघाली आहेस? तू इथे योगाबद्दल शिकण्यासाठी आली होतीस. तू हा अभ्यासक्रम पूर्ण केला पाहिजेस. तो तू पूर्ण कर, प्रमाणपत्र घे आणि मग जा. सोडून देणं हे कधीही उत्तर नसतं.''

एवढं बोलून ते गर्रकन त्यांच्या ऑफिसकडे वळले; त्यांची देहबोली स्पष्ट सांगत होती : हा विषय संपला.

तो ऑक्टोबर महिन्यातला वादळी दिवस होता. त्यांनी सांगितलेलं मला अंशत: पटलं होतं. आणखी काही महिने म्हणजे फार नाही, मी स्वत:ची समजूत घातली... आणि तिथेच राहिले.



**अनू आगरवाल यांची एक योगमुद्रा**

त्यानंतर त्यांनी मला त्यांच्या लांब आणि विस्तृत योगी पंखांखाली घेतलं. पाठोपाठ विद्यापीठाच्या प्रमुखांचं माझ्यावर विशेष लक्ष केंद्रित झालं. अत्यंत आल्हादक चांदण्यात ते माझी काळजी घेऊ लागले. त्यांनी माझ्या गरजा समजून घेतल्या : त्यांनी चौकशी करणाऱ्या मीडियाला माझ्यापासून दूर ठेवलं आणि नकोशा पुरुषी नजरांपासून माझं रक्षण केलं.

आणि, हा अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतरही मी तिथून जाऊ नये असं त्यांना वाटत होतं, हे मला नंतर कळणार होतं...

मी योगाच्या प्रेमात पडले होते.

## विध्वंस

पहाटेची वेळ होती. अवकाळी पावसानं सर्वत्र पाणी पाणी झालं होतं. दक्षिण मुंबईतील अत्यंत गजबजलेला भाग असणारी चौपाटी पोलीस संरक्षणात होती. या खेपेला महात्मा गांधींची जयंती शनिवारी होती. गंमत म्हणजे, या अहिंसादिनी, अनू अगरवालला भयंकर तीव्र आघाताला तोंड द्यावं लागलं.

फारच भयंकर... 'अनू'भव.

अमेरिकी कौन्सुल जनरल यांच्याकडील पार्टीनंतर घरी परत येताना धातूच्या आघातानं अनूच्या चिंधड्या चिंधड्या झाल्या. फुटलेल्या काचेनं तिचे तुकडे तुकडे केले. वादळी वाऱ्यानं थरथरणाऱ्या रेकल्यासारखे आवाज काढणाऱ्या गाडीत तिचा चेंदामेंदा झालेला देह अडकला होता. हाडांचा चुराडा झालेला... रक्तामासांचा चिखल झालेला... निर्दयी अपघातानं अशी अवस्था झालेल्या अनूचा अजूनही श्वास सुरू होता...

मात्र अर्धवट... अपुरा.

पांढरीशुभ्र मर्सिडिस जेम्स बॉण्डसारखी ३६० अंशात तीनदा गिरक्या घेऊन खवळलेल्या समुद्रापाशी येऊन धाड्कन आदळली होती... ते पाहून पोलीसही थक्क झाले. मग त्यांना ड्रायव्हरच्या सीटच्या बाजूला कलंडलेला स्त्रीदेह दिसताच ते तिला बाहेर काढायला धावले. ती संपली आहे असंच दिसत होतं. तिचे पाय विंडस्क्रीनच्या फुटलेल्या काचेवर होते. तिच्या पायाच्या तळव्यातून रक्त वाहत होतं.

त्यानंतर विमा कंपनीची माणसं त्या चेंदामेंदा झालेल्या गाडीची पाहणी करण्यासाठी आली, तेव्हा त्यांनी पैसे वाचवण्यासाठी काही पळवाटा मिळताहेत का ते पाहायला सुरुवात केली, कारण अशी दामटी झालेली गाडी म्हणजे विम्याची पूर्ण रक्कम... फुल इन्शुरन्स कव्हरेज द्यावं लागणार होतं.

■

डॉक्टरांनी अनूच्या छातीवर स्टेथोस्कोप ठेवला. त्यांनी तिला ताबडतोब ओळखलं होतं. ऑक्टोबर महिन्यातल्या अवकाळी पावसात, ढगांचा गडगडाट आणि विजांचा कडकडाट अशा तांडवात, तिला भल्या पहाटे हॉस्पिटलमध्ये पळवत आणलं होतं. चार धिप्पाड पोलिसांनी मादक स्त्रीदेह उचलून आणला होता... पावसाच्या पाण्यानं निथळणारा... ओलाचिंब... शुद्ध हरपलेला... लालभडक दाट रक्त ठिबकणारा. ती अर्धवट शुद्धीत होती... असह्य वेदनेनं तिच्यासमोर अंधार पसरत होता, पण हॉस्पिटलच्या प्रवेशद्वाराशी ती त्या अवस्थेतही धडपडत उठण्याचा प्रयत्न करत होती, पोलिसांनी आपल्याला उचलून नेणं तिला मान्य नव्हतं.

हा सिनेमाच्या चित्रीकरणाचा भाग म्हणून चालला असता, पण इथे कुठे कॅमेरा क्रू दिसत नव्हता, म्हणजे हे चित्रीकरण नव्हतं. मग हे खऱ्या आयुष्यातील नाट्य होतं का?

त्या दिवशी हॉस्पिटल पिवळ्या गुलाबांनी सजून गेलं होतं. चाहते, मित्रपरिवार, प्रसारमाध्यमे, जाहिरात व चित्रपटक्षेत्रातील लोक ब्रीच कॅन्डी हॉस्पिटलबाहेर जमा झाले होते.

अतिदक्षता विभागात डॉ. कार्तिक शुभ्र एप्रनमागे हात बांधून उभे होते. त्यांनी खाली झुकून अनूला तपासलं. ती प्रेतवत पडली होती... पांढऱ्या शुभ्र चादरीवर. तिच्या देहावर असंख्य नळ्या जोडल्या होत्या.

गाढ झोपेत... शांत...

आणि समजा ती जागी झाली... कोमावस्थेतून उठलीच... तर तिला यातून बरं व्हायला तीन वर्षे लागतील. अशा बिछान्याला खिळलेल्या अवस्थेतील निश्चल रुग्णाला पुन्हा मुळाक्षरे शिकवावी लागतील. या तीन वर्षांच्या चिंताजनक काळात मृत्यू जवळपास अटळ असतो.



**अनू आगरवाल योगासन करताना**

■

अनूचे रक्तानं माखलेले कपडे प्लॅस्टिकच्या पिशवीत चुरगळून पडले होते, लाल डाग पडलेल्या रद्दी कागदासारखे.

''तुम्ही ते फेकून द्या,'' ब्रीच कॅन्डीमध्ये तिच्यावर उपचार करणाऱ्या एका डॉक्टरांनी सांगितलं.

पण पा हटून होते. ते 'नाही' म्हणाले.

''मी तिचे कपडे धुवून ठेवणार आहे.''


मी माझ्या हातांनी ते कपडे धुणार आहे... त्यांनी शूरपणे ठरवलं होतं.

हॉस्पिटलच्या पांढऱ्याशुभ्र बाथरूममध्ये ते उभे होते... पूर्णपणे कोसळलेले.

त्यांनी किरमिजी रंगाच्या पुडक्याकडे लक्षपूर्वक पाहिलं. त्यातल्या रक्ताचे डाग पडलेल्या भगव्या जीन्सला धातू, काच, पावसाचं पाणी, गुलाब आणि २१२ मस्कचा वास येत होता. ममता आणि दु:ख अशा संमिश्र भावनांच्या आवर्तात त्यांनी ती विचित्र रंगाची जीन्स काळजीपूर्वक निर्दयी नळाखाली धरली... हॉस्पिटलच्या सिंकला हॉस्पिटलमधल्या उग्र रसायनांचा वास येत होता.

पाणी वाहत होतं... तशाच त्यांच्या आत दाबून ठेवलेल्या भावनाही... ते ओक्साबोक्शी रडत होते. पांनी अतिशय त्वेषानं ती जीन्स घासायला सुरुवात केली... त्यांना त्या भीषण घोर तडाख्याचे डाग धुवून काढायचे होते. माँ आणि त्यांच्या वैवाहिक आयुष्यात इतकी भयंकर घटना त्यांनी कधी अनूभवली नव्हती. ते थिजल्यासारखे झाले होते.

मग त्यांना मायेचे उमाळे फुटले त्याखाली सगळं झाकून गेलं... ते रक्त धुवून काढत होते... त्यांची मुलगी जी अतियातनादायक दु:खाला



तोंड देत होती... ज्यातून पार होत होती ते सगळं... ते तिचं दु:खं हलकं करत होते... स्फुंदत होते.

त्यांच्या डोक्यातून एक विजेची लहर दौडत गेली. त्यांच्या 'पुत्री'ला (त्यांनी तिला दिलेलं टोपणनाव) काय झालंय... ते समजून घ्यायचा प्रयत्न करत होते. हे असं कसं झालं? कारमध्ये काय झालं? ती ड्रायव्हरच्या सीटच्या मागे असायला हवी होती. का, ती मागेच होती? ती घायाळ झाली आहे– नखशिखांत. अनेक ठिकाणच्या फ्रॅक्चर्सनी ती हतबल झाली आहे. ती गाडीत ड्रायव्हरच्या सीटवर असताना आत अडकली होती का?

ती घटना कोड्यात टाकणारी होती, सगळंच अनूत्तरित होतं. ते भीतीनं शहारले. एरवी अज्ञेयवादी असणारे पा आता तारणहार देवाची प्रार्थना करू लागले.

असं वाटत होतं की, पुत्री कालच जन्माला आली आहे. त्या वर्षाच्या आरंभापासून, अकरा दिवस तिनं सूर्यप्रकाश पाहिलेला नाही. ११ जानेवारीला त्यांना सुवार्ता कळली, तेव्हा ते रोमांचित झाले होते.

''आम्हाला मुलगी झाली. आनंदोत्सव!''

त्यांनी आनंदाच्या भरात नातेवाईक व मित्रपरिवाराला तारा केल्या होत्या. बहुतेकशा नातेवाइकांना ही तार विचित्रच वाटली असावी, कारण भारतात तेव्हा कुटुंबाचा वारसा पुढे चालू ठेवणाऱ्या मुलाच्या जन्माची फक्त वाट पाहिली जात असे आणि त्याप्रीत्यर्थ आनंदोत्सव अधिकृतपणे साजरा होत असे.

■

फ्लॅट ५०३, अनूचं घर. तिच्याविना घर सुनंसुनं आणि उदासवाणं झालं होतं. छतापासून लटकणाऱ्या, चमचमते मणी लावलेल्या, क्रोशाच्या पांढऱ्या लॅम्पशेडमधून प्रकाश पाझरत होता. तकाकी दिलेल्या मोझॅक फ्लोअरवर, दोन लॅम्पशेड्स एकमेकांसमोर उभ्या होत्या... फिकट गुलाबी रंगाच्या, रेशमी. त्यावर कॉफीच्या रंगाची बाटिक नक्षी होती. अनूनं पाँडिचेरीच्या अरबिंदो आश्रमाच्या सहलीबद्दल सांगितलेलं पांना आठवलं... हे तिनं तिथूनच आणलं असणार. दिवाणखान्याच्या एका भिंतीवर छतापासून जमिनीपर्यंत काचेची खिडकी होती. तिथून फेसाळ समुद्र दिसत असे... त्यांच्या देखण्या 'पुचिकू'सारखाच चित्तवेधक.

■

हॉस्पिटल.

मी अतिदक्षता विभागात होते... बेडवर आडवी, नळ्यांच्या आणि टायटॅनियम नॉट्सच्या विळख्यात होते... बेशुद्धावस्थेत... मी अशा 'प्रगाढ निद्रेत' होते जिथं मृत्यू अगदी सामान्य असतो.

जगाच्या दृष्टीनं बेशुद्ध असले, तरी मी जिवंत होते.

माझ्या आजवर जगलेल्या आयुष्याची पाटी माझ्या डोक्यात पुसली जात होती. या बाह्य, शारीरिक कोलाहलात आंतरिक सुव्यवस्था होती. मधुर संगीतही होतं... दुसऱ्या प्रदेशात गेल्यावर, मी भयावह प्राणी अँग्युलर हार्प वाजवताना पाहिले... गलिच्छ घाणीचे कुरूप फवारे आणि अंधारकोठडीतली दुर्गंधी.. वजनरहित पऱ्या थोड्या उंच प्रतलात समाधानानं उडत होत्या... बिनपंखांच्या.

प्रेम आणि तिरस्कार अशा दोन पूर्णत: विरुद्ध गोष्टींचा मिलाफ घडलेला होता. प्रकाशामुळे अंधाराचं अस्तित्व असतं आणि समतोल म्हणजे या दोन्ही परस्परविरुद्ध गोष्टींचा स्वीकार.

हे कुणालाही दिसत नव्हतं.

अपेक्षित होतंच त्याप्रमाणे स्मृतिनाश झालाच.

मला लोकांच्या प्रेमळ हातांचा स्पर्श जाणवत होता, त्यांची खरीखुरी आस्था कळत होती. त्यांच्या दृष्टीनं मी गाढ झोपेत होते, पण मी माझ्या डोक्यात टक्क जागी होते... अंत:चक्षू उघडे होते. अस्तित्वाच्या खोल गाभ्यातून प्रकटणाऱ्या दिव्यदृष्टीची विलक्षण शक्ती जागृत झाली होती. मला लोकांचे सूक्ष्म श्वास ऐकू येत होते, खोलीच्या भिंतींच्या आतला गलका वा हास्य दिसत होतं. ज्ञानेंद्रियांनी जे कळतं, त्यापेक्षा मला जास्त कळत होतं. चमत्कारिक गोष्ट होती!

मला माझ्या छिन्नविछिन्न देहाची जाणीव नसावी... मी कालच ज्या भयानक आघातातून पार झाले होते त्यापासून मी कोसो दूर होते.

सीटी स्कॅननं शरीरातील अनेक फ्रॅक्चर्स शोधली होती :

Clavical – multiple fracture of the right collarbone;

Humerus bone in the upper right arm-multiple fracture;

Unstable pelvic fracture;

Bladder rupture;

Jaw – multiple fracture, dislocated;

Basilar skull fracture;

Temporal bone fracture of the ear;

Ribs, mandible – hairline fracture;

Sinuses smashed;

Forehead fracture suspected;

In the orbital region that holds the eye, fracture suspected;

Nasal bone fracture suspected;

Inner ear fracture, causing labyrinthitis, a disorder of the inner ear.

Head injury : damage caused to the underlying blood vessels; Brain bleed.

अशा प्रकारची भयंकर मोडतोड झालेली मी हॉस्पिटलच्या नव्या, ताज्या चादरीवर वेदनारहित अवस्थेत पडले होते. मी कुठल्याही क्षणी

संपेन असं वाटत होतं. प्रश्न फक्त एवढाच होता की, कधी.

कोमाच्या अखेरच्या दिवशी, माझ्या मेंदूच्या पडद्यावर एक स्वच्छ प्रतिमा दिसू लागली. माझे 'डॉन जुआन' होते बडे स्वामीग्ली... मूर्ख नैतिक प्रतिबंधांपासून मुक्त. त्यांचं अस्तित्व सतत जाणवत होतं. मंद लाल कफनीतल्या स्वामीग्लींची आकृती थोडी छोटी, तिथून मागे काही अंतरावर दिसत होती. ऐहिक पार्श्वभूमीवर, हिऱ्याच्या ठिपक्यांसारख्या चमकणाऱ्या, डोळ्यांच्या दोन जोड्या माझ्यावर एकटक रोखल्या होत्या.

– तू योगी, तू तुझं स्वत:चं नशीब निवडू शकतेस. योगी तसं करतात.

पाण्याचा फवारा... वादळी झंझावातात आभाळात एक काटकुळी रेषा गरगरू लागली. माझ्या डोक्यात आवाज घुमला : हा तुझा नवा जन्म आहे, तू शुद्ध होत आहेस. तू स्वर्ग पृथ्वीवर आणू शकतेस – तुझ्या आतमध्ये व तुझ्या अवतीभोवती सर्वत्र.

सृजन : नवी अनू जन्माला येणार आहे. नव्याने. पुनरुत्थान. रूपबदल.

गंमत म्हणजे, त्या वेळी मी वैषयिकदृष्ट्या सर्वांत उन्नत प्रदेशात होते.

मी तारकांसमवेत स्वर्गीय अवकाशयानात होते. माझ्याभोवती सूर्य, तारे आणि ग्रह आणि त्यापलीकडचंही होतं.

मी वजनविरहित अवस्थेच्या आनंदात होते.

मी सुदैवानं आणि निष्ठुरपणे, अनंतात विलीन होण्यासाठी फेकली गेले होते. ब्रह्मांडात.

हे नम्र करणारं होतं... शब्दांपलीकडलं. त्यानं मला माझा सर्व अस्तित्वांशी असलेला अत्यंत जवळचा दुवा दाखवला. प्रेमातून जन्मलेले... आपण सर्वच प्रेममय आहोत. आपण सर्व 'एक'च आहोत. सगळीकडे फक्त प्रेमच आहे.

■

सर्वप्रथम माझ्या उजव्या दंडातील हाडाचे तुकडे जोडण्याची शस्त्रक्रिया झाली. मला ती शस्त्रक्रिया आठवतही नाही. त्या दरम्यान मला जो देहातीत अनुभव आला तो फक्त मला आठवतोय :

*निष्प्राण देहाबाहेर उभी राहून,*
*पाहत होते मी ओळखता न येणारा चेहरा,*
*एकत्र जोडलेल्या रूपात... मी नव्हतेच त्या चौकटीत.*

शस्त्रक्रिया सुरू आहे... मी उडी घेतली आहे अंधारकोशात. मी ज्या बोगद्यात आहे तो आहे रेशमी आणि उबदार. तिथे इतका गडद अंधार आहे की, मला काहीच दिसत नाहीये. मी वेगानं ओढली जातेय आवर्तात. तिथे आहे पूर्ण विचारशून्य अवस्था. आपण वेगानं कुठे निघालो आहोत हा प्रश्नही मी विचारला नाहीये. कुठलेही प्रश्न नाहीत. मी खूपखूप वेगानं पुढे जात आहे. अचानक सुंदरशा प्रकाशाचा लोळ आला आणि सगळं बधिर झालं. मला आत्मीयतेची व्यवस्थित जाणीव आहे. मी त्या प्रकाशात विलीन होऊ पाहतेय. मला अखिल ब्रह्मांडाचे बहुआयाम दिसत आहेत. माझी जाणीव इतकी प्रचंड विस्तारली आहे की, मला माझीसुद्धा जाणीव उरलेली नाही... त्या अवस्थेत मला एक अनूभूती आली... त्याचं वर्णन मी निर्मळ शाश्वत सुख असं करते. मला अकस्मात शांती जाणवली... सुस्पष्ट जाणिवांनी मला मंत्रमुग्ध केलं.

*मी बहुधा 'परत न येण्याच्या बिंदू'पर्यंत पोहोचले होते आणि मला परत यायचंही नव्हतं...*

माझ्या दंडातील मोडलेल्या हाडाला आधार देण्यासाठी बारा इंच लांबीची रुपेरी, धातूची प्लेट बसवली, तिला आधार देण्यासाठी आठ स्टीलचे स्क्रू बसवले, त्यानंतर टाके घालून जखम शिवण्यात आली... खांद्यापासून कोपरापर्यंत अठ्ठावीस आडवे टाके दिसत होते.

त्यानंतर पुढची शस्त्रक्रियाही झटपट झाली. त्यांनी त्वचेचा छेद घेतला आणि अंतर्गत अवयवांना कुठे दुखापत झाली नाही ना हे तपासलं. तसंच फाटलेलं मूत्राशय शिवलं. या शस्त्रक्रियेनंतर एक लांबच लांब उभा व्रण राहिला... सापासारखा... त्याचं नाक वक्षांच्या लगतच होतं... तिथून तो खाली पसरत पसरत... त्याचं शेपूट योनीपर्यंत गेलं होतं.

''नशिबवान आहात. तुमच्या मुलीला आतल्या भागांना काहीही इजा झालेली नाही... मज्जारज्जू व्यवस्थित आहे,'' डॉक्टर शेखरनी चश्म्याच्या काचा पुसत माझ्या वडिलांना सांगितलं.

पांनी सुटकेचा नि:श्वास सोडला : तिची ख्रिस्तोफर रीव्हसारखी अवस्था होणार नाही... सुपरमॅनची भूमिका करणारा हा अभिनेता घोडेस्वारीच्या स्पर्धेदरम्यान पडला होता. त्याच्या कवटीचा खालचा भाग आणि पाठीचा मणका वायर, टायटॅनियम लावून जोडावे लागले होते आणि त्याच्या नितंबाचं हाड काढून ते 'ग्राफ्ट' करावं लागलं होतं.

''फक्त तिचं मूत्राशय फाटलं होतं, ते आम्ही शस्त्रक्रियेनं शिवून बंद केलं आहे. काळजी करू नका. तुमच्या मुलीला गर्भारपण पेलता येईल, मुलांना जन्म देता येईल,'' डॉक्टर शेखर धीर देत म्हणाले.

त्या अवस्थेत माँच्या दृष्टीनं या मुद्द्याला फारसं महत्त्व नव्हतं.

**अनू आगरवाल एका निवांत क्षणी**



तिला तिची उत्साहानं सळसळणारी मुलगी पुन्हा जिवंत पाहायची होती.

■

मला जाग आली.

डॉ. कार्तिक आनंदानं चीत्कारले :

तू जिवंत आहेस! हा चमत्कार आहे.

जिवंत?

म्हणजे, पहिल्या शस्त्रक्रियेदरम्यान मी माझं शरीर बाहेरून निरखत होते, तेव्हा मी जिवंत नव्हते?

सकाळचे नऊ वाजले आहेत. प्रकाश बदलला आहे, इतकंच. ते याला 'सकाळ' म्हणतात. काहीही असलं तरी तुमचं अस्तित्व असतं. तुम्ही अनंत काळाचा एक भाग आहात. मी माझ्या डोळ्यांनी तिथली लगबग पाहते... पांढऱ्या पोशाखातल्या तीन मदतनिसांनी घाईघाईनं खोलीत एक स्ट्रेचर ढकलत आणलं आणि अतिशय पद्धतशीरपणे बेडला समांतर लावलं. खोलीत कसलाही आवाज नव्हता. सगळ्या गोष्टी अंतरावर होत्या... दूरवर. 'माझं' शरीर– ज्याच्याशी माझा संबंध नव्हता– उचललं गेलं. मी कुतूहलानं पाहत होते. माझं शरीर बेडवरून उचलून गडद हिरव्या स्ट्रेचरवर ठेवण्यात आलं. स्ट्रेचर कॉरिडॉरमधून झपाट्यानं लिफ्टमध्ये नेण्यात आलं.

मी निचेष्ट होते...

नाजूक... नवजात अर्भकासारखी...

लहान मुलासारख्या नवलाईनं पाहणारी.

पृथ्वी... एक रहस्य.

आम्ही 'मॅग्नेटिक रेझोनन्स इमेजिंग' (MRI) रूममध्ये होतो. एमआरआयमध्ये तीव्र चुंबकीय क्षेत्रे व रेडिओलहरींद्वारे शरीराच्या आतल्या तपशीलवार प्रतिमा घेतल्या जातात.

रेडिओलॉजिस्ट डॉ. अनिरुद्ध प्रतिमेकडे निर्देश करत सांगू लागले :

A Computerized Tomography, of the base of skull, is performed; there is fluid in both mastoid air cells, right mastoid fracture is noted, right sphenoidal polyp is noted.

The conclusion : there is fluid in both mastoid air cells, there is a right mastoid undisplaced fracture.

व्हॉटेव्हर!

रेडिओलॉजिस्ट उत्साहानं सळसळत होते. स्वच्छ पांढऱ्या झग्यातले... सहृदय. त्यांनी अस्वस्थपणे खिशात हात घातले होते. बेचैन अस्वस्थता? कशाबद्दल?

''तुमच्या शरीरावर प्रचंड वार... प्रचंड आघात झाले आहेत... तुमचं शरीर त्यामुळे निर्बल झालं आहे, त्यामुळे आम्ही आमच्या बाजूनं जे प्रयत्न करू त्याची शृंखला तोडली जात आहे... शरीर एकावेळी फक्त... तुमच्या शरीरानं भयंकर... अकल्पित आघात सोसले आहेत.''

ते बोलू लागले. त्यांच्या चेहऱ्यावर निस्तेज स्मित होतं.

''तुमच्या कवटीबरोबरच कपाळावरही एक तडा होता... डोळ्यांच्या खोबणीजवळ. तिथे फ्रॅक्चर आहे का हे तपासण्याची गरज होती, पण तुमच्या शरीराच्या इतर अनेक भागांकडे तातडीनं लक्ष देणं गरजेचं असल्यामुळे आम्हाला ते करता आलं नाही...

''त्यामुळे तो भाग एखाद्या पोकळ गुहेसारखा झाला होता आणि आकसून गेला होता... बधिर झाला होता. कपाळाचा निम्मा भाग संवेदनाहीन झाला होता आणि काळ्या राखेनं माखला होता.''

मला ते काय म्हणत आहेत ते समजत नव्हतं... मला ऐकू येत नव्हतं.

चेहऱ्याचा भाग संवेदनाशून्य झाला, तर त्यावर आंतरिक हास्य दिसत नाही. मी देहात जितका वास करते त्यापेक्षा बाहेर जास्त असते.

तुम्ही देह संपवू शकता. तुम्ही 'मला' संपवू शकत नाही. मी अनंताचा अंश आहे.

त्यांनी माझा निचेष्ट देह उचलला आणि हन्टलीच्या बेडवर हिरवट चादरीवर नेऊन ठेवला. मी पुन्हा झगमगीत सूर्यप्रकाश असलेल्या खोलीत परत आले होते. 'माझा देह' म्हणजे काय?

■

माझ्या निम्म्या देहाची संवेदना हरवली होती, पण त्या अवस्थेत हळूहळू सुधारणा झाली : अंथरुणाला खिळलेली मी चाकाच्या खुर्चीपर्यंत पोहोचले होते. चेहऱ्यावर झालेल्या आघातामुळे 'बोटॉक्स-ट्रीटेड' चेहरा पूर्णत: शिथिल... सैलावलेला दिसत होता. चेहऱ्याच्या सर्व स्नायूंची संवेदना पूर्ण हरवली होती.

मला हॉस्पिटलमधून घरी सोडलं. मला 'माझ्या' घरी आणण्यात आलं... 'माझ्या' म्हणजे काय... मी बोटांनी चाळा करत होते. 'माझ्या घरी'?

तू एका रिमझिम पावसाळी रात्री डिनरला बाहेर गेली होतीस, ते घरी परत आलीच नाहीस, अदृश्यच झालीस. तू महिन्याभरापेक्षा जास्त काळानं घरी परत आली आहेस आणि तुझं घर 'तुझं' आहे हे तुला आठवत नाहीये. आणि आपण घरातून बाहेर पडलो होतो, हेच तुला आठवत नसल्यामुळे तू घरी परतही आलेली नाहीस. तू इथे पहिल्यांदाच आली आहेस... तुला पुसटसं आठवतंय. स्मृतिभ्रंशानं फिल्म स्टार पूर्ण संपली होती... ती ओळख पूर्ण पुसली होती. वैद्यकीयदृष्ट्या खास सांगितलेल्या बेडवर मी आडवी होते.


डॉ. कार्तिक व्हिजिटला आले होते. ते मॉंला सांगत होते :

''शी हॅड हिस्टेरिकल पोस्ट-ट्रॉमॅटिक ॲम्नेसिआ. मेंदूतील 'हिप्पोकॅम्पस'ला इजा झाल्यामुळे तिला भविष्याची कल्पना करता येणार नाही, कारण सर्वसामान्य माणूस जेव्हा भविष्याची कल्पना करतो, तेव्हा तो संभाव्य कल्पनाचित्र रेखाटण्यासाठी त्याचे गतानुभव वापरतो.''

आता अनू या क्षणात जगत आहे... वर्तमानात.

■

**(मेहता पब्लिशिंग हाऊस प्रकाशित आणि सुप्रिया वकील द्वारा अनुवादित 'अनू'प... अनू अगरवालच्या वादळी आयुष्याचा लेखाजोखा अनुभवण्यासाठी जरूर वाचा...)**




अमेरिकेच्या जडणघडणीचा जनक.. लेखक..चित्रकार..
वैज्ञानिक..संशोधक.. धुरंधर राजकारणी..
अशा चतुरस्र आणि अलौकिक बुद्धिमत्तेच्या
माणसाने सांगितलेली
स्वत:च्या आयुष्याची प्रांजळ कहाणी...


मूळ लेखक - लेविस लेअरी
अनुवाद - सई साने

पृष्ठसंख्या : १६८
किंमत : ₹२४०

Book Available

# बेंजामिन फ्रँकलिन

---




जिभेवर रेंगाळणाऱ्या पिझ्झाच्या
चमचमीत चवीसारखीच
डॉमिनोज 'पिझ्झा ब्रॅण्ड'च्या
जडणघडणीची कहाणी..


मूळ लेखक - टॉम मोनाघन
अनुवाद - डॉ. सुधीर राशिंगकर

पृष्ठसंख्या : ३४०
किंमत : ₹४२०

Book Available

# पिझ्झा टायगर

---




शेतकरी बनलेल्या कॉर्पोरेट क्षेत्रातील
तंत्रज्ञाची विलक्षण कहाणी

मूळ लेखक - वेंकट अय्यर
अनुवाद - दीपक कुळकर्णी

पृष्ठसंख्या : २०८
किंमत : ₹२९५

Book Available

# कॉर्पोरेटला रामराम, शेतीला सलाम!



# कॉर्पोरेटला रामराम, शेतीला सलाम

- वेंकट अय्यर

*कार्पोरेट क्षेत्रात उच्च पदावर काम करणाऱ्या वेंकट अय्यर यांनी त्यांचं क्षेत्र सोडून शेती करायचं ठरवलं आणि ते गावी गेले; गावी गेल्यानंतर केवळ शेतीकडेच त्यांनी लक्ष पुरवलं असं नाही, तर गावातल्या माणसांशी, त्यांच्या सुखदु:खांशी ते एकरूप झाले आणि ही एक प्रकारे समाजसेवाच होती. जी त्यांच्याकडून अभावितपणे होत होती. शहरी जीवनशैली सोडून ग्रामजीवनाचा अंगिकार करणाऱ्या वेंकट यांनी त्यांचे अनुभव सांगितले आहेत.*

*त्यांच्या अनुभवविश्वाची ही एक झलक...*

**शेतीमध्ये प्रथमच रस निर्माण झाला**

स्वतंत्र पत्रकारिता करत असताना २००२ मध्ये सेंद्रिय कपाशीची शेती याविषयी मीनानं एक संशोधनात्मक प्रोजेक्ट हाती घेतला होता. त्याचा अभ्यास करताना काढलेल्या टिपणांचं तिनं संकलन केलं होतं. त्या विषयावरचा शोधनिबंध ती लिहिणार होती आणि तिचं लिखाण नंतर पुस्तकरूपानं प्रसिद्ध होणार होतं. संशोधन काळात तिनं भारतातील चार राज्यांत प्रवास करून तिथल्या सेंद्रिय कापसासाठी शेती करणाऱ्या शेतकरी व कृषी व्यावसायिकांशी या विषयावर दीर्घ चर्चा केली. अनेकदा शेतकऱ्यांच्या घरात मुक्काम करून तिनं त्यांच्याकडून बारीकसारीक तपशील मिळवले. तिथून घरी परतल्यावर तिथल्या ग्रामीण जीवनाचं ती इतकं सुंदर वर्णन करायची की, त्या खेड्याचं चित्रच माझ्या डोळ्यांसमोर उभं राहायचं. मीही तिला खूप प्रश्न विचारून, तिच्याकडून जास्तीतजास्त माहिती मिळवायचो. तिच्या बोलण्यावरून माझ्या असं लक्षात आलं की, त्या शेतकऱ्यांना खूप कष्ट व मेहनत करावी लागत असली तरी ते आपल्यापेक्षा खूप सुखासमाधानाचं जीवन जगताहेत.

त्यांच्या घराचं, तिथल्या स्वच्छ मोकळ्या हवेचं आणि सर्वस्वी निसर्गावर अवलंबून असलेल्या त्यांच्या कष्टप्रद आयुष्याचं हुबेहूब वर्णन मीना करत असे. आपल्या जमिनीत स्वतः पिकवलेल्या धान्यातून ते आपलं अन्न शिजवून खात असत. त्यांचं जेवण साधं असलं तरी अतिशय स्वादिष्ट व रुचकर असायचं. आज आपल्या शहरात कॉलेस्टेरॉल, शरीरात वाढणारी चरबी, लिपिड्स, एचडीएल, एलडीएल यासंबंधीच्या माहितीचा महापूर आलेला असताना, तिथल्या खेड्यातील माणसाच्या पानात रोजच्या अन्नाबरोबर साजूक तुपाचा मोठा गोळा वाढलेला असतो. प्रत्येक वेळी जेव्हा मीना तिथून घरी परतायची, तेव्हा त्या चविष्ट जेवणाचं उदाहरण देत ती इथल्या बेचव व सपक अन्नावर कडाडून टीका करत असे.

ग्रामीण व शहरी जीवनातील या तफावतीवर आमची घरात तावातावाने चर्चा चालत असे. मला आठवतं, एकदा मीना गुजरातमध्ये दीर्घ मुक्काम करून घरी परतली होती, तेव्हा ती तिथल्या लोकांच्या जीवनशैलीनं कमालीची प्रभावित झाली होती. जवळजवळ महिनाभर ती वेगवेगळ्या शेतकऱ्यांच्या घरी राहिली होती. मीही तिचे अनुभव आवडीनं ऐकत होतो व त्यातले बारीक तपशील पुनःपुन्हा तिच्याकडून ऐकत होतो. मला वाटणाऱ्या कुतूहलाचं मीनालाही थोडं आश्चर्य वाटत होतं; पण मी त्या विषयावर आता खूप विचार करू लागलो होतो. निसर्गाच्या सान्निध्यात राहून आपल्याला लागणारं अन्न आपणच का पिकवू नये? लहानशा खेड्यात एक छोटसं घर बांधून शेती करायला काय हरकत आहे? माझ्या मनात ती कल्पना हळूहळू मूळ धरू लागली होती आणि त्याबद्दल मीनाशी मी सतत चर्चाही करू लागलो होतो.

मला आठवतं, एका संध्याकाळी आमचं दीर्घ संभाषण झाल्यानंतर मीनानं वर्णन केलेल्या त्या खेड्यातल्या प्रसंगाचं चित्र मी मनातल्या मनात रंगवत होतो. बैठकीच्या खोलीतील सोफ्यावर मी अगदी खोल रुतल्यासारखा बसलो होतो. कोपऱ्यात वेताची लॅम्पशेड होती. दिव्याचा मंद प्रकाश तिच्या जाळीतून झिरपत भिंतीवर नाजूक नक्षी काढत होता. अतिशय नाजूक क्षण होता तो; पण तितकाच निर्णायक! होय, तोच तो क्षण... माझ्या आयुष्याला कलाटणी देणारा! इतकी वर्षं आम्ही फक्त आठवडाअखेरीस मुंबईबाहेर जाऊन राहण्याच्या कल्पनेत अडकून बसलो होतो. कर्जतमध्ये जमीन मिळवण्यासाठी किंवा लोणावळ्यात आवडलेला एक बंगला विकत घेण्यासाठी खूप आटापिटा केला होता. तो सारा शोध आता संपला होता. एखाद्या खेडेगावात छोटासा जमिनीचा तुकडा खरेदी करायचा आणि लहानसं घर बांधून राहायचं ही कल्पना मनाला भावली होती. हा निर्णय अतिशय सोपा होता असा दावा मी कधीच करणार नाही; पण त्या संध्याकाळी अचानक तो निर्णायक क्षण मला गवसला होता.



निसर्गाचं एक रमणीय रूप

मीनानं वर्णन केलेली खेडी व तिथले शेतकरी मी प्रत्यक्षात कधीच पाहिले नव्हते. तरीही त्यांच्या जगण्याच्या पद्धतीनं मी थक्क होऊन जायचो. ते सगळेच  सधन शेतकरी नव्हते; पण शहरातील वेगवान व तणावपूर्ण जीवनाच्या तुलनेनं मला त्यांचं आयुष्य खूप मोहक वाटायचं. त्यांच्या जगण्याला एक निश्चित प्रयोजन होतं. त्यांना कठोर परिश्रम करावे लागत; पण अखेरीस स्वतः कष्ट करून पिकवलेल्या अन्नाचा आस्वाद घेताना त्यांचा ऊर अभिमानानं भरून येत असे. त्यांचं आयुष्य एका संथ; परंतु स्थिर वेगात सुरू असल्यासारखं मला भासत होतं म्हणूनच वरवर पाहता तरी त्यांच्या जीवनात फारच कमी ताण-तणाव असावेत अशा निष्कर्षाप्रत मी आलो होतो. अर्थात शेतमालाला मिळणारा कमी भाव, कृषिव्यवसायातील संकटं आणि त्यापोटी केलेल्या आत्महत्या अशा कटू वास्तवाची दुःखी पार्श्वभूमीही त्यांच्या आयुष्याला लाभली होती. मात्र, तरीही संशोधन कार्यानिमित्त मीनानं काढलेले फोटो माझ्या मनात खोलवर ठसले होते आणि आपल्या मालकीच्या तशाच एखाद्या घरात कायमचं सुखानं राहण्याचं स्वप्न मी रंगवत होतो; त्यामुळे मुंबईतील



**शेतात रमलेले वेंकट अय्यर**

आमच्या ५३० चौरसफुटांच्या छोट्या आणि बंदिस्त जागेत अचानक मला कोंडल्यासारखं वाटू लागलं.

कोणतीही घातक रसायने किंवा इतर काही अपायकारक गोष्टींचा वापर न करता केवळ सेंद्रिय शेती करण्याची कल्पना मला अतिशय आवडली होती. आपल्यापेक्षा अधिक स्वच्छ व नैसर्गिक अन्नाचं सेवन करत असल्यामुळे खेड्यातील लोकांचं आरोग्य आपल्याहून जास्त चांगलं असतं ही गोष्ट आता मला पूर्णपणे पटली होती. विविध रसायनांचे पिकांवर होणारे दुष्परिणाम व त्यांचा वापर तातडीनं थांबवण्याची निर्माण झालेली गरज, मीनाचा शोधनिबंध वाचून मला तीव्रतेनं जाणवली होती. रोजच्या अन्नात मिसळलेल्या रासायनिक व इतर विषारी द्रव्यांमुळे आपल्या आरोग्यावर किती घातक परिणाम होत चालला आहे याचाही मी नीट अभ्यास केला होता.

शहर सोडून खेड्यात स्थायिक होण्याची माझी कल्पना मीनाला पटली होती; त्यामुळे आपल्या आयुष्यात शहरी जीवनापेक्षा सुंदर बदल होईल असं तिलाही वाटत होतं; पण केवळ ऐकीव गोष्टींवर विसंबून फारच तडकाफडकी मी हा निर्णय घेतोय, असं तिचं मत होतं. शहरात राहण्यामध्ये तिलाही फारसा रस उरला नव्हता. रोजचा कंटाळवाणा प्रवास, प्रदूषित हवा व माणसांची गर्दी यामुळे ती पार वैतागून गेली होती. शहर सोडून जाण्यामुळे होऊ शकणारा बदल तिला निश्चितच स्वागतार्ह वाटत होता; पण त्याचबरोबर माझ्या या निर्णयामुळे कदाचित काही आर्थिक समस्या निर्माण होतील याची धास्तीही तिला वाटत होती.

अलीकडे आरोग्याच्या काही तक्रारींमुळे मी ग्रासला गेलो होतो. खासकरून ट्रेकिंग करताना मला डोकेदुखीचा असह्य त्रास होई. पुरेशी विश्रांती घेतल्यानंतर आपोआप त्या त्रासातून मुक्तता मिळे. ट्रेकिंग करताना कडक उन्हाचा होणारा त्रास हे आपल्या डोकेदुखीचं कारण असल्याचं माझ्या लक्षात आलं. शारीरिक तपासणीच्या वेळी मला उच्च रक्तदाब असल्याचं निदान डॉक्टरांनी केलं. त्याचं कारण आनुवंशिक असावं. माझ्या आई-वडिलांनाही हा त्रास होता. याच तपासणीच्या दरम्यान मला मधुमेह असल्याचं व कॉलेस्टेरॉल प्रमाणाबाहेर वाढल्याचं निष्पन्न झालं.

नियमितपणे औषधं घेतल्यास हे सर्व आजार नियंत्रणात राहू शकतात; त्यामुळे काळजी करण्याचं कारण नाही असा भरवसा डॉक्टरांनी दिला होता; पण अवघ्या तिशीत असताना दिवसभर वेगवेगळ्या रंगांच्या गोळ्या गिळण्याची वेळ माझ्यावर आली. मी बिनसाखरेचा चहा व कॉफी प्यायला सुरुवात केली. मिठाई व पक्वान्नांचा त्याग करून मी शिस्तबद्ध जीवनशैली स्वीकारली. रोज सकाळी चालण्याची सवय लावून घेतली आणि त्याचबरोबर हॉटेल व बारमध्ये जाण्याचं मी शक्यतो टाळू लागलो. या सर्व उपायांनंतर परिस्थिती नियंत्रणात आली असली तरी ॲलोपथी औषधांवर व त्यांच्या दूरगामी परिणामांवर आमचा फारसा विश्वास नव्हता. माझे आई-वडीलही सुरुवातीला अशाच गोळ्या घेत होते; पण काही वर्षांतच त्यांच्यावर इन्सुलीनचं इंजेक्शन घेण्याची वेळ आली; त्यामुळे या आजारावरील इतर इलाजांचा आम्ही शोध घेऊ लागलो.

माझ्या एका सन्मित्राने त्यावर एक तिबेटियन औषध सुचवलं. मी ते घेण्यास तयार झालो. तिबेटमधील एक महिला डॉक्टर दर दोन महिन्यांनी





**गावातील एका गावकऱ्यासह वेंकट अय्यर (इनसेटमध्ये त्यांच्या शेतात काम करणाऱ्या स्त्रिया)**

मुंबईला येत असे. मी तिला भेटायचं ठरवलं. काही महिन्यांतच माझा रक्तदाब योग्य पातळीवर आणण्यात ती यशस्वी ठरली. मात्र, कडक पथ्य पाळूनही ती माझा मधुमेह नियंत्रित करू शकली नाही. रक्तातील साखरेचं प्रमाण झटपट कमी करण्यासाठी नावाजल्या गेलेल्या आपल्या औषधोपचारांचा माझ्यावर काहीच परिणाम होत नाही हे पाहून तीसुद्धा चकित झाली. माझ्या विकाराचं खरं कारण मानसिक ताणतणाव हेच आहे असं अखेरीस तिनं मला सांगितलं.

यासंबंधी मी जसजसं अधिक वाचन करू लागलो, तसं माझ्या लक्षात येऊ लागलं की, माझ्या रोजच्या जेवणातील अन्नपदार्थ हेच माझ्या रोगाला मूलतः कारणीभूत आहेत. आपण खात असलेल्या विविध भाज्या व धान्य पिकवण्यासाठी त्यात मोठ्या प्रमाणात केलेल्या रसायनांचा वापर पाहून मला धक्काच बसला. त्याचप्रमाणे मानसिक ताणतणाव, दडपण व आपण स्वीकारलेली गतिमान जीवनशैली हीदेखील आपल्या अनारोग्यामागची महत्त्वाची कारणं आहेत हेदेखील माझ्या लक्षात आलं; त्यामुळे तिबेटियन औषधांचा माझ्यावर परिणाम होऊ शकला नाही, याचं मला फारसं नवल वाटलं नाही.

आपण जर आपली जगण्याची पद्धत बदलली आणि सकस अन्न खाऊ लागलो तर आजचे हे आधुनिक आजार या भूतलावरून कायमचे नाहीसे होतील याची मला पक्की खात्री वाटू लागली. 'आयबीएम'मध्ये माझ्या अनेक सहकाऱ्यांना मधुमेह, उच्च रक्तदाब व तीव्र पाठदुखींसारखे अनेक विकार जडले होते. कॉर्पोरेट क्षेत्रात काम करताना जीवनात निर्माण होणारे प्रचंड ताणतणाव सहन न झाल्यामुळे ते अशा रोगांना बळी पडत होते. त्यासाठी आपण आपल्या मुळांकडे म्हणजेच मूळ जीवनशैलीकडे परतणं आवश्यक होतं, जी आपल्या पूर्वजांनी अंगीकारली होती. आपलं अन्न आपण पिकवणं आणि खेडेगावातील आनंदी व तणावमुक्त जीवन जगणं, हाच खरा सर्वोत्तम पर्याय होता.

आज आपला देश कृषिक्षेत्रात अत्यंत आणीबाणीच्या काळातून जात असताना, माझं हे विधान कदाचित एखाद्याला स्वप्नरंजक किंवा तद्दन मूर्खपणाचंही वाटू शकेल. अनेकजण हरितक्रांतीचं व त्यासाठी कसून वापरलेल्या रसायनाचं समर्थन करतात; त्यामुळे उपासमार व दुष्काळापासून आपण बचावलो असं त्यांचं म्हणणं असतं; पण आजही आपण कुपोषण व उपासमारीच्या बातम्या वर्तमानपत्रात वाचतो. याचा अर्थ हरितक्रांती झाली तरीही या समस्या अजूनही पूर्णपणे नाहीशा झालेल्या नाहीत. उलट रसायनांमुळे माणसांवर आणि निसर्गावर होणाऱ्या घातक परिणामांच्या गंभीर समस्येला आज आपल्याला तोंड द्यावे लागत आहे.

गेल्या दशकात कर्जाचा भार असह्य झाल्याने शेकडो शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. शेतमालाच्या भावाबाबतीत असलेले सरकारी धोरण, ग्रामीण कर्जाचा तुटवडा आणि शेतमालाला दिलेली अत्यंत अल्प किमान आधारभूत किंमत यामुळे परिस्थिती अधिकच बिकट बनली. शेतकरी कर्जाच्या दुष्टचक्रात अडकले आणि त्यांच्या आयुष्याची शोकांतिका झाली. या चक्राला अंत नव्हता. मला मात्र यातून खूप काही शिकण्यासारखं होतं. एक गोष्ट माझ्या लक्षात आली की, जर मी कर्जमुक्त राहिलो आणि पिकांसाठी रसायनं वा खतांचा वापर केला नाही तर एकूण उत्पादनखर्चात मी खूप मोठी बचत करू शकेन. सेंद्रिय शेतीकडे वळलेल्या अनेक शेतकऱ्यांनी त्यातील फायदे अनुभवले होते. याचा अर्थ शेतकरी पुन्हा स्वावलंबी होऊ लागला होता. हा खूप मोठा व महत्त्वाचा बदल होता. आजपर्यंत तो संकरित बियाणं आणि सरकारकडून मिळणाऱ्या विविध अनुदानांवर अवलंबून होता. कीटकनाशकं व रसायनांचा वापर करून तो स्वतःचीच दिशाभूल करत होता आणि या सर्वांमध्ये त्याच्या उत्पादनाला त्यानं काढलेल्या पिकाला मात्र सरकारकडून अत्यल्प भाव दिला जात होता. त्यानंतर काही काळानं मी जेव्हा मध्य प्रदेश व तामिळनाडूतील सेंद्रिय शेती करणाऱ्या लोकांना भेटलो, तेव्हा माझ्या मतावर आणखी ठाम झालो. सुरुवातीच्या काळात त्यांनी सेंद्रिय शेतीसाठी केलेल्या प्रयत्नांनी मी प्रेरित व प्रभावित झालो; परिणामी, रसायनं न वापरण्याच्या माझ्या निर्णयालाही एक प्रकारे दुजोरा मिळाला.

**(मेहता पब्लिशिंग हाऊस प्रकाशित आणि दीपक कुळकर्णी द्वारा अनुवादित 'कॉर्पोरेटला रामराम, शेतीला सलाम' या पुस्तकातून जाणून घ्या वेंकट अय्यर यांचा आयटी ते शेती हा प्रवास...)**

T BOOK CLUB

या क्लबचे सभासद व्हा आणि उत्तमोत्तम अनुवादित पुस्तके निम्म्या किमतीत मिळवा!

# टी बुक क्लब

**या योजनेतील सहाही पुस्तके घेणे आवश्यक!**

चालू बुक क्लबचे सभासदत्व **५० रु.** भरून घेता येते. या क्लबअंतर्गत दरवर्षी गाजलेल्या सहा इंग्रजी पुस्तकांचे अनुवाद प्रकाशित केले जातात. सभासदांना ही पुस्तके निम्म्या किंमतीत मिळतात. पुस्तके प्रकाशित होताच आपणांस त्यासंबंधीची माहिती कळवली जाते.

**ही सर्व सहाही पुस्तके घेणे आपल्यावर बंधनकारक राहील.**

या सहा पुस्तकांपुरती ही सभासद फी मर्यादित राहील. या क्लबच्या सभासदांना आमच्या प्रकाशनाची इतर पुस्तके सवलतीत मिळतील.

## टी बुक क्लब योजनेतील 'क्लासिक्स'साठी खास सवलत!

₹ १०० भरून उपलब्ध असलेल्या पुस्तकांपैकी कोणतीही ८ किंवा सर्व पुस्तके एकाचवेळी निम्म्या किंमतीत मिळवा. पोस्टेज खर्च अतिरिक्त.

## टी बुक क्लब २८ मधून प्रकाशित झालेली पुस्तके

| | | | |
|---|---|---|---|
| **फुल ब्लॅक** | ब्रॅड थॉर | अनु. बाळ भागवत | ४५० |
| **सॅक्टस** | सायमन टॉएन | अनु. उदय भिडे | ६०० |
| **मायक्रो** | मायकेल क्रायटन आणि रिचर्ड प्रेस्टन | अनु. डॉ. प्रमोद जोगळेकर | ४५० |
| **ट्वेल्व्ह रेड हेरिंग्ज** | जेफ्री आर्चर | अनु. डॉ. देवदत्त केतकर | ३०० |
| **क्युअर** | रॉबिन कुक | अनु. अनिल काळे | ४८० |

## टी बुक क्लब २८ मधून प्रकाशित होणारे पुस्तक

| | | |
|---|---|---|
| **द किल लिस्ट** | फ्रेडरिक फॉर्सिथ | अनु. बाळ भागवत |


## टी बुक क्लब २९ मधून प्रकाशित होणारी पुस्तके

| | | |
|---|---|---|
| **एचएमएस युलीसेस** | ॲलिस्टर मॅक्लीन | अनु. अनिल काळे |
| **चेसिंग टुमारो** | सिडने शेल्डन, टिली बॅगशॉ | अनु. मेघना जोशी |
| **द इनोसन्ट मॅन** | जॉन ग्रिशॅम | अनु. संजय गडकरी |
| **नेव्हर गो बॅक** | ली चाइल्ड | अनु. बाळ भागवत |
| **व्हेअर ईगल्स डेअर** | ॲलिस्टर मॅक्लीन | अनु. माधव कर्वे |
| **चार्लटन्स** | रॉबिन कुक | अनु. उज्ज्वला गोखले |

**सभासद फी ₹ ५०,** सभासद व्हा व **५०%** सवलत मिळवा!

अधिक माहितीसाठी संपर्क : (०२०) २४४७६९२४ / २४४६०३१३ / २४४६३०४८ 9420594665

## नवं कोरं




खुसखुशीत विनोदाची फोडणी असणाऱ्या आणि भोवतालाशी घट्ट वीण सांगणाऱ्या लहानथोरांसाठीच्या आर.के.नारायण यांच्या मालगुडी स्टाइल रम्य कथा..


### वडाच्या झाडाखाली आणि इतर कथा

मूळ लेखक - आर.के.नारायण
अनुवाद - नंदिनी देशमुख

पृष्ठसंख्या : २४४
किंमत : ₹३००

Book Available

---





कथात्म साहित्यातील अजब रसायन असणाऱ्या 'नंबर वन लेडिज डिटेक्टिव्ह एजन्सी'मधील रंजक पुष्प.. बोट्स्वाना देशातील पहिली स्त्री गुप्तहेर मॅडम रामोत्स्वेचे दिलखुलास कारनामे..

### द फुल कबर्ड ऑफ लाइफ

मूळ लेखक : अॅलेक्झांडर स्मिथ
अनुवाद : नीला चांदोरकर

पृष्ठसंख्या : २२०
किंमत : ₹२५०

---




अफगाणिस्तानातील पहिली ब्रिटिश स्वारी उधळून लावणाऱ्या मोहिमेचा रंगतदार इतिहास...

### रिटर्न ऑफ अ किंग

मूळ लेखक - विल्यम डॅलरिंपल
अनुवाद - अंजनी नरवणे, सुनीति काणे

पृष्ठसंख्या : ५२०
किंमत : ₹५९५

Book Available



# सागरी परिक्रमेचा पराक्रम

- कॅप्टन दिलिप दोंदे

*आम्ही इंजिनच्या साहाय्यानं मांडवी नदीच्या बाहेर आलो. ॲडमिरल साहेबांनी सुकाणू हाती धरलं, तर मी शिडं उभारली. समुद्रावरून येणाऱ्या वाऱ्यांना अजून गती प्राप्त झाली नव्हती त्यामुळे इंजिन काही काळ चालू ठेवण्याचा मी निर्णय घेतला आणि इंजिन सुरू राहावं यासाठी इंधनाच्या टाकीत भर घालू लागलो. इंजिनाला हे काही पसंत पडलं नसावं, त्यानं खडखडाट करत आपला निषेध नोंदवला आणि मग निपचित पडून राहिलं. एकीकडे बोटीची शिडं उभारत असताना दुसरीकडे इंजिनाचा विचार करत मी फेऱ्या मारत होतो, तेव्हा ॲडमिरल साहेबांनी मला बंदराकडे परत फिरण्याचा आग्रह केला.*

## ‘म्हादेई’ची पहिली पावलं

‘म्हादेई’ला नेव्हीकडे सुपूर्त केल्याच्या दुसऱ्याच दिवशी रॉबिन गोव्यात येऊन दाखल झाले. आम्ही त्यांना आदल्या दिवशी झालेल्या समारंभासाठी आमंत्रित केलं होतं, पण त्यांच्या व्यस्त वेळापत्रकामुळे ते येऊ शकले नव्हते. ‘म्हादेई’वर एकदा तज्ज्ञ नजर फिरवायला, सगळी साधनं नीट बसली आहेत की नाही ते बघायला आणि मला कानमंत्र द्यायला ते आले होते. त्यांनी आधीचा संपूर्ण आठवडा आर्क्टिक खंडात वजा ४३ अंश सेल्सिअस अशा हाडं गोठवणाऱ्या थंडीत काढला होता, त्यामुळे त्यांना लख्ख सूर्यप्रकाश आणि उबदार हवा यांची गरज होती. त्यांची ही भेट अत्यंत आनंददायी आणि फलदायी ठरली. इंडियन नेव्हल अकॅडमीच्या वॉर्डरूममध्ये रॉबिन यांची राहण्याची व्यवस्था केली होती आणि ‘म्हादेई’चं वास्तव्यही तिथेच होतं, त्यामुळे आम्ही रत्नाकर, ओटाव्हियो आणि इतर उत्सुक सहकारी, मित्र यांच्यासोबत रोजच नौकाविहाराला जात होतो. प्रत्येक दिवशी काहीतरी नवीन शिकायला मिळत होतं. रॉबिन अनेक छोट्या छोट्या पण महत्त्वाच्या सूचना बोटीच्या सुधारणांच्या दृष्टिकोनातून करत होते आणि त्या सूचना अशा होत्या की त्यांच्यासारख्या आयुष्यभर नौकानयनाचा अनुभव गाठीशी असलेल्या माणसाखेरीज अन्य कुणालाही सुचल्या नसत्या. त्यांची भेट संपताना, बोटीवर कराव्या लागणाऱ्या गोष्टींची भली थोरली यादी आमच्याजवळ तयार झाली होती. असं असलं तरी ‘म्हादेई’ रॉबिन यांच्या परीक्षेत उतरली होती. निघण्यापूर्वी अभ्यागतांसाठी असलेल्या पुस्तिकेत त्यांनी नोंद केली, ‘जगभर सफर करण्यासाठी ही खूपच मजबूत आणि छान बोट आहे.’ एक वर्षापूर्वीची आमची परिस्थिती पाहता, ही कौतुकाची थाप आमच्यासाठी अभिमानाचीच गोष्ट होती.

आतापर्यंत ‘म्हादेई’ला घेऊन मी केलेली सगळ्यात मोठी सफर होती एका रात्रीची. त्यातही रॉबिन, रत्नाकर आणि ओटाव्हियो माझ्याबरोबर होते. आता तिला अन्यत्र घेऊन जाण्याची, थोडंफार जग दाखवण्याची आणि तिच्या गाठीला काही सागरी मैल बांधण्याची वेळ झाली होती. पहिला विचार मनात आला तो स्वाभाविकपणे मुंबईचा. तिची अधिकृतपणे नोंदणी मुंबईत झाली होती, त्यामुळे तिचं घर खरंतर ते होतं. यापूर्वी, इतर बोटींवर प्रशिक्षण घेण्याच्या हेतूने केलेल्या सफरींच्या वेळी खलाशी न मिळण्याचा मला जो अनुभव आला होता, तो लक्षात घेऊन मुंबईपर्यंत मी एकट्यानंच जायची योजना आखली होती. मागच्या वेळी त्या बोटी एकट्यानं नेणं मला कठीण गेलं असतं म्हणून मी खलाश्यांच्या शोधात होतो, कारण दुसरा पर्याय नव्हता. आता माझ्याकडे एकट्यानं नेऊ शकेन अशी बोट होती आणि या संधीचा शंभर टक्के फायदा उठवण्याची इच्छाही होती. मी माझा मनोदय ॲडमिरल आवटींना सांगितला तेव्हा त्यांनी माझ्याबरोबर येण्याची इच्छा व्यक्त केली. त्यांना नकार देणं मला शक्यच नव्हतं, पण त्यांच्या उतरत्या वयाची मला चिंता वाटत होती.

‘‘तुमची पत्नी या गोष्टीला संमती देत असेल तर माझी काहीच हरकत नाही, सर. तुम्ही त्यांना आधी विचाराल का प्लीज?’’ मी म्हणालो. मला माहीत होतं की एका नवख्या बोटीवर नवख्या कप्तानाबरोबर आपल्या ८२ वर्षांच्या पतिराजांना पाठवायचं म्हणजे त्यांच्या पत्नीच्या जिवाला घोर लागला असता. ॲडमिरल साहेबांनी पत्नीचं मन कसं वळवलं ते माहीत नाही; पण दोनच तासांनी त्यांचा उल्लसित स्वरात मला फोन आला आणि मी बोटीवर असताना ‘म्हादेई’वर सफर करू द्यायला पत्नीची काही हरकत नसल्याची बातमी त्यांनी दिली.

३ मार्चच्या (२००९) सकाळी आम्ही गोवा सोडलं आणि दुपारपर्यंत समुद्रावरून येणाऱ्या वाऱ्यांचा वेग वाढला की शिडं उभारण्याची तयारी ठेवण्याची योजना आखली. ५ मार्च २००९ रोजी आम्ही मुंबईत पोचू अशी अपेक्षा होती, त्यानुसार वेस्टर्न नेव्हल कमांडनं दुपारी आमच्यासाठी स्वागत समारंभ करण्याची तयारी केली होती. आम्ही गोव्याहून निघेपर्यंत बोटीचं काही ना काही काम सुरूच होतं आणि तरीही बऱ्याच गोष्टी करायच्या बाकी होत्या. उपकरणं बसवण्याच्या कामी माझाही हातभार लागला होता, तरी सगळ्या गोष्टी एकट्यानं हाताळणं, हा माझ्यासाठी नवीनच अनुभव होता. आजवर समुद्रावर सफर करताना येणाऱ्या अडचणी सोडवायला रत्नाकर आणि ओटाव्हियो नेहमीच माझ्याबरोबर असायचे. आता हे सुख मला लाभणार नव्हतं.



आम्ही इंजिनच्या साहाय्यानं मांडवी नदीच्या बाहेर आलो. ॲडमिरल साहेबांनी सुकाणू हाती धरलं, तर मी शिडं उभारली. समुद्रावरून येणाऱ्या वाऱ्यांना अजून गती प्राप्त झाली नव्हती त्यामुळे इंजिन काही काळ चालू ठेवण्याचा मी निर्णय घेतला आणि इंजिन सुरू राहावं यासाठी इंधनाच्या टाकीत भर घालू लागलो. इंजिनाला हे काही पसंत पडलं नसावं, त्यानं खडखडाट करत आपला निषेध नोंदवला आणि मग निपचित पडून राहिलं. एकीकडे बोटीची शिडं उभारत असताना दुसरीकडे इंजिनाचा विचार करत मी फेऱ्या मारत होतो, तेव्हा



**बिल्बाओ इथे सर रॉबिन यांच्याबरोबर दिलिप दोंदे (डावीकडे)**

ॲडमिरल साहेबांनी मला बंदराकडे परत फिरण्याचा आग्रह केला.

''काय झालं?'' त्यांनी काळजीनं मला विचारलं.

''मला नक्की समजत नाहीये, तेच जाणून घेण्याचा प्रयत्न करतोय,'' मी विचारात गढलेलो असल्यानं काही न उमजून उत्तरलो.

''मला वाटतं, आपण बंदराला परत जावं, जे काही झालं आहे ते दुरुस्त करावं आणि मग मुंबईसाठी निघावं. मुंबईच्या ईटीए (Estimated Time of Arrival -आगमनाची अनुमानित घटिका)ची चिंता करू नकोस, मी ते कमांडर इन चीफशी बोलून निस्तरेन. तू फक्त आपल्याला (बोटीला) खेचून नेण्यासाठी दुसऱ्या बोटीची व्यवस्था करायला रत्नाकरला सांग,'' त्यांनी चिंतायुक्त स्वरात पुन्हा आग्रह केला. मी तोंडातल्या तोंडात काहीतरी पुटपुटलो. नक्की काय बिघाड झाला आहे हा विचार अजून माझ्या डोक्यातून गेला नव्हता, तर बंदराकडे परत जाण्याचा विचारही माझ्या मनाला अजून शिवला नव्हता.

''मी म्हणतोय की आपण आता परत फिरू!'' संयमाचा बांध फुटायच्या बेतात आलेल्या ॲडमिरल आवटींचा आवाज जरा चढला.

आता कप्तानाचा अधिकार बजावण्याची वेळ आली आहे हे जाणून मी त्यांच्यासमोर उभा राहिलो, त्यांच्या नजरेला थेट नजर भिडवून त्यांच्याशी जितकं बरोबरीच्या नात्याने बोलणं शक्य होतं तितक्या अधिकारवाणीने म्हणालो, ''सर, ही एक शिडाची बोट आहे आणि जोपर्यंत तिची शिडं उघडलेली आहेत, तोपर्यंत ती पुढे जात राहील. वारा अगदी पडलेला असला तरी मुंबईला पोचेपर्यंत पुरेल इतकं अन्न-पाणी बोटीवर आहे. म्हणून, मी जोपर्यंत हा इंजिनाचा प्रश्न सोडवत नाही, तोपर्यंत तुम्ही नौकानयनाचा मनमुराद आनंद लुटा. आपण माघारी जाणार नाही.''

इंजिनाकडे इंधन घेऊन येणाऱ्या नळ्यांमध्ये हवेचे बुडबुडे तयार झाले होते ही समस्या माझ्या लक्षात आली आणि ती ॲडमिरल साहेबांच्या मदतीनं दूर करून इंजिन पुन्हा सुरू करण्यात मला यश आलं. त्या दिवशी ॲडमिरल आवटींच्या मनात नेमकं काय होतं ते गुपित सांगणारं पत्र आमची सफर सुरक्षितपणे पार पाडल्यानंतर काही दिवसांनी त्यांनी मला पाठवलं. हसत हसत ते पत्र वाचताना माझ्या मनात विचार आला, ''माझा परीक्षाकाळ कधी संपणार आहे की नाही!'' त्यांनी लिहिलं होतं—

*'...गोव्यातून आपण बाहेर पडलो त्या पहिल्याच दिवशी सकाळी तुझा निश्चय अगदी स्पष्ट दिसून आला. इंजिनाने संप पुकारला तेव्हा तुझा निर्धार पक्का होता. त्या वेळी मी तुला आमिष दाखवून पाहिलं, पण तू त्या जाळ्यात सापडला नाहीस. तू इंजिन सुरू केलंसच. तुझा कामाच्याप्रति असलेला दृढनिश्चय बघून मला आनंद झाला. शाबास! तू माझ्याशी ज्या वास्तववादी पद्धतीनं वागलास, बोललास त्यासाठीसुद्धा तुझं कौतुक करावंसं वाटतं. मला हांजी-हांजी करणाऱ्या, लांगूलचालन करणाऱ्या व्यक्ती आवडत नाहीत! बरं झालं, तू त्यांच्यापैकी नाहीस.'*

इंजिन सुरू झाल्यानंतरची आमची मुंबईपर्यंतची सफर तशीच रोमांचक झाली. दुसऱ्या दिवशी सकाळपर्यंत चांगल्या वाऱ्याच्या शोधात आणि मासेमारीसाठी समुद्रात टाकलेली जाळी टाळण्यासाठी आम्ही किनाऱ्यापासून ५० सागरी मैलांपेक्षाही लांब गेलो होतो. आमचा उपग्रह संपर्क संच बंद पडला होता आणि नेव्हीला आमच्याबद्दल काही कळेनासं झालं होतं; पण ही बाब फार चिंता करण्याजोगी नव्हती. दुर्दैवानं, सकाळी सौ. आवटींना काळजी वाटून त्यांनी थेट वेस्टर्न नेव्हल कमांडच्या मुख्य अधिकाऱ्यांना फोन लावला आणि आपल्या पतीचा ठावठिकाणा विचारला; नंतर एकच गदारोळ उठला! बोटीवर आम्हाला याचा काहीच पत्ता नव्हता आणि आम्ही अगदी मजेत होतो; मस्त गरमगरम नाश्ता करत होतो. नौदलाच्या पद्धतींचा चांगलाच अनुभव असलेल्या ॲडमिरल साहेबांनी आदल्या रात्रीपासून नेव्हीशी काही संपर्क झाला आहे का ते मला विचारलं. संपर्कयंत्रणा काम करत नसल्याचं मी त्यांना सांगितलं आणि जास्तीत जास्त किनाऱ्याजवळ जाऊन मोबाइल फोनवरून नेव्हीला आपली खुशाली कळवण्याचा प्रयत्न करत असल्याचंही खात्रीपूर्वक सांगितलं.


"मला वाटतं, एक तासाच्या आत आपल्याला त्यांच्याकडून काहीतरी निरोप येईल; तसं जर झालं नाही तरच मला आश्चर्य वाटेल," ते मोठ्या आत्मविश्वासानं म्हणाले. तसंच झालं. एक तासाच्या आत नेव्हीच्या टेहळणी विमानाकडून व्हीएचएफ संपर्कयंत्रणेवरून मला संदेश आला. ते आमची स्थिती जाणून घेण्यासाठी आमच्याशी संपर्क साधायचा प्रयत्न करत होते. काहीच मिनिटांत ते विमान आमच्या डोक्यावर घिरट्या घालायला लागलं आणि त्यापाठोपाठ नौदल आणि तटरक्षक दलाची जहाजं आमच्या भेटीसाठी येताना दिसली. त्या सगळ्यांना आमच्यावर नजर ठेवायला सांगण्यात आलं होतं.

ताशी १८ सागरी मैल वेगानं वाहणारं जोरदार वारं पाठीशी घेऊन आम्ही ५ मार्च २००९ रोजी मुंबई गाठली. नेव्हल डॉकयार्डमध्ये प्रवेश करण्याआधी आणि कमांडर इन चीफकडून औपचारिकरीत्या स्वागत स्वीकारण्याआधी मुंबई बंदरात विहार करायला खूप मजा आली. माझ्यासाठी हा दिवस खूप महत्त्वाचा होता; मनात संमिश्र भावनांनी गर्दी केली होती. माझे वडील हयात असते तर त्या दिवशी त्यांचा ६७ वा वाढदिवस असता. त्यांना स्वतःच्या हातानं काम करायला आवडायचं आणि 'म्हादेई'चं काम करायला, तिच्यावर सैर करायला त्यांना नक्कीच खूप आवडलं असतं. शिवाय, धक्क्याच्या शेवटच्या टोकाला माझी पहिली आणि एकमेव नेव्हल कमांड आयएनएसडीबी टी-५५ सेवेतून निवृत्त केली जात होती. आयुष्य खरंच एक नवीन वळण घेऊन पुढे सरकलं होतं!

**(मेहता पब्लिशिंग हाऊस प्रकाशित आणि मुक्ता देशपांडे द्वारा अनुवादित 'सागरी परिक्रमेचा पराक्रम' या पुस्तकातून)**

**सागरी परिक्रमा पूर्ण करून मुंबईला आल्यानंतर तत्कालीन उपराष्ट्रपती हमीद अन्सारी यांनी दिलिप दोंदे यांचं स्वागत केलं. त्या प्रसंगी हमीद अन्सारी, नौदलाचे अधिकारी आणि अन्य मान्यवरांसह दिलिप दोंदे (उजवीकडून दुसरे)**





**सागरात प्रवास करताना 'म्हादेई'**

**'म्हादेई'चा मुंबईत प्रथम प्रवेश**



सर्व प्रकारची महाविद्यालयीन पुस्तके, युपीएससी, एमपीएससी, सेट-नेट,
इंजिनीअरिंग, मेडिकल, मॅनेजमेंट, सायन्स, कॉम्प्युटर इ. विविध विषयांवरील
क्रमिक व संदर्भ पुस्तके यांचे माहेरघर

# मेहता बुक सेलर्स

३२२, भाऊसिंगजी रोड, भवानी मंडपाजवळ, कोल्हापूर - ४१६०१२.
वेळ : सकाळी ९.३० ते रात्री ८.०० (शनिवार बंद)
फोन : (०२३१) २५४२९०१/२५४२३०४
Email : mehtabooksellers@gmail.com

Mehta eBooks

**1000+ Marathi Titles available as e-Book**

on

GET IT ON Google Play

amazon


iTunes Connect

नाहीत स्कॅन केलेली पाने किंवा नाहीत पीडीएफ्स...
मराठीत प्रथमच, खरीखुरी eBooks
युजर फ्रेंडली, वाचायला सोपी, सोयीस्कर -
थेट तुमच्या कॉम्प्युटर, आयपॅड, किंडल आणि अॅन्ड्रॉइड टॅब्लेटवर!

eBook

eBooks साठी खालील लिंक्सचा वापर करा
play.google.com/store/books
www.amazon.in
books.apple.com/us/book

Online पुस्तके खरेदी करा www.mehtapublishinghouse.com





सीतेच्या आयुष्याचा चिंतनात्मक आढावा असणारी
एस.एल.भैरप्पा यांची समृद्ध रामकथा...

## उत्तरकांड

मूळ लेखक - एस.एल.भैरप्पा
अनुवाद - उमा कुलकर्णी

पृष्ठसंख्या : ३०८
किंमत : ₹३९५

Book Available





गंगापुत्र भीष्म पितामह यांची सखोल जीवनयात्रा
स्पष्ट करणारं आधुनिक महाभारत..

## प्रतिश्रुती स्मरणयात्रा भीष्मांची

मूळ लेखक - ध्रुव भट्ट
अनुवाद - अंजनी नरवणे

पृष्ठसंख्या : २५६
किंमत : ₹३३०

Book Available




मानवी लालसेचे अनेक पदर उलगडत जात
मनात तळ ठोकून बसणारी
व्यक्तित्वं मांडणाऱ्या विलक्षण कथा...

## एका लालसेने

मूळ लेखक - मंजुल बजाज
अनुवाद - डॉ. शुचिता नांदापूरकर-फडके

पृष्ठसंख्या : २७२
किंमत : ₹३२०

Book Available



# तिमिरातून तेजाकडे...

- भावेश भाटिया

*भावेशची दृष्टी जन्मतःच अधू होती. हळूहळू त्यांना पूर्ण अंधत्व आलं; पण त्या अंधत्वाच्या अंधारात त्यांनी 'सनराईज कॅन्डल्स'रूपी ज्योत चेतवली. त्या ज्योतीच्या प्रकाशात त्यांनी अन्य दृष्टिबाधितांनाही रोजगाराचा मार्ग दाखवला. मेणबत्त्यांच्या व्यवसायात स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण करून राष्ट्रपतींच्या हस्ते पुरस्कार स्वीकारण्यापर्यंतची ही प्रेरणादायी प्रकाशवाट...*

## अंधत्वाचं दुःख आणि आईचा आधार

एके दिवशी मी संध्याकाळी शाळेतून घरी आलो. शाळेचं दप्तर एका कोपऱ्यात आदळलं आणि उशीत तोंड खुपसून ढसाढसा रडू लागलो. त्या वेळी मी पहिलीत होतो. त्याआधी मी दोन वर्षं बालवाडीत होतो, तेव्हा मला शाळेत जायला खूप आवडायचं; पण आता पहिलीच्या वर्गात बरेच नवीन विद्यार्थी आले होते, त्यांच्याशी माझी ओळखही नव्हती.



**भावेश भाटिया आणि त्यांच्या अंध सहकाऱ्यांनी साकारलेल्या कलात्मक मेणपणत्या**

माझ्या रडण्याचा आवाज ऐकून आई माझ्याजवळ आली. तिनं माझ्या डोक्यावरून प्रेमानं हात फिरवला. मी पायांतले बूटसुद्धा काढले नव्हते. तिनं  माझ्या पायांतले बूट काढले, मोजे उतरवले. ते बाजूला ठेवत ती म्हणाली,

''काय झालं? आज कुणाशी तरी भांडण झालं वाटतं...''

मग ती माझ्या डोक्यावरून व पाठीवरून हात फिरवू लागली... आणि मला खूप सुरक्षित वाटू लागलं; पण सहानुभूती मिळाल्यामुळे बहुधा, मला आणखी कढ येऊ लागले. मी रडत रडत तिला म्हणालो,

''मी उद्यापासून शाळेला जाणार नाही. सगळे जण मला 'आंधळा-आंधळा' असं म्हणून चिडवतात...''

अखिल ब्रह्मांडात फक्त मीच सर्वाधिक दुःखी असल्यासारखा मी तिला बिलगून रडू लागलो...

माझी आई मात्र शांत होती. तिनं जराही विचलित न होता माझ्या डोळ्यांतून वाहणाऱ्या अश्रुधारा तिच्या साडीच्या पदरानं टिपल्या आणि ती जे म्हणाली ते माझ्या आजही जसंच्या तसं लक्षात आहे.

''हे बघ बाळा, आपल्याला सगळ्यांनाच माहीत आहे की तुझे दोन्ही डोळे जन्मतःच अतिशय कमजोर आहेत. डॉक्टरांच्या म्हणण्यानुसार तू कदाचित आयुष्यात कधीही पुस्तकं किंवा फळ्यावरचं वाचू शकणार नाहीस. आम्ही तुला वर्गात पहिल्या बाकावर बसवून फळ्यावर लिहिलेलं शिकवण्याचा कितीतरी वेळा प्रयत्न केला आहे. तू पाचव्या वर्षापासूनच हा जाड काचांचा चष्मासुद्धा घालत आहेस; पण बाळा, डॉक्टर काकांनी सांगितलंय की, तुला हा जो डोळ्यांचा त्रास आहे, तो हजारांत नव्हे, तर लाखांत एखाद्याला असतो. तुझ्या दोन्ही रेटिनांवर बरेच डाग आले आहेत, त्यामुळे तुझ्या डोळ्यांत प्रतिमा तयार होऊ शकत नाही आणि तुझ्या डोळ्यांतून मेंदूकडे जाणाऱ्या शिरा सुकू लागल्या आहेत; ज्यावर जगभरात कुठेही उपचार उपलब्ध नाहीत.''

ही गोष्ट मला समजावून सांगितल्यानंतर आईनं मला पुढे जे सांगितलं त्यातला शब्द न् शब्द आजही माझ्या स्मरणात आहे.

''भावेश, एक गोष्ट कायम लक्षात ठेव. तू हे जग पाहू शकत नाहीस, ठीक आहे; पण त्यामुळे वाईट वाटून घेण्याचं अजिबात कारण नाही. तू हे जग पाहू शकतोस की नाही यामुळे काहीही फरक पडत नाही; मात्र आयुष्यात असं काहीतरी करण्याचा प्रयत्न अवश्य कर... काहीतरी वेगळं करण्याचा... चाकोरीबाहेर जाऊन काहीतरी करण्याचा,  की जे जग तू पाहू शकत नाहीस, तेच जग तुझ्याकडे पाहू लागेल. तुझ्या हातून काहीतरी वेगळं घडवण्यासाठी परमेश्वरानं तुला असं घडवलं असेल. एक दिवस मला तुझी आई म्हणवून घेण्याचा अभिमान वाटेल, याची मला पूर्ण खात्री आहे.''

मी डोळे पुसून आईचं बोलणं लक्षपूर्वक ऐकत होतो. ती पुढे म्हणाली,

''बाळा, आज जी मुलं तुला आंधळा म्हणून चिडवतात, त्रास देतात, तीसुद्धा तुझ्याच वयाची आहेत. त्यांना काय योग्य, काय अयोग्य हेही कदाचित कळत नसेल. असं बोलावं का, हेही समजत नसेल. बस, तू न वैतागता किंवा न नाराज होता वर्गातल्या सगळ्या मुलांशी मैत्री

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्योजकता पुरस्कार स्वीकारताना भावेश आणि त्यांची पत्नी**



**नॅशनल ॲचिव्हर्स कॉन्फरन्समध्ये वक्ता म्हणून भावेश यांनी सहभाग नोंदवला, त्यावेळी अन्य मान्यवरांसह भावेश**



**तत्कालीन राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांच्या हस्ते राष्ट्रपती पुरस्कार स्वीकारताना भावेश भाटिया**





भावेश यांनी मेणातून साकारलेला शिवरायांचा पुतळा



आपल्या अंध सहकाऱ्यांसमवेत कामात रमलेले भावेश

करायला सुरुवात कर. या सगळ्यांच्या मैत्रीचा तुला पुढं जाण्यासाठी खूप उपयोग होईल. आता कुणीही चिडवलं, त्रास दिला तरी माझा राजा त्यांच्याशी कधीही भांडण, मारामारी करणार नाही, रडणार नाही. भेकड माणसं रडतात. तू तर माझा बहादूर मुलगा आहेस.''

त्या दिवशी मी आईच्या मांडीवर डोकं ठेवून तिचं बोलणं लक्ष देऊन ऐकत होतो. आईचा हात माझ्या डोक्यावरून फिरत होता. तिच्या स्पर्शातून ममता आणि आत्मीयता पाझरत होती. तिचं बोलणं ऐकता ऐकता मला कधी झोप लागली तेही कळलं नाही.

*नंतर काही वर्षांनी...*

**मेणबत्त्यांच्या व्यवसायाची मुहूर्तमेढ**

मी इरफानच्या मदतीनं महाबळेश्वरच्या मार्केटमध्ये मारुती मंदिराच्या बाहेर हातगाडी लावायचो. जास्तीत जास्त लोकांची नजर माझ्या मेणबत्त्यांवर पडावी असा माझा उद्देश होता; पण शनिवारी मंदिरात बरीच गर्दी असायची, त्यामुळे नारळ, तेल, हार विक्रेते यायचे आणि तिथे जागा मिळणं फार मुश्किल व्हायचं; पण तिथेही आईची शिकवण उपयोगी पडली. ती सांगायची, सगळ्यांशी मैत्री कर. मग मी सगळ्यांना दादा, काका, मामा म्हणून त्यांच्याशी मैत्री करायचो आणि वेळ मारून न्यायचो.

महाबळेश्वरच्या सगळ्या दुकानांत बऱ्याच मोठमोठ्या कंपन्यांच्या व ब्रँडस्च्या मेणबत्त्या मिळत असत. मी महाबळेश्वरच्या मार्केटमध्ये फिरून तिथे कोणकोणत्या प्रकारच्या मेणबत्त्या मिळतात याची माहिती घेतली, तेव्हा लक्षात आलं की या क्षेत्रात नव्या प्रयोगांची गरज आहे. मग मी माझ्या सर्जनशीलतेचा उपयोग करू लागलो. मी पांढऱ्या मेणबत्तीवर विविध रंगांचे जिलेटीन कागद गुंडाळण्यापासून ते विविधरंगी मेणबत्त्यांची पॅकेट्स बनवण्यापर्यंत वेगवेगळे प्रयोग केले. काही महिन्यांतच मी आणखी धीर एकवटून वेगवेगळ्या प्रकारचे डाय खरेदी करू लागलो; पण अद्याप मला महाबळेश्वरपर्यंत कच्च्या मालाचा पुरवठा करणारा सप्लायर मिळाला नव्हता.

सहा-सात महिने असेच गेले. एक प्रकारचा धागा संपला, तरी मला मुंबईला जावं लागत असे. मग हळूहळू करत सप्लायर्स मिळत गेले. मी त्यांचा विश्वास मिळवत गेलो. मी वडिलांना सांगून त्यांना बँकेचा ड्राफ्ट पाठवायचो; कारण त्या काळी ऑनलाईनची व्यवस्था नव्हती, त्यामुळे ड्राफ्ट हाच मार्ग होता. ड्राफ्ट पाठवल्यावर मुंबईहून ट्रान्सपोर्ट कंपनीकडून माल येत असे. अशा प्रकारे माझं काम प्रगतिपथावर होतं.

आता प्रश्न होता, या कामात वेगळेपणा व वैविध्य कसं आणायचं?

मग मी त्यावर विचार करू लागलो. काही दिवसांनी दिवाळी होती. त्यासाठी मेण भरलेल्या पत्र्याच्या पणत्या बाजारात येतात, त्या अब्दुलभाईंकडे किलोच्या हिशोबानं मिळत असत. त्या पणत्यांमध्ये घालण्याचा धागाही तयारच मिळत असे. मग मी ते साहित्य घेऊन त्यापासून वेगवेगळ्या चार-पाच प्रकारच्या पत्र्याच्या पणत्या बनवू लागलो. त्यात काहीतरी वेगळेपण आणण्याच्या इच्छेतून कल्पना सुचली आणि मी पुठ्ठे वेगवेगळ्या आकारांत कापून त्यावर या पत्र्याच्या मेणबत्त्या आकर्षक स्वरूपात मांडल्या, त्यांची अर्धा डझन किंवा एक डझन अशी वर्गवारी केली. त्यावर विविधरंगी जिलेटिन कागद चिकटवला आणि छानसं गिफ्ट पॅक तयार केलं. माझं हे गिफ्ट पॅक हातोहात खपायचं; पण या पॅकेजिंगमध्ये खूप वेळ जायचा. त्या दरम्यान मला समजलं, की या कामासाठी बाजारात 'हॉट गन' आणि 'व्हॅक्यूम पॅकिंग'चं मशिन मिळतं. एक-दीड वर्षानी मी हे मशिनसुद्धा विकत घेतलं.

इरफान बऱ्याचदा मला सकाळी-सकाळी त्याच्यासोबत 'सूर्योदय पॉइंट'वर घेऊन जात असे. तिथे शेकडो पर्यटक आलेले असत. मला सूर्योदय पाहता येत नसला, तरी मी त्याची ऊर्जा मात्र भरून घ्यायचो. मी मेणबत्त्या बनवण्याचा हा छोटासा उद्योग सुरू केल्यापासून, कसं कोण जाणे, पण माझ्या आतमध्ये मला एक जबरदस्त सकारात्मक ऊर्जा जाणवू लागली होती... माझ्या आतमध्येसुद्धा सूर्योदय होत असावा! आता मला माझ्या आतल्या व बाहेरच्या सूर्योदयात बरंच साम्य वाटू लागलं होतं. त्याचा एक छान परिणाम म्हणजे, मी माझ्या मेणबत्त्या या शब्दांशी गुंफल्या... 'सनराईज...' आणि अशा प्रकारे 'सनराईज कॅन्डल्स' या 'ब्रॅन्ड'चा जन्म झाला.

महाबळेश्वरच्या टेलिफोन एक्स्चेंजमध्ये एक सद्गृहस्थ काम करत असत. ते उत्तम पेंटरही होते. त्यांनी मला एक कापडी फलक तयार करून दिला होता. त्यावर 'सनराईज कॅन्डल्स' अशी अक्षरं लिहिलेली होती. मी तो फलक रोज त्या हातगाडीवर बांधायचो. त्यांनी त्या फलकावर

अक्षरांबरोबरच सूर्योदयाचं चित्रही रेखाटलं होतं. पुढे तोच 'सनराईज कॅन्डल्स'चा 'लोगो' बनला.

महाबळेश्वरमध्ये पाऊस खूपच असायचा, त्यामुळे मी स्टॉलवर जाताना सोबत प्लॅस्टिकचा कागद न्यायचो, पाऊस आला तर स्टॉल झाकण्यासाठी. जुन्या प्लायवुडपासून एक टप्प्यांचा स्टॅन्डही बनवून घेतला होता. त्यामुळे हातगाडीवर मेणबत्त्या ठेवायला व त्यांची सजावट करायला आणखी बरीच जागा उपलब्ध झाली होती. हातगाडी हा माझ्यासाठी असा मंच होता, ज्याच्या माध्यमातून मी माझ्या व्यवसायातला रोज कुठला ना कुठला नवा धडा शिकत होतो.

**मनोकामनेची पूर्ती**

बऱ्याचदा मनात यायचं की मी आता माझ्या पायावर उभा राहिलो आहे... सचिनजींसारखे जिवाभावाचे मित्र मिळाले आहेत... नीताची साथ मिळाली आहे... सगळं छान चाललं आहे; पण मनात एक अपराधी भावना घेरून होती. दृष्टिबाधित मित्रांसाठी काहीतरी करण्याच्या उद्देशानं मी आणि नीता एकत्र आलो होतो; पण ते ध्येय कुठे पूर्ण होताना दिसत नव्हतं. ही गोष्ट मनात सलत होती. आम्ही दोघं आपापल्या जबाबदाऱ्या सांभाळत, पर्यटन हंगामाच्या धामधुमीच्या काळात मार्केटमधील स्टॉलवर काम करत असायचो, तेव्हा हे अपराधीपण अधिकच गडद व्हायचं. त्या मार्केटमध्ये कुठून कुठून दूरवरून आलेले कितीतरी दृष्टिबाधित मित्र- ज्यांना आम्ही ओळखतही नव्हतो– हातातली काठी आपटत, भीक मागत आमच्यासमोरून जात असत. एकीकडे आम्ही त्या छोट्याशा टेबलवर स्वाभिमान व आत्मसन्मानाच्या मोठमोठ्या गप्पा मारत होतो, तर दुसरीकडे माझे ते अंध मित्र भीक मागत होते. हे किती विसंगत होतं! या दोन दृश्यांतून दृष्टिहीन जीवनाची दोन वेगवेगळी रूपं दिसत होती. मला



**क्रीडा क्षेत्रातील भावेश यांची चमकदार कारकीर्द**

**दुपारी तीनच्या सुमाराला समोरून एका महिलेचा आवाज आला. ''मिस्टर भाटिया, तुमच्याशी बोलायचं होतं.''**

**मला वाटलं की त्या बाई अभिप्राय द्यायला आल्या असतील.**

**''मी गेले दीड-दोन तास हे प्रदर्शन पाहतीये. मी माहितीपटही पुन्हा पुन्हा पाहिला. मला खूप आवडला. तुमचं प्रत्येक प्रॉडक्ट मी हात लावून पाहिलं. खूप आवडलं मला.''**

**मी त्यांचे आभार मानले.**

**''मिस्टर भाटिया, मला तुमच्याशी थोडं आणखी बोलायचं होतं,'' त्या म्हणाल्या.**

**त्या तीन दिवसांत बरेच लोक बिझनेसचे वेगवेगळे प्रस्ताव घेऊन मला भेटायला येत होते. त्यामुळे तसंच काहीतरी असेल, असं मला वाटलं. या तीन दिवसांत सकाळपासून संध्याकाळपर्यंत मला शेकडो लोक भेटून गेले होते.**

**पण माझा हा तर्क चुकीचा होता. त्या बाईंनी मला धक्काच दिला. त्या म्हणाल्या, ''डॉक्टरांनी सांगितलंय, मला चौथ्या स्टेजचा कॅन्सर आहे. माझे खूप थोडे दिवस उरले आहेत. जास्तीत जास्त एक ते सव्वा वर्ष. त्यापेक्षा जास्त नाही. मी इतकी हताश आणि खिन्न झाले होते की मी तीन-चार महिनेसुद्धा जगणार नाही, असं मला वाटत होतं. मी बऱ्याच वृत्तपत्रांत या प्रदर्शनाबाबतच्या बातम्या व लेख वाचले. तुमची हॅन्डबिल्सही पाहिली. मग मला राहवलं नाही आणि मी इथं ओढल्यासारखी आले. मिस्टर भाटिया, या वातावरणात दोन तास व्यतीत केल्यानंतर, मी तुम्हाला एवढंच सांगायला आले आहे, की काहीही झालं तरी आता मी या कॅन्सरने मरणार नाही. इथे येऊन मला इतकी ऊर्जा मिळाली आहे की, आता या ताकदीच्या बळावर मी या कॅन्सरशी दोन हात करीन... जसे तुम्ही तुमच्या अंधत्वाशी दोन हात केले आहेत, तसेच.''**

**मी त्यांना खूप खूप शुभेच्छा दिल्या आणि नीताला सांगून त्यांचा फोन नंबर व पत्ता लिहून घेतला. त्या तिथून प्रसन्न मनाने बाहेर पडल्या.**

**माझी त्यांच्याशी भेट झाली, तो दिवस होता २२ जुलै, २००७. डॉक्टरांच्या म्हणण्यानुसार त्या फक्त एक ते सव्वा वर्षच जगणार होत्या; पण त्यांच्या मनोबलाने चमत्कार घडवला! २०१५ सालापर्यंत त्या अगदी मजेत जगल्या. त्यांच्याशी माझे रेशीमबंध जुळले होते. त्या माझी मोठी बहीणच बनल्या होत्या. मी दर वर्षी राखीपौर्णिमेला पुण्याला जाऊ शकलो नाही; पण त्यांची राखी मात्र नियमित व वेळेत येत असे.**



ज्येष्ठ समाजसेवक प्रकाश आमटे यांच्या हस्ते 'भरारी' पुरस्कार स्वीकारताना भावेश



हैदराबादच्या एशियन इन्स्टिट्यूट ऑफ ॲडव्हान्स्ड डेन्टिस्ट्री या संस्थेच्या हस्ते भावेश यांचा सत्कार करण्यात आला तो प्रसंग



सर्वोत्कृष्ट स्वयंरोजगार पुरस्कार (अंधांसाठीचा) सोहळ्याप्रसंगी मुकेश अंबानी आणि नीता अंबानी यांच्यासह भावेश.

प्रत्येक वेळी वाटायचं, की यांना रोखलं पाहिजे. एके दिवशी माझे तीन-चार दृष्टिबाधित मित्र काठी आपटत निघाले असताना मला अगदीच राहवलं नाही. ते येत असल्याचं नीतानंही मला सांगितलं. मग मी त्यांना थांबवलं आणि माझ्या टेबलावर मांडलेल्या मेणबत्त्या त्यांना स्पर्शानं दाखवल्या.

''मित्रांनो, मीही तुमच्यासारखाच दृष्टिबाधित आहे. ही माझी पत्नी नीता,'' मी सांगितलं. आणि त्यांना विचारलं, ''तुम्ही दिवसाला किती पैसे मिळवता?''

त्यावर सगळे गप्प बसले. कुणीच काही उत्तर दिलं नाही. तरी मी त्यांना पुन्हा पुन्हा तोच प्रश्न विचारत राहिलो.

मी त्यांना म्हणालो, ''हे बघा, मीही तुमच्यापैकीच आहे.''

मी दृष्टिबाधित आहे, तुमच्यापैकीच आहे हे ऐकल्यानंतर त्यांनी 'आता या धंद्यात कुठं काय राहिलंय,' असा सूर आळवत मला टाळायला सुरुवात केली.

माझ्या बोलण्यावरून त्यांना बहुधा मी मेणबत्त्यांचा व्यवसाय बंद करून त्यांच्या या भीक मागण्याच्या ऐतिहासिक उपक्रमात सहभागी होऊ इच्छितो, असं वाटलं असावं. त्यांना आपल्या धंद्यात स्पर्धा वाढण्याची भीती वाटली असावी, त्यामुळे त्यांनी मला टाळण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या डोक्यात काय शिजतंय हे माझ्या लगेच लक्षात आलं. मग मी त्यांना म्हणालो,

''तुमचा गैरसमज होतोय. मला तुमच्यासोबत यायचं नाहीये, माझी तुम्हा सर्वांना माझ्यासोबत घेऊन जाण्याची इच्छा आहे.'' दरम्यान नीतानं त्यांच्यासाठी चहा मागवला आणि आमची त्यांच्याशी थोडी मैत्री झाली.

नीतानंही त्यांच्याशी खूप सहानुभूतीनं बातचीत केली. अखेर

एका प्रदर्शनावेळी भावेश आणि त्यांचे अंध सहकारी



आंतरराष्ट्रीय परिषदेत भाषण देताना भावेश







**भावेश यांनी २०१५मध्ये पहिल्यांदा महाबळेश्वरमध्ये भारताच्या २२ राज्यांतून आलेल्या ५०० अंध मित्रांच्या रॅलीचं आयोजन केलं होतं, त्या वेळचं छायाचित्र.**

**पॅरा ऑलिम्पिक प्रसंगी आपल्या महाराष्ट्र स्टेट ब्लाइंड टीमबरोबर भावेश.**

त्यांच्यातील एकानं मनाचे घट्ट लावून घेतलेले दरवाजे जरासे किलकिले केले.

''आम्हाला दिवसभरात ऐंशी ते शंभर रुपये मिळतात.'' त्यानं सांगितलं.

त्या सर्वांची या अपमानास्पद कामातून सुटका करण्यासाठी त्यांना दररोज इतके पैसे उचलून देण्याएवढी परिस्थिती माझी त्या वेळी नव्हती. तरीही मी त्यांना म्हणालो, ''मित्रांनो, हे काम बंद करा. चला, आपण सगळे आपल्या घरी जाऊ या. आपण सगळे मिळून काहीतरी करू या.''

त्यावर त्या सगळ्या अंध मित्रांचा एकच प्रश्न होता, आमचा उदरनिर्वाह कशावर चालणार? आम्ही आमची मिळकतीची ही सध्याची सोय बंद करून तुमच्यासोबत येऊ शकत नाही.

पण कसं कोण जाणे... बहुधा परमेश्वराचीच माझ्या तोंडून हे वदवण्याची इच्छा असावी, की भले तुम्ही रोज शंभर रुपये मिळवत असाल; पण मी तुम्हाला रोज दोनशे रुपये देईन.

पण त्यांचा माझ्या सांगण्यावर विश्वास बसला नाही. त्यांना आपली काहीतरी फसवणूक होत आहे, असं काहीतरी वाटलं.

तरी मी त्यांना सांगितलं, की मी तुम्हाला रोज दोनशे रुपये देईन आणि तुमच्या राहण्याची व खाण्यापिण्याची व्यवस्थाही मोफत करीन; पण तुम्ही हे जे हीन काम करत आहात, ते करू नका... बंद करा हे काम.

अखेर मी काय सांगतो आहे हे त्यांच्या लक्षात आलं. मग त्या दिवशी आम्ही आमचा स्टॉल अर्धा तास लवकर बंद केला व त्या सर्व अंध मित्रांना आमच्या घरी घेऊन आलो.

**निपमन फाउंडेशनतर्फे Equal Opportunity Award स्वीकारल्यानंतर मान्यवरांसह भावेश.**



**अंध मित्रांचा सहभाग आणि 'सनराईज कॅन्डल्स'ची यशस्वी वाटचाल**

''मैं गोताखोर, मुझे गहरे जाना होगा,
तुम तट पर बैठ लहरों से बातें किया करो!''

आपल्याला पोहायला शिकायचं असेल तर आपल्याला खोलवर बुडी घ्यावीच लागेल. मेणबत्त्यांचा उद्योग खऱ्या अर्थानं यशस्वी करायचा असेल, या सगळ्या मित्रांना सोबत घेऊन वाटचाल करायची असेल, तर आम्हाला 'गिअर' बदलावा लागेल आणि खोलवर बुडी घ्यावीच लागेल, हे माझ्या लक्षात आलं होतं.

टिळक स्मारकमधल्या त्या प्रदर्शनाच्या निमित्तानं आम्ही अशी खोलवर बुडी घेतली होतीच. या प्रदर्शनानंतर 'सनराईज कॅन्डल्स'चा इवलासा वेलू गगनावरी निघाला होताच! मग आम्ही कित्येक मोठमोठ्या हॉटेलांमध्ये व रिसॉर्टमधील युटिलिटी शॉपमध्ये आमचे स्टॉल भाड्यानं लावले. आमच्या मेणबत्त्या बनवणाऱ्या व त्या विकणाऱ्या सर्व दृष्टिबाधित मित्रांना जास्तीत जास्त काम मिळावं, हा आमचा उद्देश होता.

आमच्या या उद्योगात कुठली संस्था, एन.जी.ओ. किंवा देणगी, तसंच सरकारी, वैयक्तिक अनुदान वगैरे काहीही नव्हतं. सिंदोड येथील वर्कशॉपमध्ये सर्व दृष्टिबाधित मित्र मेहनत करून आपला वाटा कमवत होते. त्यांचं ज्या प्रकारचं योगदान असेल त्यानुसार त्यांना रास्त फळ मिळत होतं. सगळं काही व्यवस्थित सुरू होतं. 'सनराईज कॅन्डल्स'ची कीर्ती दूरवर पसरत होती. सोशल मीडिया प्रिंट व इलेक्ट्रॉनिक मीडियामध्ये रोज 'सनराईज कॅन्डल्स'बद्दल काही ना काही प्रसिद्ध होत होतं, त्यामुळे आमचं 'गुडविल' भक्कम होत होतं. महाराष्ट्रालगतच्या कर्नाटक, गोवा, गुजरात, मध्य प्रदेश अशा राज्यांमधूनही विचारणा होऊ लागली होती. तिथले बेरोजगार दृष्टिबाधित मित्र 'सनराईज कॅन्डल्स'मध्ये येण्यासाठी खूप उत्सुक होते. त्यांनाही मेणबत्त्या बनवण्याचं काम शिकायचं होतं, त्या कामातलं तंत्रज्ञान जाणून घ्यायचं होतं. आणि आम्हीही त्यांना हे काम शिकवू इच्छित होतो. आमची जी कल्पना होती, आम्हाला जे घडावं असं वाटत होतं, ते वास्तवात साकार होत होतं!

**(मेहता पब्लिशिंग हाऊसच्या भावेश भाटिया लिखित आणि सुप्रिया वकील अनुवादित 'रुक जाना नही' या आगामी पुस्तकातून)**

# प्रशम :
# सांत्वन, समाधान, विश्रांती : विशाल परुळेकर

**- स्वाती चांदोरकर**



*माझ्या वाट्याला जे दु:ख आलं, ते इतरांच्या वाट्याला येऊ नये, असं वाटणारे लोक हाताच्या बोटांवर मोजण्याइतके असतात. अशाच अत्यल्प व्यक्तींमध्ये समावेश होतो विशाल परुळेकरचा. लहानपणी विशालला जे दारिद्र्यमय, अनाथासारखं जीवन जगावं लागलं, ते अन्य कुणाला जगावं लागू नये म्हणून विशाल आज अनाथांना, आर्थिकदृष्ट्या दुर्बलांना आधार देतो आहे. विशालच्या विशाल मनाचं हे थक्क करणारं दर्शन...*

प्रशम म्हणजे सांत्वन, समाधान, विश्रांती. अनेकदा असं होतं की समाधान प्राप्त होतं; पण विश्रांती मिळतेच असं नाही. अथवा सांत्वन होतं; पण समाधान होत नाही. तीनही गोष्टी एकाच वेळी प्राप्त होतील अशी जागा असू शकते? एक जागा अशी आहे जिथे या तीनही गोष्टी प्राप्त होतात. नाही, हा कोणा साधूचा आश्रम नाही, ना कुठलं मंदिर, ना कुठलं निसर्गरम्य ठिकाण. अगदी लहानशी जागा आहे. वसईच्या पुढे, एका गावात. त्या जागेचं नाव आहे 'साई आधार.'

आता साई हे नाव आलं म्हणजे हे साईबाबांचं मंदिर आहे असं वाटू शकतं. ते तसं नाही; पण इथे या नावानं अनेक निराधारांना आधार मात्र दिलेला आहे. त्या आधारवडाचं नाव आहे विशाल परुळेकर. विशालची आई त्याच्या वयाच्या सातव्या महिन्यात देवाघरी गेली. वडील व्यसनाधीन, सांभाळ आजीनं केला. तिला जमेल तसं वाढवलं. छापखाना होता वडिलांचा; पण व्यसनापायी विकावा लागला. पोटात भूक होती. वखवखलेली. वसईत एक साईमंदिर आहे. तिथे मग पडेल ते काम करायचं. चपला सांभाळायच्या, जमीन पुसायची, हाय-वेवर मिरची-लिंबूचे आकडे विकायचे, गाड्यांच्या काचा पुसायच्या. कुणी पैसे द्यायचे तर कुणी त्याच्या हातातलं मळकं फडकं बघून धुतकारून लावायचं. हमाली करायची. चिल्लर घेऊन घरी जायचं. त्यातून जे काही पोटाला मिळेल ते.... एक वेळ तर एक वेळ, क्वचित तेही नाही.

मग शेवटचा उपाय, हातात कटोरा. भीक मागायची. लाज कसली त्यात? पोटाला, भुकेला लाज कळत नाही. मग देवळाबाहेर कटोरा घेऊन उभं आणि त्यातून मिळालेल्या चिल्लरनं विशालची भूक शमू लागली. गंमत आहे ना! काम करत होता तर कुणी एक नाणं देत नव्हतं. भीक मागायल लागला तर कटोरा भरू लागला. काय मानसिकता असते आमची? दान केलं, याचा इतका आनंद, समाधान लाभावं? पण तेच पैसे कुणी कष्ट करून मागतो आह, तर आम्ही हात आखडता घेतो. त्यात दानाचं पुण्य लाभत नाही ना. भीक मागायला उभं राहिलं की सगेसोयरे भेटतात. विशालच्या बरोबरीने अजून तीन-चार मुलं, एक कुष्ठरोगी आणि एक एचआयव्हीबाधित महिला, नवऱ्यानं त्यागलेली, घरादारानं हाकलून लावलेली, भीक मागायला उभे असत. ते विशालचं कुटुंब झालं.

या अशा स्थितीत विशालनं शिक्षण मात्र सोडलं नाही. म्युनिसिपाल्टीच्या शाळेत शिकायचं. अभ्यास करायचा. आणि संध्याकाळ भीक मागण्यात घालवायची. या साईमंदिरानं त्याला आधार दिला. कुणी प्रसाद म्हणून पेढे ठेवायचे, कुणी बर्फी, कधी फळ, कुणी काही, कुणी काही. नारळ तर नक्की मिळायचा. मग ते खोबरं त्या सर्व कुटुंबानं खायचं. भरपूर पाणी प्यायलं की त्या रात्रीची चिंता मिटली; पण खरे हाल व्हायचे ते पावसाळ्यात. धो धो पाऊस असला की साईबाबासुद्धा एकटे होऊन जायचे. कुणी चुकून फिरकला तर काही कमाई होणार, तीही नक्की नाही.

दिवसभर प्रत्येक जण काही ना काही काम करायला जायचं. मुलं सिग्नलवर गजरे, काकड्या विकायला जायची. ती बाई कुठे काम मिळतंय का बघत हिंडायची. कुष्ठरोगी मात्र काहीच करू शकायचा नाही. दुपारच्या जेवणाची तशी आबाळच व्हायची; पण रात्रीला सर्वांना पोटभर



**आपल्याला मिळालेल्या बक्षिसाचा आनंद साजरा करताना 'साई आधार'मधील मुलं.**

मिळायलाच हवं, असं विशालला वाटायचं. मग त्यानं ठरवलं की दिवस कुठेही घालवा; पण रात्री साईमंदिराच्या समोर एक पत्र्याची शेड होती, तिथे सर्वांनी भेटायचं आणि त्या शेडला नाव दिलं गेलं 'साई आधार'. जग बघत, माणसांना बघत, अभ्यासात विशाल मोठा होत होता. त्याची हुशारी त्याच्या शिक्षकांनी जाणली. मानसशास्त्र या विषयावर एक विशेष परीक्षा घेतली जाणार होती, त्या परीक्षेचा विशालचा अर्ज त्या शिक्षकांनी त्याच्या नकळत भरला. आणि विशाल म्हणतो की चमत्कार होता का काय हे माहीत नाही, पण तो त्या परीक्षेत उत्तीर्ण झाला. राज्यात सातवा आणि पालघर-ठाणे पट्ट्यात पहिला आला.

कुठलंही यश माणसाला सकारात्मक बनवतं. विशाल सकारात्मक झाला. त्याचा जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला. वसईचे आमदार हितेंद्र ठाकूर यांनी विशालची शिर्डीमधल्या एका चांगल्या हॉटेलमध्ये



**शाळेतील शिक्षकांसह 'साई आधार'मधील मुलं**

व्यवस्थापक म्हणून नेमणूक केली. काही रक्कम बक्षीस म्हणून दिली. आणि मग त्यातूनच भागीदारीतून विशालनं स्वतःचं एक हॉटेल शिर्डीत काढलं. आणि मनोमन एक ध्येय निश्चित केलं, 'माझ्यासारखी अवस्था असणाऱ्या मुलांचं संगोपन करेन.' आपण प्रत्येक जण असे मोठमोठाले वायदे करत असतो. स्वतःशी, इतरांशी; पण ती ऊर्मी गेली की पुन्हा सर्व काही जैसे थे. विशाल आणि आपल्यामध्ये फरक आहे तो हाच. त्याची ऊर्मी कमी झाली नाही. आजही तितकीच आहे. आणि त्या ऊर्मीला एक दिशा आहे. सत्यता आहे. सातत्य आहे.

शिर्डीला असताना साईमंदिराच्या बाहेर एक म्हातारी तिच्या लहानशा नातवाला घेऊन भीक मागत बसलेली असायची. आजी कुष्ठरोगी होती. एका अपघातात तिचा मुलगा आणि सून दगावलेले होते. ते लहान मूल म्हणजे 'साई आधार'चं पहिलं बालक. पुढे त्या दोघांना घेऊन विशाल मुंबईला आला. वसईला एका डॉक्टरांकडे त्यांनी आजीला उपचारासाठी ठेवलं. आणि मुलाला आपल्या 'साई आधार'मध्ये नेलं. तीच पत्र्याची शेड. आजी पुढे वारली आणि त्या मुलाची जबाबदारी विशालवर आली.

आता काही तरी कमाई करायला हवी होती. शिर्डीचं हॉटेल त्यानं बंद केलं. जे काही पैसे हाती लागले ते त्यानं वसईत एका जागेत घातले. पत्र्याची एक खोली तयार झाली आणि नाव दिलं 'साई आधार.' भाड्यानं टेम्पो चालवायला सुरुवात केली. चार पैसे गाठीला लागू लागले. दरम्यान, अंकिता आयुष्यात आली. तिच्या वडिलांचा विटांच्या भट्टीचा व्यवसाय होता. अंकिता गावात ब्यूटिपार्लर चालवायची. मोठ्या आजारानं अंकिताचे वडील वारले. तशी त्यानं अंकिताला लग्नाबद्दल विचारलं आणि त्या लहानशा पोरीनं आनंदानं होकार दिला. एक गोष्ट आधीच स्पष्ट करून झालेली होती. गरिबी असणार, अनाथ मुलांचा तरीही सांभाळ केला जाणार. अमाप कष्ट घ्यावे लागणार. एक बावीस वर्षांचा पोरगा या अटी सांगत होता वीस वर्षांच्या मुलीला. आणि तिनं त्या मान्य केल्या होत्या. आजच्या युगात, दिखाऊ जगात, इतक्या तरुण वयात, जेव्हा मनात काही कविकल्पना असतात, स्वप्नं असतात, सुखी संसार बघितला जातो, अशा वयात एक पोरगा सांगतो आहे की यातलं काहीच मिळणार नाही; कदाचित दोन वेळचं अन्नसुद्धा नाही. लग्न करशील? आणि ती 'हो'म्हणते. लग्न होतं आणि इतक्या लहान वयात आठ-नऊ वर्षांच्या मुलाचं पालकत्व स्वीकारलं जातं.

कुठलंही कार्य म्हणजे एक झिंग असते. ती झिंग अंगात भिनली नाही तर कार्य घडणं शक्य नाही. ही झिंग दोघांच्याही तनामनात भरून राहिलेली. कधी बातमी येते वाचनात, अमक्यातमक्या ठिकाणी शेतकऱ्याची आत्महत्या. आणि त्या ठिकाणी विशाल पोचतो. त्या दुर्दैवी शेतकऱ्याचं घरदार बघतो. त्या घरातल्या पोरक्या मुलाला आपल्या छत्रछायेखाली घेतो. घरातली म्हणतात, बरं झालं, एक तोंड कमी झालं.आणि बघता बघता एकाचं दोन, दोनाची चार करत करत विशाल-अंकिताचं अंगण लहानग्या पावलांनी भरून जातं. अंकिता आपलं ब्यूटिपार्लर विकून टाकते आणि त्या पैशांतून पत्र्याचं घर पाडून एक विटांची भरभक्कम खोली उभी राहते. 'साई आधार'मध्ये मुलं आहेत, मुली आहेत. एकत्र राहतात, शिकतात, खेळतात, कामं करतात. मोठी होतात आणि दहावी पास झाली की बाहेरच्या दुनियेशी सामना करायला तयार होतात.

हे विशाल आणि अंकिताचं राज्य आहे. इथे कपट नाही, हेवेदावे नाहीत, मत्सर, द्वेष नाही. आहे ती फक्त एकच गोष्ट- रोजच्या जगण्यासाठी लागणारी मेहनत. पहाटे चारला ढणाणा पेटणारी चूल रात्री सातला विझते. भीक मागितली जात नाही. कुणी ओळखीनं काही देत असेल तर असंख्य आभार मानत स्वीकारलं जातं. काहीही द्या. जुने कपडे, पुस्तकं, वह्या,चपला. त्यातून नवनिर्मिती केली जाते. अंकिता शिवण शिकली. ती जुन्या कपड्यांचे नवीन कपडे तयार करते, मुलांच्या अंगावर घालते. वह्यांतली कोरी पानं नव्यानं शिवली जातात, वह्या तयार होतात. रस्त्यावर टाकून दिलेल्या रिकाम्या प्लॅस्टिकच्या पाण्याच्या बाटल्या, पुडकी गोळा केली जातात. पोतीभरून साठली की विक्री होते. त्या दिवशी मुलांना भेळ मिळते.

आता दिवाळीत पणत्या केल्या जातात, संक्रांतीला पतंग केले जातात, कंदील बनवले जातात, ग्रीटिंग कार्ड्स तयार केली जातात. अभ्यास सांभाळून मुलांनी हे सर्व करायचं, हे त्यांना शिकवलं गेलं आहे. मुलांना छान गाता येतं. कीर्तन करतात मुलं. गावातून त्यांना कीर्तनासाठी आमंत्रण दिलं जातं. स्वतः रचना करतात, चाल देतात. ढोलक, चिपळ्या, झांजा घेऊन दहा वर्षांची ही मुलं आत्मविश्वासानं कीर्तन

‘साई आधार’मधील कौतुकाचा क्षण. एका लहानग्याला औक्षण करताना अंकिता परुळेकर



करतात. शिवाजी महाराजांच्या कथा ऐकवतात. विठ्ठलाचा जयघोष करतात, साईबाबांना नमन करतात.

हे विशाल-अंकिताचं राज्य आहे. या राज्यात मुख्यमंत्री आहे, सुरक्षामंत्री आहे, आरोग्यमंत्री आहे, पुरोहित आहे, अर्थमंत्री आहे. कुठल्याही निवडणुका न होता हा राज्यकारभार यशस्वीरीत्या चालू आहे. अरुण हा वय वर्षं १७ मुख्यमंत्री आहे. जेव्हा विशाल राज्यात नसेल तेव्हा राज्याचा कारभार हा सांभाळतो. गुंडाप्पा वय वर्षं १६, सुरक्षामंत्री आहे. घरात आणि परिसरात येणारे साप, विंचू यांपासून सर्वांचं रक्षण करायचं. कुणाचं भांडण होत असेल तर ते मिटवायचं. १५ वर्षांचा भावेश हा आरोग्यमंत्री आहे. सर्वांनी स्वच्छ अंघोळ केली आहे ना, दात, कान, नाक स्वच्छ आहे ना, कुणाला ताप असेल, तर औषध वेळेवर घेतो आहे ना.. नखं कापलेली आहेत ना. केस बारीक आहेत ना. कुणाची भूक कमी तर नाही ना झालेली, कोंबडा आरवला की उठायचं आणि प्रत्येकाला उठवून या गोष्टी तपासायच्या. रोज. अर्थमंत्री आहे ती पूजा. पूजा आणि अंकिता अन्नमंत्री पण आहेत. पूजा या राज्यात आली आणि त्या दिवसापासून त्यांच्या राज्यात कुणीही उपाशी झोपलं नाही. अन्न कधी कमी पडलं नाही. कुणी काही रक्कम भेट म्हणून दिली तर ती तिच्याच हस्ते स्वीकारली जाते. ती बघते, कुठे किती खर्च करायचा. वय आहे फक्त १५ वर्षं. हा राज्यकारभार चिकाटीनं चालू आहे.

मुलांच्या शाळा आहेत नऊ किमी लांब. चालत जायचं, चालत यायचं. जर कधी टेम्पोभाडं नसेल तर मुलांना शाळेत सोडलं जातं, आणलं जातं. भाडं नसेल त्या दिवशी भंगार गोळा करायचं. मुलांना उत्तम पुस्तकं वाचायची आवड आहे. कधीही भेटायला गेलं की एकसाथ सगळे ‘ओम हरी’ म्हणणार. सरकार आता ग्रांट देत नाही. हे कार्य महान आहे, हे माहीत असूनही सरकारकडे मदतीसाठी काहीही शिल्लक नाही. आतापर्यंत गेल्या दहा वर्षांत ७० मुलं या साई आधारातून बाहेर पडलेली आहेत. त्यांना बाहेरच्या जगात जगता यावं म्हणून काही शिक्षण दिलं गेलं आहे. सुतारकाम, इलेक्ट्रिकल कामं.. शिवणकाम.. काही ना काही.

दिवाळी मात्र या राज्याची असते. पूर्ण राज्य भ्रमंतीला जातं. मुलांना त्यांच्या गावी नेलं जातं. नातेवाइकांची भेट घालून दिली जाते. जर कुणी स्वखुशीनं मुलाला घरात ठेवून घेत असेल तर आनंदानं त्या मुलाला कुटुंबाकडे सुपूर्त केलं जातं. असं फार क्वचित होतं. निघताना अजून एखाद-दोन मुलांची भर पडलेली असते. राज्य विस्तारलेलं असतं. या वर्षी मात्र राज्यातल्या दोन राजकन्यांची लग्नं झाली. अगदी थाटात. बत्तिसाव्या वर्षी विशाल आणि अंकितानं कन्यादान केलं.

आनंदाचे असंख्य छोटे छोटे क्षण गोळा केले गेलेले आहेत, साठवले गेले आहेत. कीर्तनकार सातारकर यांनी या चिमुरड्यांचं कीर्तन ऐकलं आणि ‘मृदंगमणी’ अशी उपाधी चौदा वर्षांच्या हेमंतला बहाल केली. सत्कार केला. थैली दिली. विशाल जेव्हा अशा व्यक्तींना भेटतो, तेव्हा मनोमन नतमस्तक झालेला असतो. ही सगळी मुलं मिळून एक पथनाट्य करतात. त्यात एक निरोप असतो सर्वांसाठी, ‘आत्महत्या करू नका, त्याने काहीही साध्य होणार नाही. मुलं पोरकी होतात, संसार उद्ध्वस्त होतात. आत्महत्या करण्यात कोणतीही वीरता नाही. परिस्थितीशी दोन हात करण्यात खरी वीरता आहे.’

जर हा संदेश सर्वांनी मानला तर शेतकऱ्यांची मुलं अनाथ होणार नाहीत.

मी अगदी सहज विशालला विचारलं, ‘जर खरंच कुणी अनाथ राहिलं नाही तर विशाल तू आयुष्यात पुढे काय करणार?’

विशाल म्हणाला, ‘‘ताई, काही कामच करायचं तर कुणी आत्महत्या कशाला करायला हवी? आणि आता माझा संसार ३९ माणसांचा आहे. त्यातलं सर्वांत लहान बाळ आहे तीन वर्षांचं. म्हणजे अजून पंधरा वर्षं तरी मला सांभाळ करायचा आहेच. पंधरा वर्षांनंतर मी काय करत असेन, कुठे असेन, कसा असेन... कशाला आत्ता विचार करू?’’

खरं आहे. कशाला विचार करायचा आहे? गरजच नाही.

आत्ता तिथली प्रत्येक व्यक्ती जगते आहे. खरं जीवन जगते आहे.

हा कुठला मठ नाही, इथे कुठल्याही सोयी नाहीत, सुविधा नाहीत, पक्वान्नं नाहीत, की भारी लेणं नाही, तरीही इथे आनंद आहे, हास्य आहे, नम्रता आहे, समाधान आहे, सुख आहे, आत्मीयता आहे.

हे स्थान ‘प्रशम’ आहे.

swatichandorkar21@gmail.com

# यशोवाणीची यशोगाथा साकारणारी प्राची गुर्जर

- वर्षा वेलणकर



*अंध विद्यार्थ्यांची मुख्य समस्या म्हणजे त्यांना वाचता येत नाही. अंध विद्यार्थ्यांची ही समस्या प्राचीताईंनी जाणली आणि अंधांसाठी पुस्तकं रेकॉर्ड करायचं काम त्या करू लागल्या. त्यांच्या या कामाने 'यशोवाणी' या संस्थेचं रूप धारण केलं आणि अनेक अंध विद्यार्थ्यांना चांगल्या रीतीने शिक्षण घेता येऊ लागलं. प्राचीताईंच्या कामाचा आणि त्यामुळे अंध विद्यार्थ्यांच्या जीवनात उजळलेल्या प्रकाशाचा घेतलेला हा वेध...*

हॉस्पिटलमधून डायलिसिस घेऊन थकून परत आल्यावर एक फोन आला. नंबर अपरिचित होता म्हणून जरा रुक्ष आवाजातच, कोण? म्हणून चौकशी केली. राजस्थानच्या एका छोट्याशा गावातून इंद्रनील नावाचा मुलगा बोलत होता. 'आप प्राचीताई की स्वयंसेवक हो ना?' मी होकार दिल्यावर तो भरभरून बोलू लागला. बारावीला त्याला ८६ टक्के मिळाले होते आणि हे सारे काही फक्त प्राचीताई, यशोवाणी आणि मी केलेल्या कामामुळे शक्य झाले, असे तो सांगू लागला, तेव्हा माझा शारीरिक त्रास क्षणात नाहीसा झाला. कुणाच्यातरी आयुष्यात आनंद पसरविण्याचा जो आनंद मला त्या क्षणी मिळाला होता, त्या प्राचीताईच्या वेगळ्या वाटचालीची ही कथा.



**प्राची गुर्जर पुरस्कार स्वीकारताना**

स्वतःच्या आयुष्यात बदल घडवून आणण्यासाठी धडपडणारे बरेच लोक आपल्याला सभोवती आढळून येतात; पण काही व्यक्ती अशा असतात, ज्या इतरांच्या आयुष्याचा कायापालट करून टाकतात. प्राची गुर्जर हे नाव अशाच एका व्यक्तीचे आहे. एक गृहिणी म्हणून घरातील जबाबदाऱ्या पार पाडत असताना, आपण समाजासाठीही फावल्या वेळेत काही करू शकतो का, या एका विचाराची परिणती एका अशा कामात प्राचीताईने केली आहे, की ज्यामुळे आज दृष्टिहीन विद्यार्थ्यांच्या आयुष्यात आशेचा सूर्योदय झाला आहे. विविध क्षेत्रांत काम करण्यासाठी सज्ज झालेल्या या मुलांना आवश्यक ते माहितीपूर्ण साहित्य, लिखाण पुरविण्याचे अनमोल काम ती करते आहे. दृष्टिबाधितांसाठी विनामूल्य ध्वनिमुद्रित पुस्तकांचे एक वाचनालयच तिने उभे केले आहे.

प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यात एक टप्पा असा येतो, की त्याला भविष्यातील संभावित एकटेपणाची जाणीव होऊ लागते आणि त्या रिकाम्या वेळेचा सदुपयोग करण्याच्या क्लृप्त्या ती व्यक्ती शोधू लागते. प्राचीताईदेखील याला अपवाद नव्हती. सांसारिक जबाबदाऱ्या जवळपास पूर्ण होत असताना तिला प्रकर्षानं जाणवलं की आता समाजोपयोगी काहीतरी आपण करावं. वडिलांचे शब्द मनात गुंजत होतेच. 'कधी कुठल्या अंध-अपंग व्यक्तीला गरज असेल तर हात आखडता ठेवू नकोस,' हे त्यांचं म्हणणं तिला सारखं आठवू लागलं, तशी ती मुंबईच्या नॅशनल ॲकॅडमी फॉर ब्लाइंड या संस्थेच्या प्रांगणात पोचली. संस्थेच्या शिक्षण विभागात रीतसर प्रशिक्षण घेऊन ती स्वयंसेवक म्हणून काम करू लागली.

''इतर कुठलाही विचार डोक्यात नव्हता. आपल्याला या मुलांसाठी फक्त जे जे करता येईल ते करावं, एवढाच उद्देश होता,'' प्राचीताई सांगते. मुलांना अभ्यासाची पुस्तकं वाचून दाखवणं, त्यांच्या इतर काही अडचणी असतील तर त्या सोडविण्याचा प्रयत्न करणं, परीक्षेसंदर्भात त्यांना योग्य मार्गदर्शन करणं आणि इतकंच नाही, तर त्यांचे पेपर लिहून देण्याचं कामही तिनं या संस्थेशी संलग्न असताना केलं. तिला हे सारं करताना आनंद आणि समाधान मिळत होतं आणि त्यासाठी ती अगदी कुठलाही मोबदला मिळत नसतानाही इमाने इतबारे संस्थेत ९ ते ५ या वेळेत नियमित जात असे.

ते वर्ष २००४ होतं. काम उत्तम सुरू होतं; पण पतीची पुण्याला बदली झाल्यामुळे प्राचीताईला हे काम सोडावं लागलं. 'सारं काही स्थिरस्थावर झाल्यावर तिथलं काम इथेही सुरू करण्याची माझी प्रचंड इच्छा होती; पण सगळ्या संस्था लांबच्या अंतरावर होत्या आणि मला इतकं फिरणं शक्य नव्हतं; पण तरीही भांडारकर रोडस्थित 'निर्माल्य' या संस्थेत मी जायला लागले आणि मुलांना पुस्तकं वाचून त्याचं कॅसेटवर रेकॉर्डिंग करून देण्याचं काम मी सुरू केलं. मुंबईला पण गरज असेल तर मी असं रेकॉर्डिंग पाठवत होते; पण संस्थेत नियमित जाणं मला आर्थिकदृष्ट्या परवडणारं नव्हतं,'' प्राचीताई सांगते.

शिवाय त्या वेळी कॅसेटवर रेकॉर्डिंग करून देणं खर्चिक काम होतं आणि त्या कामाचं वाटप जास्त विद्यार्थ्यांमध्ये करणं शक्य होत नसे. सरतेशेवटी आधुनिक तंत्रज्ञानाची मदत घेण्याचा निर्णय तिनं घेतला आणि MP3 प्लेअरची खरेदी केली. मुंबईला नोकरी करणाऱ्या तिच्या मुलीनं तिला या कामात मदत म्हणून इंटरनेट, मेल करणं, इतरांशी संपर्क वाढावा म्हणून ऑर्कुट आणि इतर काही गोष्टींशी तिचा परिचय करून दिला. 'आधी अंगावर बोटभर काटा आला होता हे सगळं ऐकून. संगणकाला हात लावण्याचीही भीती वाटायची; पण या सगळ्यांचाच मला खूप फायदा झाला आणि माझ्या कामात मदत करतील अशी अनेक मंडळी मला या माध्यमातूनच लाभली,' तिनं नमूद केलं.

रेकॉर्डिंग कसं करावं, ते ट्रान्स्फर कसं करावं, त्याचं संपादन करण्यासाठी काय काय करावं लागतं आणि इतर लोकांची मदत घेऊन हे काम कसं वाढवता येईल, या आणि इतर अनेक बारीकसारीक गोष्टी प्राचीताईला सांगणारे लोक या माध्यमातून भेटले. तिच्याच घराजवळच्या काही स्त्रिया या कामासाठी तयार झाल्या. आणखी MP3 प्लेअर्सची



**ध्वनिसंपादन कसे करावे, याचे प्रात्यक्षिक यशोवाणीच्या स्वयंसेवकांना देताना प्राची गुर्जर**

माझ्यासोबत काम करत आहेत. अगदी परदेशातसुद्धा माझे स्वयंसेवक आहेत. पुस्तक आलं की त्याची विभागणी करून, स्कॅनिंग करून ते स्वयंसेवकांना मेल करण्यात येतं. ते त्यांच्या सवडीनं रेकॉर्डिंग करून मला परत करतात. त्याचं ध्वनिसंपादन करून मी ते पेनड्राईव्ह किंवा व्हॉइस फाईल्स बनवून त्या त्या विद्यार्थ्याला पाठवते.''

'यशोवाणी हा एक समूह आहे. याच्या माध्यमातून होणाऱ्या कामाचा एकही पैसा अंध विद्यार्थी किंवा कुठल्याही संस्थेकडून घेतला जात नाही. या कामासाठीचं आवश्यक साहित्य हे स्वयंसेवकांनी स्वकष्टांच्या कमाईतून गोळा केलेलं आहे. सरकारी कुठलीही मदत या समूहाकडून घेतली जात नाही; आर्थिक कुठलाही व्यवहार आम्ही करत नाही. पुस्तकाचं स्कॅनिंग करणं, पेन ड्राईव्हज विकत घेणं, ते कुरिअर करणं वगैरे कुठल्याही कामाचे पैसे आकारले जात नाहीत. ज्यांना गरज आहे ते विद्यार्थी आमच्यापर्यंत पोचतात आणि आम्ही त्यांना काम करून देतो,'' प्राचीताई स्पष्ट करते. या कामातून आज फक्त शालेय परीक्षांमध्येच अंध विद्यार्थ्यांना फायदा झाला आहे असे नाही, तर अनेक स्पर्धा परीक्षांमध्येसुद्धा काही विद्यार्थी 'यशोवाणी'मुळे यश संपादन करू शकले आहेत. एमएड या परीक्षेत उत्तीर्ण होणारा सगळ्यात पहिला अंध विद्यार्थी या 'यशोवाणी'च्याच मदतीनं यशस्वी झाला आहे. तर एक विद्यार्थिनी अगदी यूपीएससीच्या मुलाखतीच्या पातळीपर्यंत पोचली होती. अशी रेकॉर्डिंग्ज ऐकून अनेकांनी बँकांच्या परीक्षा पास केल्या आणि ते विविध ठिकाणी नोकरीला आहेत.

''आपल्याच घरात जर एखादी व्यक्ती कुणाच्या तरी मदतीवर अवलंबून असेल तर आपण आकाश-पाताळ एक करतो. ती मदत कशी मिळेल यासाठी वाट्टेल ते करण्याची तयारी दर्शवतो. मग रोजच्या कामातून अशा असंख्य मदतेच्छुक अंध मुलांसाठी आपण अर्धा तास नाही का काढू शकत?'' प्राचीताई सवाल करते; कारण रोज जर कुणी एवढी अर्धा तास रेकॉर्डिंगची मदत केली, तर तिचे काम आणखी व्यापक आणि सोपे होणार आहे. स्पर्धा परीक्षांसाठी या मुलांना रोजची वर्तमानपत्रे नियमित वाचून देणारी आणि त्यांना करंट अफेअर्सची खडा न् खडा माहिती पुरवण्याची गरज आहे आणि त्यासाठी रोजची वर्तमानपत्रे रेकॉर्ड करून देणाऱ्यांची गरज आहे. शिवाय अवांतर वाचनासाठीही अभ्यासेतर पुस्तकांची या विद्यार्थ्यांना गरज असते. मराठी, हिंदी, इंग्रजी साहित्यातील उत्तमोत्तम पुस्तकांपासून ही मुले वंचित राहू नयेत, यासाठीही 'यशोवाणी' प्रयत्नरत आहे. यासाठी जितके स्वयंसेवक या समूहात येतील तितके काम जास्त होण्याची शक्यता आहे.

आता 'यशोवाणी'च्या भविष्यातील योजना काय आहेत? 'जे काम हातात आहे तेच उत्तम रीतीने पार पडावे, हाच या समूहाचा एकमेव ध्यास आहे. सुरुवातीचे वर्ष हे काम एकखांबी तंबू होता. आता अनेकांनी यात

खरेदी झाली आणि काम सुरू झालं. ''पुस्तक असायचं एक आणि वाचणाऱ्या पाच जणी. मग पुस्तकवाटप करायचं कसं, हा एक मोठा प्रश्न आम्हा सगळ्यांपुढे उभा ठाकला; कारण हे काम फावल्या वेळात आणि कुठलाही आर्थिक भार न उचलता करायचं होतं. शेवटी एक मैत्रीण मदतीला धावून आली. तिचे पिझ्झा आउटलेट्स पुण्यात अनेक ठिकाणी होते आणि तिच्याकडे काम करणारी मुलं पिझ्झा पोचवून देतानाच या पुस्तकाच्या पानांची डिलिव्हरीदेखील करतील, असा शब्द तिनं दिला आणि आमचं काम मार्गी लागलं.''

आता या कामाचा आवाका वाढल्याचं प्राचीताईला जाणवलं आणि मग तिनं स्वयंसेवकांची एक फळी निर्माण व्हावी, यासाठी प्रयत्न सुरू केले. फक्त शालेय शिक्षणच नाही, तर इतर अनेक गोष्टींसाठी अंध मुलांना कुणीतरी पुस्तकं किंवा माहिती वाचून दाखवण्याची खूप गरज असते. विविध स्पर्धात्मक परीक्षा हाही त्याचाच एक भाग आहे. बँकांच्या परीक्षा, एमपीएससी, यूपीएससी यांसारख्या परीक्षांसाठी तर अगदी वेगळ्या प्रकारची तयारी आवश्यक असते. सामान्यतः मुलांना एवढा प्रचंड अभ्यास करताना खूप त्रास होतो. त्यात अंध विद्यार्थ्यांना तर सामान्य ज्ञानापासून सगळी माहिती गोळा करण्यासाठी प्रचंड कष्ट घ्यावे लागतात. रोजचे वर्तमानपत्र कुणी त्यांना वाचून द्यावे; कारण ब्रेलमध्ये असे साहित्य उपलब्ध नाही. आणि या घडामोडी ठाऊक नसतील तर त्यांना या परीक्षांमध्ये यश कसं मिळणार?

हे सारं ध्यानात घेऊन प्राचीताईनं स्वयंसेवकांची संख्या वाढवण्यासाठी प्रयत्न केले आणि तिच्या प्रयत्नांना यशदेखील आलं. संख्या वाढताच अशा स्वयंसेवकांच्या गटाचं त्यांनी नामकरण केलं आणि 'यशोवाणी'चा जन्म झाला. ''आता साधारण २०० स्वयंसेवक


उडी घेतली आहे; पण तरीही रेकॉर्डिंग केलेल्या फाइल्सचे ध्वनिसंपादन करण्याची जबाबदारी मी एकटीनं उचलली आहे. गेल्या सहा महिन्यांत या कामासाठी काही स्वयंसेवकांनी उत्सुकता दर्शवली आणि मी त्यांना तसं प्रशिक्षणदेखील दिलं आहे. त्यामुळे संपादनाच्या कामासाठी एक स्वतंत्र स्वयंसेवकांची फळी निर्माण होते आहे. तशीच आणखी एक टीम या संपूर्ण कामाची जबाबदारी घेणारी तयार व्हावी, असं आता वाटत आहे. माझ्याशिवायदेखील हे काम अखंडित चालू राहावं, हा त्याच्यामागचा उद्देश आहे,'' प्राचीताई सांगते.

रोजच्या धकाधकीत गुंतले असल्यामुळे 'यशोवाणी'चे स्वयंसेवक नियमित भेटू शकत नाहीत; पण मग वर्षातून एकदा त्यांची भेट घडून येते. याच स्नेहसंमेलनात मग 'यशोवाणी'ने मदत केलेल्या विद्यार्थ्यांचाही सहभाग असतो. आपण जे काम केलं ते नेमकं कुणासाठी, या प्रश्नाचं उत्तर मग स्वयंसेवकांना मिळतं. या गाठीभेटी किती सुखावह आणि समाधान देणाऱ्या असतात, याचं वर्णन शब्दांत शक्य नाही, असं 'यशोवाणी'चे स्वयंसेवक सांगतात.

प्राचीताईनं निवडलेल्या कामाची वाट खरं तर इतरांच्याही आवाक्याबाहेरची नाही; पण तिनं अशी वाट निवडून, ती अगदी सहजतेनं सुकर करून दाखवली आहे. आज फक्त महाराष्ट्रातीलच नाही, तर इतरही राज्यांतील लोक तिच्या कामाची दखल घेऊन तिला त्यांच्यासाठीही काम करण्याची विनंती करतात. आणि ती नकार देत नाही. यासाठी लागणारा आर्थिक भारदेखील ती सोसते. अगदी गमतीनं ती आपल्या सर्व मित्र-मैत्रिणींना सांगत असते की, वाढदिवसाला तिला इतर काही नको; पण पेनड्राईव्हज घेऊन द्या. आणि सारे तिचं ऐकतातही. तिचा फोन नंबर आणि 'यशोवाणी'चा ई-मेल ॲड्रेस (९०११०४१८१७, yashovanigroup@gmail.com) हे कायम उपलब्ध असतात. तिच्या या कामाचे प्रमाणपत्र म्हणून तिला अनेक पुरस्कारही मिळाले आहेत. यात लुई ब्रेल अंध अपंग कल्याण संस्था, पुणे तर्फे दिला गेलेला समाजभूषण पुरस्कार, २०१२, लुई ब्रेल पुरस्कार, २०१४, पुणे महानगरपालिकेकडून १५ ऑगस्ट, २०१५ रोजी महापौरांच्या हस्ते सत्कार आणि अनेक सामाजिक संस्थांकडून मिळालेल्या पुरस्कारांचा आणि सन्मानांचा समावेश आहे.

समाजानं घालून दिलेल्या काही अलिखित नियमांच्या आडोश्याला राहून आयुष्य घालवणारे लोक आणि एक सगळ्या गरजा पूर्ण करणारी, सुरक्षा देणारी चौकट उपलब्ध असतानाही चौकट मोडून एक वेगळी (इंगळी) वाट चोखाळणाऱ्या प्राची गुर्जर हिच्यासारखी व्यक्ती. कुणाची सोबत आपण करावी, याचा निर्णय घेण्याची आता आपली पाळी आहे. तिच्या आडवाटेच्या प्रवासात तिला असंख्य स्वयंसेवकांची साथ लाभो आणि तिनं घेतलेल्या कामाचा ओघ अखंडित राहो, हीच शुभेच्छा! आणि तो राहणार याची ग्वाही देणारी घटना म्हणजे तिच्या १२ वर्षांच्या नातवाने आपल्या आजीच्या कामाचा वारसा पुढे चालवत नुकतंच एक पुस्तक रेकॉर्ड केलं आहे. वर्षाला 'यशोवाणी' आता हजार ते १२०० पुस्तकांचं रेकॉर्डिंग करते. स्वयंसेवक आनंदानं यात सहभागी होतात आणि ते आता स्वतःला 'व्हॉइस व्हॉलेंटिअर्स' म्हणवतात. 'यशोवाणी'चा आवाज असाच दुमदुमत राहील, यात आता शंका नाही.

varsha.welankar@gmail.com





# सैनिकमय जीवन : अनुराधा प्रभुदेसाई

**शब्दांकन आणि संकलन :**
**प्रतिनिधी (मेहता मराठी ग्रंथजगत)**

*'अनुराधा प्रभुदेसाई -'सैनिकांची आई' अशीच त्यांची ओळख आहे आणि सैनिकांबद्दलच्या त्यांच्या अपार ममतेतून ती निर्माण झाली आहे. आकाशवाणी पुणे केंद्रावर अनुराधाताईंची मुलाखत ऐकली आणि त्या खूप महत्त्वाचं काम करत आहेत, हे जाणवलं. सैनिकांच्या जीवनाशी एकरूप होत त्यांचं कार्य चालू आहे. त्यांच्या कार्याच्या विविध पैलूंची ही ओळख...*






**पुस्तक प्रकाशन प्रसंगी**

**सन्मानपत्र स्वीकारताना**

ऑगस्ट २००४मध्ये अनुराधाताई, त्यांचे पती आणि विक्रम जोशी व त्यांची पत्नी असे चौघं जण द्रासला सहज फिरायला म्हणून गेले होते. त्या वेळी एका पाटीनं अनुराधाताईंचं लक्ष वेधून घेतलं 'I only regret that I have only one life to lay down for my country.' अनुराधाताईंनी मराठीतून त्या पाटीकडे निर्देश केला, तेव्हा तिथून सुभेदार मेजर कदम चालले होते. मराठी ऐकून त्यांना फार आनंद झाला; कारण जवळ जवळ नऊ महिन्यांत मराठी त्यांच्या कानावर पडली नव्हती. ज्या दुर्गम भागात आपली मातृभाषा कानावर पडणं दुर्मिळ आहे, अशा भागात आणि खडतर परिस्थितीत हे जवान कसे राहत असतील, हा प्रश्न अनुराधाताईंच्या मनाला त्या वेळी अस्वस्थ करून गेला. तसेच, द्रास, टायगर हिल भागात हिंडत असताना त्यांनी विचारलं, 'इथे नेमकं काय घडलं?' तेव्हा हॉटेलच्या एका खानसाम्यानं त्यांना सांगितलं, 'आपको मालूम नही? १९९९में इधर सैंकडो लाशे गिरी थी।' त्याच्या या वाक्यानं अनुराधाताईंना हलवून टाकलं आणि त्यांनी विक्रम जोशींसह कारगिलच्या विजयस्तंभासमोर (कारगिलच्या युद्धात वीरगती प्राप्त झालेल्या जवानांसाठी उभारलेला स्मृतिस्तंभ) शपथ घेतली, की ज्या जवानांनी कारगिल युद्धात बलिदान दिलं, त्यांच्या शौर्यगाथा लोकांपर्यंत पोचवायच्या.

त्यानंतर सलग पाच वर्षं त्या कारगिलला भेट देत होत्या. जवानांना राखी बांधण्याची परवानगी मिळवण्यासाठी त्यांनी आर्मीतील अधिकाऱ्यांचा पत्रांद्वारा पाठपुरावा केला आणि त्यांना ती परवानगी मिळाली. २००५मध्ये लेहच्या खडबडीत रस्त्यांवरून जवानांपर्यंत पोचणं अवघड असूनही, त्या तिथपर्यंत पोचल्या आणि जवानांना राख्या बांधल्या. घरी केलेले पदार्थ त्यांनी जवानांसाठी खाऊ म्हणून नेले होते. त्या वेळी जवानांनी दिलेली प्रतिक्रिया अशी होती, 'आप जो प्यार देते हो राखी के जरिए, वह हौसला देता है लडने के लिए।' २००६मध्ये अनुराधाताई ३६ मुलींना घेऊन लेह-लडाखला जवानांना राखी बांधण्यासाठी गेल्या. त्यांचा हा उपक्रम आजही चालू आहे. सीमेवरील जवानांना भेटण्यासाठी आणि सैनिकांचं जीवन कसं असतं, हे दाखवण्यासाठी अनेक लोकांना त्या आतापर्यंत सीमेवर घेऊन गेल्या आहेत. त्यांनी जवानांवर केलेल्या हिंदी कवितांच्या अनेक प्रती आणि कारगिल युद्धात हुतात्मा झालेल्या जवानांवरील अनेक पुस्तिका प्रकाशित केल्या आहेत.





जवानांसमवेत संवाद साधताना



विद्यार्थिनीचे कौतुक करताना

२००९मध्ये त्यांनी घेतलेल्या शपथेला पाच वर्षं पूर्ण झाली, तेव्हा त्यांना आपल्या कामाबाबत अनिश्चितता वाटू लागली. त्यांनी ती ब्रिगेडिअर पाल यांच्याजवळ बोलून दाखवली, तेव्हा पाल यांनी त्यांना हे कार्य पुढे चालूच ठेवण्याची जणू आज्ञाच केली. पाठोपाठ अनुराधाताईंनी 'लक्ष्य' फाउंडेशनची स्थापना केली. युवकांमध्ये देशभक्तीची ज्योत चेतवणे, हा लक्ष्य फाउंडेशनच्या स्थापनेमागचा उद्देश आहे. अनुराधाताई शाळांमध्ये जाऊन व्याख्यानं देतात. कारगिलची फिल्म दाखवतात. त्या नेहमी म्हणतात, 'चित्रपट तारे-तारकांची नावं आपल्याला माहीत असतात; पण परमवीरचक्र मिळवणाऱ्या जवानांची नावं आपल्याला माहीत नसतात.' जवानांच्या पत्नी आणि विधवांसाठी स्नेहसंमेलनांचं आयोजनही त्या करतात. लक्ष्य फाउंडेशनतर्फे दिवाळीत जवानांच्या कुटुंबीयांना मिठाई वाटण्यात येते. २०१२मध्ये अनुराधाताईंनी बँकेची नोकरी सोडली आणि त्यांनी स्वतःला पूर्णपणे या कार्यासाठी झोकून दिलं. अनुराधाताई नेहमीच सांगतात, 'जे जवान १८,०००फूट उंचीवर, हाडं गोठवणाऱ्या थंडीत, अनेक आठवडे घालवतात, अशा जवानांना सन्मान द्या. प्रेम द्या. त्याची त्यांना गरज आहे.'

जवानांसमवेत



तर अशा या अनुराधाताई जवानांच्या मॅम, माँ, मौसी आहेत. जवानांच्या जीवनाचा हिस्सा आहेत. अनुराधाताई या एकच अशा नागरिक आणि स्त्री आहेत, ज्यांना कारगिल विभागातील सगळ्या रेजिमेंट्समध्ये जाण्याची मुभा आहे. जवानांचं नीतिधैर्य वाढविण्याच्या आणि सामान्य नागरिक व सैनिक यांच्यातील अंतर कमी करण्याच्या त्यांच्या कार्याबद्दल त्यांना २६जुलै, २०११ रोजी लेफ्ट. जन. यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह प्रदान करण्यात आलं. जवान या समाजातील एका महत्त्वपूर्ण घटकासाठी, त्याच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी काय काय करता येऊ शकतं, हे अनुराधाताईंनी त्यांच्या बहुआयामी कामातून दाखवून दिलं आहे.

१२ ऑगस्ट, २०१७ रोजी अनुराधाताईंचा 'स्वातंत्र्याची किंमत' या शीर्षकाचा लेख 'लोकसत्ता'मध्ये प्रकाशित झाला होता, तोही खूप अंतर्मुख करणारा आणि जवानांच्या समर्पित जीवनावर प्रकाश टाकणारा आहे. त्या लेखात शेवटी अनुराधाताई लिहितात,'सैनिकाच्या जीवनातील कित्येक दालनं उघडायची बाकी आहेत. आणि मनातली आंदोलनंही! पण एखादी ओवी अनुभवावी म्हणून हा लेखनप्रपंच. गेल्या चौदा वर्षांतील फौजींच्या सहवासातून जे काही अनुभवांचं गाठोडं तयार झालं, ते इथं थोडंसं उघडावंसं वाटलं. माझ्या अल्पमतीला जे पटलं ते मांडलं. कुणी हे गाठोडं फेकून देईल, कुणी माळ्यावर टाकेल तर कुणीतरी विचारपूर्वक डोकावूनही बघेल. त्या क्षणाची मी वाट पाहत आहे.'

lakshy.ladakh@gmail.com

टाक्यातून झिरपे ऊब...
जशी हुबेहूब आईची माया...
मूर्तिमंत सुखाचा सूर...
आळवते 'लडिवाळ सुधा'...



सुधा मूर्ती



तीन हजार टाके | सर्पाचा सूड | गरुडजन्माची कथा | त्रिशंकू | बकुळा | गोष्टी माणसांच्या | वाइज अँड अदरवाइज



हरवलेल्या मंदिराचे रहस्य | महाश्वेता | डॉलर बहू | सामान्यांतले असामान्य | परीघ | अस्तित्व | पुण्यभूमी भारत



आजीच्या पोतडीतल्या गोष्टी | सुकेशिनी | थैलीभर गोष्टी | स्वर्गाच्या वाटेवर काहीतरी घडलं... | पितृऋण | आयुष्याचे धडे गिरवताना



# मनोरुग्णांच्या सेवेचं व्रत घेतलेले भरत वाटवानी

**शब्दांकन आणि संकलन :**
**प्रतिनिधी (मेहता मराठी ग्रंथजगत)**

*रस्त्याने एखादा मनोरुग्ण जाताना दिसला आणि तो अस्वच्छ असला तर सर्वसामान्य माणसाला एक तर किळस वाटते, भीती वाटते किंवा अनुकंपा वाटते; पण ती तेवढ्यापुरतीच; पण त्या मनोरुग्णाला नवजीवन द्यावं किंवा देता येऊ शकतं, असा विचारही कोणाच्या मनाला शिवत नाही. डॉ. भरत वाटवानी या मानसोपचारतज्ज्ञाला मात्र या मनोरुग्णांचा उद्धार करावा, असं वाटलं. त्यांनी आणि त्यांच्या मानसोपचारतज्ज्ञ पत्नी स्मिता यांनी मनोरुग्णांच्या पुनर्वसनाचं व्रत घेतलं आणि ते व्रत ते आजतागायत पाळत आहेत. त्यांच्या या व्रताची ही कहाणी.*

एखादी घटना तुमच्या आयुष्याला आणि एखाद्या विशिष्ट घटकाच्या आयुष्याला कलाटणी देऊ शकते. असंच काहीसं घडलं डॉ. भरत वाटवानी यांच्याबाबत. डॉ. भरत आणि डॉ. स्मिता वाटवानी हे दोघंही मानसोपचारतज्ज्ञ. दहिसरला त्यांचं क्लिनिक होतं. प्रॅक्टिसही उत्तम होती. दोघंही डॉक्टर असल्यानं ते खोऱ्यानं पैसा ओढू शकले असते; पण वंचित लोकांसाठी काहीतरी करण्याची जबरदस्त इच्छा होती. १९८९मध्ये एका हॉटेलमध्ये चहा घेत असताना त्यांना हॉटेलसमोरच्या नालीमध्ये एक तरुण पाणी पिताना दिसला. ते दृश्य बघितल्यावर वाटवानी पती-पत्नी हेलावले आणि त्यांनी त्या तरुणाला आपल्या क्लिनिकमध्ये नेलं. घाण झालेलं शरीर, अंगाचा वास, केस वाढलेले, जीर्ण झालेले कपडे अशा त्या तरुणाला त्यांनी स्वच्छ केलं. त्याच्यावर उपचार केले आणि दोन महिन्यांत तो तरुण बरा झाला. त्याला जेव्हा आठवायला लागलं, त्याची ओळख समजल्यावर तर त्यांना धक्काच बसला. तो डिएमएलटी झालेला तरुण होता. हैदराबादमध्ये त्याची पॅथॉलॉजी लॅब होती. नोकरीनिमित्त तो मुंबईत आला होता. त्याची मानसिक स्थिती बिघडली आणि तो भरकटला. दोन महिने रस्त्यावर त्यानं भटकत काढले. तो तरुण स्क्रिझोफेनियाचा रुग्ण होता. या घटनेनंतर त्यांनी अशा रुग्णांसाठी काम करण्याचा निश्चय केला.

**बाबा आमटेंनी दिलेलं प्रोत्साहन**

मुंबईत कामाला सुरुवात झाल्यानंतर डॉ. भरत वाटवानी बाबा आमटेंची भेट घ्यायला २००४ मध्ये विदर्भात हेमलकशाला गेले. जात असताना वाटेत त्यांना साखळदंडाने बांधलेला एक मनोरुग्ण रस्त्यावर दिसला. त्यांनी त्या मनोरुग्णाला प्रकाश आमटेंच्या लोकबिरादरी प्रकल्पात नेलं. प्रकाश आमटेंनी त्याच्या हाता-पायात असलेले साखळदंड तोडले आणि त्याच्यावर उपचार केले. दुसऱ्या दिवशी सकाळी ते साखळदंड बाबांनी आपल्या हातात घातले होते. त्या मनोरुग्णाला काय वेदना होत असतील त्याचा अनुभव घेण्यासाठी बाबांनी असं केलं होतं. समाज अशा लोकांकडे किती असंवेदनशीलतेनं बघतो, असं सांगत बाबांनी डॉ. वाटवानींना आणखी जोमानं काम करण्याचा सल्ला दिला आणि वाटवानींच्या आयुष्याला नवी दिशा मिळाली.

**'श्रद्धा'चा जन्म**

कामाला जोमानं सुरुवात केल्यावर डॉ. वाटवानी दाम्पत्यानं दहिसरमध्ये एका घरात अशा मनोरुग्णांसाठी सेंटर सुरू केलं; पण अशा लोकांकडे कुठल्या नजरेनं बघावं याची मानसिकताच आपल्या समाजात नसल्यानं लोकांनी या सेंटरला विरोध केला. अशा वेड्या लोकांमुळे आमच्या मुलांवर परिणाम होईल असं सांगत आजूबाजूच्या सोसायटीमधल्या लोकांनी या सेंटरविरुद्ध पोलिसात तक्रार केली. डॉक्टरांवर खोटेनाटे आरोप केले. लोकांचा विरोध आणि काम वाढवण्याची असलेली प्रचंड इच्छा यामुळे शेवटी डॉ. वाटवानींनी कर्जतमध्ये मोठी जागा घेऊन 'श्रद्धा पुनर्वसन केंद्रा'ची स्थापना केली.

**माणुसकी वाढवणारं 'श्रद्धा'**

कर्जतच्या मोकळ्या जागेत २००६मध्ये श्रद्धा पुनर्वसन केंद्राची स्थापना झाली. मनोरुग्णांना हक्काचा आधार आणि निवारा मिळाला. आज या केंद्रात १२८ पेशंट्स आहेत. त्यात ७७ पुरुष, तर ५१ महिलांचा समावेश आहे. केंद्राची इमारत उत्तम आहे. या केंद्रात पुरुषांसाठी दोन वॉर्ड आणि महिलांसाठी एक वॉर्ड आहे. ४२ प्रशिक्षित लोकांचा उत्तम स्टाफ आहे. या सर्व कर्मचाऱ्यांमुळेच मी हे काम करू शकतो, याचं सर्व श्रेय त्यांचं आहे, असं डॉक्टर विनम्रपणे नमूद करतात. आत्तापर्यंत सात हजारांपेक्षा जास्त रुग्णांवर त्यांनी उपचार केले असून, काही अपवाद वगळता प्रत्येकाला त्यांनी त्याच्या/तिच्या कुटुंबीयांच्या स्वाधीन केलं आहे.

**काळजाला पाझर फोडणारे अनुभव**

श्रद्धा पुनर्वसन केंद्रात फक्त मनोरुग्णांवर उपचारच होत नाहीत, तर त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करून त्यांना त्यांच्या कुटुंबीयांपर्यंत पोहोचवलंही जातं. ते काम अतिशय अवघड असं आहे; पण त्यामधून



**आपल्या स्टाफसह भरत वाटवानी**



**कर्जत येथील ‘श्रद्धा’ पुनर्वसन केंद्र**




मिळणारा आनंद शब्दांत मांडणं शक्यच नसल्याच्या भावना इथं काम करणाऱ्या कार्यकर्त्यांनी व्यक्त केल्या. या केंद्रात विविध राज्यांतून आणि परदेशातूनही पेशंट्स येतात. त्यामुळे इथे काम करणारे कर्मचारीही विविध राज्यांतले आहेत. पेशंटचा पत्ता शोधून काढून हे कर्मचारी त्यांना त्यांच्या कुटुंबीयांच्या स्वाधीन करतात. एक महिला तर तब्बल २७ वर्षांनंतर तिच्या घरी गेली. उत्तर प्रदेशातल्या तरुणाला जेव्हा काही महिन्यांपूर्वी त्याच्या घरी सोडण्यात आलं, तेव्हा अवघं गाव त्याच्या स्वागतासाठी लोटलं होतं. त्याच्या आईला एवढा आनंद झाला की ती धाय मोकलून रडू लागली. एका पेशंटला जेव्हा घरी पोहोचवलं, त्या वेळी काही तासांपूर्वीच त्याच्या वडिलांचं निधन झालं होतं. तीन वर्षांनी घरी परतलेल्या त्या मुलानं वडिलांचे अंतिम संस्कार केले. कुणाचे वडील, आई, भाऊ, बहीण जेव्हा पुन्हा घरी जातात तेव्हा ‘श्रद्धा’चे कार्यकर्ते म्हणजे त्यांच्यासाठी देवदूतच असतात; कारण हरवलेले लोक पुन्हा सापडतील ही आशाच त्यांच्या कुटुंबीयांनी सोडलेली असते. पुण्यातला एक पेशंट बरा झाला. नंतर त्यानंच ‘श्रद्धा’ केंद्रासाठी एक ॲम्ब्युलन्स भेट दिली. इथं येणाऱ्या पेशंट्समध्ये अनेक जण डॉक्टर, इंजिनिअर, वकील, प्राध्यापकही आहेत. नेपाळमधूनही अनेक जण या केंद्रात येतात. एक इराणचा रुग्ण बरा होऊन पुन्हा आपल्या मायदेशी परतला. इथल्या प्रत्येक पेशंटची स्वतःची एक कहाणी आहे आणि ही कहाणीच इथं काम करणाऱ्या प्रत्येकाची प्रेरणा आहे.

### रॅमन मॅगसेसे पुरस्कार


कोणत्याही प्रसिद्धीची, पुरस्काराची अपेक्षा न करता चाललेलं हे डॉ. वाटवानींचं काम प्रकाशात आलं, ते त्यांना मिळालेल्या रॅमन मॅगसेसे पुरस्कारामुळे. पुरस्कार मिळाल्यानंतर केंद्राकडे अनेक लोक चौकशी करतात. पेशंट असल्याची माहिती देतात. त्या सर्वांना कसं सामावून घ्यायचं, असा प्रश्न डॉ. वाटवानींना सतावतो आहे. तसेच, पुरस्कार मिळाल्यापासून श्रद्धा पुनर्वसन केंद्राला भेट देणाऱ्यांची संख्या वाढली आहे. लोक येतात, शुभेच्छा देतात, अनेकांच्या डोळ्यांत पाणीही असतं. तुमचं काम खूप चांगलं आहे, असं लोक डॉ. वाटवानींना सांगतात; त्यावर डॉ. वाटवानी म्हणतात, ‘‘पण माझी काळजी त्या पुढची आहे. हे काम पुढे गेलं पाहिजे. नुसतं कळवळा येऊन चालत नाही. मनोरुग्णांच्या मदतीसाठी समाज पुढे आला तरच या मोठ्या पुरस्काराचं समाधान आहे. या संवेदना जाग्या झाल्या नाहीत तर काहीच अर्थ नाही.’’

### हे काम वाढलं पाहिजे

श्रद्धासारखी अनेक केंद्रं राज्यात आणि देशात सुरू झाली पाहिजेत. मनोरुग्णांकडे पाहण्याची समाजाची मानसिकता जोपर्यंत बदलत नाही, तोपर्यंत ही परिस्थिती बदलणार नाही. लोकांच्या संवेदना जाग्या झाल्या, मदतीसाठी लोक पुढे आले, तरच बदल घडेल. मॅगसेसे पुरस्कार असा बदल घडवण्यासाठी काम करणाऱ्या प्रत्येकाला डॉ. भरत वाटवानींनी समर्पित केला आहे.

shraddha_karjat@yahoo.co.in

**नवं कोरं**




पृथ्वीपलीकडील गूढ विश्वाचा शोध घेण्यासाठीची अद्‌भुत 'अंतराळ स्पर्धा' आणि चांद्र मोहिमेच्या अभूतपूर्व घडामोडींचा इतिहास डोळ्यांसमोर आणणारं चित्तथरारक वर्णन.


## अंतराळ स्पर्धा

लेखक - अतुल कहाते

पृष्ठसंख्या : २२०
किंमत : ₹२५०

Book Available

---





कल्पनाशक्तीला खुराक देणारा रोमांचक ब्रह्मांड प्रवास, अणुगर्भाच्या संरचनेपासून ते विश्वनिर्मितीपर्यंतचा अनोखा वैज्ञानिक अध्याय....

## अशक्य भौतिकी

मूळ लेखक - मिचिओ काकू
अनुवाद - लीना दामले

पृष्ठसंख्या : ३१६
किंमत : ₹३५०

---



रंजक, आनंददायी आणि वाचकाच्या मनावर ओझे न टाकता विज्ञानाची महती पटवणाऱ्या विज्ञानकथा...

## डिंभक

लेखक - डॉ. संजय ढोले

पृष्ठसंख्या : १६८
किंमत : ₹१९५

Book Available



# कृषी क्षेत्रातील कर्मयोगिनी : स्वाती शिंगाडे

**शब्दांकन आणि संकलन :**
**प्रतिनिधी (मेहता मराठी ग्रंथजगत)**




*शेतकरी कुटुंबात वाढलेली एक मुलगी...तिला शेतीतच करिअर करायचं होतं...पण एक स्त्री म्हणून शेती करताना तिला काही मर्यादा येतील असं इतरांना वाटलं आणि ॲग्रिकल्चरमध्ये पदवी घेतलेली असतानाही ती वळली एमपीएससीच्या परीक्षेकडे...त्या परीक्षेत उल्लेखनीय यश मिळवून ती दाखल झाली पोलीस खात्यात...पोलीस उपनिरीक्षक पदापर्यंत तिने मजल मारली...पण काळी माती साद घालत होती...मग तिने ॲग्रिकल्चरमध्ये पदव्युत्तर पदवी घेतली...पोलीस उपनिरीक्षक पदाचा राजीनामा दिला आणि फुलशेतीकडे वळायचं ठरवलं... मग सुरू झाली एक यशोगाथा...*

## वर्दी ते शेती



'उत्तम शेती...मध्यम व्यापार आणि कनिष्ठ नोकरी' अशी एक उक्ती आहे; पण दुर्दैवाने शेती उत्तम असूनही काही मोजके अपवाद वगळता शेती या क्षेत्राकडे वळायला फारसं कुणी उत्सुक नसतं. पावसाची अनिश्चितता, शेतमालाला मिळणाऱ्या भावाची अनिश्चितता, शेतीत करावे लागणारे कष्ट, महानगरांचं आकर्षण इ. काहीही कारणं असतील; पण अगदी शेतकऱ्याची मुलंही शेती करायला राजी नसतात. अशा पार्श्वभूमीवर शेतकऱ्याची मुलगी असलेल्या स्वाती शिंगाडे यांनी पोलीस खात्यातील नोकरी सोडून शेती करायचा निर्णय घेतला आणि त्या निर्णयाची बहुआयामित्वाने अंमलबजावणी केली.

एमपीएससीच्या परीक्षेत दुसऱ्या आलेल्या स्वाती पोलीस खात्यात दाखल झाल्या; पण त्यांचा मूळ ओढा होता शेतीकडे. ॲग्रिकल्चरची पदव्युत्तर पदवी त्यांच्याकडे होतीच. मग त्यांनी पोलीस उपनिरीक्षक पदाचा राजीनामा दिला. फुलशेती, सेंद्रिय शेती हे त्यांचं ध्येय होतं. ते ध्येय साध्य करण्यासाठी त्यांना कर्ज हवं होतं; पण अनेक बँकांनी त्यांना कर्ज देण्याचं नाकारलं; मात्र बँक ऑफ बडोदाने त्यांना दहा लाख रुपयांचं कर्ज दिलं आणि स्वाती यांनी ते एक वर्षात फेडलं.

बारामती तालुक्यातील सोनकसवाडी इथे चाळीस एकरवर शिंगाडे फार्म हाऊस उभं आहे. Unicert Pvt. Ltd., PGS, NOCA यांच्याकडून ही चाळीस एकर जमीन १००टक्के सेंद्रिय प्रमाणित करून घेतली आहे. मोबाइल, ई-मेल, मोबाइल स्टार्टर मोटर ऑपरेशन, ॲटोमायझेशन फर्टीगेशन, सी. सी. टी. व्ही. कॅमेरा यांचा फार्मवर वापर केला जातो. १८ तास कृत्रिम लाईट देऊन शेवंतीसारखी नवीन उत्पादने ग्रीनहाऊसमध्ये घेतली जातात. फुले, ऊस, गहू, कडधान्य यांचं उत्पादन शिंगाडे फार्मवर घेतलं जातं. शेतीच्या जलसिंचनासाठी पाच विहिरी, दोन बोअरवेल्स आणि शेततळं असे विविध स्रोत उपलब्ध आहेत. सिंचन, खते-औषधे व्यवस्थापन इ. कामे यांत्रिकीकरणाद्वारा केली जातात. स्वाती यांनी नैनिताल, गुजरात, महाराष्ट्र, सिक्कीम या राज्यांतून देशी बियाणं जमा केलं आहे. हे बियाणं सेंद्रिय प्रमाणित शेतात वाढवून त्या शेतकऱ्यांना वितरित करतात.

विक्री व्यवस्था सुधारण्याच्या दृष्टीने आणि उत्पादित मालाला चांगला दर मिळावा यासाठी तालुक्यातील शेतकऱ्यांना एकत्र आणून त्यांनी बारामती फार्मर्स प्रोड्यूसर कंपनी लि.ची स्थापना केली. परिसरातील शेतकऱ्यांचा उत्पादित शेतीमाल विविध सोसायट्या, हॉटेल्स व विविध मॉल्स या ठिकाणी एकत्रित विक्री केला जातो. सेंद्रिय धान्य, भाजीपाला, सेंद्रिय ऊस उत्पादन, सेंद्रिय गूळ, काकवी, विविध सेंद्रिय डाळी, विविध धान्य पिठं यांची प्युअर ऑरगॅनिक ब्रँडखाली विक्री केली जाते. त्यांच्या या सेंद्रिय उत्पादनांची राज्य पातळीवर आणि देश

**शिंगाडे फार्ममध्ये शेतकऱ्यांना हायटेक फ्लोरीकल्चर आणि सेंद्रिय शेतीविषयक माहिती व प्रशिक्षण देताना स्वाती**








**परिसरातील महिलांना शेतीचे प्रशिक्षण देताना स्वातीताई**

**पुरस्कार स्वीकारताना**

पातळीवर प्रदर्शनं भरवली गेली आहेत.

शाश्वत उत्पादन मिळवण्यासाठी शिंगाडे फार्मवर हायटेक फुलशेती प्रशिक्षण केंद्र चालवलं जातं. शेतकऱ्यांनी चालवलेलं हे पहिलं प्रशिक्षण केंद्र आहे. गुजरात, राजस्थान, हरियाणा इ. राज्यांतील प्रशिक्षणार्थी या प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षण घेतात. तीन दिवस, आठ दिवस व एक महिना असा या प्रशिक्षणाचा कालावधी आहे. आतापर्यंत या प्रशिक्षण केंद्रातून एक हजारहून अधिक लोकांना मार्गदर्शन मिळालं आहे. पहिली बॅच बाहेर पडून पाच एकरवर हायटेक प्रोजेक्ट उभा राहिला आहे. सेंद्रिय चळवळीचा प्रसार स्वाती महाराष्ट्रासह विविध राज्यांत प्रात्यक्षिकांच्या व प्रशिक्षणाच्या माध्यमातून करतात. त्यासाठी त्यांनी आधी सिक्कीमचा अभ्यास दौरा केला आणि तेथील सेंद्रिय शेतीची पद्धत व मार्केटची धोरणं जाणून घेतली.

हायटेक प्रोजेक्टमुळे परिसरातील लोकांना बारा महिने रोजगार उपलब्ध होतो. कार्नेशन सपोर्ट सिस्टिम, पॉलिहाउस उभारणी, असं नवं तंत्रज्ञान शिकल्यामुळे तरुणांचाही सहभाग वाढतो आहे आणि त्यांना आर्थिक स्थैर्य प्राप्त झालं आहे. तसंच महिलांनाही रोजगार प्राप्त झाला आहे. फुलांचं कटिंग, पॅकिंग त्या व्यवस्थित करतात. भविष्यात आणखी फुलांचे व फीलर्सचे प्रकार वाढवून बचत गटाच्या महिलांना डेकोरेशनचं प्रशिक्षण देऊन डेकोरेशनच्या ऑर्डर्स घेण्याचा स्वाती यांचा मानस आहे.

शेतीचा काही भाग हायटेक ग्रीनहाउस करणं, उत्पादित मालाचा कचरा करायचा नसेल तर प्रक्रिया करणं व दर्जेदार माल मार्केटपर्यंत पाठविण्यासाठी उत्तम पॅकिंग, ग्रेडिंग, कोल्ड स्टोरेज या गोष्टींचा अवलंब करणं आवश्यक आहे. तसंच कमी क्षेत्र असणाऱ्या शेतकऱ्यांनी एकत्र येऊन गट व कंपनी तयार करून उत्पादित मालाचं मार्केटिंग करावं, असा सल्ला शेतीच्या यशस्वितेसाठी स्वाती देतात.


स्वाती यांच्या कार्याची दखल प्रिंट मीडिया आणि इलेक्ट्रॉनिक मीडियानं उल्लेखनीय रीतीनं घेतली आहे. 'सकाळ', 'पुढारी' , 'लोकसत्ता' 'महाराष्ट्र टाइम्स', 'अॅग्रोवन' इ. दैनिकांनी लेख, बातमीच्या स्वरूपात त्यांचं काम समाजापुढे आणण्याचा प्रयत्न केला आहे. डी.डी. किसान ही दूरदर्शनची वाहिनी, स्टार माझा, साम टीव्ही या वाहिन्यांनीही त्यांच्या कार्याचं कौतुक केलं आहे. त्यांच्या या सर्वांगीण कामासाठी त्यांना विविध पुरस्कारांनी गौरविण्यात आलं आहे. २०१२मध्ये प्रवीण मसाले यांच्याकडून 'उद्योग जननी कमल पुरस्कार', महाराष्ट्र शासन कृषी विभागाकडून कृषी क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल सन्मान, २०१३मध्ये सकाळ पेपर्स यांच्याकडून महाराष्ट्र उद्योगिनी पुरस्कार, २०१५मध्ये महाराष्ट्र सिंचन विभागाकडून 'प्रयोगशील महिला शेतकरी पुरस्कार' इ. अनेक पुरस्कारांनी त्या सन्मानित आहेत. विविध कृषी सल्लागार समित्यांच्या सदस्य म्हणून त्यांनी काम पाहिलं आहे. बारामती तालुका फलोत्पादन संघाच्या त्या विद्यमान संचालिका आहेत.

साधारणतः २००८मध्ये सुरू केलेल्या या कामाकडे स्वाती यांनी केवळ एक उत्पन्नाचं साधन म्हणून पाहिलं नाही, तर शेती या क्षेत्राला त्या विविधांगानं भिडल्या. त्या विषयाची व्यापकता जाणून पूर्ण अभ्यासानिशी आणि नियोजनपूर्वक त्या या क्षेत्रात उतरल्या. शेतीचं महत्त्व तरुणांना पटवून देणं, शेतीला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देणं, वेगवेगळ्या पिकांना वेगवेगळ्या पद्धतीनं पाणी देणं, पारंपरिक शेतीला हायटेक शेतीची जोड देणं, स्वतःचा ब्रँड निर्माण करून आपल्या मालाचं आत्मविश्वासानं मार्केटिंग करणं या सगळ्या बाबींमधून त्यांनी शेती यशस्वी रीतीनं कशी करता येते, याचं एक चांगलं उदाहरण लोकांसमोर ठेवलं आहे.

swatishingade@gmail.com

**विविध गौरवक्षण...**







इस्पितळाच्या भिंतीआड घडणाऱ्या गोष्टींचे बारकावे टिपत स्वास्थ्यजाणीव वाढवणारं पथदर्शक पुस्तक...

मूळ लेखक - डॉ.अतुल गवांदे
अनुवाद - सुनीति काणे

पृष्ठसंख्या : २४०
किंमत : ₹२९५

# बेटर

---




परिस्थितीला शरण जाण्यास नकार दिलेल्या विशेष कर्तृत्व दाखवणाऱ्या दिव्यांग व्यक्तींच्या प्रेरक कथा


मूळ लेखक - सुधा मेनन आणि
व्ही.आर.फिरोज
अनुवाद - सुमिता बोरसे

पृष्ठसंख्या : २०८
किंमत : ₹२९५

Book Available

# दिव्यगुणी

---




चार वर्षांच्या मुलाला झालेला स्वर्गाचा साक्षात्कार... त्याच्याच शब्दांत सांगितली गेलेली स्वर्गाच्या अविश्वसनीय सफरीची सत्यकथा...

मूळ लेखक - टॉड बर्पो
अनुवाद - मेधा मराठे

पृष्ठसंख्या : १५२
किंमत : ₹१९५

# स्वर्गाचा साक्षात्कार



# वंचितांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणाऱ्या संस्था

**- रजनी परांजपे आणि प्राजक्ता रुद्रवार**

*समाजाच्या तळागाळातील लोकांची मुलं, विशेषतः मजुरांची मुलं शाळेपासून दूर असतात. त्या मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणून, किमान साक्षर तरी करावं, या उद्देशाने दि सोसायटी फॉर डोअरस्टेप स्कूल्स आणि सहगामी फाउंडेशन या संस्था काम करत आहेत. कसं चालतं त्यांचं काम यावर टाकलेला हा दृष्टिक्षेप...*

## दि सोसायटी फॉर डोअर स्टेप स्कूल्स

'दि सोसायटी फॉर डोअरस्टेप स्कूल्स' ही संस्था मुंबई (१९८९) व पुणे (१९९३) या दोन शहरांमध्ये कार्यरत आहे. संस्थेचे सर्व काम शिक्षणापासून वंचित राहणाऱ्या मुलांबरोबर चालते. ज्यांच्या घरात शिक्षणाची परंपरा नाही, अशा पुष्कळ कुटुंबांतील मुले एकतर शाळेत दाखलच होत नाहीत; शाळेत दाखल झाली तर शाळेत टिकून राहत नाहीत आणि टिकली तरी दर्जेदार शिक्षण घेऊन बाहेर पडली असे होत नाही, असे बऱ्याचदा दिसते. याच तीन मुख्य समस्यांवर संस्था काम करते. वरील समस्या नजरेसमोर ठेवून आम्ही सुरुवातीपासूनच १) तीन ते सहा वर्षांच्या मुलांसाठी बालवाड्या सुरू करणे. २) सहा वर्षे आणि अधिक वयाच्या मुलांना सरकारी शाळेत दाखल करून पहिली व दुसरीच्या मुलांचे नियमित अभ्यास वर्ग घेणे. ३) १२-१३ वर्षांच्या वरील मुलांना अनौपचारिक शिक्षण देऊन साक्षर बनवणे (आमची साक्षरतेची व्याख्या वर्तमानपत्र वाचता येणे अशी आहे.) ४) वस्ती पातळीवर फिरती बाल-वाचनालये सुरू करणे, हे चार उपक्रम हाती घेण्याचे ठरवले होते व त्यानुसार ते टप्प्याटप्प्याने चालूही केले. ते आजपर्यंत चालूही आहेत. अर्थात त्यांची व्याप्ती आणि गुणवत्ता सुरुवातीपेक्षा कितीतरी पटींनी वाढली. उपक्रमांची गुणवत्ता वाढवण्याच्या दृष्टीने जे जे करावयास हवे असे लक्षात आले, ते ते करत गेलो आणि करत राहिलो. सुरुवातीपासूनच चालू केलेले हे चारही उपक्रम आजही चालू आहेत. त्यात गरजेनुसार बदलही केले आणि नवीन उपक्रमांची भरही घातली.

या उपक्रमांविषयी लिहिताना डोअर स्टेप स्कूलचा सर्वांत चर्चिलेला उपक्रम 'फिरती शाळा' किंवा 'स्कूल ऑन व्हील्स' यापासून सुरुवात करणे उचित ठरेल. 'स्कूल ऑन व्हील्स' ही एक बस असते, जी आतून वर्गखोलीप्रमाणे तयार करून घेतो. ही बस जेथे मुले असतात, पण त्यांना एकत्र घेऊन बसण्यासाठीची जागा नसते अशी ठिकाणे निवडून, उदा. स्टेशन परिसर, मार्केट परिसर, डिफेन्सच्या जागेवर अथवा रस्त्याच्या कडेला असणाऱ्या वस्त्या वगैरे तेथे ठराविक वेळेला जाते. आजूबाजूच्या मुलांना एकत्र करून बसमध्येच त्यांचा रोज दोन-अडीच तासांचा वर्ग होतो. मुलांचे शिक्षणही होते आणि जागेचा प्रश्नही सुटतो. अशी पहिली बस आम्ही १९९८मध्ये मुंबईला सुरू केली. आज मुंबई-पुणे मिळून अकरा बसेस चालतात.

वस्ती पातळीवरील वाचनालयांचा उपयोग वाचन सुधारण्यासाठी म्हणून फारसा होत नाही, असे लक्षात आले. म्हणून सन १९९९मध्ये 'वाचन संस्कार प्रकल्प' चालू केला. हा प्रकल्प महानगरपालिकांच्या शाळेत, शाळेच्या वेळात, शाळेच्याच जागेत व पहिली ते चौथीच्या वर्गातील शाळेच्याच मुलांबरोबर, शाळेतील शिक्षकांच्या सहकार्याने, गेली वीस वर्षे चालू आहे. एवढेच नव्हे तर दहा शाळांपासून सुरू झालेला हा प्रकल्प आता २४० शाळांमधून चालतो आहे. याशिवाय या सर्व शाळांमधून पहिली ते सातवीच्या सर्व मुलांसाठी घरी पुस्तके देण्याचा उपक्रमही चालतो. मुले आठवड्यातून एकदा पुस्तक बदलून घेऊ शकतात. हे करत असताना मराठीत बालसाहित्य पुष्कळ असले तरी वाचन शिकवण्यासाठी उपयोगी पडेल असे टप्प्याटप्प्याने पुढे नेणारे वाचनसाहित्य फारसे नाही, हे लक्षात आले. मग २००१पासून तशी पुस्तके व शैक्षणिक साहित्य तयार करायला सुरुवात केली. टप्प्याटप्प्याने अवघड होत जाणारी ५०हून जास्त पुस्तके डोअरस्टेपने लिहिली आणि प्रकाशित केली. ही पुस्तके आणि साधन साहित्याच्या बॅगांचा आज अमेरिका, कॅनडा आणि ऑस्ट्रेलिया येथील महाराष्ट्र मंडळांच्या मराठी वर्गातून वापर केला जातो. या अनुभवातूनच 'पहिलीचे पुस्तक पहिलीतच वाचा' (First Steps Forward, 2011) हा उपक्रम सुरू केला. याचे उद्दिष्ट पहिलीतील सर्व मुलांना दुसरीत जाताना पहिलीचे पुस्तक वाचता

**डोअर स्टेप स्कूल्सचा कार्यकर्ता मजुरांना आणि त्यांच्या मुलांना शिक्षणाचं महत्त्व पटवून देताना**





**वाचन संस्कार प्रकल्प म.न.पा. शाळा (इ.१ली)**

आले पाहिजे, असे आहे. म्हणजेच मुलांना पहिलीच्या अभ्यासक्रमानुसार मराठीतील सर्व मुळाक्षरे, बाराखडी आणि जोडाक्षरांचे शब्द वाचता आले पाहिजेत.

हा उपक्रम सुरू करण्यापूर्वी वर्गशिक्षकांना या उपक्रमाची गरज, त्यांच्या सहकार्याने हा उपक्रम राबविता येणे कसे शक्य आहे आणि तसा तो राबवला तर मुले कशी वाचायला शिकतील, हे पटवून दिले. त्याचबरोबर रोजचे ४० ते ४५ मिनिटांचे वेळापत्रक आखले. या वेळात स्वतः वर्गशिक्षक व आमच्या ताया (ज्यांना आम्ही 'पुस्तकपऱ्या' म्हणतो.) पहिलीच्या मुलांचे क्षमतेप्रमाणे गट करून त्यांचा वाचनसराव करून घेतात. तपशीलवार नियोजन आणि काटेकोर मूल्यमापन या दोन पायांवर पहिलीची मुले अपेक्षेप्रमाणे पुढे जातात आणि जवळ जवळ ६० टक्के मुले जोडाक्षरांसहित सर्वच वाचू शकतात. तर केवळ पाच-सहा टक्के मुले मुळाक्षरांच्या टप्प्यात अडकलेली दिसतात. (प्रकल्पापूर्वी हेच प्रमाण २५ ते ३०टक्के असायचे, तर जोडाक्षरे येणाऱ्यांचे पाच ते सहा टक्के).

त्यापूर्वी २००३मध्ये बांधकाम मजुरांच्या मुलांसाठी पाया प्रकल्प (Project Foundation) नावाने एक नवा प्रकल्प चालू केला. या गटाबरोबर काम करणाऱ्या संस्था फारशा नाहीत; पण गरज मात्र खूप आहे, हे लक्षात आल्याने कामाचे स्वरूप आणि लक्ष्य थोडेसे बदलून हे काम सुरू केले. येथे काम करताना आम्हाला दोन गोष्टी नव्याने कराव्या लागल्या. वर्गाची वेळ नऊ ते पाच करणे आणि ० ते ३ वर्षांच्या मुलांना सांभाळणे. वर्ग अर्थातच बांधकामावरच्या मजूर वस्त्यांवरच चालतात. एका वेळी साधारण ८० ते १०० वस्त्यांवर वर्ग लागतात. या मुलांबरोबर काम करताना कुठल्याही मुलाला १२० दिवसांमध्ये संपूर्ण साक्षर करून सोडण्याचे तंत्र आम्ही विकसित केले.

२००७ मध्ये आम्ही स्वतःचे प्रशिक्षण केंद्र चालू केले. हे केंद्र आमच्या प्रशिक्षणाच्या गरजा भागवून दुसऱ्या संस्थांनाही मागणीनुसार प्रशिक्षण देते. २०११मध्येच सुरू केलेला 'एकेक मूल मोलाचे एक नागरिक' अभियान (Every Child Counts, Citizens' Campaign) आणि २०१२मध्ये चालू केलेला 'मुलांच्या शिक्षणात पालकांचा सहभाग' हे उपक्रम. २००९च्या शिक्षण हक्क कायद्याने १४ वर्षांपर्यंतच्या सर्व मुलांना सक्तीच्या व मोफत शिक्षणाचा हक्क दिला; पण म्हणून जी मुले आधी शाळेत जात नव्हती ती आता आपोआप शाळेत जाऊ लागतील, असे होत नाही. ज्या परिस्थितीमुळे ती आधी शाळेत जात नव्हती ती परिस्थिती उदा. घरची गरिबी, पालकांचे अज्ञान किंवा उदासीनता तर आपोआप बदलत नाही. त्यासाठी प्रयत्न करणे गरजेचेच आहे.

'एकेक मूल मोलाचे एक नागरिक' अभियान हा असाच एक प्रयत्न. याचे वेगळेपण म्हणजे नागरिक सहभागाची असलेली अपेक्षा. शहरातील १०० टक्के मुले शाळादाखल आहेत; शाळाबाह्य कोणी नाही, हे जर शक्य व्हायचे असेल तर नागरिकांचा सहभाग हवाच. नाहीतर शहरभर सर्वदूर लहानसहान वस्त्यावाड्यांतून पसरलेली ही मुले आपण शोधणार कशी आणि एकेक मूल शोधून त्याला जवळच्या सरकारी शाळेत दाखल करणार कसे? आजपर्यंत अशा प्रकारे शोधून काढून शाळेपर्यंत पोहोचवलेल्या पुणे व पिंपरी-चिंचवड भागातील मुलांची संख्या ११,०००च्या वर आहे. आम्ही यांचा पाठपुरावा एक वर्षापर्यंत करतो. त्यात साधारणपणे तीस ते पस्तीस टक्के मुले शाळेत टिकतात असे दिसते.

मुले शाळेत टिकण्यासाठी पालकांचा सहभाग फार मोलाचा. इतकी मुले शिक्षणापासून वंचित राहतात याचे मुख्य कारण- घरात शिक्षणाची परंपरा नसणे, मुलांच्या शिक्षणाच्या संबंधात पालकांची उदासीनता, हे लक्षात घेऊन हाती घेतलेला हा उपक्रम. यात पालकांना अगदी लहान लहान गोष्टींपासून म्हणजे मुलाला रोज लवकर उठवा, त्याला स्वच्छ, नीटनेटके करून शाळेत पाठवा वगैरेपासून तर शाळेत पालक मीटिंगला जात जा, इथून दुसरीकडे जाताना शाळेचा दाखला घेऊन जा किंवा मुलाची परीक्षा, शाळेच्या सुट्ट्या इत्यादी माहिती करून मगच गावी जाण्याचे ठरवा, इथपर्यंत सांगावे लागते. पालकांमध्ये जागृती निर्माण करण्याची प्रक्रिया थोडी अवघड, खर्चीक आणि वेळखाऊ आहे; पण त्याचे परिणामही तसेच आहेत. या उपक्रमांतर्गत शाळेत दाखल केलेल्या मुलांपैकी ७०टक्के मुले शाळेत टिकतात, असे दिसते.

२०१७ मध्ये 'लहानपणीच गिरवू धडे' किंवा 'Teach Them Young' हा नवा उपक्रम सुरू केला. यात दोन भाग आहेत- मुलांना शाळेत पुरेशा आणि चालू अवस्थेतील संडास, मुताऱ्या, पिण्याच्या पाण्याच्या, मध्यान्ह भोजनाच्या सोयी उपलब्ध आहेत किंवा नाहीत हे बघणे. नसल्यास तशा त्या करून घेणे हा एक भाग आणि दुसरा भाग मुलांना या सुविधा योग्य प्रकारे वापरण्याची माहिती देणे, सवय लावणे आणि त्यासाठी सतत सतर्क राहणे. हे सर्व शाळेतील शिक्षकांच्या, इतर कर्मचाऱ्यांच्या, पालकांच्या सहकार्याने आणि आमच्या पुस्तकपऱ्यांच्या मदतीने केले जाते. सध्या ३५ शाळांमध्ये काम चालले आहे. बालवाडी ते चौथीपर्यंतची ११,०००च्या वर मुले यात सहभागी आहेत. बालवाडीची मुले सर्वांत लवकर शिकतात आणि पालकांनाही शिकवतात, असे दिसते.

पालकांना हा उपक्रम आवडतो आणि मुले कमी आजारी पडतात, असे त्यांना वाटते. २०१८मध्ये आम्ही 'शिंपण गुंफण' (Networking &Nurturing) हा नवा उपक्रम चालू केला. याचा मुख्य उद्देश आमच्या अनुभवाचा, आम्ही विकसित केलेल्या काही तंत्रांचा, साधन साहित्याचा, नव्याने या क्षेत्रात येणाऱ्यांना काही उपयोग झाल्यास बघावे, तसेच इतरांकडून आपल्याला जे शिकता येईल ते शिकावे, असा आहे. अजून म्हणावा तसा तो रुजला नाही, पण हळूहळू तो आकार घेईल याची आम्हाला खात्री आहे. डोअरस्टेप स्कूलच्या निरनिराळ्या उपक्रमांचा हा

थोडक्यात आढावा. इथे नमूद केलेल्या या उपक्रमांखेरीज दोन महत्त्वाचे उपक्रम, मुलांना शाळेत सोडणे-आणणे हा एक आणि कम्युनिटी लर्निंग सेंटर हा दुसरा. रोज जवळ जवळ आठशे मुले शाळेत नेतो –आणतो आणि तीन लर्निंग सेंटर्स मिळून १५००+ मुलांपर्यंत पोहोचतो. या सर्व उपक्रमांद्वारा गेल्या वर्षात पुणे, पिंपरी-चिंचवड व सभोवतालच्या परिसरातील एकूण ७३,४८४ मुलांपर्यंत आम्ही पोहोचलो.

ही सर्व माहिती वाचल्यावर माणसाच्या मनात साहजिकच काही प्रश्न उभे राहतात. उदा. हे सर्व करायला आर्थिक बळ आणि मनुष्यबळ कुठून मिळते? ही कल्पना मुळात सुचली कशी वगैरे. कल्पना कशी सुचली म्हणाल तर अनुभवातून. मी त्या वेळेला मुंबईला निर्मला निकेतन, कॉलेज ऑफ सोशल वर्कमध्ये शिकवत होते. आमच्या कॉलेजचा स्कूल सोशल वर्क म्हणून एक प्रकल्प कॉर्पोरेशनच्या शाळांमध्ये चालत असे. या प्रकल्पाची उद्दिष्टे बरीचशी डोअरस्टेप स्कूलच्या उद्दिष्टांसारखीच होती. आम्ही विद्यार्थ्यांच्या मदतीने तो प्रकल्प चालवत होतो. त्यातून मिळालेल्या अनुभवातून एक गोष्ट लक्षात आली, की मुले शाळेतून गळतात किंवा मुळीच येत नाहीत याची कारणे बऱ्याचदा त्यांच्या घरच्या परिस्थितीत असतात. शाळेत जाऊन शिकणे त्यांना पुष्कळदा शक्य होत नाही. घर राखणे, भावंडे सांभाळणे, पाणी भरणे अशा छोट्या-मोठ्या गोष्टींसाठी त्यांनी घरी असणे जरुरीचे असते. आपण त्यांना शाळेत घातले तरी ती शाळेतून गळतात. लिहिणे-वाचणे न शिकताच मोठी होतात आणि निरक्षर प्रौढांच्या पंक्तीत जाऊन बसतात. प्रौढ शिक्षण ही एक राष्ट्रीय समस्या बनते. तशी ती त्या काळात होतीच. प्रौढांना शिकवण्यापेक्षा मुलांना शिकवणे कितीतरी पटींनी सोपे; तेव्हा आपण ते करावे, अशा विचारातून शिक्षणच मुलांच्या दारापर्यंत घेऊन जाण्याची कल्पना सुचली व अनुभवातून आलेल्या शहाणपणाच्या पायावर पुढची इमारत उभी राहिली.

कुठलेही काम करायचे म्हटले की त्यासाठी माणसे हवीतच. स्वयंसेवक हवेत. ते असतील तेवढे लागतातच. त्यामुळे कोणीही स्वयंसेवक म्हणून आले तर त्याचे स्वागतच असते; पण तेवढ्यानेच भागत नाही. विशेषतः कुणाला शिकवायचे असेल तर त्यासाठी शिक्षकांचा नियमितपणा आणि वक्तशीरपणा महत्त्वाचा. म्हणून शिक्षक म्हणून आम्ही पहिल्यापासूनच पगारी माणसे नेमली. तसेच ज्या ज्या कामांसाठी अशा तऱ्हेची बांधिलकी आवश्यक असते, तेथे तेथे गरजेनुसार माणसे नेमली. त्यासाठी लागणारे आर्थिक बळ निरनिराळ्या ठिकाणांहून मिळवावे लागते. दानशूर व्यक्ती, धर्मादाय ट्रस्ट्स, लहान-मोठ्या कंपन्या, फंडिंग करणाऱ्या परदेशी संस्था, असे निरनिराळे स्रोत शोधावे लागतात. ते तसे शोधले. देवाच्या दयेने मिळतही गेले. काम बंद पडले असे झाले नाही. पैशाअभावी काम थांबले नाही हे चांगलेच; पण समाजाला आता अशा कामाची गरज नाही म्हणून ज्या दिवशी काम बंद करावे लागेल, तो सुदिन.

**- रजनी परांजपे**
rajani@doorstepsschool.org

## सहगामी फाउंडेशन

साधारण दोन वर्षांपूर्वी नेहमीप्रमाणे आमचा ग्रुप मुलांबरोबर बालदिन साजरा करावा म्हणून नवीन जागा, नवीन वस्तीच्या शोधात होता. असेच एके दिवशी अन्नदान करायला गेल्यावर बघितले, तर रावेतमध्ये बांधकाम मजुरांची वस्ती दिसत होती. जवळपास शंभरच्या वर झोपड्या दिसत होत्या. खायला देताना बघितले तर साठ-सत्तरच्या वर मुले दिसत होती या वस्तीमध्ये. मुलांना विचारलं की कुठल्या शाळेत जाता, तर कळलं की एवढ्या वस्तीतून फक्त चार मुलेच शाळेत जातात. 'कोण शाळेत जाणार, चला सांगा बरं,' असं विचारलं असता कोणीच बोलेना. पुण्यासारख्या शिक्षणाचे माहेरघर असणाऱ्या गावात ही स्थिती पाहून खूप आश्चर्य वाटलं. मग त्यांच्याशी गोड बोलण्याचा प्रयत्न केला तर कळलं, की भारतातील विविध प्रांतांतून इथे येऊन हे कामगार कष्टांनी पोट भरत आहेत; पण एका ठिकाणी जास्त दिवस वास्तव्य नसल्यामुळे येथील मुलांना कोणत्याही प्रकारचं शिक्षण देत नाहीत; कारण त्यांना शिक्षणाचं महत्त्व नसतं व थोडंफार वाटलं तरी त्यांच्याकडे इथली सरकारी कागदपत्रंही नसतात. त्यामुळे आई-वडील कामावर गेले की ही मुलं वस्तीमध्ये किंवा रस्त्यावर खेळत राहतात. आई-वडील कामावर गेल्यावर घर सांभाळून धुणीभांडी करणं, पाणी भरणं, लहान भावंडांना सांभाळणं, ही कामं कोण करणार, म्हणून मुलांना शाळेत पाठवायची पालकांची अजिबात इच्छा नसते. मग ही मुलं घरची सगळी कामं करून, आई-वडिलांसाठी स्वयंपाक करून, राहिलेल्या वेळात फक्त उनाडक्या करत फिरत राहतात.

मग ठरलं की आपण यांना शिक्षणाचं महत्त्व पटवून देऊ यात. जवळपास एखादी जागा घेऊन शाळा काढावी तर घर, भावंडं सोडून ही मुलं तिथे येणार नाहीत म्हणाली. मग त्यांच्याच वस्तीत जाऊन शिकवण्याशिवाय पर्याय नव्हता. पद्मा, रवी, अर्पिता यांनी सुरवात म्हणून रस्त्यावरच मुलांना बोलावून शिकवायला सुरवात केली. पहिल्या दिवशी फक्त आठ मुलं आली. ऑक्टोबरचं चांगलंच ऊन होतं; पण तिथे एकही झाड नसल्यामुळे कारच्या मिळेल तितक्या सावलीत शिकविण्याशिवाय पर्याय नव्हता. दुसऱ्या दिवशी सकाळी मी, केतकी, रोशनी गेलो तेव्हा तिथल्या एका पडीक झोपडीचा शोध लागला. जागा स्वच्छ केली व

**सहगामी फाउंडेशनच्या शाळेसाठी मिळालेली शेड**







**रस्त्यावर शिक्षणाचे धडे घेणारी मजुरांची मुलं**

**अभ्यासात रमलेली वस्तीवरची मुलं**

आम्ही उन्हातून सावलीत आलो. साधारण महिनाभर त्या पडीक जागेत आम्ही शाळा चालवली. याच दरम्यान आमचा पत्रकार मित्र ज्ञानेश्वरनं अशी शाळा इथे चालते, अशी 'सकाळ'मध्ये स्टोरी दिली व त्याचा फायदा झाला. एका दानशूर व्यक्तीशी माझं बोलणं झालं. त्यांनी आम्हाला पत्र्याची शेड बांधून दिली. आमची स्वतःची नवीकोरी, दार व लॉक लावता येईल अशी शाळा पाहून आमचा आनंद गगनात मावत नव्हता.

नवीन शेडमध्ये स्थलांतरित झालो. तोपर्यंत महिन्यातच मुलांची संख्या पंचवीसच्या वर गेली; पण खूप मुलं असूनसुद्धा येत नव्हती. आली तरी काही खाल्लेलं नसायचं. मग मुलांना इथे यायला गोडी लागावी म्हणून आम्ही घरून काही ना काही पदार्थ करून नेऊ लागलो. हळूहळू आमची सोसायटी, बाहेरच्या सोसायटीतील मैत्रिणीही पदार्थ देऊ लागल्या. चक्क वार लागायला लागले व या खाऊमुळे मुलांची संख्यापण वाढायला लागली होती. मिशन फत्ते झालं याचा आनंद होऊ लागला.

आम्ही कुठलेही पैसे न टाकता सुरवात केल्यामुळे ज्याला जमेल तसं साहित्य आणत होतो. मग दानशूरांकडून विचारणा होऊ लागल्यावर वह्या-पुस्तकं, पाटी, पेन्सिल आम्ही मागून घ्यायचो. त्या साहित्यावर शाळेचा प्रवास सुरू होता. मग हे ठेवायला कपाट हवं होतं. अन्वरनं लगेच त्याच्या ग्रुपमध्ये टाकलं व कपाटही आलं. शाळेचं साहित्य सुरक्षित राहू शकलं.

शाळा सुरू होती. मुलांची संख्या पन्नासच्या आसपास पोहोचली; पण अजूनही चारच मुलं सरकारी शाळेत जात होती. आमचा मुख्य उद्देश होता की या मुलांना शिक्षणाची गोडी लावून सरकारी शाळेत भरती करणं; कारण त्याशिवाय आमच्या या शाळेचा उद्देश सफलच झाला नसता. मग आम्ही त्यांना सांगायला लागलो, की मोठ्या सरकारी शाळेत शिक्षण घेतलं की छान पगाराची नोकरी लागेल व हे जीवनमान बदलून जाईल. सगळे 'हो हो' म्हणायचे; पण कोणीच यायला तयार नसायचं. मग पालक सभा घेतल्या. पालकांनाही शिक्षणाचं महत्त्व पटवून देत होतो. जी मुलं शाळेत जातात त्यांना वेगळा खाऊ, गिफ्ट द्यायला लागलो. त्यांनाच सर्कस दाखवायची. एक ना अनेक उपाय करून पाहिले. मग कुठेतरी मुलांना शाळेत यावंसं वाटू लागलं. पहिल्या सहा मुलांना माझ्या कारमध्ये घालून रावेतच्या सरकारी शाळेत घेऊन गेलो. शाळेचे मुख्याध्यापक व सगळ्याच शिक्षक वर्गानं आनंदानं आमचं व मुलांचं स्वागत केलं. लागेल ती मदत करून ॲडमिशन करून दिली. डोअरस्टेप या संस्थेनं आमच्या मुलांसाठी विनामूल्य बससेवा सुरू केली. आम्ही एक पाऊल पुढे गेलो वाटलं तरी, अजून बऱ्याच मुलांना सरकारी शाळेत पाठवणं बाकी होतं.

इथे रोजचा दिवस नवीन काहीतरी घेऊन येत होता. रोज रोज खाऊसाठी डोनर शोधणं कठीण काम होतं. तेवढ्यात गादिया सरांनी त्यांच्या जवळच असलेल्या कँटीनमधून दररोज पन्नास मुलांचा नाश्ता घेऊन जा, असा निरोप दिला. आठ-पंधरा दिवस का होईना नाश्त्याचा प्रश्न मिटला; पण आज वर्षभराहून जास्त दिवस झाले असतील, ते दररोज मुलांसाठी सकाळचा नाश्ता देतात. असे अन्नदाते भेटल्यामुळे नाश्त्याचा प्रश्न कायमचा सुटला.

उन्हाळ्यात पत्र्याच्या शेडमुळे खूप गरम होत असे. त्यात पत्रा असल्यामुळे खिडकीही नव्हती. आजूबाजूच्या फटींमधून कुत्र्या-मांजरांपासून सापापर्यंत काहीही येत असे. पुण्यातील चांगल्या लोकेशनमध्ये राहतो याचा अभिमान वाटताना आपल्या जवळच लोक कोणत्या परिस्थितीमध्ये राहत आहेत, याची जाणीव होत होती.

हळूहळू मुलांच्या अभ्यासाबरोबर त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा म्हणून अभ्यासेतर गोष्टीही शिकवल्या जात होत्या. गुड टच, बॅड टच या





आवश्यक गोष्टी शिकवल्या व चर्चिल्या जाऊ लागल्या. योगा, डान्सचं रीतसर प्रशिक्षण देण्यात येऊ लागलं. ज्या मुलांना अंघोळ कशी करायची माहीत नव्हतं, त्यांचा लूकच बदलला होता. ही मुलं आपल्या मुलांसारखी दिसावीत म्हणून अगदी केससुद्धा कापण्यात आले शाळेत पार्लरवाल्यांकडून. सर्व प्रकारच्या आरोग्य तपासण्या व मोफत औषध देऊ लागलो. रुबेला व गोवरसारख्या लसीकरणाचे शिबिर शाळेत भरवण्यात येऊ लागलं. मुलांना आर्ट क्राफ्टबरोबरच शाडूच्या मातीचे गणपती बनविण्याचं प्रशिक्षण देण्यात आलं. तसेच सर्व सण, विविध दिवस साजरे केले जाऊ लागले. देशासाठी लढणाऱ्या जवानांची माहिती देऊ लागलो. मुलांना संगणक हाताळायला दिला जाऊ लागला. कराटेसारखे आत्मसुरक्षेचे धडे दिले जाऊ लागले. 'सकाळ' वृत्तपत्राच्या कार्यालयाला भेट देण्यात आली. कलाविष्कार सादर करण्यासाठी त्यांना संधी देण्यात येऊ लागली. मुलांनाा शाळेची खूप गोडी लागू लागली. त्यामुळे आत्तापर्यंत ८५च्या वर मुलांची सरकारी शाळेत ॲडमिशन करून देण्यात आली. मुलांची प्रगती सुरू होती. सरकारी शाळेत कोणत्याही महत्त्वाच्या कार्यक्रमात आम्हाला बोलावलं जाऊ लागलं.

अशा वस्तीवर मुलं एकटी असतात, हे माहीत असल्यामुळे चोरी किंवा कुकर्म करणाऱ्यांची ये-जा असे. मुलींना त्रास होत असे. मग पोलिसांना तसं पाठशाळेच्या वतीनं कळवण्यात आल्यावर दामिनी पथकाच्या सकट मॅडम यांची खूप मदत झाली. वस्तीमध्ये पोलिसांची गस्त सुरू झाली. आपोआपच अशा गोष्टींना आळा बसला.

मुलांबरोबर महिलांचा सहभाग वाढल्यामुळे महिलांनादेखील शिकवायला सुरवात केली. त्यांना स्वावलंबनाचे धडे देऊ लागलो. विविध पर्याय उपलब्ध करून देऊ लागलो. या वस्तीतील १२वी पास महिलेला शिक्षिका म्हणून घेऊन बाकीच्या महिलांना शिक्षणाचं महत्त्व पटवून देण्यात आलं. पहिल्यांदा दहा-अकरा महिला येत होत्या; त्यांना लिहिण्यास शिकवण्यास सुरवात केली. हळूहळू चार-पाच महिला स्वतःचं नाव तरी लिहू लागल्या. कधीही पाटी-पेन्सिल हातात न घेतलेल्या महिलांसाठी ते एखाद्या चित्रकलेसारखंच होतं. पण त्यांचा उत्साह वाखाणण्यासारखा होता. मग त्यांना कागदी बॅग, कापडी बॅगचं प्रशिक्षण देण्यात आलं. हळूहळू रोजगारासाठी नवीन काय काय संधी आहेत हे सांगतानाच स्वतःच्या आरोग्याची निगा कशी राखायची ते संततिनियमनापर्यंत सांगण्यात आलं. 'रेड डॉट कॅम्पेन'सारखे विषय त्यांना सांगण्यात आले.

पण फिरतीचे काम करणाऱ्या या लोकांना एका जागी जास्त दिवस राहून प्रशिक्षण घेणं शक्य नव्हतं. मग त्यांना कुठेही गेल्यावर कामी येईल अशा प्रकारचं प्रशिक्षण द्यावं, असा विचार चालू असतानाच सिंबायोसिस स्किल व ओपन युनिव्हर्सिटीच्या काही विनामूल्य उपक्रमांची माहिती मिळवली. यांतील काही महिलांना नेऊन दाखवलं व प्रौढांची निगा राखणं, या अडीच महिन्यांच्या विनामूल्य सर्टिफाइड कोर्ससाठी त्यांना ॲडमिशन घेऊन दिली.

दीड वर्ष याच परिस्थितीत शाळा चालवल्यानंतर एका सरकारी अधिकाऱ्याच्या प्रयत्नांतून एक मोठा कन्टेनर शाळेला मिळाला. आलिशान, चार खिडक्या असलेली ही नवीन कन्टेनरवाली शाळा आमच्यासाठी स्वप्नवत होती. कितीतरी मुलं आली-गेली तरी मुलांची संख्या पंचावन्न ते साठ झाली होती. आता फक्त लाइट नसल्यामुळे फॅन, लाइट चालू नव्हते. त्यातच रविभैयांनी पुढाकार घेऊन फॉक्सवॅगन कंपनीतील समविचारी लोकांबरोबर सीएसआरमधून सौरऊर्जेचं युनिट बसवून सोलरवर चालणारी यंत्रणा बसवून दिली. त्यामुळे आता विजेवर चालणारी सगळी उपकरणं सुरू झाली. संध्याकाळी मुलांसाठी जास्तीचे क्लास घेता येऊ लागले.

या दोन वर्षांत आमच्या या शाळेची व मुलांची वरचेवर प्रगती होत गेली. आज समाधान वाटतयं, की समाजकार्य करण्याचा विचारही मनात नसताना सुरू केलेली ही शाळा कितीतरी मुलांचं आयुष्य घडवणारी ठरत आहे. सहगामी फाउंडेशनच्या बरोबर शनिवार-रविवार रॉबिनहूडचे कार्यकर्ते शाळेत मुलांना शिकवतात. तसेच यासाठी भरपूर जणांची साथ व मदतीचे हात पुढे आले म्हणून आम्ही हे शक्य करू शकलो.

**- प्राजक्ता रुद्रवार**

rudrawar.prajakta@gmail.com



# प्रयोगशीलतेतून विकास साधणाऱ्या मंगलताई

- यशोधरा काटकर

*जेमतेम तीन हजार वस्ती असलेल्या भुईसमुद्र गावातील एक महिला मंगलताई वाघमारे. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचं प्रमाण जिथे जास्त आहे, अशा मराठवाड्यातील* हे गाव; *पण मंगलताईंनी कंबर कसली आणि सेंद्रिय शेती करण्याचा निर्णय घेतला. मनात आणलं तर एक स्त्री स्वतःबरोबरच इतरांचाही कसा उद्धार करू शकते, याचं मूर्तिमंत उदाहरण आहेत मंगलताई. त्यांची ही प्रेरक गाथा...*

घराणेशाहीच्या हातात एकवटलेल्या सत्तास्थानांना समांतर असे कष्टकरी महिलांचे नेतृत्व आता गावपातळीवर, तळागाळातून उभे राहू लागले आहे. या महिला कोणत्याही राजकीय व आर्थिक सत्तास्थानांशी जोडलेल्या नाहीत. त्यांची भूमिका विरोधाची नाही; ती विधायक आहे, हे त्यांना उमजलेले आहे. म्हणून एकमेकींच्या साथीने, प्रसंगी, स्थानिक नेतृत्वाशी समन्वय साधून त्यांची वाटचाल सुरू आहे. काळ जसा पुढे जात आहे, तशी नवी संकटे ,नवी आव्हाने सामोरी येत आहेत. अजून खूप मोठा पल्ला गाठायचा आहे, हे त्यांना माहीत आहे. पंचायत राज, सखी बचत गट ते सखी महासंघ, पाणी व स्वच्छता, हरित ऊर्जा, सेंद्रिय शेती व अन्नसुरक्षा, वित्तीय साक्षरता, व्यवसाय जागृती ते विकास अशा विविध उपक्रमांमध्ये महिलांचे नेतृत्व व सहभाग वाढविण्यासाठी त्या कार्यरत आहेत. दुष्काळाचा सातत्याने सामना करत असलेल्या मराठवाड्यात प्रतिकूल पर्यावरणाशी झगडत तळागाळातल्या अनेक महिला पुढे येत आहेत. त्यातून स्वतःचे आणि इतरांचे आयुष्य उजळून टाकणारे नवे नेतृत्व निर्माण होत आहे. अशा महिलांसाठी 'रोल मॉडेल' ठरल्या आहेत भुईसमुद्र गावच्या अल्पभूधारक शेतकरी- उद्योजक-कार्यकर्त्या मंगलताई वाघमारे.

**अविरत कार्यरत**

लातूर जिल्ह्यातील भुईसमुद्र हे कुणाच्या खिजगणतीत नसणारे जेमतेम तीन हजार वस्तीचे खेडेगाव. गावात मूलभूत सुविधांचा अभाव. रोजगाराची परवड. प्रत्येकाचा जणू जगण्याशीच संघर्ष. बारावीपर्यंत शिक्षण झालेल्या मंगलताईंच्या वाट्याला लहानपणी लग्न आणि पुढे चूल अन् मूल नशिबाला आले. आजूबाजूच्या परिसरातल्या आत्महत्याप्रवण शेतकऱ्यांच्या कुटुंबांची दुरवस्था पाहून मंगलताईंचे मन खचून जात होते आणि एके दिवशी त्यांच्या घरातही चूल पेटली नाही. जगण्याचा प्रश्न गंभीर बनला. एकीकडे शेतीतल्या अपयशामुळे खचलेला पती आणि हृदयाच्या दुखण्याने आयुष्याची लढाई लढत असलेला मुलगा, या दोन्ही संकटांचा सामना करण्यासाठी मंगलताईंना पदर खोचून बाहेर पडावेच लागले. मानसिक-आर्थिकदृष्ट्या अतिशय खचलेल्या परिस्थितीतल्या मंगलताईंचा एसएसपीशी (मराठवाड्यातील भूकंपानंतर महिलांना प्रशिक्षण देऊन त्यांचे सक्षमीकरण करणारी संस्था) संपर्क झाला. संस्थेच्या मार्गदर्शनातून त्यांनी काही महिलांना सोबत घेऊन 'लक्ष्मी सखी महिला बचत गट' स्थापन केला आणि इथून त्यांनी मागे वळून पाहिले नाही. प्रशिक्षणामुळे त्यांच्या अंगी असलेला आत्मविश्वास जागा झाला. समोरच्या व्यक्तीशी नाते जोडण्याचे कौशल्य, चारचौघात वावरण्याचे आणि आपला मुद्दा धीटपणे मांडण्याचे बळ प्राप्त झाले. त्यातून त्यांनी बांगड्या विक्री, सौंदर्य प्रसाधन, कपडे विक्री आणि सेंद्रिय पद्धतीने भाजीपाला लागवड, असे विविध व्यवसाय सुरू केले.

**१४ गुंठ्यांची शाश्वत शेती**

मंगलताई घराबाहेर पडल्या खऱ्या; पण जिथे मोठी जमीन असलेला, अनुभवी शेतकरी आत्महत्या करत आहे, तिथे टीचभर शेतीत तुम्ही काय करून दाखवणार, अशी टीकाही त्यांच्यावर करण्यात आली; पण मंगलताईंना निराश होणे परवडण्यासारखे नव्हते. लहरी पाऊस, वर्षानुवर्षे पाचवीला पुजल्यासारखा दुष्काळ , नापीक होत चाललेल्या जमिनी आणि पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष, अशा हवामानबदलामुळे उद्‌भवणाऱ्या समस्यांना तोंड देण्यासाठी पर्यावरणीय पद्धतीने (सेंद्रिय) शेती करून शाश्वत उपजीविकेचे मार्ग शोधण्याची कल्पना मंगलताईंनी उचलून धरली. आशा हरपलेल्या नवऱ्याला पुन्हा उभारी देण्यासाठी एकीकडे व्यवसाय सुरू ठेवत, त्या शेतीतल्या प्रयोगांवर ठाम राहिल्या. त्यांनी हायब्रीडची वाट सोडत पारंपरिक बियाणे विकत घेत आपल्या फक्त १४ गुंठे शेतात शेतीला सुरुवात केली. सेंद्रिय शेतीवर वाचन सुरू केले आणि एसएसपीने दिलेला मार्गदर्शनाचा हात घट्ट पकडून आपली वाटचाल धीराने सुरू ठेवली.

**अन्नसुरक्षा आणि विषमुक्त आहाराची चळवळ**

मराठवाड्यात सतत उद्‌भवणाऱ्या दुष्काळात होणारे हाल बघून एसएसपीने आपल्या कार्यकक्षा विस्तृत करत २०१४पासून शाश्वत शेती प्रकल्प राबवायला सुरुवात केली. ग्रामीण शेतकऱ्याचे कुटुंब एकल असो व संयुक्त, कुटुंबाच्या जमिनीवर मुख्यत्वे राबते ती महिला; पण महिलेच्या स्वतःच्या नावावर जमीन आहे, असे चित्र अगदी अभावानेच दिसते. पारंपरिक शेती करणाऱ्या पुरुषांचा कल नगदी पिके घेण्याकडे होता. कोणते पीक लागवडीखाली घ्यावे तो निर्णय

**शेतात काम करताना मंगलताई**





**महिला दिनाच्या कार्यक्रमात**
**गौरवांकित मान्यवरांबरोबर मंगलताई**

घेण्याचे स्वातंत्र्य महिलेला कधीच मिळाले नव्हते, हा सगळ्यात मोठा अडथळा होता. म्हणजे इथे परत केवळ निसर्गाचे आव्हान नव्हते, तर समाज-संस्कृतीचे आव्हानही समोर ठाकले होते. महिलांनी किमान एक एकर शेतीमध्ये कुटुंबाच्या गरजेनुसार धान्ये, कडधान्ये, भाज्या, फळे, औषधी वनस्पती अशा घटकांची नैसर्गिक-सेंद्रिय पद्धतीने लागवड करून विषमुक्त आहाराचे उत्पादन करत घरीच वापरावे, ही कल्पना मंगलताईंनी स्वीकारली आणि अनेकांच्या विरोधाला तोंड देत यशस्वीपणे राबवूनही दाखवली.

सेंद्रिय शेती प्रशिक्षणानंतर पिकाची लागवड, संवर्धन, घरच्या घरीच बनवलेल्या खतांचा आणि कीटकनाशकांचा वापर करायला त्या शिकल्या. बीजप्रक्रिया करण्याआधी घरच्या बियाण्यांचे संवर्धन करून, उगवणक्षमता तपासून त्या त्याची पेरणी शेतात करतात. मंगलताई आज स्वतः प्रक्रिया केलेली बियाणे, गांडूळखत ,जीवामृत आणि दशपर्णी , निंबोळी अर्क, अग्निअस्त्र अशी कीटकनाशके वापरतात. यामुळे खर्चाची बचत तर होतेच, शिवाय कमी पाण्यावर मिश्र पिके घेतल्याने जमिनीच्या सुपीकतेत वाढ होते. त्याचबरोबर पोषक व सुरक्षित आहार, महिलांचे सक्षमीकरण, अन्नसुरक्षा, तसेच पर्यावरणरक्षण या बाबी साध्य होतात. विषमुक्त अन्न मिळाल्याने त्यांच्या कुटुंबीयांचे आरोग्य सुधारले, आजारांवर होणाऱ्या खर्चाची बचत झाली. बियाणे, खते आणि कीटकनाशकांचे पैसे वाचले, पाण्याची बचत झाली आणि मिश्र पीक पद्धतीमुळे उत्पादनही वाढले आहे.

नैसर्गिक-सेंद्रिय पद्धतीने पिकवलेल्या भाजीपाल्याचे महत्त्व लक्षात आल्यामुळे मंगलताईंच्या शेतातली भाजी गावातच विकली जाऊ लागली. घरात पैसा येऊ लागला. आता त्यांनी आणखी दोन एकर शेती लीजवर घेऊन तिथे सेंद्रिय शेती करायला सुरुवात केली आहे; पण या वर्षी पुन्हा एकवार दुष्काळाचे सावट पसरले आणि पाण्याच्या टंचाईमुळे पिण्याच्या पाण्याचा मोठा प्रश्न उद्‌भवला. मंगलताईंनी १४ गुंठे शेतात शेवग्याची लागवड केली होती. तीही सुकण्याच्या मार्गावर होती; परंतु त्यांनी हिंमत न हरता दिवसातून तीन-चार वेळेला बोअरवेल चालू करून ठिबकच्या वापरामुळे आपली लागवड अशा दुष्काळी स्थितीतही सावरली आहे. त्यात आंतरपीक मिरची व कांद्याची लागवड केली आहे. त्यासाठी लागणारे गांडूळखत, बायोडायनामिक व कंपोस्ट खत, फवारणीसाठी दशपर्णी आणि लिंबोळी अर्क तयार केले आहेत. एवढ्यावरच न थांबता त्यांनी परिसरातल्या इतर महिलांना उद्योजकतेचे प्रशिक्षण देऊन व्यवसाय सुरू करण्यास प्रोत्साहन दिले आहे. त्यांनी आपल्या गावात चार स्वमदत गट स्थापन केले असून, या गटातील महिलांना सेंद्रिय शेती तंत्राची माहिती देण्यास सुरवात केली. यापासून स्फूर्ती घेऊन ५६ महिलांनी परसबागेमध्ये या तंत्राचा वापर करून भाजीची लागवड केली आहे. दुष्काळाने गांजलेल्या, कर्जाच्या विळख्यात सापडून आत्महत्येला प्रवृत्त होणाऱ्या हजारो शेतकऱ्यांसाठी आता मंगलताई मार्गदर्शक ठरल्या आहेत.

**विषमुक्त आहाराबरोबर आरोग्याची निगा**

आपले कार्यक्षेत्र फक्त सेंद्रिय शेतीपुरतेच मर्यादित न ठेवता, महिला व तरुण मुलींच्या आरोग्यविषयक समस्यांवरदेखील त्या काम करत आहेत. प्रतिबंधात्मक आरोग्य, विशेषतः मासिक पाळीच्या काळातील स्वच्छता याबाबत महिला व तरुण मुलींबरोबर वारंवार चर्चा होत असतात. गावाचे आरोग्य व सुखसमृद्धी हे त्यांचे उद्दिष्ट आहे. आज मराठवाडा पुन्हा दुष्काळाच्या छायेत अडकलेला असताना, पुढच्या वर्षी केवळ ५०टक्केच पाऊस पडण्याचा इशारा पर्यावरणतज्ज्ञांनी दिला आहे, असे निराशाजनक चित्र डोळ्यांसमोर असताना मंगलाताईंसारख्या ग्रामीण महिला करत असलेले कार्य आशेचा दीप बनून समोर येत आहे.


**महिला किसान पुरस्कार**

मंगलताईंच्या मार्गदर्शनाखाली गावातील सर्व शेती रासायनिक खतांपासून मुक्त करण्याचे, कृषिपूरक व्यवसाय सुरू करून मराठवाड्याचे चित्र बदलण्याचे स्वप्न महिला बघू लागल्या आहेत. त्यांच्या या कर्तृत्वाबद्दल दूरदर्शनतर्फे दिल्या जाणाऱ्या ‘महिला किसान’ पुरस्कारासाठी ज्या ११४ महिला देशपातळीवर निवडण्यात आल्या होत्या, त्यांतल्या महाराष्ट्रातल्या चार महिलांमध्ये मंगलताईंची निवड करण्यात आली. गावाबाहेर फारशा न पडलेल्या, आपण कधी विमानात बसून कुठे प्रवासाला जाऊ हे स्वप्नातसुद्धा नसणाऱ्या मंगलताई या पुरस्काराच्या निमित्ताने आपल्या पतीसह विमानाने दिल्लीला जाणार, ही बातमी पसरत गेली तेव्हा गाव उत्साहाने भरून गेले. या निमित्ताने मंगलताईंची दिल्ली दूरदर्शनच्या किसान वाहिनीवर मुलाखतही घेण्यात आली.

या वर्षी महाराष्ट्र शासनाचे माहिती आणि जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय आणि विधिमंडळ पत्रकार संघटनेच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त साहस, क्रीडा, संगीत, पत्रकारिता अशा क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महिलांना गौरवण्यात आले. त्यात मंगलताईंचाही समावेश होता. मंगलताईंच्या वाट्याला असेच अनेक सन्मान येवोत, ही सदिच्छा!

lekhikaat12a@gmail.com

नवं कोरं




'ललितकलादर्श'चे पु.श्री.काळे यांनी घडवलेली
विसाव्या शतकाच्या आरंभीची सफर...

## ललितकलेच्या सहवासात

लेखक - पु.श्री.काळे

पृष्ठसंख्या : १८८
किंमत : ₹२५०

Book Available




व. पु. काळे यांचा शब्दसाज ल्यालेली
भालचंद्र पेंढारकरांची नाट्यमुशाफिरी

## जपुन टाक पाऊल!

लेखक - व.पु. काळे

पृष्ठसंख्या : १७६
किंमत : ₹२२०

Book Available



सहा बहिणी आणि त्यांचं तुटलेलं घर..
घराचा अखेरचा सांधा निखळत असताना
भविष्याला कलाटणी देणाऱ्या खिडकीची गोष्ट...

## शेष

लेखक - स्वाती चांदोरकर

पृष्ठसंख्या : १५६
किंमत : ₹२००

Book Available



# जीवन त्यांना कळले हो! : विवेक नवरे

- वामन देशपांडे

*पंढरपूरच्या पायवारीत वैद्यकीय सेवा करणं...आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन स्पर्धेत नवा विक्रम करणं... कोणताही मोबदला न घेता स्वत:च्या रिक्षातून अपंगांना हॉस्पिटलमध्ये पोचवणं आणि त्याचा दवाखान्याचा खर्च करणं...हे सगळं करते एक अपंग व्यक्ती...विवेक नवरे...त्यांच्या अपूर्व मनोबलाची आणि अपंगसेवेची ही न्यारी कहाणी...*

महाकवी ग. दि. माडगूळकर यांनी मानवी आयुष्यावर भाष्य करताना एक शाश्वत सत्य प्रकट केले की,

*दैवजात दुःखे भरता दोष ना कुणाचा*
*पराधीन आहे जगती पुत्र मानवाचा...*

माणूस हा मूलतः पराधीन आहे. त्याचे आयुष्य पूर्वसंचिताशी निगडित असते. एखादा सुखाचा धागा अनुभवायला मिळतो; परंतु शंभर दुःखाचे धागे मानवी आयुष्याला अक्षरशः लपेटून येतात, हे सत्य प्रत्येक माणूस नित्य अनुभवतच असतो. प्रत्यक्ष प्रभू श्री रामचंद्रांनी भरताला म्हटले होते की,

खेळ चाललासे माझ्या पूर्वसंचिताचा...

हे त्रिकालाबाधित सत्य आहे की, आपले नित्याचे आयुष्य हे आपल्या प्रारब्धाशी जोडले गेलेले असते. मांजराच्या पावलांना जसा आवाज नसतो, तसे मानवी आयुष्यात डोकावणाऱ्या दुःखाच्या पावलांना आवाज नसतो. दुःख हे अवचितपणे कोसळते आणि आपले आयुष्य बेचिराख करून टाकते. जगणे असह्य करून टाकते; परंतु काही माणसे जिद्दीने आपल्या शापित आयुष्याला धैर्याने सामोरे जातात आणि राख झालेल्या आपल्या आयुष्याला स्वकर्तृत्वाने नव्याने उभारी देतात. अपरंपार दुःखाला स्वबळाने नवा सुखाचा परीघ अर्पण करतात. 'गीतरामायण' या अमर गीतकाव्यात प्रभू श्री रामचंद्र सीतेला म्हणतात,

*मी शौर्याने वाकविलें दैवातें...*

शापित दैवाला वाकवण्याची विलक्षण ताकद प्राप्त झालेली पोलादी मनगटाची माणसे तशी संख्येने कमी असतात; परंतु हीच श्रेष्ठ माणसे, समाजापुढे नवा आदर्श ठेवतात. स्वतःला सामाजिक कार्यात पूर्णांशाने गुंतवतात आणि निष्काम कर्मयोगाचा नवा दीपस्तंभ आपल्या कर्तृत्वाने निर्माण करतात. प्रसिद्धी आणि पैशापासून शेकडो कोस दूर उभी असणारी ही माणसे, 'इदं न मम' वृत्तीने आयुष्यभर जगतात आणि मुख्य म्हणजे समाजातल्या दुःखी-कष्टी जीवांना जगण्याची नवी उमेद देतात. दुःखी माणसांच्या डोळ्यांतले घळाघळा वाहणारे अश्रू पुसतात आणि त्यांना जगण्याची नवी उभारी देतात. त्यांच्यात नवी जिद्द निर्माण करतात. सामाजिक कार्यात झोकून दिलेली ही देवदूत मंडळी खूप निराळी असतात. दुःखितांना आपले हृदय अर्पण करणारी ही देवस्वरूप माणसे, नेमकी कशी असतात तर,

*आस नाहीं मज कशाची, खंत नाही मानसीं*
*तू नभाच्या लोचनांनी सर्व काहीं जाणसी*
*देह हा कर्मांत सरुनी सफल होवो जन्म हा...*

अशा सहृदयी समाजसेवेत स्वतःला झोकून दिलेली ही निःस्वार्थी माणसे जी असतात, त्यांना कसल्याही स्वरूपाची इच्छा वा आकांक्षा नसते, की त्यांच्या मनात कुठलीही खंत नसते. परमेश्वरावर अतूट श्रद्धा असणारी ही लोभस वृत्तीची माणसे, परमेश्वराला साकडे घालत म्हणतात की, भगवंता, तू आभाळातून आम्हाला निरखित असतोस; तू सर्व काही जाणतोस. माझी एकच इच्छा आहे की, हा देह लोकांची सेवा करण्यात खर्च होवो आणि हा माझा मानवी जन्म सफल होवो.''

डोंबिवलीच्या कवी मधुकर जोशी यांनी प्रकट केलेल्या आपल्या गीतकाव्यातले हे उत्कट भाव, प्रत्यक्ष जगणारी एक देवस्वरूप व्यक्ती डोंबिवलीतच राहते आणि त्या समाजसेवेचे व्रत प्राणपणाने जगणाऱ्या, निर्मळ अंतःकरणाच्या व्यक्तीचे नाव आहे विवेक श्रीनिवास नवरे. साठीच्या उंबरठ्यावर, अष्टौप्रहर समाजसेवेत निमग्न असणाऱ्या या ध्येयवेड्या व्यक्तीने गेली तीस वर्षे फक्त अपंगांची सेवा करण्यातच तन-मन-धन अर्पून, आपले अवघे आयुष्य व्यतीत केले. स्वतः अपंग असणाऱ्या नवरे यांचे कार्य प्रत्यक्ष एकदा का आपण अनुभवले, की आपण आश्चर्यचकितच होतो. त्यांच्या डाव्या पायाला 'जयपूर फूट' लावलेला आहे, हे आपल्या चुकूनही लक्षात येणार नाही, एवढ्या जलद हालचाली करणारे विवेक नवरे यांचे एकूण आयुष्य हे आश्चर्यालाही आश्चर्य वाटावे, एवढे स्फूर्तिदायी आहे.

विवेक नवरे मूलतः दुग्ध व्यवसायात होते; परंतु एक दुर्दैवी घटना घडली आणि ते अचानक अपंग झाले. २ ऑक्टोबर, १९९० या दिवशी दुर्दैवाने एक भीषण घटना घडली. नवरे यांची काहीही चूक नव्हती. रस्त्याच्या कडेला मित्राबरोबर बोलत असताना, अचानक एक ट्रक वेगाने, रस्ता सोडून त्यांच्या अंगावर आला आणि त्यांना जोरदार धडक बसली. ते खाली कोसळले. त्यांच्या डाव्या पायाला जबरदस्त मार लागला. इतका की सहा वर्षांच्या अथक इलाजानंतर त्यांचा डावा पाय गुडघ्यापासून काढून टाकण्याचा निर्णय घेणे डॉक्टरांना क्रमप्राप्त झाले.

मुंबईतील सुप्रसिद्ध अस्थिरोगतज्ज्ञ डॉ. अरविंद बावडेकर यांच्या निःस्वार्थ सेवेतून त्यांनी समाजसेवेची प्रेरणा घेतली. नवरे यांना कृत्रिम पाय बसवण्यात आला. त्या क्षणापासून गेली पंचवीस-तीस वर्षे नवरे केवळ अपंगसेवेतच गर्क झाले आहेत. त्यांनी आपला दुग्धव्यवसाय केवळ अपंगांची सेवा करण्यासाठीच बंद केला. त्यांनी एक रिक्षा घेतली आणि कोणत्याही

**एका अपंग मुलीसह विवेक नवरे (बाजूला उभे)**






**सन्मानपत्रासह विवेकजी**

अपंगाला आपल्या रिक्षात बसवून ते डॉक्टरांकडे उपचारांसाठी कुठेही घेऊन जातात. आजपर्यंत त्यांनी शेकडो अपंगांना स्वखर्चाने सर्वत्र नेले. उपचारांचा खर्चसुद्धा नवरे स्वतःच करतात. गीतेतला निष्काम कर्मयोग प्रत्यक्ष जगणारे नवरे हे एक महाआश्चर्यच आहे. आगीच्या बंबाला जसे बोलावल्या क्षणी धावत जावे लागते ना, तसे नवरे अक्षरशः आपली रिक्षा घेऊन जातात. त्याला धीर देत, उत्तम डॉक्टरांकडे घेऊन जातात आणि तो दुःखमुक्त होईपर्यंत त्याची सेवा करतात. ज्याचा पाय गेला असेल त्याला 'जयपूर फूट' बसवून देईपर्यंत हा देवदूत त्या रुग्णाबरोबर त्याचा श्वास होऊन, त्याला साथ देतो.

नवरे हे एक जिद्दी व्यक्तिमत्त्व आहे. २००६ ते २०१० अशी सलग पाच वर्षे ते आळंदी ते पंढरपूर पायवारीत सामील होऊन मोफत वैद्यकीय सेवा करण्यासाठी डॉक्टरांबरोबर जात होते. वैद्यकीय सेवेचा अनुभव त्यांना या वारीत मिळाला. चढण्यास अतिशय कठीण असलेला राजगड स्वतः चढून गेले. तसे त्यांनी अनेक किल्ले सर केले. 'पंगू लंघयते गिरीम्' या वचनाचे मूर्त रूप म्हणजे हे विवेक नवरे. इतकेच काय, परंतु मुंबईतल्या आंतरराष्ट्रीय मॅरेथॉनमध्ये तीन किलोमीटरचे अंतर फक्त ४५ मिनिटांत पार करून नवा विक्रम प्रस्थापित केला. नवरे यांच्या रुग्णसेवेचे कौतुक अनेक संस्थांनी केले. त्यांचे आजपर्यंत अनेक सत्कार झाले. समाजाने त्यांच्या कार्याची नोंद घेतली. अपंगांचे मनोधैर्य वाढवण्यासाठी ते समुपदेशन करतात. त्यांच्या या सेवेची मोठ्या प्रमाणात डॉक्टरांनीसुद्धा नोंद घेतली. डॉक्टरांचे सहकार्य नवरे यांना सतत मिळते. गेली तीस वर्षे स्वतः अपंग असूनही, हा धीरादोत्त पुरुषोत्तम निष्काम भावनेने सतत सेवा करतो आहे. प्रसिद्धी आणि पैसा चुकूनही न घेता कार्य करणारा हा नवा देवदूत आहे, अशी त्यांची प्रसिद्धी आता संपूर्ण महाराष्ट्रभर झालेली आहे. सतत हसतमुख असणारे नवरे हे कविहृदयाचे आहेत. अध्यात्माची त्यांना विशेष गोडी आहे. आश्चर्य म्हणजे एका अपंग व्यक्तीला पुण्याच्या हॉस्पिटलमध्ये न्यायचा एक प्रसंग त्यांच्यावर आला आणि त्यांनी आपल्या रिक्षाने त्या व्यक्तीला पुण्यात नेले. मुंबईच्या हॉस्पिटलमध्ये तर त्यांनी अनेक अपंगांना प्रेमाने नेले आहे.

आजपर्यंत त्यांच्यावर अनेक पुरस्कारांचा वर्षाव झाला आहे; परंतु त्यांच्या मनात मात्र केवळ सेवाभावच असतो. खूप वेळेला मनात येते की भारत सरकारने त्यांच्या या अपूर्व कार्याची नोंद घेतली तर एका रुग्णसेवकाचा खरा सत्कार होईल. ज्ञानदेवांच्या भाषेत त्यांच्या कार्याचे मूल्यमापन करायचे तर, असे म्हणता येईल :


*मार्गाधारे वर्तावे । विश्व मोहरे लावावे ।*
*अलौकिका नोहावे । लोकांप्रती ॥*

विवेक आणि वैराग्य या वृत्तींच्या संगमावर नवरे आपले अपंगसेवेचे कार्य करीत निष्काम भावनेने उभे आहेत. बा. भ. बोरकरांच्या कवितेच्या ओळीत सांगायचे झाले तर,

*जीवन त्यांना कळले हो*
*'मी'पण ज्यांचे पक्व फळापरी*
*सहजपणाने गळले हो...*

**एका कार्यक्रमात विवेकजी**







युद्धजन्य अफगाणिस्तानात स्त्री शिक्षणासाठी
लढणाऱ्या कोवळ्या 'परवाना'ची कथा..
'द ब्रेडविनर' या
जगप्रसिद्ध मालिकेतील नवा भाग...

मूळ लेखक - डेबोरा एलिस
अनुवाद - अपर्णा वेलणकर

पृष्ठसंख्या : २०४
किंमत : ₹२४०

Book Available

## माय नेम इज परवाना





तीन स्त्रियांचं जीवनवस्त्र...
वेगवेगळ्या धाग्यांनी विणलेलं...
हे धागे परस्परांत गुंफलेले...
त्या गुंफलेपणातून साकारलेली
वास्तव कादंबरी

मूळ लेखक - बेलिंडा व्हिएगस
अनुवाद - श्यामल चितळे

पृष्ठसंख्या : २४८
किंमत : ₹२९५

## धीवराची आर्त साद




पर्यावरणाच्या साखळीतलं माणसाचं स्थान
आणि नात्यांच्या जंजाळातलं
स्वतःचं अस्तित्व शोधाचा हा प्रवास,
गूढ सुंदरबनापासून सुरू होऊन
उजाड माळरानापर्यंत पोहोचलेला
आणि सुरूच राहिलेला...

लेखक - शर्मिला फडके

पृष्ठसंख्या : ३५२
किंमत : ₹३९५

Book Available

## फोर सीझन्स



# वाया जाणारे अन्न सत्कारणी लावणारी संस्था : रॉबिनहूड आर्मी

**शब्दांकन आणि संकलन :**

**प्रतिनिधी (मेहता मराठी ग्रंथजगत)**

*समाजसेवेच्या अनेक वाटा आहेत. काही वेळेला जाणीवपूर्वक एखादी वाट चोखाळली जाते, तर काही वेळेला एखाद्या प्रसंगामुळे समाजसेवेची कोणती वाट चोखाळावी, याचा साक्षात्कार एखाद्या व्यक्तीला होतो. एखाद्या छोट्या प्रसंगातूनही समाजसेवेची प्रेरणा मिळते. दिल्लीमधील नील घोषला समाजसेवेचा एक मार्ग सापडला आणि वाया जाणारे अन्न सत्कारणी लावण्याचे त्याने ठरवले. त्यातूनच निर्मिती झाली रॉबिनहूड आर्मी या संस्थेची. आज ही संस्था १०३ शहरांमध्ये काम करते आहे. या संस्थेचे सदस्य राहुल पाटील यांनी संस्थेविषयी दिलेली माहिती...*

एकीकडे उपासमार तर एकीकडे दररोज अन्न फेकले जात आहे, हे पाहून पाच वर्षांपूर्वी दिल्लीमध्ये नील घोषने काही मित्र-मैत्रिणींचा ग्रुप घेऊन असेच हॉटेलमध्ये उरलेले अन्न गोळा करून गरजूंना वाटले आणि त्याच वेळेस रॉबिनहूड आर्मी या संस्थेची संकल्पना त्याला सुचली. त्याच वेळी पुण्यातही भाविनी व अवनी या दोन बहिणींनी या कामाला सुरुवात केली.

'रॉबिनहूड आर्मी'ही एक समाजसेवी संस्था आहे, जी उरलेले, वाया जाणारे अन्न गरजूंपर्यंत पोचवण्याचे काम करते. रॉबिनहूड आर्मीचे सभासद विविध हॉटेल्समधील उरलेले, वाया जाणारे अन्नपदार्थ जमा करतात आणि गरीब, भुकेल्या लोकांना वाटतात.

रॉबिनहूड आर्मीमध्ये असणारे रॉबिन स्वयंसेवक हे नोकरदार, व्यावसायिक, विद्यार्थी आहेत. मिळेल तसा वेळ काढून हे स्वयंसेवक अन्नदानाचे काम जागोजागी करतात. त्या बदल्यात ही संस्था किंवा स्वयंसेवक कोणताही मोबदला घेत नाहीत. गरीब आणि गरजूंपर्यंत अन्न पोहोचवणे, हा या संस्थेचा एकमात्र उद्देश आहे.

**गरिबांना अन्नवाटप करताना 'रॉबिनहूड'चे कार्यकर्ते**



आपल्या परिसरातील हॉटेल्सशी संपर्क साधून, त्यांच्याकडे उरलेलं अन्न एकत्र जमवलं जातं. यानंतर हे अन्न शहरातील विविध भागांत गरीब लोकांमध्ये वाटलं जातं. काही रेस्टॉरंट्सनी, मोठ्या सोसायट्यांनी या संस्थेमार्फत गरजूंना मदत करता यावी म्हणून खास जेवण बनवायलाही सुरुवात केली आहे. तसेच बांधकाम मजूर, वीट कामगारांच्या मुलांसाठी संस्थेमार्फत विनामूल्य शाळादेखील चालवली जाते.

पुणे व पिंपरी-चिंचवडमध्ये वीसहून अधिक ठिकाणी ही संस्था काम करते. त्यामध्ये अनेक स्वयंसेवक मिळेल तितका वेळ काढून हे कार्य करत आहेत.

'कधी कधी रात्री अकराला कार्यक्रम संपल्यानंतर फोन येतो. मग व्हॉट्सॲपवर मेसेज टाकला जातो. ज्यांना ज्यांना शक्य आहे ते सर्व ठराविक जागी जमा होतो व त्यानंतर वस्तीमध्ये जाऊन अन्नवाटप केले जाते. कधी कधी लागोपाठ तीन-चार कॉल्स येतात; परंतु त्या लोकांचे आनंदी चेहरे पाहून सगळा थकवा जातो. आज किती अन्न वाचवून गरजूंपर्यंत पोहोचवले, याचा आनंद मिळतो. कधी कधी अनेक आशीर्वाद घेऊन परत येतो,' असं रॉबिनहूड आर्मीचे स्वयंसेवक राहुल पाटील सांगतात.

अन्नाबरोबरच धान्य, कपडे, ब्लँकेट्स, चपला यांचेही वाटप होते. चप्पल किंवा कपडे मापानुसारच दिले जातात; अन्यथा त्याचा वापर होत नाही, हे आम्हाला माहीत असते. अन्नधान्याशिवाय दर सहा महिन्यांनी रक्तदान शिबिर भरवले जाते. शक्य तितके रॉबिन्स रक्तदान करतात.

या सर्व कार्यासाठी सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे रॉबिन्स मिळणे. त्यासाठी आम्ही विविध महाविद्यालये, ऑफिसमध्ये जाऊन माहिती देतो. तसेच मोठ्या मोठ्या प्रदर्शनात जाऊनदेखील अन्नबचतीविषयी माहिती दिली जाते. या जनजागृतीमुळे आपोआपच लोक संपर्क करायला लागले

**एका लहानग्याला खाऊ देताना 'रॉबिनहूड'चे कार्यकर्ते**



शिक्षणापासून वंचित मुलांना शिक्षणाचे धडे देणारी 'रॉबिनहूड'ची कार्यकर्ती



आहेत. २०१९च्या आषाढी वारीमध्ये ७० हजारांहून जास्त वारकऱ्यांना सरबतवाटप करण्यात आले. तसेच त्यांच्या पायाला तेल लावून मसाज करून देण्यात आला. त्या वेळेस भरभरून मिळणारे आशीर्वाद आमचं बळ वाढवतात आणि आम्हाला मनभरून समाधान देतात. या वेळेस अन्नबचतीबरोबर आपण निसर्गाचंही देणं लागतो, या तत्त्वानं बियांचे मातीतले गोळे बनवून वारकऱ्यांना देण्यात आले. डोंगरातून जाताना या बिया फेकून त्यापासून झाडे येतील, हा एक विचार होता.

असे अनेक नवनवीन उपक्रम करत 'रॉबिनहूड आर्मी'ही संस्था अनाथाश्रम, वृद्धाश्रम इथेही आपला अमूल्य वेळ देऊन अन्न, कपडे, गरजेच्या वस्तूंचं वाटप करून माणुसकी जपत आहे.

या संस्थेचे सभासद सोशल मीडियावर आपले अनुभव व्यक्त करतात. त्यामुळे लोकांना या संस्थेविषयी माहिती मिळते. जर कोणाला या संस्थेचं सभासद व्हायचं असेल तर संस्थेशी संलग्न होऊन आठवड्यातले तीन दिवस नियमितपणे देणं गरजेचं आहे; अन्यथा, आपल्या शहरात अन्नवाटपाचं काम तुम्ही करू शकता. 'Citizens first - Mission Next - Robins Last' या भूमिकेतून ही संस्था काम करते. या संस्थेचं कुठेही ऑफिस नाही.


■

rahulpatil.auto@gmail.com

वृद्धाश्रमातील ज्येष्ठांबरोबर 'रॉबिनहूड'चे कार्यकर्ते



## नवं कोरं





भारतीय क्रिकेटचा आलेख उंचावत नेणाऱ्या
११ आदर्श क्रिकेटपटूंच्या कारकिर्दीचा आवर्जून वाचावा
असा लेखाजोखा...

# डेमोक्रसीज इलेव्हन

**भारतीय क्रिकेटची महान गाथा**

मूळ लेखक - राजदीप सरदेसाई
अनुवाद - मेघना ढोके
पृष्ठसंख्या : ५०४
किंमत : ₹५९५
Book Available

---





क्रिकेटमध्ये करिअर करू इच्छिणाऱ्या तरुणांसाठी
पथदर्शक ठरेल अशी
सचिन तेंडुलकरची आत्मकथा..

# चेस युअर ड्रीम्स

मूळ लेखक - सचिन तेंडुलकर
अनुवाद - दीपक कुळकर्णी
पृष्ठसंख्या : २४०
किंमत : ₹२९५
Book Available

---




आयुष्य उद्ध्वस्त झालेला मायकेल
स्टारबक्समध्ये काम करू लागतो
आणि त्याला जगण्याचं नवं सूत्र गवसतं..
स्टारबक्सनं मायकेलला दिलेला
हा यशाचा फॉर्म्युला...

# हाऊ स्टारबक्स सेव्हड माय लाइफ

मूळ लेखक - मायकेल गेट्स गिल
अनुवाद - नीला चांदोरकर
पृष्ठसंख्या : २७२
किंमत : ₹३२०




# सायकलस्वार परांजपे काका

- ज्योती आफळे

*माणसाच्या जीवनात संकटं येतात, विवंचना येतात; पण काही माणसं त्याही वेळी खंबीर राहतात आणि जीवनाला चांगल्या रीतीने सामोरी जातात.*

*अशाच माणसांपैकी एक आहेत परांजपे काका. अपार कष्ट करत स्वतःच्या जीवनाची घडी त्यांनी बसवलीच; पण वेगवेगळ्या कामांमधून ते समाजऋणही फेडत आहेत. वयाच्या नव्वदीकडे वाटचाल चाललेली असतानाही तरुणांना लाजवेल इतक्या उत्साहाने काम करणाऱ्या परांजपे काकांच्या जीवनाचा आणि कार्याचा हा आलेख...*

"काका, तुम्हाला फोन कधी करू? थोडी सवड कधी मिळेल?" फोनवरून मुलाखत घेण्यासाठी मला काकांचा वेळ हवा होता.

"कधीही कर, मी कामात असतो. तसंच बोलीन." काकांचं उत्तर

गोविंद भास्कर परांजपे. माधवनगर गावाचे रहिवासी. सांगली जिल्ह्यातील हे छोटंसं गाव. पटवर्धन सरकारांनी वसवलं. परांजपे काकांच्या कार्यानं आम्हा माधवनगरवासीयांची मान अभिमानानं उंचावली आहे.

...तर सकाळी ७ वाजता, ११ वाजता, ५ वाजता, ८ वाजता कधीही फोन करा- काका कामासाठी बाहेर पडलेले. सल्ल्यासाठी कोणीतरी त्यांच्याकडे आलेलं. ८१ वर्षांचे हे गृहस्थ दिवसभर रोपं तयार करतात, खड्डे खणून ती लावतात, जगवतात. सायकलप्रवास, राजकारण, समाजकारण यांत अखंड व्यस्त असतात. विनातक्रार, विनाकंटाळा.

१० ऑक्टोबर, १९३८ रोजी कोल्हापूर जिल्ह्यातील इचलकरंजी इथे काकांचा जन्म झाला. ते दहा वर्षांचे असताना त्यांच्या वडिलांचं निधन झालं. तेव्हापासून त्यांच्या कुडीनं कष्टांचा वसा घेतला. भावंडांनी एकदिलानं परिस्थितीचं आव्हान स्वीकारलं. राहायला भाड्याचं जुनाट घर. चंद्रमौळी घरात आई आणि एक ते सोळा वयातील आठ मुलं. शाळेचं गणित सांभाळत हातातोंडाशी गाठ पडण्यासाठी प्रत्येकानं प्रयत्नांची पराकाष्ठा करायची. वखार, खानावळ, सायकल दुकान, वीटभट्टी, ट्रान्सपोर्ट कंपनी, घरोघरी फिरून उदबत्ती, गवती चहा विकणं, असा या भावंडांचा व्यवसायाचा आवाका. शिवाय पोहणं, धावणं, सायकलिंग, हुतूतू, खो खो या खेळांत प्रावीण्य. याविषयी काका म्हणतात, 'पहाटेपासून रात्रीपर्यंत काम करायचं व्यसन आमच्या नसानसांत भिनून गेलं. आजही या व्यसनानं त्यांची पाठ सोडलेली नाही.' या मुशीतून घडल्यानं आजतागायत त्यांच्या अंगभूत ऊर्जेचा आलेख उंचावलेला आहे.

त्यांचं जन्मगाव असलेलं इचलकरंजी मिनी मँचेस्टर म्हणून ओळखलं जातं. अकरावीची परीक्षा संपल्यावर दुसऱ्या दिवशी एका पॉवरलूम कारखान्यात ते दिवाणजीचं काम करू लागले. दहा महिन्यांनी एका इंजिनिअरिंग वर्कशॉपमध्ये दिवाणजी म्हणून रुजू झाले. आठ तास नेमलेलं काम केल्यावर पुढचे चार तास मशिनवर लोखंडी बार कापणं, ड्रील मशिननं नगांना भोकं पाडणं, कास्टिंग, रिमिंग, टॅपिंग, मिलिंग, शेपिंग, प्लेनिंग, बोअरिंग, सेंटरिंग, लेथ मशिनिंग ही कामं शिकायची. हुश्श... इथं गोविंदा, यंत्रकारागीर बनला. कुठलंही काम कुशलतेनं हाताळणारा. दुर्दैवानं या कारखान्यात कामगार व मालक यांच्यात बिनसलं. कामगार संपावर गेले. यामुळे गोविंदानं कोल्हापूरला दसरा चौकातील शिवाजी तंत्र संस्थेची वाट धरली. तिथला टर्निंगचा कोर्स आणि उमेदवारीचा काळ पूर्ण केला. गंमत म्हणजे कामाचा अनुभव आधीच गाठीशी जमला होता, शिक्षण नंतर घेतलं. त्यानंतर कुर्ल्यातील कार्यशाळेत त्यांनी प्रशिक्षणार्थी म्हणून प्रवेश केला. अनेक जबाबदाऱ्या आपण होऊन त्यांच्याकडे चालून आल्या आणि त्यांनी त्या समर्थपणे पेलल्या. खानावळ चालवण्याचा अनुभव असल्यामुळे कार्यशाळेतल्या



**सांगली ते नेपाळ हा प्रवास सायकलने करण्यास सज्ज असलेले परांजपे काका**

मेसचं व्यवस्थापकपद त्यांना मिळालं. ५०० विद्यार्थ्यांना वाजवी दरात उत्तम प्रकारचं जेवण मिळू लागलं. हे काम चोखपणे पार पाडल्यावर संस्थाप्रमुखांनी त्यांना गौरवपत्र देऊ केलं.

प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर सांगली येथील तंत्रशिक्षण केंद्रात (आयटीआय) ते शिक्षक पदावर रुजू झाले. मोजूनमापून चाकोरीत राहून काम करणं त्यांच्या स्वभावात नाही. इथंही सहशिक्षक आणि विद्यार्थी यांच्यामध्ये मिळून मिसळून त्यांनी अनेक कामं पार पाडली. स्नेहसंमेलनांमध्ये अभिनय केला. इथल्या विद्यार्थी ग्राहक भांडाराची जबाबदारी त्यांच्यावर सोपवली गेली. ही संस्था नोंदणीकृत नव्हती. तिच्या नोंदणीचे सगळे सोपस्कार पार पाडून संस्थापक अध्यक्ष म्हणून त्यांनी अनेक वर्षं कारभार पाहिला. अभिमानाची गोष्ट म्हणजे आज पन्नास वर्षांनंतरही या संस्थेचं कार्य सुरळीत चालू आहे. याचं कारण म्हणजे गोविंद परांजपे या शिक्षकानं घालून दिलेली घडी. सांगली आयटीआय ही संस्था २८ एकरांवर पसरलेली आहे. त्या काळी शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना हाताशी धरून श्रमदानातून त्यांनी आवारात मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड केली. आजही या वृक्षांनी संस्थेवर कृपेचं छत्र धरलं आहे. त्यांच्याबरोबर या संस्थेत र. वा. प्रधान नावाचे सहशिक्षक होते. त्यांनी



**परांजपे काकांना त्यांच्या कार्यासाठी मिळालेलं स्मृतिचिन्ह आणि सन्मानचिन्ह**

'महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण संस्था निदेशक संघटना' स्थापन केली. निवृत्त होईपर्यंत काकांनी या संस्थेची कोषाध्यक्ष, सचिव, राज्य खजिनदार अशी विविध पदं सांभाळली. १९७२मध्ये या संघटनेनं यंत्र व वस्तू खरेदीतील भ्रष्टाचाराविरोधात राज्यव्यापी आंदोलन छेडलं. याचा पाठपुरावा करताना काकांनी मुंबई, नागपूर, अमरावती, पुणे, सांगली इथे उपोषण केलं.

सेवानिवृत्तीनंतर श्रमसाफल्याचा आनंद घेत निवांत जगायची पठडी काकांनी स्वीकारली नाही. शिक्षक म्हणून वावरत असताना ते वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या आरोग्याची जातीनं विचारपूस करत. गंभीर अवस्थेतील विद्यार्थ्यांना शासकीय रुग्णालयात दाखल करत. प्रसंगी पदरमोडही करत. रुग्णसेवेचं मोल त्यांनी ओळखलं होतं. निवृत्तीनंतर दुसऱ्या दिवसापासून काका पत्नीसह रुग्णालयात जाऊन 'रुग्णमित्र' म्हणून काम करू लागले. रुग्णांचे दाखले भरून देणं, दिव्यांग रुग्णांची वैद्यकीय तपासणी करवून त्यांच्या अपंगत्वाचं प्रमाण ठरवून देणं, या त्यांच्या कामाची सरकारदरबारी दखल घेतली गेली. शासकीय रुग्णालयात त्यांच्यासाठी टेबल-खुर्चीची सोय करण्यात आली. यामुळे त्यांच्या सेवेचा लाभ अनेकांना घेता येऊ लागला. पुढे दहा-बारा मित्र या कामात त्यांना मदत करू लागले. पुढे संगणकीकरण झाल्यामुळे हातानं दाखले भरणं बंद झालं.

पर्यावरणरक्षणाचा फार बोलबाला नसलेल्या काळात काकांनी पावसाचं पाणी साठवणं, सार्वजनिक स्थळांची देखभाल करणं, जैविक कचऱ्यापासून खत-निर्मिती, झाडं लावून ती जगवणं, दिवसा चालू असलेले पथदिवे बंद करणं यांचा पुरस्कार केला. पन्नास वर्षांपासून ते पर्यावरणरक्षणासाठी झटत आहेत. रोज सकाळी घरातील कचऱ्याचं वर्गीकरण करून, जैविक कचऱ्याचे तुकडे करून हा कचरा ते एका दणकट पिशवीत भरतात. पिशवी भरल्यावर विटांचा चुरा, माती यांचा थर लावून त्यात बिया रुजवतात. वर्षभर या रोपाची देखभाल करून मग योग्य ठिकाणी त्याची लागवड करतात. मोठं अंगण असणाऱ्यांच्या अंगणात अशा १५-२० पिशव्या ठेवून त्यांना त्याची देखभाल करायला लावणं, नागरिकांना नव्यानं लावलेल्या रोपांची निगराणी करायला लावणं, ही कामं ते चतुराईनं करून घेतात. रोज प्रभातफेरी काढून गावातील देशी वृक्षांच्या बिया गोळा करतात व कटाक्षानं त्यांचीच रोपं तयार करतात. आजही रस्त्याकडेला खड्डे खणून त्यात रोपं लावायला त्यांना कोणाच्या मदतीची गरज पडत नाही. दर वर्षी हजारो रोपटी त्यांच्या कृपेनं जग बघतात आणि योग्य कोंदण मिळेल या निश्चिंतीनं सुखानं डोलतात. ज्यांना हवीत त्यांनी ती खुशीनं न्यावीत आणि जबाबदारीनं वाढवावीत. घरची जबाबदारी काका व्यवस्थित उचलतात. त्यांच्या पत्नी सौ. अनुराधाकाकू पिग्मी एजंट आहेत. रोजचे दोन तास त्यांनाही मदत करतात. त्यामुळे गृहमंत्री खूश!

राजकारण, समाजकारण या क्षेत्रातील काकांची मुशाफिरीही तितकीच उल्लेखनीय आहे. निवृत्तीनंतर ते सांगलीशेजारच्या माधवनगर या गावी स्थायिक झाले. गावच्या पाणीप्रश्नाचा सूक्ष्म अभ्यास करून त्यांनी त्यावर एक पुस्तिका काढली व लोकांमध्ये जागरुकता वाढवली. २००७ मध्ये १७ जणांचे पॅनेल घेऊन त्यांनी ग्रामपंचायतीची निवडणूक लढवली. त्यांचे १६ उमेदवार निवडून आले व काका उपसरपंच झाले. नेमके त्या काळात वीजबिल थकल्याने गावचा पाणीपुरवठा बंद झाला होता. काकांनी पदरचे लाख रुपये व सरपंचांनी २५,०००रुपये बिलापोटी भरले. पाणीपुरवठा सुरळीत झाला; पण या पाण्याला मोठी गळती होती. काकांनी जातीनं उभं राहून ती गळती काढून घेतली. या दुरुस्तीमुळे दीड लाख लिटर पाण्याची नासाडी टळली. या कामाची दखल घेऊन तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांनी सन्मानपत्र देऊन त्यांचा गौरव केला. त्या पत्राचा मजकूर असा होता : 'जलकुंभाच्या उभ्या पाइपची गळती काढण्याचे काम जोखमीचे होते. श्री. गोविंद भास्कर परांजपे, ग्रा. पं. उपसरपंच, माधवनगर यांनी स्वतः माफक खर्चात ही गळती बंद केली, ही बाब गौरवास्पद आहे, याबाबत दुमत नाही.'

त्या वर्षीची काकांची एक आठवण अविस्मरणीय आहे. झालं असं. गणेशोत्सवाच्या महाप्रसादासाठी गोडं पाणी उपलब्ध नव्हतं. त्यासाठी ग्रामपंचायतीकडे मागणी करूनही ती पूर्ण होऊ शकली नाही. काकांनी पावसाचं पाणी चार पिंपांत सुरक्षितपणे साठवलं. त्या पाण्यावर हा महाप्रसाद शिजला.

पाच वर्षांचा उपसरपंच पदाचा कालावधी पूर्ण झाल्यावर पाच वर्षं ते ग्रामपंचायतीचे विशेष सदस्य होते. त्यामुळे सार्वजनिक कामातल्या खाचाखोचा त्यांना ज्ञात झाल्या. आजही ते रोज ग्रामपंचायतीत जाऊन लोकांच्या समस्या जाणून घेतात. त्या सोडविण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय, तालुका पंचायत कार्यालय, तहसील कार्यालय, जिल्हा परिषद, समाजकल्याण खातं इथं न कंटाळता खेपा घालतात. रक्तदान मेळावे, ज्येष्ठ नागरिकांवरील अन्यायाला वाचा फोडणं, दिव्यांग, मतिमंद, वृद्ध यांना पेन्शन मिळवून देणं, यात ते सतत व्यस्त असतात.

हे सुरू असताना १९९८मध्ये त्यांनी माधवनगर येथील आरोग्य केंद्रात ज्येष्ठ नागरिक संघाचं काम सुरू केलं. आज ते याचे अध्यक्ष आहेत. काही काळ त्यांनी या संघाचं जिल्हाध्यक्षपदही सांभाळलं. या बाबतीत काकांनी स्वतःवर कडक निर्बंध घालून घेतलेत. ज्येष्ठ नागरिक





संघाची बैठक, अधिवेशन, आंदोलन जिथे असेल तिथे जायचं- सायकलवरून! यासाठी त्यांनी आठ कि.मी.पासून ३५०० कि.मी.पर्यंतचं अंतर कापलंय. गाव, तालुका, जिल्हा, राज्य,हदेश या पातळ्यांवरील कार्यक्रमांना सायकलवरून हजेरी लावली आहे. सायकलच्या फुल आणि हाफ मॅरेथॉन स्पर्धाही त्यांनी पूर्ण केल्या आहेत. अगदी अलीकडची गोष्ट म्हणजे २७ जून, २०१९रोजी मुंबईतील आझाद मैदानावर ज्येष्ठ नागरिक संघाचं 'धरणे आंदोलन ' झालं, त्यासाठी काकांनी सायकलवरून हजेरी लावली होती. विश्वबंधुत्व आणि पर्यावरणरक्षणासाठी माधवनगर ते काठमांडू हे ३५०० किमीचं अंतर त्यांनी दोनदा सायकलवरून पार केलं आहे. सायकल पर्यटन हा त्यांचा छंद आहे. वर्षातून त्यांच्या किमान दोनदा लांब पल्ल्याच्या सायकलसफरी असतातच. त्याची काही उदाहरणं अशी : लखनौ, उज्जैन, गंगोत्री, हैदराबाद, नेपाळ (दोन वेळा), गिरनार (दोन वेळा), कन्याकुमारी (तीन वेळा). दिवसाला सरासरी ७० कि.मी. अंतर ते कापतात. शिवप्रतिष्ठानच्या गडकोट मोहिमांमध्येही त्यांचा सहभाग असतो.

वयाच्या ८१व्या वर्षी काका समाधानाचं, कृतज्ञतेचं जीवन जगत आहेत. तीनही मुलं गावातच स्थायिक झाली. उद्योजक बनली, संपन्नता आली. मुलं, सुना, नातवंडं यांच्यात रमण्याची संधी मिळाली. यामुळे ते कृतकृत्य आहेत. त्यांच्या कष्टांचा, निसर्गसंवर्धनाचा वारसा तीनही मुलं समर्थपणे चालवत आहेत. वृक्षारोपण, वृक्षसंवर्धन, जलसंधारण ही कामं ते हिरिरीनं चालवतात. जाता जाता एक गंमत- नुकत्याच झालेल्या शारीरिक वय निर्देशांकाच्या वैद्यकीय चाचणीत काकांचं वय आलंय ५० वर्षं! काकांना निरोगी दीर्घायु लाभो, ही ईश्वरचरणी प्रार्थना!

लाभले काटक यष्टीचे इनाम, वर्णावेत किती तुमचे आयाम,
थक्क, बोटे तोंडात; पाहुनी तुमचे काम
काका तुम्हाला कडकडीत सलाम!!!

jyotiaphale@gmail.com



परांजपे काकांच्या विविध सायकल सफरींची क्षणचित्रे



# वाचनातून देशसेवा : प्रदीप लोखंडे

- प्राचार्य श्याम भुर्के

वाचक कॉफी कट्ट्याचा कार्यक्रम माझ्या घरी सुरू होता. त्यामध्ये एकाने 'प्रदीप लोखंडे पुणे १३' या पुस्तकाचे रसग्रहण केले. या पुस्तकाच्या नावापासूनच मला उत्सुकता होती. आजही 'प्रदीप लोखंडे पुणे १३' या पत्त्यावर पत्र पाठविले तर ते त्याला मिळते. कोण आहेत हे प्रदीप लोखंडे?



**मुलांमध्ये रमलेले प्रदीप लोखंडे**

हा वाईचा मुलगा. वडील शिपाई म्हणून काम करत होते. हे चार भाऊ. घरची गरिबी होती. प्रदीप अभ्यासात बेताचाच होता. आपणच आपल्या पायावर उभे राहायला पाहिजे या भावनेने प्रदीप पुण्यास आला. मार्केटिंग विषयाचा एक तीन महिन्यांचा अभ्यासक्रम पूर्ण केला. एका आंतरराष्ट्रीय कंपनीत नोकरीस लागला. तिथं अठरा महिने काम केलं. त्या काळात कॉर्पोरेट वर्ल्ड काय आहे हे कळलं. माहितीचा खजिना ज्याच्याकडे असेल तो प्रभावी मार्केटिंग करू शकतो. 'नॉलेज इज पॉवर' याची त्याला प्रकर्षाने जाणीव झाली. भारताचं शक्तिस्थान हे ग्रामीण भाग आहे, हेही त्याच्या ध्यानात आलं. त्याने नोकरी सोडून देऊन ग्रामीण भागातील माहिती जमवायची असे ठरवले.

महाराष्ट्रातील सुमारे तीनशे ग्रामपंचायतींना पोस्टकार्ड्स पाठविली. त्यात त्यानी त्या गावाची माहिती मागवली. आठवडी बाजार केव्हा आणि कुठे भरतो, शाळा कोणत्या आहेत, आरोग्य केंद्र, पोलीस ठाणे, सरकारी कार्यालये, पिके इत्यादी माहिती मागवली. फक्त बारा जणांनी माहिती पाठवली. त्यातही चार जणांनी ही माहिती कशासाठी हवी आहे एवढेच विचारले. प्रदीप निराश झाला नाही. त्यानी हे माहिती संकलन चिकाटीने चालू ठेवले. माहिती जमवत राहणे हे त्याचे ध्येय निश्चित होते. ध्येयनिश्चिती असेल तरच प्रयत्नांचा उपयोग होतो. त्याने आपली चिकाटी सोडली नाही. पोस्टकार्ड या स्वस्तातल्या माध्यमाचा प्रयोगही बंद केला नाही. काही दिवसांतच ग्रामीण भागाची प्रचंड माहिती जमा झाली. ही माहिती मोठमोठ्या कंपन्यांना सल्लागार या नात्याने दिली. कोणत्या गावातील विद्यार्थी दात घासण्यासाठी पेस्ट वापरत नाहीत, ही माहिती कोलगेट कंपनीला मिळाल्यावर त्यांनी त्या शाळांमधून छोट्या नमुना पेस्ट मोफत वाटल्या. पुढे त्या गावातील त्यांची पेस्टची विक्री वाढली. प्रदीप लोखंडे माल विकत नाहीत. ते माहितीच्या आधारावर सल्ला देतात. ग्रामीण भागाचे नुकसान होईल अशा वस्तू विकणाऱ्या कंपन्या ते जवळ करत नाहीत. तंबाकू, दारू याला त्यांचा विरोध आहे. सेवाभावी वृत्तीचा अभाव असणाऱ्या सरकारी विभागाकडेही ते जात नाहीत.

ग्रामीण भागातील तरुणांना त्यांनी हाताशी धरलंय. ते आठवडी बाजारात फिरून माहिती गोळा करतात. एक आठवडी बाजार म्हणजे जवळच्या पंधरा-वीस खेड्यांतील लोकांशी संपर्क असतो. ही माहिती गोळा केली जातीये हेही कोणाला माहिती नसतं. या माहिती साठ्याचा उपयोग राजकीय नेत्यांनीही करून घेतला. माजी मंत्री प्रमोद महाजन यांनी लोकप्रतिनिधींचं काम कसं चाललंय हे जाणून घेतलं होतं. माजी मंत्री शरद पवार यांनी विधान सभेच्या निवडणुकीस कोणाला तिकीट दिले तर ते निवडून यायची शक्यता आहे हे प्रदीपकडून अजमावलं होतं. त्यांचे त्यावर्षी बरेच आमदार निवडून आले. लोकांनी अभिनंदनास गर्दी केली तेव्हा ते म्हणाले, 'माझं अभिनंदन करू नका. तो बाजूला वाईचा पोऱ्या बसलाय त्याचं अभिनंदन करा.'

प्रदीप लोखंडे आर्थिकदृष्ट्या सक्षम झाले. स्वत:चं घर झालं. मर्सिडीज गाडी आली. या यशात समाधान न मानता त्यांनी या ग्रामीण भागाच्या विकासात प्रत्यक्ष काम करायचं ठरवलं. सोशल एंटरप्रिनर होण्याचा निश्चय केला. ग्रामीण भागातील मुलींना ज्ञानी बनवून उद्याच्या भारतासाठी सक्षम बनवायचं ठरविलं. आज त्यांना शाळेतून जे शिक्षण मिळतंय त्यात अजून कोणते ज्ञान आणि कौशल्ये त्यांना प्राप्त व्हायला हवीत याचा विचार केला. त्या विषयातील पुस्तकांची चोखंदळपणे, परिश्रमपूर्वक निवड केली. अशी पुस्तके ते ग्रामीण भागातील शाळेला भेट म्हणून पाठवितात. त्या शाळेतील विद्यार्थिनी या पुस्तकाच्या आधारे वाचनालय सुरू करतात. या वाचनालयाचं नाव आहे Gyan Key वाचनालय (Read + Write + Speak). शाळेतील विद्यार्थिनी वाचनालय चालविण्यास उत्सुक आहेत. तशी त्यांच्याकडून मागणी आहे, हे निश्चित झाल्यावरच त्यांना पुस्तके पाठविली जातात. असं पहिलं वाचनालय पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यातील हिवरे या गावी गुरुदेव नारायण महाराज माध्यमिक शाळेत सुरू झालं आहे. त्या शाळेत वीज नाही. बसायला बाक कमी आहेत. तरीही मुली आवडीने वाचन करत आहेत. तिथे ९६५ पुस्तके दोन लोखंडी कपाटांत ठेवली आहेत. मुलांना एक पुस्तक एक आठवड्यासाठी वाचायला मिळतं. मुलांचं या वाचनालयावर 'आपलं वाचनालय' या भावनेतून प्रेम आहे. मुलं पुस्तकं मनापासून वाचतात. नीट ठेवतात. फाडत नाहीत.

अशा वाचनालयाला प्रदीप लोखंडे यांना देणगीदारही मिळत आहेत. एका वाचनालयाला महाराष्ट्रात ६७००रु. आणि अन्य राज्यात ७६००रु. खर्च येतो. देणगी फक्त धनादेशाद्वारे स्वीकारली जाते. धनादेश पुस्तक विक्रेत्याच्या नावाने काढावा लागतो. पुस्तके मिळाल्यावर शाळेकडून पत्र येते. प्रत्येक पुस्तकात पोस्टकार्ड असते. पुस्तक वाचणाऱ्या विद्यार्थिनीकडून देणगीदाराला पत्र जाते. अमरावती जिल्ह्यातील, तिवसा गावातील प्रतीक्षा घावडे लिहिते, 'मी बोक्या सातबंडे वाचले. आता माझी वाचनाची गोडी वाढली आहे.' एक मुलगी लिहिते, 'मी सुनीता विल्यम्स वाचले. तिच्यासारखी मी जरी अंतराळात जाऊ शकले नाही तरी मी मोठी होणारच अशी माझ्यात जिद्द निर्माण झाली आहे.' दुसरी एक विद्यार्थिनी लिहिते, ''एपीजे अब्दुल कलामांचं 'अग्निपंख' वाचलं. माझी घरची परिस्थिती गरिबीची आहे; पण मीही मोठी कर्तबगार होऊ शकते असा माझ्यात विश्वास निर्माण झाला.'

'श्यामची आई', सुधा मूर्तींची पुस्तकं ही या विद्यार्थिनींना भावत आहेत. एका मुलीने लिहिले, 'सापाबद्दल माहिती देणारं पुस्तक पाठवा.' तिला त्याचं कारण विचारल्यावर म्हणाली, ''माझा नातेवाईक साप चावून मेला. मला सर्वांना जागरूक करायचंय.''

सध्या अशी दोन-तीन वाचनालये ग्रामीण भागात उघडली जात आहेत. महाराष्ट्रात ३९१०, कर्नाटकात ६७, तेलंगणात ७६, आंध्रप्रदेशात ४९, मध्यप्रदेशात २१, तामिळनाडूत १, झारखंडमध्ये १, राजस्थानात १२८ वाचनालये उघडली आहेत. ती कार्यरत आहेत. एखादे वाचनालय नीट चालविले जात नाही कळल्यावर तेथील पुस्तके परत घेतली जातात. १५१७ दिवसात ही सारी वाचनालये उघडली आहेत. या आठ राज्यांत १०,१९,००० लाभधारक वाचक आहेत. आत्तापर्यंत वाचनाने समाधान मिळाल्याचे सांगणारी १.९३ लाख वाचक विद्यार्थ्यांची पोस्टकार्डे प्राप्त झाली आहेत. रोज सरासरी १५० पत्रे प्रदीप लोखंडे यांच्याकडे येतात. पोस्टमनला हा पत्ता पाठ झालाय. म्हणूनच पुस्तकाचं नाव 'प्रदीप लोखंडे, पुणे १३' ठेवलंय.

या वाचनालयातर्फे ४१ ठिकाणी वाचनप्रेरणा दिन कार्यक्रम झाले. शाळांतून स्पर्धा झाल्या. त्यात विद्यार्थी, शिक्षक, प्राचार्य हेही सहभागी झाले. त्यातून २.३८ लाख विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. 'Library by the students, for the students' अशा या उपक्रमाला आजपर्यंत ३.९१ कोटींची ९.४०लाख पुस्तके पुरविली आहेत. या वाचनालयाला साहाय्य म्हणून संगणकसुद्धा पुरवले जात आहेत. आत्तापर्यंत नऊ राज्यांत २०,००० संगणक बसविले आहेत.

हे सारं शक्य आहे याचं कारण ग्रामीण भागातील विद्यार्थिनींचा प्रामाणिकपणा आणि अविरत कष्ट करण्याच्या गुणांवर प्रदीप यांचा विश्वास आहे. ते सातत्याने ग्रामीण भागात फिरत असतात. भारतातील पाच हजार खेड्यांना त्यांनी भेटी दिल्या आहेत. 'आपण आता समाजकार्य करणार' असे जाहीर केल्यावर त्यांची पत्नी आणि कन्या यांनी त्यांना पूर्ण पाठिंबा दिला.

मी त्यांच्या कार्यालयात गेलो तेव्हा सुमारे पाच लाख पत्रांचा संग्रह पाहिला. येणाऱ्या पत्रांतील माहिती आता संगणकाद्वारे भरण्याचे काम त्यांच्या सेवातत्पर महिला कर्मचारी करत होत्या.


जुलै २०१९ मध्ये त्यांनी पुण्यात रिक्षावाल्यांना अधिक सक्षम करण्यासाठी पुस्तके वाटली. पोलीस स्टेशनमधून वाचनालये उघडली. सातारा जिल्ह्यात अधिक वाचनालये काढून त्यास 'पुस्तकांचा जिल्हा' असे नामाभिधान केले.

Books open your mind.
Broadens your mind and
Strengthen you as nothing else can.

संपूर्ण भारत वैभवशाली होणार आहे. ते कार्य ग्रामीण भागातील विद्यार्थिनी करणार आहेत. त्याची तयारी आता संवेदनशील मने असताना वाचनाच्या माध्यमातून  होत आहे. हा विश्वास बाळगून लोखंडे कुटुंब सोन्यासारखं कार्य करतंय. त्यांना शुभेच्छा!!

shyam@izeltech.com

## नवं कोरं




१७२ वर्षं जगभरच्या वाचकांना भुरळ पाडणारी ..
नरमांसभक्षक समजल्या जाणाऱ्या टैपी आणि हप्पार
आदिवासींच्या तावडीत सापडलेल्या
दोन खलाश्यांची रोमहर्षक कहाणी..

# पाचूचे बेट

मूळ लेखक - हर्मन मेलव्हिल
अनुवाद - भानू शिरधनकर
पृष्ठसंख्या : १९२
किंमत : ₹२४०

Book Available



तरुण, उमदा, जिगरबाज बिली बड...
तब्बल पन्नास वर्षांनी पुन्हा मराठी वाचकांच्या भेटीस...

# शिस्तीचा बळी

मूळ लेखक - हर्मन मेलव्हिल
अनुवाद - भानू शिरधनकर
पृष्ठसंख्या : ८०
किंमत : ₹१००

Book Available




तब्बल ५४ वर्षांपूर्वी मराठीत अनुवादित झालेली
'फॉर हूम द बेल टोल्स' अमेरिकन क्लासिक्समधील
विलक्षण युद्धकथा
पुन्हा वाचकांच्या भेटीस...

# घणघणतो घंटानाद

मूळ लेखक - अर्नेस्ट हेमिंग्वे
अनुवाद - दि.बा. मोकाशी
पृष्ठसंख्या : ४७२
किंमत : ₹५५०

Book Available



# अमरगीत

## : बाबा आमटे यांचं जीवनचरित्र

- निशा मीरचंदानी

*समाजकार्य किंवा समाजसेवा हा शब्द उच्चारल्यानंतर अपरिहार्यपणे ओठांवर नाव येतं ते बाबा आमटे यांचं; कारण समाजाकडून ज्या कुष्ठरोग्यांना वाळीत टाकलं गेलं होतं, त्यांना बाबांनी नवजीवन दिलं. त्यासाठी बाबांनी आपलं संपूर्ण जीवन समर्पित केलं. त्यांच्या या समर्पित जीवनाची गाथा 'अमरगीत' या चरित्रातून समोर येते. त्या गाथेतील हा एक महत्त्वपूर्ण अध्याय...*

## आनंदवन

१९५१

राज्य सरकारनं महारोगी सेवा समितीला वरोडा गावापासून तीन किलोमीटरवर असलेली पन्नास एकर खडकाळ जमीन मंजूर केली, तेव्हा बाबांच्या आनंदाला पारावार उरला नाही. या ठिकाणाचं त्यांनी 'आनंदवन' असं नामकरण केलं. ते जेव्हा प्रथम ती जागा बघण्यासाठी गेले, तेव्हा मात्र झाडाझुडपांनी भरलेली, साप आणि विंचूंचा सुळसुळाट असलेली, शत्रुवत भासणारी ती जमीन पाहून ते विमनस्क झाले. तेथून सर्वांत जवळची विहीरसुद्धा दोन किलोमीटरवर होती. बाबा परत जाऊन ताईंना म्हणाले, 'त्या ठिकाणी केवळ दगडधोंडे, झाडाच्या मुळ्या आणि सरपटणाऱ्या वेलींखेरीज आणखी काहीही नसावे, ही गोष्टसुद्धा सूचकच आहे. समाजानं वाळीत टाकलेल्या लोकांसाठी वाळीत टाकण्यात आलेली जमीन. आजपासून हेच आपलं नशीब.'



**आनंदवनातील पहिल्यावहिल्या विहिरीचं पाणी काढताना बाबा आमटे**

आनंदवनात कायमचं निवासाला जाण्यापूर्वी बाबा आणि ताई रोज वरोड्याहून तिकडे ये-जा करीत असत. कालांतराने दोन झोपड्या तिथे उभारण्यात आल्या. एक कुष्ठरोग्यांसाठी आणि दुसरी आमटे कुटुंबीयांसाठी. त्या दिवसांची आठवण काढत ताई म्हणाल्या, 'ही दुसरी झोपडी बांधण्याआधी आम्ही दोघं रोज दोन-तीन किलोमीटर अंतर पायी चालून जात असू. हातात जेवणाचा डबा आणि पाणी घेऊन, मुलांना थोडं अंतर चालवत तर उरलेलं अंतर कडेवर घेऊन आम्ही आनंदवनाच्या जंगलात जाऊन पोहोचत असू. आम्हाला तेव्हा सायकलसुद्धा परवडत नव्हती!'

आनंदवन अगदी बाल्यावस्थेत असताना *'साधना'* या मराठी नियतकालिकाचे पत्रकार यदुनाथ थत्ते यांनी आपल्या आनंदवनाच्या भेटीविषयी अत्यंत उत्साहाने लिहिलं होतं : 'गावाबाहेर जंगलवजा एका जागेत ते राहत होते. एक छोटीशी झोपडी आणि कुष्ठरोगी! जंगलातील सर्व सुखदु:खं तिथे जागी होती. बाबा आणि साधनाताई एखाद्या आरण्यक ऋषीप्रमाणे तिथे राहत होते; पण खरं म्हणजे बाबा स्वप्नातच वावरत होते आणि त्या स्वप्नात साधनाताईही एकरूप झाल्या होत्या. हे स्वप्न झपाटून टाकणारं होतं... साने गुरुजींच्या मनोभूमीत तरळणारी स्वप्नं भूमीवर उतरविण्यासाठी आसुसणारा, बेचैन झालेला माणूस मला दिसला. गुरुजींनी साहित्यात जे रंगविलं; पण भूमीवर उतरविण्याची उसंत त्यांना मिळाली नाही, तेच स्वप्न तिथे धडपडत असलेलं मला दिसलं.'

आपल्या दोन चिमुकल्या बाळांना घेऊन या ओसाड जमिनीवर राहण्यासाठी आलेल्या बाबा आणि ताईंचं आदर्शवादी चित्र आनंदवनासंबंधी लिहिण्यात आलेल्या अनेक लेखांमधून रंगविण्यात आलं आहे. त्या लेखांमध्ये असं म्हटलेलं आहे की, बाबा आणि ताई या दोघांची त्या वेळची अवघी संपत्ती म्हणजे एक लंगडी गाय, एक कुत्रा आणि चौदा रुपये. आता मागे वळून बघताना ही सर्व कथा फारच अद्भुतरम्य वाटते. ताईंनी मात्र आपल्या नेहमीच्या खास व्यवहारी शैलीत मला सांगितलं की, भूक आणि भय या दोन्हीही गोष्टींमध्ये अद्भुतरम्य असं काहीही नसतं. आनंदवनातील सुरुवातीचे दिवस फारच भयावह होते. काही दिवसांतच चित्त्यानं त्यांच्या कुत्र्याला ओढून नेलं. चार खांबांवर गवताचं छप्पर हेच त्यांचं आश्रयस्थान होतं. आजूबाजूला हिंस्र श्वापदांचा मुक्त संचार असे. त्यांच्यापासून संरक्षण करण्यासाठी त्यांच्या झोपडीला भिंतीसुद्धा नव्हत्या.

२००४ सालच्या डिसेंबर महिन्यात मला वरोड्याला एक व्यक्ती भेटली. या व्यक्तीला आनंदवनाच्या सुरुवातीच्या दिवसांचे स्मरण होते. सुमारे अर्ध्या शतकापूर्वी घडलेल्या या सर्व घटना अझीम पटेल नामक प्रेमळ, वयस्क माणसानं अस्खलितपणे मला सांगितल्या : 'मी शिकारीसाठी बाहेर पडलो असताना एक छोटीशी गवताची झोपडी मला दिसली. त्या झोपडीला भिंती वगैरे नव्हत्याच. बाबांनी मला आत बोलावलं. तिथे मला दोन कुष्ठरोगी दिसले. त्यांच्या अंगावर असंख्य उघड्या जखमा, पू भरलेली गळवे होती. ते दृश्य पाहून अक्षरश: शिसारी येत होती. बाबा त्यांची शुश्रूषा करीत होते. साऱ्या जगाने या कुष्ठरोग्यांना वाळीत टाकले होते आणि इथे बाबा, त्यांची तरुण पत्नी आणि तान्ही मुले या भयाण जागी त्यांच्यासमवेत राहत होती! मला हे सगळं माहीत आहे; कारण मी शिकारीसाठी तिथे गेलो होतो.'

आनंदवनाचा एक रहिवासी नारायण बाळा मरसकोल्हे याने तर या काळाचं अगदी चित्रदर्शी वर्णन केलं आहे : 'मी माझ्या भद्रावती गावाहून इथे आलो, त्या वेळी इथे आनंदवनात सहा कुष्ठरोगी येऊन राहिले होते. हे मनोहर दिवाण यांच्या दवाखान्यातील रुग्ण होते. मी इथे येणारा सातवा आणि गणपत आठवा. त्या पहिल्या सहा रुग्णांपैकी कोणीही आज हयात नाही. मी त्या वेळी केवळ पंधरा नाहीतर सोळा वर्षांचा होतो. मला अजून आठवतं – बाबा या शाळेतून त्या शाळेत जाऊन लोकांना कुष्ठरोगाची माहिती सांगत आणि देणग्या जमा करीत. इथे काही निरोगी लोकसुद्धा होते, शांताबाई नर्स होत्या; कारण गावात जाण्यासाठी आम्हाला व्याधिग्रस्त नसलेल्या, निरोगी, धडधाकट लोकांची गरज भासायची. उदाहरणार्थ, कुणाला तरी पिठाच्या गिरणीत जावं लागे. आमचं दळण



**कुष्ठरोग्यांना तपासताना बाबा आमटे**

दळून देण्यास त्या काळी गावातील केवळ एकच गिरणीवाला तयार झाला होता. त्या काळी आम्ही जर कधी गावात गेलो तर कुणी आम्हाला थेंबभर पाणीसुद्धा देत नसे.'


यापुढील कहाणी आठव्या कुष्ठरोग्यानं, गणपतनं पुरी केली : 'आमच्या झोपड्या गळायच्या. खालच्या बाजूनं पाण्याचा लोट आत यायचा. त्यामुळे पावसाळ्याच्या दिवसांत आमच्या बिछान्याखालून जणू नदीच वाहायची. आमच्या सभोवताली बिबट्या वाघ, साप, विंचू आणि रानडुकरांचा संचार असायचा; पण आनंदवनातील जंगली प्राण्यांपेक्षा मला समाजाकडून वाट्याला आलेल्या हेटाळणीची, तिरस्काराची भीती जास्त वाटायची. आमच्यासमोर इतकी संकटं येऊन उभी ठाकली होती; पण तरीही मी तिथेच राहिलो. मी माझ्या गावी कधीच परत गेलो नाही. ताई आणि बाबा आमची काळजी घ्यायचे. आमच्या खांद्याला खांदा लावून काम करायचे. आमच्यावर प्रेम करायचे, आम्हाला आदर दाखवायचे. मी त्या वेळी पंधरा-सोळा वर्षांचा मुलगा होतो. आम्हाला झालेल्या कुष्ठरोगामुळे आमचे स्वत:चे कुटुंबीयसुद्धा आम्हाला इतकी वाईट वागणूक द्यायचे. ताई मात्र स्वत:च्या मुलांना जेवू घालावं तसं आम्हाला प्रेमानं जेवू घालायच्या. बाबा आमच्या सान्निध्यात राहत असल्यामुळे त्यांना समाजाकडून फारच मानहानी पत्करावी लागली. त्यांना समाजानं वाळीत टाकलं. महारोगी सेवा समितीकडे पैसा नव्हता, निधी नव्हता. फार खडतर काळ होता तो. वरोड्याच्या मारवाडी समाजानं बाबांना मदत केली. बाबांच्या वकील मित्रांनीही मदत केली. बाबा आणि ताई यांनी कसा कोण जाणे, पण आम्हा सर्वांचा सांभाळ केला.'

नलिनी वैशंपायन या तेथील अजून एक जुन्या रहिवासी. त्यांनी असं ठासून सांगितलं की, समाजकार्य हे देणग्या किंवा दानधर्मापेक्षाही तळमळीने काम करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या शृंखलेवर अवलंबून असतं. 'सुरुवातीच्या काळात तर अनेकदा असं घडलं. अन्नधान्याचा तुटवडा भासू लागलेला असे आणि निधी नसे,' त्या म्हणाल्या, 'अशा वेळी बाबा सर्वांना जवळ बोलावून घेत आणि या खडतर परिस्थितीचा सामना कसा करायचा, यावषियी सर्वांचं मत विचारीत. मग आम्ही दिवसातून केवळ एकदाच जेवून राहण्याचा निर्णय घ्यायचो – त्याबद्दल कोणालाच काही वाटायचं नाही; कारण हा निर्णय आम्ही सर्वांनी एकमतानं घेतलेला असायचा.'

आनंदवनात जर राहायचं असेल तर विहीर खणल्याशिवाय पर्याय नाही, हे बाबांना कळून चुकलं होतं. जर कायमस्वरूपी पाणीपुरवठ्याची शाश्वती मिळाली असती, तर त्यांना स्वत:च अन्नधान्य पिकवता आलं असतं; स्वयंपूर्ण होता आलं असतं. हा धडा श्रम आश्रमाच्या प्रयोगातून बाबा शिकले होते. आनंदवनाची जमीन खडकाळ होती; पण त्या खडकाखाली नक्की पाणी लागेल असा बाबांना विश्वास होता. केवळ कुदळ, फावडी, टिकाव आणि पहारींच्या साहाय्याने बाबा आणि इतर सहा कुष्ठरोग्यांनी त्या खडकाळ जमिनीत विहीर खोदायला सुरुवात केली.

आनंदवनातील ती पहिलीवहिली विहीर खणताना आलेल्या अनुभवांच्या आठवणीत बाबा अजूनही रमून जातात : 'सहा आठवड्यांनंतर, सुमारे चौतीस फूट खोल खणल्यानंतर खडक जरासा ओलसर लागू लागला. तो मे महिना होता. सावलीतील तापमानसुद्धा सत्तेचाळीस अंश सेल्सिअस होतं. आम्ही खणलेल्या खड्ड्यातील वातावरण अतिशय तप्त होतं. त्यानंतर खालच्या ओलाव्याकडे एक मधमाशी आली. त्या मागोमाग एक फुलपाखरूही आलं. दोन दिवसांनंतर आम्ही सकाळच्या वेळी जेव्हा कामावर हजर झालो तेव्हा खडकांमधोमध थोडं पाणी वर आलं होतं व त्यात एक बेडूक आनंदानं बसला होता. तीन दिवसांनंतर भरपूर पाणी लागलं. आम्ही पांढरी फुलं वाहून, दुधाचा नैवेद्य दाखवून पाण्याची पूजा केली. त्यानंतर राहिलेला दिवसभर आम्ही नुसते आमच्या विहिरीच्या बाजूला बसून आनंदानं त्या पाण्याला निरखून पाहत होतो. आता भविष्यकाळाबद्दल मनात आशा बाळगायला निदान सबळ कारण तरी मिळालं होतं.'

एकोणीसशे एक्कावन्न सालच्या जून महिन्यात आचार्य विनोबा भावे यांनी स्वहस्ते आनंदवनाचं औपचारिक उद्घाटन केलं. या प्रसंगी केलेल्या भाषणात ते म्हणाले, 'आनंदवनातील ही वसाहत पाहून मला अतिशय आनंद होत आहे. या वसाहतीचं 'आनंदवन' हे नाव अगदी यथार्थ आहे. आयुष्यात आपल्या कामाने तुम्ही आनंद निर्माण केला आहे. तुम्ही आपल्या हातातील भिकेच्या कटोरीचा त्याग करून त्याऐवजी प्रामाणिक कष्टांचा अंगीकार केला आहे, कष्टातील अंगभूत पावित्र्याचा तुम्हाला



**विनोबा भावे यांच्यासह बाबा आणि अन्य**



**बाबा आणि साधनाताई**

साक्षात्कार झाला आहे. ही काही कुष्ठरोग्यांची वसाहत नाही, कुष्ठरोग्यांचं धाम किंवा वस्ती नाही. इथे सेवाव्रताचं नवं रामायण लिहिण्यात येत आहे. आपण जे जुने धर्मग्रंथ वाचतो, त्याहून हे नवं महाकाव्य काही कमी प्रेरणादायी नसेल.'

१९५३ साली, म्हणजे केवळ दोन वर्षांत आनंदवनातील रुग्णांची संख्या सहावरून साठांवर जाऊन पोहोचली होती. सर्वांनी मिळून पिकांची लागवड करण्यासाठी जमीन साफ केली होती. कुष्ठरोग्यांच्या समोर इतकी मोठी शारीरिक आव्हानं उभी असूनसुद्धा त्यांनी सहा विहिरी खणल्या होत्या! परंतु, अजूनही स्वयंपूर्ण होण्याच्या त्यांच्या मार्गात एक भला मोठा अडथळा होता. आनंदवनात पिकविलेल्या भाज्या बाजारपेठेत जाऊन विकण्याची बाबांची इच्छा होती खरी; पण त्या भाज्या विकत घेण्यास कोणीच तयार नव्हत. कुष्ठरोग्यांनी पिकविलेल्या भाज्यांना स्पर्श केल्यावर आपल्यालाही त्या रोगाचा संसर्ग होईल, अशी भीती लोकांना वाटायची.

बाबांवर ओढवलेल्या या संकटाची बातमी गांधीजींच्या सेवाग्राम आश्रमात जाऊन पोहोचली. त्या वेळी तेथे सर्व्हिस सिव्हिल इंटरनॅशनल (SCI) नामक एक स्वयंसेवकाचा गट काम करीत होता. यात सदतीस देशांमधून आलेले पन्नास स्वयंसेवक होते. त्यांनी आपण होऊन बाबांना मदत करण्याची इच्छा प्रदर्शित केली. ते सर्वजण तीन महिने आनंदवनात येऊन राहिले व त्यांनी येथे एक दवाखाना व हॉस्पिटल बांधलं. हे विविध राष्ट्रांमधून आलेले स्वयंसेवक आनंदवनात येऊन राहिले आहेत, तेथील कुष्ठरोग्यांशी मोकळेपणे मिळून-मिसळून, मनात कोणताही पूर्वग्रह न बाळगता राहत आहेत हे पाहून वरोड्याचे स्थानिक रहिवासी थक्क झाले. हे अजब दृश्य स्वत:च्या डोळ्यांनी पाहण्यासाठी ते आनंदवनाच्या भेटीला आले. तेथील सुंदर आणि स्वच्छ वसाहत त्यांनी मनात कल्पिलेल्या कुष्ठरोग्यांच्या वसाहतीपेक्षा फारच वेगळी होती. त्यानंतर काही दिवसांतच वरोड्याच्या बाजारात आनंदवनात पिकलेली फळे व भाजीपाल्याची विक्री जोरात सुरू झाली. आनंदवनाच्या आणि बाबांच्या दृष्टीने हा फारच मोठा विजयाचा क्षण होता.

या शिबिरात भाग घेणारा एक स्वयंसेवक आल्फ्रेड क्नाऊस हा या अनुभवाविषयी बोलताना म्हणाला, '...आम्ही एकोणीससशे चोपन्न सालच्या जानेवारी महिन्यात कुष्ठरोग्यांच्या पुनर्वसनासाठी एक केंद्र उभारण्याच्या निमित्ताने वरोड्याला आलो. या केंद्राचं नाव होतं 'आनंदवन' व हे बाबा आमटे यांनी सुरू केलं होतं. आम्ही आलो तेव्हा आमच्या मनात संमिश्र भावना होत्या. त्या काळी आनंदवन म्हणजे नुसती झाडंझुडपं, खडकाळ जमीन, जंगल आणि काही थोड्या झोपड्या, त्यात राहणारे बाबा आमटे यांचं कुटुंब, एक डॉक्टर आणि थोडेसे रुग्ण एवढंच होतं. एक कुजक्या, सडक्या पाण्याची विहीर होती. त्यातून होणारा पाणीपुरवठाही अल्पच होता. ह्या एवढ्या संकटांचा सामना करीत, वरोडा गावातील गावकऱ्यांचा थोडासुद्धा पाठिंबा नसताना, कुष्ठधाम बांधायचं तरी कसं? ह्या बाबांना वेड तर नाही ना लागलं – असं आमच्यातील काही स्वयंसेवकांना वाटलं; पण आमच्या शिबिरासाठी तेथे फार उत्तम पूर्वतयारी करण्यात आली होती. आम्ही अत्यंत साध्या, बांबूपासून बनविलेल्या झोपड्यांमध्ये राहत होतो. कामाच्या जागेवरही अतिशय उत्तम व्यवस्था होती. हे सर्व केवळ बाबा आमटे यांच्या व्यक्तिमत्त्वामुळेच साध्य झालेलं होतं, यात तर शंकाच नव्हती. बाबा आमटे यांचं व्यक्तिमत्त्व म्हणजे चैतन्याचा झरा, व्यवहारज्ञान आणि शिस्त यांचा संगम. केवळ तीन महिन्यांत आमच्या गटानं तेथील रुग्णांच्या मदतीने विटांची चार व्यवस्थित बांधलेली घरं उभारली. दवाखाना व कर्मचाऱ्यांचे आणि रुग्णांचे निवासस्थान अशा कामांसाठी त्यांचा वापर होणार होता.

आपलं हे शिबिर संपून आपण परत गेल्यानंतर आनंदवनाचं कामकाज पुढे कसं काय व्यवस्थित चालणार, याविषयी क्नाऊसला खात्री नव्हती. यानंतर सुमारे दहा वर्षांनी तो जेव्हा परत आनंदवनाच्या भेटीला आला, तेव्हा तेथील प्रचंड बदल पाहून त्याच्यावर थक्क होण्याची वेळ आली. त्यापूर्वी सेवाग्रामच्या भेटीसाठी गेलो आणि तेथे निराशाच पदरी आली. (गांधीजींचं ते विधायक चैतन्य आता कुठे बरं हरवलं होतं?) त्या पार्श्वभूमीवर आनंदवनात आल्यावर मात्र अपेक्षेपेक्षा खूप काही जास्त पाहायला मिळालं, असं क्नाऊसनं लिहिलंय. 'ही काही रुग्णांसाठी बांधण्यात आलेली कोंडाळी नव्हती. येथे कुष्ठरोगी आपापल्या खाटेवर सडत पडले नव्हते.' त्याऐवजी क्नाऊसला आनंदवन हे इस्रायली किबुत्झ (ज्यूंची शेतकी वसाहत)सारखे भासले. आनंदवनात सर्वत्र, तेथील प्रत्येक रुग्णांच्या ठायी बाबांचे चैतन्य दिसून येत होते. क्नाऊसने

समारोप करताना म्हटले आहे, ‘आनंदवनानेच हे सिद्ध केलं आहे की, कुणीही व्यक्ती रोगी व अकार्यक्षम नसते. प्रत्येकाला समाजात स्वत:ची जागा असते व प्रत्येकजण आपल्या कामाचा वाटा उचलू शकतो; पण बाबा आमटे यांच्या मते आपल्या समाजात एका रोगाचा प्रादुर्भाव झालेला आहे, तो म्हणजे मानसिक कुष्ठरोगाचा व त्याचा सामना आपल्याला केला पाहिजे.’

या मानसिक कुष्ठरोगाचे स्पष्टीकरण बाबांनी असे दिले : ‘कुष्ठरोगाची बाह्य लक्षणं म्हणजे त्वचेवरील रंगहीन चट्टे आणि त्वचेवरील संवेदनांची जाणीव नाहीशी होणे. त्यानंतर कालांतराने तेथील मज्जातंतू जाड होतात. आपल्या तथाकथित समाजातसुद्धा आपल्याला कितीतरी अन्याय, गरिबीच आढळते; पण तरीही आपलं मन द्रवत नाही. आपली संवेदनक्षमताच लोप पावलेली असते. भावना बधीर झालेल्या असतात. आपल्या मनाला जणू कोणी भूल दिलेली असते. आपलं मन इतकं मंद आणि हृदय इतकं भावनाशून्य झालेलं असतं, एखाद्या पाणघोड्यासारखं निबर. हाच मानसिक कुष्ठरोग.’ त्यानंतर ते पुढं विषादानं म्हणाले, ‘एक गोष्ट मला कळून चुकली आहे – शारीरिक कुष्ठरोग व्यवस्थित बरा होऊ शकतो; पण हा मानसिक कुष्ठरोग मात्र नाही बरा होऊ शकत.’ वरोडा गावातील गावकऱ्यांच्या मनातील हा कुष्ठरोग थोड्याफार प्रमाणात दूर करण्याचं काम या एस.सी.आय. शिबिराच्या कार्यकर्त्यांनी केलं. कुष्ठरोग्यांच्या वसाहतीत येऊन, त्यांच्याशी मिळूनमिसळून राहिल्याने कोणाला कुष्ठरोग होत नाही, हेच त्यांनी सिद्ध करून दाखवलं.

एकोणीसशे पन्नास-पंचावन्नच्या सुमारास ग्रीसच्या ऑर्थोडॉक्स चर्चच्या सदस्या मदर गॅव्हरीलीया (ॲव्हरीलीया पॅपियानी) – यांना सर्वजण सिस्टर लीला म्हणत – आनंदवनात राहण्यासाठी आल्या. त्या येथे कोणत्या परिस्थितीत आल्या, त्याची पार्श्वभूमी त्यांनी लिहिली आहे : ‘ट्रेनने कित्येक तास प्रवास केल्यानंतर मी आधीच थकलेली होते. तशात रात्रीच्या त्या थंडीत पुढचा प्रवास बैलगाडीने. हा प्रवास करून मी बाबा आमटे यांच्या त्या तात्पुरत्या उभारलेल्या झोपडीवजा घरात प्रवेश केला. मात्र, माझा शिणवटा कुठल्या कुठे पळून गेला. त्या साध्यासुध्या, घरगुती, उबदार वातावरणात माझ्या चित्तवृत्ती प्रफुल्लित झाल्या. तिथे कोणी पुढे होऊन नमस्कार केला नाही की पाश्चात्त्य देशांप्रमाणे हस्तांदोलन करून औपचारिक स्वागतही केले नाही; पण मला पाहताच बाबा आमटे उठून पुढे आले. त्यांच्या चेहऱ्यावरचं ते प्रेमळ हास्य, ती आपुलकी माझ्या हृदयाला स्पर्श करून गेली. दुसऱ्या कोणत्याही स्वागतापेक्षा ती भावना खूप काही बोलून गेली. सर्व वेळ सौ. आमटे आपल्या पतीच्या मागे शांतपणे उभ्या होत्या. त्यांच्या कडेवर एक बाळ होतं. ते बाळ त्यांचं स्वत:चं नव्हतंच. त्या वस्तीतील एका गरीब कुष्ठरोगी स्त्रीचं होतं ते. हे उभयता पती-पत्नी आपल्या स्वत:च्या मुलांबरोबरच त्याचा स्वत:च्या घरी सांभाळ करीत होते. त्याला कुष्ठरोगाची बाधा होऊ नये म्हणून जपत होते. रात्रीची वेळ होती. त्यांची स्वत:ची दोन मुलं झोपली होती.

सिस्टर लीला तेथे आल्या, त्याच वेळी नेमकी बाबांना मदतीची फार गरज होती. त्या एक निष्णात फिजिओथेरपिस्ट होत्या. (फिजिओथेरपिस्ट – मर्दन, शेक, व्यायाम, इत्यादी उपचारपद्धतींचा रोग बरा करण्यासाठी अवलंब करणाऱ्या तज्ज्ञ.) त्यांच्या मनात इतकी प्रगल्भ श्रद्धा होती की, त्यामुळे त्यांना कुष्ठरोगाचं भय मुळीसुद्धा वाटत नसे. त्यांच्या मते, ‘बाबा आणि त्यांच्या मदतनिसांमध्ये हे कार्य करण्यासाठी आवश्यक असणारे सर्व गुण होते : धैर्य, श्रद्धा, सबुरी. रुग्णांनी आपण होऊन मदतीसाठी केलेली धडपड आणि स्नेही मंडळींनी उदार हस्ते दिलेल्या देणग्या यांच्या साहाय्याने हे काम पुढं चालू ठेवणं शक्य झालं होतं. आनंदवन हे काही केवळ कुष्ठरोग्यांना ठेवण्यासाठी बांधण्यात आलेलं रुग्णालय नव्हे, कुष्ठरोग हा केवळ माणसाच्या शरीरालाच होतो असं नव्हे, तर तो माणसाच्या मनावर आणि आत्म्यावर घाला घालतो. त्यांना जखमी करतो. इथे कुष्ठरोग्यांच्या शरीराबरोबर त्यांच्या मनावर, आत्म्यावरही उपचार करण्यात येतात. समाजाने या रुग्णांना वाळीत टाकलेलं असतं, त्यामुळे त्यांच्या नशिबी एकांतवास येतो. त्यातूनच आत्यंतिक निराशा त्यांना वाटू लागते...’

सिस्टर लीला यांनी आनंदवनात जे काही काम हाती घेतलं होतं, त्याविषयीचा त्यांचा दृष्टिकोन इतर मिशनऱ्यांपेक्षा फारच वेगळा होता. त्यांनी या गोष्टीचं स्पष्टीकरण अशा पद्धतीनं केलं : आपण जेव्हा म्हणतो, ‘मी कुष्ठरोग्यांना मदत करणार आहे,’ तेव्हा आपण खरं तर स्वत:ची फसवणूक करीत असतो. उदाहरणार्थ, आपल्याकडे एक बावीस वर्षांची मुलगी येते. तिचा हात रोगामुळे सडलेला असतो. (त्याला गँगरीन झालेले असते.) तो सडलेला भाग जर तुम्हाला कात्रीनं कापून काढावा लागला, तर कोणी कोणाला मदत केली? धडधडत्या हृदयानं, कापऱ्या हातानं ते काम करणाऱ्या मी त्या गरीब मुलीला मदत केली, असं म्हणायचं? का ‘देवाचीच ही इच्छा आहे, तेव्हा खुशाल कापा,’ असं मलाच धीर देत म्हणणाऱ्या त्या मुलीनं मला मदत केली? या क्षणी नक्की कोण कोणाच्या मदतीला धावून आलं?’

सिस्टर लीला यांनी आपल्या घरी लिहिलेल्या पत्रांमधून आनंदवनातील सुरुवातीच्या खडतर काळाचं वर्णन केलं आहे :

‘मी इथे रुग्णांची भाषा बोलू शकत नाही; पण त्यांना त्याचं काही वाटत नसावं. त्याचं कारण असं की, मी त्यांना स्पर्श करते. आपल्या जातीमुळे आणि या रोगामुळे समाजात अस्पृश्य ठरलेल्या या लोकांना मी स्पर्श करते. रात्रीच्या वेळी जेव्हा मी बायबल वाचीत असते, तेव्हा साप, विंचू आणि उंदीर येतात. मग मला वाचन थांबवून त्यांना बाहेर घालवावं लागतं... मी पहाटे पाचला उठते आणि बरोबर सहा वाजता माझ्या खोलीबाहेर पडते. उगवत्या सूर्याचं स्वागत करण्यासाठी! मी लिंबूपाणी पिऊन एक केळं खाते. त्यानंतर कुष्ठरोग्यांच्या जखमांची मलमपट्टी आणि त्यांना मसाज करणं... पेट्रोलियम जेलीच्या मलमाचा या जखमांवर केवढा उपयोग होतो! मला खरोखर या गोष्टीचं नवल वाटतं... त्यानंतर विहिरीवर जाऊन कपडे धुण्यासाठी पाणी शेंदावं लागतं. दुपारी मी जेवते. तीन वाजेपर्यंत शांतपणे मनन, चिंतन, ध्यानधारणा. त्यानंतर त्या दोघा लहान मुलांना इंग्लिश शिकवायचं. (चोवीस तासांत फक्त याच वेळी मी बोलण्यासाठी तोंड उघडते.) मग दोन तास डेअरीमध्ये जाऊन शांतपणे काम करायचं. सूर्यास्ताचा काळ ईश्वराच्या सान्निध्यात घालवायचा. ...मग थोड्या वेळानं चंद्रोदय होतो. मी आपली इथे अजून उभीच असते. त्यानंतर स्वत:च्या खोलीत परत येते. रात्रीचं हलकं जेवण आणि बायबलचं वाचन. साडेआठ ते साडेनऊ परत ध्यान-चिंतन आणि साडेनऊला झोपायचं. कागद संपलाय. थोडा पाठवून द्या.’



**लोकबिरादरी प्रकल्पाच्या रुग्णालयात तरुण प्रकाश एका माडिया गोंड रुग्णाला तपासताना**



**बाबा आणि सेबॅस्टियन, जुने स्नेही ऑर्थर तार्नोवस्की यांचा मुलगा**



**बाबा आमटे आणि हिज होलीनेस दलाई लामा आनंदवनात**

ज्येष्ठ पत्रकार आचार्य अत्रे यांनी आपल्या *'दैनिक मराठा'* नामक स्थानिक वृत्तपत्रातून एकोणीसशे साठ साली लिहिलेल्या संपादकीयामधून आनंदवनाच्या या प्रयोगाबद्दल प्रशंसोद्गार काढले होते.

''महारोग्यांना वैद्यकीय उपचार करून किंवा त्यांना बरे करून त्यांची समस्या सुटत नाही, ही गोष्ट महर्षी आमटे यांनी ओळखली. अशा रोग्यांना स्वावलंबनाचे आणि आत्मविश्वासाचे नवे जीवन दिले तरच त्यांना सुखाने शेवटपर्यंत आपले जीवन कंठता येईल, ह्या दृष्टीने महर्षी आमटे यांनी हे 'आनंदवन' काढले. ह्या संस्थेतले रहिवासी 'महारोगी' आहेत ही भावनाच त्यांनी ह्या वातावरणातून अजिबात खुडून टाकली आहे... एखाद्या शेतकी कॉलेजात शेतीविषयक जे प्रयोग कोणी करीत नाही ते आज या वसाहतीमध्ये महारोग्यांच्या हातून म. आमटे करून घेत आहेत, असे आम्ही सांगितले तर ऐकणारे थक्क होतील... ह्या शेतीतून निर्माण न होणारी अशी एकही गोष्ट नसेल. कोथिंबिरीपासून तो उसापर्यंत सर्व पालेभाज्या आणि अन्नधान्ये तेथे निर्माण होतात आणि तीदेखील असामान्य प्रकारची... वांगी, दुधीभोपळ्याच्या आकाराची आणि मिरच्या एक एक मुठीच्या आकाराच्या आम्ही डोळ्यांनी पाहिल्या... सगळ्यांत आम्हाला आश्चर्य वाटले, गुलाबाच्या एका लहानशा रोपट्याचे. एका रोपट्याला सातशे गुलाबाची फुले. म्हणजे पाने जवळ जवळ नाहीतच... अमेरिकेतील काही डॉक्टर्स आणि नर्सेस 'आनंदवना'त येऊन काही वर्षे राहावयास आणि वैद्यकीय उपचार करण्यास तयार होते. त्यांनादेखील केंद्र सरकारने परवानगी दिली नाही. देशोदेशींचे अनेक अधिकारी लोक भारतात आल्यावर प्रथम 'ताजमहाल' पाहतात आणि नंतर वरोड्यात येऊन 'आनंदवन' पाहतात, ही कदाचित कोणाला दंतकथा वाटेल; पण त्यात अतिशयोक्तीचा लवलेश नाही... महर्षी आमटे विलक्षण सामर्थ्याचा आणि योग्यतेचा महापुरुष आहे आणि त्यांचे 'आनंदवन' म्हणजे मानवतेचे महन्मंगल तीर्थक्षेत्र आहे!''

बाबा एकदा म्हणाले होते, 'सर्व चराचरांशी तादात्म्य पावण्याची साधुसंतांची इच्छा असते. या कुष्ठरोग्यांच्या निकट सान्निध्यात मी आयुष्य घालवतो आहे. त्यांच्या आत्म्याच्या कणाकणांच्या स्पंदनांशी मी एकरूप झालो आहे. साधी मुळं आपल्या अंगच्या अपार शक्तीनं पर्वतप्राय खडकसुद्धा भेदू शकतात, हे तुम्हाला माहीत आहे? ही मुळे गुहासुद्धा खोदू शकतात. त्याच प्रकारे मानवी हातांनी आनंदवन उभारलं आहे, यावर तुमचा विश्वास बसेल? बोटं नसलेल्या जखमांच्या व्रणांनी भरलेल्या हातांनी खडकाचा भेद करणाऱ्या मुळांसारखेच आहेत हे हात!'

आचार्य विनोबा भावे या आपल्या गुरुंना उद्देशून बाबांनी एक कविता लिहिली आहे. आनंदवनात घडून आलेल्या या क्रांतीबद्दल त्यांनी त्यात म्हटलं आहे :

*तूच एकदा म्हणालास,*
*'प्रश्नांसोबत जगू नकोस*
*उत्तर शोधत जगता आलं पाहिजे.'*
*माझे प्रश्न राहू देत असेच अनुत्तरित*
*माझी उत्तरं मीच शोधून काढलीत.*
*आनंदवनच्या श्रमनगरीत*
*पाचशे रुग्णांचा सहस्त्रकर समूह*
*समृद्धीचा गोवर्धन उचलू शकला*
*तसा तो खेड्यापाड्यांत कसा उचलला जाईल*
*या प्रश्नाच्या प्रदीर्घ चिंतनातून उत्स्फूर्त झालेले एक समाधान*
*मी तुमच्यापुढे मांडत आहे.*

कुष्ठरोग्यांसाठी काम करणारे बाबा आमटे हे भारतातील किंवा महाराष्ट्रातील पहिले नव्हेत. महात्मा गांधींकडून प्रेरणा घेऊन एकोणीसशे चाळीस-बेचाळीसच्या सुमारास मनोहर दिवाण यांनी महाराष्ट्रातील दत्तपूर येथे कुष्ठरोग्यांसाठी दवाखाना चालू केला होता. ते कुष्ठ रुग्णांसाठी काम करणारे महाराष्ट्रातील पहिलेच होते. (याआधी हे काम फक्त काही मिशनऱ्यांनी सुरू केले होते.) बाबांनी स्वत: दत्तपूरच्या दवाखान्यात प्रशिक्षण घेतलं. इतकंच नव्हे, तर सुरुवातीच्या काळात बाबांकडे येऊन



**विकास, बाबा आणि साधनाताई (उभे), प्रकाश आणि रेणुका (बसलेले), हेमलकसा लोकबिरादरी प्रकल्पात बांधलेल्या पहिल्या झोपडीच्या बाहेर.**



**पहिल्या 'भारत जोडो' सायकल अभियानाच्या वेळी (डावीकडून) बाबांचे जावई विलास मनोहर, बाबा आणि साधनाताई**

राहिलेले रुग्णसुद्धा डॉ. दिवाण यांच्या दवाखान्यातीलच होते. मध्य भारतातील आणखी एक दवाखाना शिवाजीराव पटवर्धनांनी अमरावतीजवळ तपोवन येथे सुरू केला. सरकारनं जनतेच्या स्वास्थ्याशी व आरोग्याशी निगडित असणाऱ्या प्रश्नांची जबाबदारी घेतली पाहिजे, असा शिवाजीराव पटवर्धनांनी यांचा आग्रह होता. त्यामुळे त्यांनी शासनाच्या यंत्रणेतच राहण्याचा आणि कितीही निराशा पदरी आली तरी हार न मानता काम करण्याचा निर्णय घेतला होता.

आनंदवनाची तुलना दत्तपूर आणि तपोवनाशी करणं कठीण आहे. एक काळ असाही होता की, या तीनही संस्था एकाच छत्राखाली काम करण्याचा प्रयत्न करीत होत्या. परंतु त्यांचे नेतेपण सांभाळणाऱ्या व्यक्तींची कार्यपद्धती आणि त्या ज्या ठिकाणी काम करीत होत्या तेथील सामाजिक संस्कृती भिन्न असल्याने ते साध्य होऊ शकले नाही. कुष्ठरोग्यांकडे व त्यांच्या उपचार पद्धतींकडे पाहण्याचे दृष्टिकोनही भिन्न होते. त्यांच्यापैकी प्रत्येकाच्या डोळ्यांसमोर एक वेगळे ध्येय होते. त्यामुळेच त्यांनी परस्परांशी किंवा सरकारतर्फे कुष्ठरोग्यांसाठी चालविण्यात येणाऱ्या उपक्रमांशी कधीही स्पर्धा केली नाही.

मॅथ्यू आणि माने यांनी *'बाबा आमटे – अ जर्नी फ्रॉम सिम्पथी टू एम्पथी'* या आपल्या पुस्तकात म्हटलं आहे : 'कुष्ठरोगाच्या क्षेत्रात बाबांनी जी काही वैद्यकीय कामगिरी करून दाखवली आहे, ती कोणीच कमी लेखू शकणार नाही. त्या वेळीसुद्धा ते स्वत: लाकडं फोडत होते. विहिरीमधून पाणी शेंदत होते, झोपड्या बांधत होते, शेत नांगरत होते आणि इतर अनेक गोष्टी करीत होते. बाबांनी कुष्ठरोगासाठी सर्व्हे घेतले, प्रतिबंधक उपायांची योजना केली, कुष्ठरोग्यांवर स्वत: उपचार केले आणि रोग्यांच्या पुनर्वसनाचे कामसुद्धा हाती घेतले. त्यांच्या या कार्याबद्दल खरं तर जगभरातील तज्ज्ञांनी त्यांची वाहवा केली असती; कारण त्यांना वैद्यकीय शिक्षणाची किंवा सामाजिक आरोग्याच्या क्षेत्रात काम करण्याची कोणतीही पार्श्वभूमी नव्हती. ते स्वत: व्यवसायानं वकील असूनही त्यांनी सुमारे एक लाख कुष्ठरोग्यांवर उपचार केले होते. कोणीही डॉक्टर या रोग्यांना हात लावायला तयार नव्हता, अशा वेळी बाबा हे कार्य करीत होते.'

वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशन (WHO) आणि धोरणात्मक निर्णय घेणाऱ्या इतर जागतिक वर्तुळात जेव्हा तज्ज्ञ लोक वादविवाद आणि चर्चा करण्यात, योजनांचे आराखडे आखण्यात गर्क होते, तेव्हा इकडे बाबांनी मात्र कुष्ठरोग्यांवर उपचार करून त्यांचं पुनर्वसन करण्याचा स्वत:चा अनोखा मार्ग शोधून काढला होता. त्यांनी असं करीत असताना विज्ञानाचा आधार तर घेतलाच होता; पण या रोग्याचे सामाजिक व मानवतावादी पैलूसुद्धा विचारात घेतले होते. कोणत्याही रोग्याला त्याचा गमावलेला आत्मसन्मान परत मिळवून देण्याच्या मुद्द्यावर बाबांनी आपलं लक्ष केंद्रित केलं होतं. एकीकडे मिशनरी व इतर काही कनवाळू सामाजिक कार्यकर्ते कुष्ठरोगानं ग्रासलेल्या रुग्णांना झोपवून ठेवत होते, विश्रांती घ्यायला लावीत होते, त्या वेळी बाबा त्यांना काम करण्यास प्रोत्साहन देत होते. बाबांच्या या धोरणाचे सकारात्मक परिणाम लवकरच दिसू लागले. एकीकडे टीकाकारांनी 'गरीब बिचाऱ्या कुष्ठरोग्यांना कामाला जुंपणारा जुलमी हुकूमशहा' असं बाबांचं चित्र रंगवायला सुरुवात केली होती. पण बाबांनी मात्र त्या सर्वांकडे साफ दुर्लक्ष केलं. रोग्यांना कामाला जुंपणं हा बाबांचा हेतू कधीच नव्हता; परंतु स्वत:च्या अंगच्या क्षमतेविषयीचा अभिमान त्यांच्या मनात जागृत करणं हा हेतू मात्र निश्चित होता. ते आपल्या रोग्यांना म्हणत, 'तुमची जर सात बोटं झडून गेली असतील, तर जी तीन राहिली आहेत, त्यांचा विचार करा!'

'कुष्ठरोगासारख्या एखाद्या रोगामुळे ज्या काही समस्या उत्पन्न होतात, त्या सर्वच्या सर्व समस्यांचं उत्तर रोग्यांना सक्षम बनवणं हे आहे. त्यांच्यावर दया करून त्यांना दानधर्म करणं हे नव्हे,' असं बाबा लिहितात, 'माझा अनुभव तर असा आहे – आनंदवन ही नव्या माणसाला निर्माण करण्याची प्रयोगशाळा आहे. कामामुळे निर्मिती होते. दानधर्म आणि दया दाखविल्याने ऱ्हास होतो, असं ध्येयवाक्य आम्ही ठरवलं होतं. उत्पादक परिश्रमामध्ये जे पावित्र्य आहे, जो देवत्वाचा वास आहे, तो आम्ही जाणला होता. शेतात केलेले परिश्रम, मागावरील विणकाम, दूध डेअरी आणि यंत्रशाळेत केलेल्या परिश्रमाचे दृश्य परिणाम मी जेव्हा डोळ्यांनी पाहायचो, तेव्हा माझ्या मनात दोन अधिक दोन याची बेरीज चारांपेक्षा कितीतरी जास्त होत असे. ज्या हातांना भिक्षेची कटोरीसुद्धा पकडता येणार नाही, त्या हातांनी जे आश्चर्यजनक उत्पादन करून दाखवलं व



**बाबा आणि विकास (१९७०),**
**विकासने आनंदवनाची सूत्रे स्वीकारल्यानंतर.**

तेही या माळरानासारख्या जमिनीतून, ते साऱ्या जगानं पाहिलं. आनंदवनात या पददलितांचं मैत्रीपूर्ण सहजीवन सुरू झालं.' बाबांच्या मते आनंदवन हे काही केवळ कुष्ठरोगावर उपचार करणारं केंद्र नव्हतं. माणसाला माणूस म्हणून जगायला शिकवणारं केंद्र होतं ते. त्याबरोबर ते कुष्ठरोगावर उपचार करणारं केंद्रसुद्धा होतं, ही गोष्ट वेगळी.

आनंदवनातील कुष्ठरोगी सेवा आणि काम तर करू शकतातच, पण त्यांची आयुष्यात भरभराटसुद्धा होणार आहे व त्यांना सुखासमाधानाचा लाभ होणार आहे, अशी बाबांची पक्की धारणा होती. पण हे घडून यायचं असेल तर आनंदवनामध्ये चैतन्यानं रसरसलेलं सामाजिक, सांस्कृतिक जीवन असणं आणि बाह्यजगाशी हे आतील जग सतत संपर्कात असणं, नवनवीन कल्पनांची या दोन जगांमध्ये देवाणघेवाण होणं अत्यंत गरजेचं होतं. त्यामुळेच इ.स. १९६१ साली आनंदवन बाह्य जगापासून अजून जरासं अलिप्त असतानाच बाबांनी एका वार्षिक मित्रमेळाव्याचं आयोजन करण्याचा घाट घातला. प्रगत विचारांची बुद्धिवादी माणसं, संगीतकार, वादक, कलाकार, विचारवंत, राजकीय वर्तुळातील व्यक्ती, सामाजिक कार्यकर्ते, सरकारी अधिकारी आणि विद्यार्थी – राज्यातून आणि संपूर्ण भारतातून विविध क्षेत्रांतून असंख्य लोक दरवर्षी या सांस्कृतिक महोत्सवासाठी आनंदवनात येण्यास सुरुवात झाली. या महोत्सवात वृक्षारोपण, सामुदायिक विवाह, व्याख्याने, मैत्रीपूर्ण मेळावे आणि चर्चासत्रे यांचा समावेश असे. ख्यातनाम मराठी साहित्यिक कै. पु. ल. देशपांडे यांनी एकदा असे उद्गार काढले होते, 'सर्वसाधारणपणे लोक कुष्ठरोग्यांकडे बघण्याचं टाळतात; पण इथे बाबा तर त्या रोग्यांना सर्वांच्या डोळ्यांसमोर व्यासपीठावरच आणतात.' ज्या काळी कुष्ठरोग हा संसर्गजन्य रोग आहे, अशी लोकांच्या मनात भीती होती आणि कुष्ठरोग्यांच्या संपूर्ण वसाहतींना समाज वाळीत टाकत असे, अशा काळात हा मित्र मेळावा हे तर कुष्ठरोगविषयक जनजागरणाचे उपक्रमातील एक महत्त्वपूर्ण पाऊल होते. ख्यातनाम गायक कुमार गंधर्व यांनी आनंदवनात येऊन गाण्याचा कार्यक्रम सादर करावा, अशी बाबांची तीव्र इच्छा होती. त्यांचं हे स्वप्न पूर्ण झालं : डॉ. श्रीराम लागू, पु. ल. देशपांडे, कुमार गंधर्व आणि अलीकडच्या काळात नाना पाटेकर अशा कलावंतांनी मित्रमेळाव्यांना उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढविली आहे.

जगातील नामांकित मानवतावादी व्यक्तिमत्त्वे म्हणजे अल्बर्ट श्वाईट्झर आणि फादर डेमियन. बाबांना त्यांच्याविषयी आदर नक्कीच वाटतो; पण त्यांना ते महात्मे किंवा संत वाटतात. सामाजिक कार्यकर्ते नव्हे. बाबा म्हणाले, 'ते दयाबुद्धीने प्रेरित होऊन कार्य करतात,' बाबा म्हणाले. त्या उलट आपल्या मनात कुष्ठरोग्यांविषयी दयाबुद्धी नाही. असं बाबांचं म्हणणं आहे. जी क्षते, ज्या जखमा बऱ्या होऊ शकत नाहीत, त्यांच्याविषयी दु:ख करीत इस्पितळाच्या खाटेवर पडून राहण्याऐवजी आपल्या रुग्णांनी लाभलेल्या आयुष्याबद्दल आनंदोत्सव साजरा करावा, असं बाबांना वाटतं. बाबांचं हे तत्त्वज्ञान आनंदवनातील रहिवाशांच्याही अंगी कसं मुरलं आहे, हे रजनी बक्षी यांनी तपशीलवार लिहिलं आहे :

तिथे ती सुंदर सलीमा आहे. ती आणि तिचा पती शेख करीम मुहंमद, दोघेही बरे झालेले कुष्ठरोगी आहेत. 'मला ती इथे-तिथे सारखी भेटायची,' शेख करीम मुहंमद सांगतो. तो तिच्याहून वीस वर्षांनी मोठा आहे. 'मला ती इथे-तिथे सारखी भेटायची. ती माझ्याकडे पैसे मागायची. तिला पैशांची कायमच चणचण भासायची. तिला दुकानातून लिपस्टिक आणि चेहऱ्याला लावायचं क्रीम आणायचं असे. बिचारी. एकटीच होती. तिच्या घरचे लोक तिला भेटायला कधीच यायचे नाहीत. ही आपले पैसे कधीच परत करू शकणार नाही, याची मला कल्पना होता... मग... मी तिच्याशी लग्नच केलं.' तो जरा लाजून हसतो, मान हलवतो, आपण या प्रेमाच्या नाजूक जाळ्यात कसे फसलो याच्या गोड आठवणींनी त्याला मजा वाटते. 'त्यांनाही साजशृंगार करावासा वाटतो,' बाबा आनंदानं सांगतात, 'हातांची आणि पायांची बोटं झडलेल्या या लोकांना! हाच माझ्या जीवनातला सर्वोच्च आनंद आहे.'

**(मेहता पब्लिशिंग हाऊसच्या निशा मीरचंदानी लिखित आणि लीना सोहोनी अनुवादित 'अमरगीत : बाबा आमटे यांचं जीवनचरित्र' या पुस्तकातून)**



# स्टोन्स इन्टू स्कूल्स

**- ग्रेग मॉर्टेन्सन**

*ग्रेग मॉर्टेन्सन यांची 'सेंट्रल एशिया इन्स्टिट्यूट' ही सेवाभावी संस्था गेली सोळा वर्षं पाकिस्तानातील व अफगाणिस्तानातील दुर्गम, उपेक्षित भागांमध्ये शाळा बांधून देऊन मुलींच्या शिक्षणासाठी मोठे कार्य करीत आहे. या देशांमधील दहशतवाद्यांच्या बंडखोरीला शह देऊन शांतता प्रस्थापित करण्यासाठी आणि विकास घडवून आणण्यासाठी 'शिक्षण' – विशेषत: स्त्रीशिक्षण – ही गुरुकिल्ली आहे, असा या संस्थेचा ठाम विश्वास आहे. अमेरिकन देणगीदारांनी सढळ हाताने दिलेल्या देणग्यांचा या सत्कार्यासाठी विनियोग करताना या संस्थेने विविध प्रकल्पांच्या जागेवरील स्थानिक लोकांशी विश्वास व आदरावर उभारलेले जिव्हाळ्याचे नातेसुद्धा जोडले आहे. उमद्या वृत्तीने, चिकाटीने व विनयशीलतेने केलेल्या या कार्याचा मनमोहक आलेख म्हणजेच हे पुस्तक! प्रचंड अस्थिरता व हिंसाचारांनी बुजबुजलेल्या देशात जिवावर उदार होऊन या सत्कार्यासाठी भगीरथ प्रयत्न करणाऱ्या नि:स्वार्थी लोकांची ही हृद्य, प्रेरणादायी व थरारक कहाणी मानवी मनाच्या थोरवीचे विविध पैलू दाखवून वाचकाला स्तिमित करते.*

## **सं**धीचं सोनं करावं

*इतिहास म्हणजे शिक्षण आणि महासंकट यांमधली शर्यत असते.*

– एच. जी. वेल्स

नव्या, भूकंपात सुरक्षित राहतील अशा शाळा बांधून तयार झाल्यावर केवळ पाचच आठवड्यांत, १ नोव्हेंबर २००६ रोजी, प्रिन्स चार्ल्स आणि त्यांच्या पत्नी, डचेस ऑफ कॉर्नवॉल यांचं पाच दिवसांच्या स्नेहभेटीसाठी इस्लामाबादला आगमन झालं. पाकिस्तानला दिलेल्या त्यांच्या या पहिल्या भेटीच्या वेळेस, हे शाही जोडपं पाटिका इथल्या अनेक नवनिर्माण प्रकल्पांचा आढावा घेण्यासाठी, तसंच अशा प्रकल्प-स्थळांना भेट देण्यात तीन तास खर्चणार होतं. या तीन तासांच्या भेटीमागचा एक उद्देश होता – पाकव्याप्त काश्मीरमधल्या भूकंपग्रस्तांच्या यातनांकडे आणि इथे अजून किती काम होणं आवश्यक होतं याकडे जागतिक पत्रकारांचं लक्ष वेधून घेणं. ठरलेल्या कार्यक्रमानुसार हे शाही जोडपं रेडक्रॉसच्या आंतरराष्ट्रीय समितीनं बांधून दिलेल्या रुग्णसेवा केंद्रापाशी थांबणार होतं. स्थानिक लोकांना १५०० दुभत्या गायी फुकट वाटणाऱ्या जर्मन पशुरोग केंद्रापाशी थांबणार होतं आणि नव्या कोऱ्या गुंडीपिरान शाळेला भेट देणार होतं.

ज्या शौकत अलीनं गेल्या नोव्हेंबर महिन्यात शाळेचे वर्ग पुन्हा भरवण्यासाठी नेटानं प्रयत्न केलेला होता, त्याची मुलाखत या कार्यक्रमापूर्वी ब्रिटिश वकिलातीच्या लोकांनी घेतली होती आणि त्याची निवड करून त्याच्यावर गुंडीपिरान शाळेला भेट देणाऱ्या शाही जोडप्याच्या स्वागताचं काम सोपवलेलं होतं. या प्रसंगी त्यानं पांढराशुभ्र सलवार-कमीझ आणि चमकदार काळे बूट घातलेले होते. त्याच्या सोनेरी फ्रेमच्या चष्म्यामुळे आणि त्याच्या मुजाहिदीन धर्तीच्या दाढीमुळे तो लक्ष वेधून घेत होता.


शाही जोडप्याच्या संपूर्ण भेटीदरम्यान सुरक्षिततेचा कडेकोट बंदोबस्त होता. शाही जोडप्याच्या प्रत्येक पावलापाठोपाठ अंगरक्षक सतर्कतेनं मागोमाग जात होते. पाटिका गावातला प्रत्येक महत्त्वाचा रस्ता सकाळपासूनच बंद ठेवण्यात आलेला होता आणि सकाळी दहाच्या सुमाराला रॉयल नेव्हीचं हेलिकॉप्टर पाकिस्तानी लष्कराच्या दोन Mi-१७ हेलिकॉप्टर्सबरोबर गावाच्या मध्यभागी असलेल्या पुरवठा केंद्रापाशी उतरलं. प्रिन्स आणि डचेस दोन अगदी रंगसंगती साधणाऱ्या क्रीम रंगाच्या पोशाखात हेलिकॉप्टरमधून उतरले. त्यांनी पाटिका गावाच्या बाजारपेठेत एक फेरी मारली. तेथे मुलांनी ब्रिटिश झेंडे हलवून, टाळ्या वाजवून आणि हातांनी सलामी देऊन त्यांचं स्वागत केलं. त्यानंतर ते रेडक्रॉस हॉस्पिटल बघायला गेले आणि तिथून गुंडीपिरान शाळेकडे आले.

शौकत अलीनं डचेसला काश्मिरी पश्मिना शाल भेट म्हणून दिली. त्यानं ती डचेसच्या खांद्यावर लपेटली. सैदा शबीरनं चहा-बिस्किटं देऊन शाही जोडप्याचं स्वागत केलं. दोन मुलींनी त्यांना पुष्पगुच्छ अर्पण केले. शिक्षकांशी दोन शब्द बोलून प्रिन्स आणि डचेसनं शाळेचे वेगवेगळे वर्ग पाहिले आणि ज्या मुलींचे देह न्यायला कुणीही आलं नव्हतं, त्या मुलींच्या समाधीपाशी ते दोघे काही मिनिटं स्तब्ध उभे राहिले. मग काहीतरी विचित्रच घडलं!

शौकत अलीकडे वळून प्रिन्सनं प्रश्न विचारला, ''ही शाळा कुणामुळे बांधली गेली?'' क्षणाचाही विचार न करता शौकत अलीनं ठासून सांगितलं की, ह्याचं श्रेय दोन संस्थांकडे जातं. आशियातल्या मुस्लीम समाजासाठी उत्कृष्ट मदतकार्य करणारी इस्माइली मदतसंस्था – आगाखान फाउंडेशन आणि चीनमधली बांधकाम करणारी कंपनी. सेंट्रल एशिया इन्स्टिट्यूटचं त्यानं नावसुद्धा उच्चारलं नाही.

सेंट्रल एशिया इन्स्टिट्यूटच्या कर्मचाऱ्यांना हे फारच विचित्र वाटलं आणि शाही जोडपं निघून गेल्यावर त्यांच्यापैकी अनेकांनी शौकत अलीकडे याचा जाब विचारला. त्याच्यामुळे लोक दुखावले गेलेले होते

**शाळेतील मुलींबरोबर ग्रेग मॉर्टेन्सन**



आणि रागावलेले होते हे जाणवल्यावर शौकत अलीची त्रेधातिरपीट उडली. त्यानं सफाई दिली की, शाळेच्या पुनर्बांधणीतल्या सीएआयच्या कामगिरीबद्दल त्याच्या मनात गोंधळ होता. हा गोंधळ आणखीच वाढण्याचं कारण होतं की, इतर स्वयंसेवी संस्थांप्रमाणे बांधकाम पूर्ण झाल्यावर त्या इमारतीपुढे आम्ही आमच्या संस्थेची मोठ्ठी पाटी लावून जाहिरातबाजी कधीच करत नव्हतो.

त्या पाटीबद्दलचा त्याचा मुद्दा बरोबर होता. शाळेचं बांधकाम पूर्ण करण्याच्या गडबडीत ही गोष्ट नजरेतून सुटून गेलेली होती. त्याखेरीज आपल्या गफलतीबद्दल त्यानं व्यक्त केलेला खेद अगदी सच्चा आणि प्रामाणिक होता. यापेक्षासुद्धा शौकत अलीनं तिथल्या अमेरिकन पत्रकाराजवळ केलेल्या वक्तव्याबद्दल त्या पत्रकारानं मला दिलेली माहिती माझ्या अंत:करणाला भिडली.

''सेंट्रल एशिया इन्स्टिट्यूटनं इथे एक छोटासा चमत्कारच घडवला आहे. कुणाही इतरांची मदत नसताना आणि धर्म, ज्ञाती आणि राजकारणाच्या तत्त्वावर भेदभाव न करता या संस्थेनं या भागात राहणाऱ्या लोकांची मानसिकताच बदलून टाकलेली आहे. इथले ७० ते ८० टक्के लोक कडवे, पारंपरिक मुस्लीम असूनही त्यांनी हा चमत्कार घडवून आणलेला आहे. भूकंपापूर्वी इथल्या अनेक लोकांचं मत होतं की, अमेरिकन लोक चांगले नाहीत; पण सीएआयनं सिद्ध करून दाखवलं की, ही समजूत चुकीची आहे. आणि आता इथले लोक या संस्थेला खूप मान देतात, खूप पूज्य समजतात.''

दुर्दैवानं हे ऐकूनही सर्फराझचा राग ओसरला नाही. गुंडीपिरान शाळा पुन्हा उभारण्यात आमच्या संस्थेनं बजावलेल्या कामगिरीचा अनुल्लेख झाल्याची बातमी ऐकून तो संतापून गेला होता. फोनवर माझी पाच मिनिटं क्षमा मागितल्यावर त्यानं शौकतअलीवर तोंडसुख घेऊन त्याच्यावर सूड उगवायच्या अनेक पर्यायांची गरमागरम उजळणी केली.

मी त्याला चुचकारत म्हटलं, ''सर्फराझ, कृपा करून शांत हो! ह्यातलं काहीही महत्त्वाचं नाही. मुलांना त्यांच्या शाळेचा लाभ झालाय आणि अखेरीस तेवढी एकच गोष्ट मोलाची आहे! तू आणि मी राग काढायला दुसरं काहीतरी शोधू या ना!''

आणि आम्हाला ती गोष्ट सापडली!

गुंडीपिरान शाळा कोसळल्यावर त्यातून बचावलेल्या मुलींपैकी एकीचं नाव होतं – घोसिया मुघल. ही अकरा वर्षांची पाचवीत शिकणारी मुलगी होती. भूकंप झाला तेव्हा बाहेरच्या नळावरून ती किटलीत पाणी भरून घेत असल्यामुळे तिचा जीव वाचला होता; पण घोसिया बचावली होती, तरी तिला नशिबानं चांगलाच फटका दिला होता. गुंडीपिरान शाळेत मरण पावलेल्या १०८ लोकांमध्ये घोसियाची आई, कोसर परवीन हिचा समावेश होता. ती आठवीच्या वर्गाला उर्दू आणि अरबी भाषा शिकवत असे. मरण पावलेल्यांच्या यादीत घोसियाच्या आणखी दोन बहिणींचा – साबा आणि रोझिया – यांचासुद्धा समावेश होता. तिच्या अनेक मैत्रिणीसुद्धा मृत्युमुखी पडल्या होत्या.

शाळेच्या वरच्या बाजूवर डोंगर उतारावर असलेलं घोसियाचं घरसुद्धा या भूकंपात जमीनदोस्त झालं होतं. त्यामुळे तिच्या दूरच्या काकांनी या आपत्तीतून बचावलेल्या घोसियाला, तिच्या मोठ्या बहिणीला, लहान भावाला आणि तिच्या वडलांना आपल्या घरी नेलं होतं. घोसियाचे वडील दहा वर्षांपूर्वीच अर्धांगवायूच्या झटक्यामुळे अंथरुणाला खिळलेले होते. ऑक्टोबर २००५ सालापासून ते या काकांच्या घराजवळच्या पत्र्याच्या टपरीत राहत होते. ही टपरी पाटिका गावाच्या अगदी टोकाला, डोंगरउतारावर बांधलेली होती. उन्हाळ्यात या टपरीतलं तपमान १२० अंश सें. इतकं चढत असे, तर हिवाळ्यात बादलीतल्या पाण्याचं रात्री गोठून बर्फ बनत असे.

शाही जोडप्यानं गुंडीपिरानला भेट दिल्यानंतर अनेक महिन्यांनी घोसियाकडे आमचं लक्ष गेलं. आमचे कर्मचारी आणि मी मिळून एक नवीन योजना हाती घेऊ पाहत होतो. त्या दृष्टीनं आम्हाला ही मुलगी अगदी योग्य वाटली. एका समस्येवरचा तोडगा म्हणून ही योजना आम्ही आखलेली होती.

आम्ही जे काम करतो त्याचं मुख्य स्वरूप आहे मुलींना साक्षर बनवून गणिताचं शिक्षण देणं आणि या मूलभूत शिक्षणाचे फायदे पाकिस्तानात आणि अफगाणिस्तानात वादातीत आहेत; पण २००३ सालापासून आमच्या सुरुवातीच्या सीएआयच्या विद्यार्थिनी शालेय शिक्षण संपवून बाहेर पडू लागल्या आणि एक भीषण सत्य आमच्यापुढे उभं ठाकू लागलं – ज्या दूरदूरच्या कोपऱ्यात आम्ही शाळा उभारलेल्या होत्या तिथल्या दरिद्री खेड्यांमध्ये या मुलींना त्यांच्या शिक्षणाचा उपयोग करण्यासाठी कोणतीच संधी उपलब्ध नव्हती! त्यांच्या शालेय शिक्षणाचा प्रकृती सुधारण्याशी आणि कमी मुलं जन्माला घालण्याशी नक्कीच संबंध असतो आणि त्यामुळे त्यांच्या समाजाची, जीवनमानाची प्रत नक्कीच उंचावली असती. या मुलींच्या शिक्षणाचा त्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी नक्कीच उपयोग झाला असता; परंतु या मुलींना घराबाहेर पडून नोकरी मिळवणं शक्य झाल्याशिवाय त्यांच्या शिक्षणामुळे त्यांच्या कुटुंबाची प्राप्ती वाढणं शक्य नव्हतं. पाकिस्तान आणि अफगाणिस्तान या देशातल्या ग्रामीण भागातल्या खेड्यांमध्ये अशी नोकरीची संधी मिळणं केवळ अशक्य होतं! मुली दुकानात काम करू शकत नाहीत, कारण पारंपरिक मुस्लीम समाजात कुटुंबाबाहेरच्या पुरुषांशी बोलण्याला मज्जाव असतो. याच कारणामुळे त्या नोकरीच्या शोधार्थ शहरातही जाऊ शकत नव्हत्या. त्यामुळे शिक्षिका म्हणून नोकरी करण्याखेरीज ग्रामीण भागातल्या स्त्रियांना आणखी कसलंही काम मिळणं शक्य नसतं.

आमच्या लक्षात आलं की, याचे अनेक परिणाम होतात. एकतर यामुळे विद्यार्थ्यांनी शिक्षक बनायचं आणि स्वत:च्याच विद्यार्थ्यांमधून पुन्हा शिक्षक निर्माण करायचे अशी साखळी निर्माण होते. दुसरं म्हणजे ज्या मुलींची पहिली पिढी शिकून तयार होते, त्यांच्या डोळ्यांपुढे कुणाचाच आदर्श नसतो किंवा त्यांना मार्गदर्शन करू शकतील असे लोकही आजूबाजूला नसतात. त्यामुळे त्यांना उच्च शिक्षण घेऊन डॉक्टर, वकील, इंजिनिअर आणि असे विविध व्यवसाय करण्याबाबत उत्तेजन मिळत नाही. असे व्यवसाय त्या करू शकल्या, तर त्या अधिक पैसा मिळवून आपलं आयुष्य नीटपणे घडवू शकतील, हे आम्हाला जाणवलं. थोडक्यात म्हणजे आमच्या लक्षात आलं की, केवळ आम्ही



**शाळेतील विद्यार्थिनींबरोबर पुस्तकात रमलेले ग्रेग**

बांधत असलेल्या शाळांवरच लक्ष ठेवणं पुरेसं नव्हतं, तर त्यातून शिकून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांकडेही तेवढंच लक्ष पुरवून, त्यांना मार्गदर्शन देऊन त्यांच्यापुढे मोठी उद्दिष्टं ठेवणं महत्त्वाचं होतं. असं केलं असतं, तरच सरतेशेवटी त्या आत्मनिर्भर होऊ शकल्या असत्या. गरीब देशातल्या गरिबांसाठी कोणतीही गोष्ट सहजपणे साध्य होण्याजोगी नसते!

या समस्या समोर दिसू लागल्या. आम्ही यातून मार्ग काढून शालेय शिक्षण पूर्ण करणाऱ्या आमच्या विद्यार्थिनींपुढले पर्याय विस्तृत करण्याबद्दल विचार करू लागलो. या समस्येला उत्तर म्हणून आम्हाला सुचलेला मार्ग असा होता की, आम्ही सर्वोत्कृष्ट विद्यार्थिनींचा शोध घेऊन त्यांच्या उच्च शिक्षणासाठी आर्थिक मदत करावी. आम्हाला असं वाटलं की, अशी शिष्यवृत्ती मिळवून उच्च शिक्षण घेणाऱ्या मुली इतर मुलींना त्यांच्या आदर्शाप्रमाणे अनुकरण करायला संप्रेरित करतील. अशा हुशार मुलींसाठी आमच्या पुंजीतला भाग बाजूला काढून ठेवायचा आणि त्यांचा आदर्श इतरांपुढे ठेवायचा असं आम्ही ठरवलं . हळूहळू का होईना, पण आम्ही नक्कीच आमच्या शालेय शिक्षण पूर्ण करणाऱ्या विद्यार्थिनींना सर्व तऱ्हेच्या व्यवसायांसाठी तयार करू शकलो असतो!

अशा तत्त्वावर आम्ही हा शिष्यवृत्तीबद्दलचा निर्णय घेतलेला होता. प्रत्यक्षात मात्र आमच्यासमोर खूपच अडचणी आल्या.

ही कल्पना जेव्हा प्रथम आमच्या डोक्यात आली तेव्हा आमच्या लगेचच लक्षात आलं की, शिष्यवृत्तीवर घरापासून दूर राहून शिकणाऱ्या या मुलींच्या सुरक्षिततेचा आणि त्यांच्यावर कुणाचीतरी देखरेख असण्याच्या आवश्यकतेचा प्रश्न नक्कीच उभा राहणार. ग्रामीण भागात राहणाऱ्या जवळजवळ साऱ्याच कुटुंबांना या गोष्टींबाबत खूपच काळजी वाटत असते कारण मोठ्या शहरात राहून आपल्या मुलींवर स्वातंत्र्याच्या पाश्चिमात्य विचारांचा पगडा बसेल याची त्यांना धास्ती वाटत असते. अशी काळजी वाटू नये म्हणून या मुलींना भरवशाच्या स्त्रीच्या देखरेखीखाली आणि दरवाजाशी चोवीस तासांचा सशस्त्र पहारेकरी असेल अशा जागी राहण्याची सोय करून देणं गरजेचं ठरणार होतं; आणि शिष्यवृत्तीवर मुली दूरच्या शहरात शिक्षणासाठी जाण्यापूर्वी त्यांना त्यांच्या गावच्या मुल्लाचे आशीर्वाद लाभणंही आवश्यक होतं.

या साऱ्या गोष्टी विचारात घेऊन आम्ही २००७ सालच्या सुरुवातीला आमच्या मुलींच्या पहिल्या वसतिगृहाच्या बांधकामासाठी पैसा उभा केला. स्कार्दू इथे हाजी गुलाम पार्वी या आमच्या बाल्टिस्तानातल्या व्यवस्थापकानं एका मोठ्या इमारतीच्या बांधकामावर देखरेख केली. या विभागातल्या आमच्या शाळांमधल्या अत्यंत हुशार अशा साठ मुलींची राहण्याची सोय या इमारतीमध्ये करता येणार होती. या हाजी गुलाम पार्वीनं बाल्टिस्तानातला आमचा व्यवस्थापक बनण्यासाठी त्याची रेडिओ पाकिस्तानवरची हिशोबनिसाची नोकरी सोडून दिलेली होती. तो बांधून घेत असलेल्या त्या इमारतीमध्ये शिष्यवृत्ती मिळवलेल्या मुली राहणार होत्या. या मुली त्यांच्या अभ्यासाच्या जोडीला स्थानिक हायस्कूल किंवा ज्युनिअर कॉलेजात काम तरी करणार होत्या किंवा 'मॅटर्नल हेल्थ केअर'सारख्या विषयांमधला दोन वर्षांचा डिप्लोमाचा अभ्यासक्रम तरी पूर्ण करणार होत्या. त्या वसंत ऋतूत आम्ही चारपुर्सन खोऱ्यातल्या मुलींनाही अशाच शिष्यवृत्त्या देऊन त्यांना पुढल्या शिक्षणासाठी गिलगिट इथे पाठवू लागलो. तिथे सैदुल्ला बेग हा आमचा हुन्झा इथला व्यवस्थापक त्यांच्यावर लक्ष ठेवून त्यांची काळजी घेत असे.

त्याच सुमारास आम्ही आमचं लक्ष पाकव्याप्त काश्मीरकडेसुद्धा वळवलं. तिथेही शाळा बांधण्याच्या प्रकल्पाबरोबरच आम्हाला

शिष्यवृत्तीचा प्रकल्प चालू करावा लागला असता. आमच्यापुढलं पहिलं काम होतं हुशार मुलींचा शोध घेणं : नीलम खोऱ्यात शिष्यवृत्तीला लायक अशा किती मुली होत्या; त्यातल्या किती जणी आमच्या शाळांमध्ये शिक्षण घेत होत्या; या मुलींपुढे कोणत्या कौटुंबिक समस्या होत्या, हे मला जाणून घ्यायचं होतं. या प्रश्नांची उत्तरं शोधण्यासाठी मी जेनेव्हिव्ह चॅबोट या बोझमनमधल्या उत्साही स्त्रीची मदत घेतली. योगायोगानं जेनेव्हिव्हनं त्याच वेळेस शिक्षण विषयातली Ed.D. ही पदवी मॉटॅना स्टेट युनिव्हर्सिटीमधून मिळवलेली होती. आमचा पाकव्याप्त काश्मिरातला शिष्यवृत्तीचा कार्यक्रम तिनं आपल्या हाती घ्यावा असं मी तिला सुचवलं. तिच्यापुढचं पहिलं काम होतं, आमच्या शिष्यवृत्तींना योग्य अशा मुलींचा नीलम खोऱ्यात शोध घेणं! हा शोध घेताना तिची आणि घोसिया मुघलची भेट झाली.

२००७ सालच्या वसंत ऋतूत जेनेव्हिव्हनं ही माहिती जमा करण्यासाठी पाकिस्तानला पहिली फेरी मारली. ती गुंडीपिरान शाळेत गेलेली असताना वर्गात पुढच्या बाकावर बसलेल्या बारा वर्षाच्या मुलीशी तिनं बोलावं असं तिला खूप विद्यार्थिनींनी सांगितलं. घोसिया आता सातवीत गेलेली होती आणि वर्गात तिनं सर्वांत जास्त गुण मिळवलेले होते. तिच्या अपंग वडलांना दर महा मिळणारं बारा डॉलर्सचं पेन्शन वगळता या कुटुंबापाशी काहीही पैसे नव्हते. असं असूनही घोसिया आत्मविश्वासानं आणि महत्त्वाकांक्षेनं नुसती भारलेली होती. तिला इस्लामाबादमध्ये वैद्यकीय शिक्षण घेऊन, पाटिका इथे डॉक्टर म्हणून काम करायचं होतं. सैदा शबीरनी दुजोरा दिला की, घोसिया ही शाळेतली सर्वोत्कृष्ट विद्यार्थिनी होती. जेनेव्हिव्हनं दिलेला अहवाल पाहून मी ठरवलं की, नीलम खोऱ्यात सीएआयची शिष्यवृत्ती सर्वांत प्रथम मिळवणारी विद्यार्थिनी घोसियाच असायला हवी.

यात अडचण फक्त एकच होती. तिच्या वडलांनी तिला ही शिष्यवृत्ती स्वीकारण्याची परवानगी जरी सुरुवातीला दिलेली होती, तरी आता त्यांनी त्यांचा विचार बदलला होता आणि दिलेली संमती काढून घेतलेली होती.

आमच्या लवकरच लक्षात आलं की, तरुण मुलीला उच्च शिक्षणासाठी मदत मिळाल्यावर अशी प्रतिक्रिया बरेचदा दिसून येते. उच्च शिक्षणाची संधी लाभल्याबद्दल हर्ष व्यक्त केल्यानंतर आमची शिष्यवृत्ती मिळवणारी अनेक मंडळी नंतर सांगत येतात की, त्यांचे आजोबा, आजी किंवा आत्या जुन्या विचारांची आहेत आणि त्यांची ह्याला संमती नाही.

''ते निवर्तल्याखेरीज मला आणखी शिकणं शक्य होणार नाही.'' असं आम्ही अनेकांकडून ऐकतो.

यात विघ्न उभं करणारे इतर लोक असतात स्थानिक सामाजिक नेते किंवा धार्मिक गुरू. त्यांची अनेक कारणांमुळे या गोष्टीला हरकत असते. त्यामुळे अशा शिष्यवृत्तींच्या मुलाखतींच्या वेळेस आम्हाला खूप रडारडी पाहावी लागते. गुणी मुलींची महत्त्वाकांक्षा दडपली जातेय किंवा त्यांची शिकण्याची इच्छा त्यांना पुढे ढकलावी लागतेय हे पाहणं आमच्या दृष्टीनं फार क्लेशकारक आणि विफलता आणणारं असतं. अशाच कारणांमुळे चारपुर्सन खोऱ्यातल्या, हिरव्या डोळ्यांच्या नसरीन बेगला शिष्यवृत्तीवर 'मॅटर्नल हेल्थ केअर'च्या अभ्यासक्रमासाठी रावळपिंडीला जायला तब्बल दहा वर्षं थांबावं लागलं होतं. अशाच प्रकारे कोर्फेचा सरपंच आणि माझा गुरू हाजीअली याच्या नातीला – जहान अलीला तिच्या वडलांच्या – त्वाहा अलीच्या नकाराला सामोरं जावं लागलं होतं. जहाननं स्कार्डूला जाऊन सार्वजनिक आरोग्याचं उच्चशिक्षण घेण्यापेक्षा तिला जास्त हुंडा मिळावा याकडेच त्वाहा अलीचं लक्ष होतं. (परंतु त्वाहा अलीनं नंतर परवानगी दिली आणि जहान आता स्कार्डूमधल्या सरकारी डिग्री कॉलेजात शिकते आहे.)

या आक्षेपामागची खरी कारणं शोधून काढणं बरेचदा अवघड असतं, पण या कारणांचा उलगडा झाला की, त्यामागे तार्किकता आढळते. घोसियाच्या बाबतीत असंच झालं.

जेव्हा जेनेव्हिव्ह, सर्फराझ आणि सैदुल्ला बेग या कुटुंबाला सर्वप्रथम भेटायला गेले तेव्हा घोसियाचे वडील सबीर आणि तिचे दोन्ही काका खूपच साशंक होते. त्यांनी अनेक अडचणी उभ्या केल्या. त्यांना वाटत होतं की, तिच्या मोठ्या भावंडांना वगळून तिला एकटीलाच शिष्यवृत्ती मिळणं चुकीचं होतं. त्यांना ती घर सोडून दूर राहणार हे पसंत नव्हतं. अनेकदा भेटून आल्यावर मात्र दुसरंच कारण वर आलं. बचावलेल्या मुलांपैकी सर्वांत लहान वयाची असलेली घोसियाच तिच्या अपंग वडलांची शुश्रूषा करत असे. तिच्यावाचून त्यांचे सर्वच व्यवहार अडले असते.

सबीरची चिंता समजण्याजोगी होती. खरं कारण समोर आल्यावर आम्ही दोन्हीकडून हा प्रश्न सोडवला. प्रथम आम्ही सुचवलं की, त्याची शुश्रूषा करणाऱ्या दाईसाठीचे पैसे घोसियाच्या शिष्यवृत्तीतून दिले जातील. दुसरं म्हणजे आमच्यापाशी असलेला बिनतोड मुद्दा आम्ही सैदुल्ला बेगमार्फत त्याच्या कानी घातला.

सैदुल्ला बेगनं घोसियाच्या वडलांना ठामपणे सांगितलं : ''माणसाच्या आयुष्यात कधीकधी अशी संधी येते की, जिचा लाभ घेणं अत्यंत आवश्यक असतं. अशी संधी आलेली असताना स्वतःच्या स्वार्थापोटी तुम्ही तुमच्या प्रिय मुलीचं भविष्य खच्ची करणं योग्य नाही! आम्ही तुमच्या सर्व कुटुंबीयांना मदत करायचा प्रयत्न करू; पण तुम्ही लक्षात घ्यायला हवंत की, ही संधी घोसियाला लाभलेली आहे. आपल्या देशातल्या अनेकांना अशी संधी कधीही लाभत नसते! अशी संधी कदाचित यानंतर *घोसिया*ला कधीसुद्धा मिळणार नाही. या संधीचा तुम्ही त्वरित स्वीकार केला नाहीत, तर कदाचित अशी संधी तुमच्यापुढे पुन्हा कधीही उभी राहणार नाही.''

सैदुल्लाच्या अंगभूत विनयामुळे हा युक्तिवाद करताना त्यानं सांगायचं टाळलं की, अनेक वर्षांपूर्वी अनेक वैयक्तिक कष्ट भोगून त्यानं त्याच्या स्वतःच्या पत्नीला हायस्कूल आणि कॉलेजचं शिक्षण दिलेलं होतं. उत्तर पाकिस्तानातले फारच थोडे पुरुष असं करतात आणि त्यानं नेटानं केलेल्या या प्रयत्नांमुळेच तिला आता गिलगिटमधल्या एका खाजगी शाळेत उत्तम नोकरी मिळालेली होती. त्यानं हे जरी सांगितलं नव्हतं, तरी सैदुल्लाच्या युक्तिवादाचा घोसियाच्या वडलांवर जोरदार प्रभाव पडलेला होता.

खूप मिनिटं विचार केल्यानंतर ते मान डोलावून म्हणाले, ''हो!



**शाळेतील विद्यार्थिनींबरोबर एका निवांत क्षणी ग्रेग**

म्हणून एका संध्याकाळी जेनेव्हिव्ह, सर्फराझ आणि मोहम्मद नाझिर भेडीतल्या डोंगरावरल्या घरी जाऊन डॉक्टर हसन आणि त्यांच्या इतर कुटुंबीयांना भेटले. त्यात सिद्रेखेरीज त्यांची पत्नी, इतर चार मुली, दोन मुलगे आणि मिरफ्ताब नावाचा जावई यांचा समावेश होता. मिरफ्ताब त्या दिवशी त्यांना भेटण्यासाठी मुझफ्फराबाद-हून आलेला होता. सिद्रे ही हुशार आणि स्पष्टपणे बोलणारी, गुंडीपिरान शाळेत बारावीत शिकणारी मुलगी होती. कॉलेजशिक्षण घेऊन डॉक्टर होण्याची आणि भेडीत परत येऊन आपल्या शिक्षणाचा उपयोग करण्याची तिची महत्त्वाकांक्षा होती. बाहेरच्या दिवाणखान्यात तिच्या आईनं या तीन पाहुण्यांचं स्वागत केलं आणि त्यानंतर घरातल्या स्त्रियांनी जेनेव्हिव्हला स्वयंपाकघरात नेलं. सर्फराझ आणि नाझिर डॉक्टर हसन आणि मिरफ्ताबरोबर सिद्रेच्या भविष्याबद्दल बोलू लागले.

स्वयंपाकघरात कंदिलाच्या उजेडात सिमेंटच्या फरशीवर बसलेल्या जेनेव्हिव्हच्या लक्षात आलं की, या घरातल्या स्त्रिया 'सिद्रे वैद्यकीय शिक्षण घेणार' या विचारानं अगदी हरखून गेलेल्या होत्या; पण तिच्या मेहुण्याचा, मिरफ्ताबचा या कल्पनेला विरोध होता. बाहेरच्या दिवाणखान्यात सर्फराझनं आणि नाझिरनंही हाच निष्कर्ष काढला. डॉक्टर हसननी थोडीशी चिंता व्यक्त केली की, ही अमेरिकन स्वयंसेवी संस्था त्यांच्या मुलीला ख्रिश्चन धर्म स्वीकारायला लावेल की काय? पण सर्फराझनं त्यांना पटवून दिलं की, सीएआयही धर्मनिरपेक्ष संस्था आहे आणि धर्मांतरं घडवण्यात या संस्थेला अजिबात गम्य नाही! परंतु मेहुणीनं शिष्यवृत्ती स्वीकारावी या कल्पनेला मिरफ्ताबचा मात्र जोरदार विरोध होता. दिवाणखान्यात पुरुषांमधली चर्चा संपल्यावर मिरफ्ताबनं स्वयंपाकघराकडे मोर्चा वळवला. इतर स्त्रिया फरशीवर बसलेल्या होत्या, तिथे त्यानं एका बाकावर बैठक मारली आणि तो जेनेव्हिव्हशी इंग्रजीत बोलून आपली मतं सांगू लागला.

पश्चिमेकडल्या संस्कृतीतून येऊन आमच्या मुलींना शाळेत धाडण्याचं आपल्याला गळी उतरवता येईल, असं जेनेव्हिव्हला वाटलंच कसं? मुलीसाठी शिष्यवृत्तीचं बोलणंसुद्धा करण्याचं धाडस तिनं कशाच्या बळावर केलं? असे त्याचे प्रश्न होते.

त्यापुढे मिरफ्ताबनं विचारलं की, सिद्रेच्या शिक्षणाचा तिच्या कुटुंबीयांना आणि भेडीतल्या लोकांना काय उपयोग होण्याजोगा होता. आणि एवढ्या वक्तव्यानंतर त्यानं कळीच्या मुद्द्याचा गौप्यस्फोट केला.

माझ्या मुलीच्या दृष्टीनं सर्वांत चांगलं असेल तेच आम्ही करू!''

या संभाषणानंतरसुद्धा सबीर अजून दोलायमान मन:स्थितीतच आहे. आम्ही आशा करत आहोत की, त्याला वेळ देऊन सहनशीतलेनं समजावून दिल्यावर त्याला घोसियाला परवानगी देण्याची आणि शिष्यवृत्ती घेऊ देण्याची बुद्धी होईल! दरम्यान आमच्या पुढे आणखी एक अशीच गोष्ट उभी ठाकली आणि त्यामुळे आमचा आशावाद टिकवून धरणं आम्हाला फार जड जाऊ लागलं.

आम्ही घोसियाच्या कुटुंबीयांची समजूत घालत होतो, त्याच सुमाराला माझ्या कानावर डॉक्टर मोहम्मद हसन याचं नाव आलं. हा नीलम खोऱ्याच्या उत्तरेकडच्या भेडी गावात राहणारा एक सुखवस्तू दंतवैद्य होता आणि त्याच्या सिद्रे नावाच्या मुलीला आम्ही शिष्यवृत्ती देऊ अशी त्याला आशा वाटत होती. जरी आम्ही शक्यतोवर आमच्या मदतीची सर्वांत जास्त गरज असलेल्या गरीब कुटुंबाचा विचार करतो, तरीसुद्धा मी या माणसाचा पत्ता जेनेव्हिव्हकडे पाठवून तिला त्याबद्दल माहिती काढायला सांगितलं. डॉक्टर हसननी इतर लायक अशा शिष्यवृत्ती उमेदवारांची आम्हाला माहिती तर दिलेली होतीच, पण शिवाय तो नीलम खोऱ्यातल्या या भागातला एक महत्त्वाचा मान्यवर माणूस होता आणि अशा माणसाशी मैत्रीचे संबंध ठेवणं महत्त्वाचं होतं.

या कुटुंबाला सीएआयनं जी शिष्यवृत्ती देण्यात काही अर्थ आणि शहाणपण होतं, ती शिष्यवृत्ती सीएआयनं सिद्रेला नव्हे, तर मिरफ्ताबला द्यायला हवी होती!

सीएआयच्या कर्मचाऱ्यांनी ती रात्र डॉक्टर हसनच्या कुटुंबीयांबरोबर घालवली. जेनेव्हिव्ह त्या मुलींबरोबर त्यांच्याच खोलीत झोपलेली होती. त्या मुली मिरफ्ताबचं वागणं पाहून सैरभैर झालेल्या होत्या आणि अश्रू गाळत होत्या. दुसऱ्या दिवशी सकाळी सिद्रेनं तिच्या डॉक्टर बनण्याच्या स्वप्नाबद्दल पुन्हा सांगितलं. (आम्ही अशा अनेक मुलींच्या मुलाखती घेतो, तेव्हा त्या नेहमीच 'स्वप्न' किंवा *'ख्वाब'* हा शब्द वापरतात.) पण निरोप घेण्यापूर्वी मिरफ्ताबनं ठासून सांगितलं होतं की, त्याचं मत अजिबात बदललेलं नव्हतं आणि असं बोलून त्यानं सिद्रेच्या स्वप्नाला मूठमाती देण्याचं काम केलेलं होतं.

त्या दिवशी डोंगरावरून गाडी खाली नेताना सर्फराझनं जेनेव्हिव्हकडे वळून तिला तिचं मिरफ्ताबद्दलचं मत विचारलं. तिनं उत्तर दिलं, ''केवळ एका मुलीच्या शिक्षणामुळे संपूर्ण खेड्यात किती बदल घडू शकतो, याची त्याला अजिबात कल्पना दिसत नाही.'' सर्फराझ आणि नाझिर जेनेव्हिव्हच्या मताशी पूर्णपणे सहमत होते आणि एका जावयाला एका हुशार मुलीच्या उच्च शिक्षणाची संधी नष्ट करण्यासाठी मोकळं सोडल्याबद्दल त्यांनी संताप व्यक्त केला.

एका मुलीचं स्वप्न भंग पावताना पाहणं नेहमीच अवघड असतं; पण ही गोष्ट त्या मुलीच्याच कुटुंबातल्या, तिच्या संधीबद्दल असूया आणि मत्सर बाळगणाऱ्या एका पुरुषानं करावी, हे पाहणं तर आणखीच क्लेशकारक असतं. सर्फराझ, जेनेव्हिव्ह आणि नाझिर यांचं एकमत झालं की, आमच्या शिष्यवृत्तीसाठीच्या उमेदवारांच्या मार्गात अडथळे आणणाऱ्या त्यांच्या कुटुंबीयांशी सामना करण्यापेक्षा नव्या शाळा बांधून घेणं ही कितीतरी सोपी गोष्ट होती.


त्यानंतर जेनेव्हिव्हनं अहवाल लिहून निष्कर्ष काढला की, जरी सिद्रे ही शिष्यवृत्तीला लायक अशी उमेदवार असली, तरी मिरफ्ताबमुळे ही गोष्ट अशक्य झालेली होती. तिचा अहवाल वाचल्यावर मी नाइलाजानं सहमत झालो की, डॉक्टर हसन जोवर त्यांच्या मुलीच्या भविष्यावर पाणी ओतायची परवानगी त्यांच्या जावयाला बहाल करत होते, तोवर आम्ही तिच्या वैद्यकीय शिक्षणासाठी मदत करू शकणार नव्हतो.

गोष्ट या टप्प्यावर येऊन थांबलेली आहे. मिरफ्ताब आपलं मत बदलेपर्यंत ती तशीच ठप्प अवस्थेत राहील. जेव्हा केव्हा तो परवानगी देईल, तेव्हा शिष्यवृत्ती सिद्रेची वाट पाहत असेल!

परंतु दरम्यान मला अमेरिकेत काही नव्या आणि अनपेक्षित आव्हानांना सामोरं जावं लागलं.

**(मेहता पब्लिशिंग हाऊसच्या ग्रेग मॉर्टेन्सन लिखित आणि सुनीति काणे अनुवादित 'स्टोन्स इन्टू स्कूल्स' या पुस्तकातून)**


नवं कोरं





जगविख्यात मायक्रोसॉफ्ट कंपनीचे सहसंस्थापक पॉल ॲलन यांच्या चतुरस्त्र व्यक्तिमत्त्वाची आणि आयुष्याची रसाळ भाषेतील आत्मकथनपर शैलीतील कहाणी.

आयडिया मॅन

मूळ लेखक - पॉल ॲलन
अनुवाद - स्वाती देशपांडे

पृष्ठसंख्या : ४३२
किंमत : ₹४९५



शारीरिक मर्यादांना अफाट जिद्दीपुढे झुकवणाऱ्या
सक्षम स्त्रीची कहाणी


## आकाश झेलताना

लेखक - मंजुश्री गोखले

पृष्ठसंख्या : १५६
किंमत : ₹१९५

Book Available

---



देखणी ऊसतोडणी कामगार सुर्वता
मुकादम आणि जमीनदाराच्या जाळ्यात अडकते...
आणि तिच्या सगळ्या स्वप्नांचा चक्काचूर होतो...
मन सुन्न करणारी कादंबरी


## सुर्वंता

लेखक - बा.ग. केसकर

पृष्ठसंख्या : १४४
किंमत : ₹१८०

Book Available

---



ग्रामीण जीवनातील समस्या, गुंतागुंत आणि
मूल्यसंघर्षावर आधारित
वैशिष्ट्यपूर्ण लक्षवेधक कथा.

## डहाळं

लेखक - बा.ग. केसकर

पृष्ठसंख्या : १४८
किंमत : ₹१८०

Book Available



# ‘भोगले जे दुःख त्याला...’

- आशा आपराद

*मी एक सामान्य स्त्री आहे, तसाच सामान्य माझा झगडा आहे. यामुळे जीवनाशी तडजोड अपरिहार्य होती. खूप मोठी क्रांती माझ्यानं शक्य नव्हती. यात कधी माघार, कधी हार, पराजय, जय असं टप्प्याटप्प्यानं जाणं मला भाग होतं. माझं लढाईचं शस्त्र होतं कलम, लेखणी. ही कलम हाती घेऊन मी आठवीतून सरळ एस.एस.सी., बी.ए., एम.ए., एम.फिल आणि प्राध्यापक अशी एक एक क्षेत्रं काबीज करत गेले. ही लढाई मला एकटीला लढावी लागली. ना कुणाची साथ, ना कुणाची सोबत, थकले तर ना कुणी उठवणारं, घायाळ झाले तर ना कुणी मलमपट्टी करणारं; तरीही लढत राहिले, अनेक अडथळ्यांना ‘कलम’ करत एका निश्चित ‘कलाम’पर्यंत पोहोचले.*



माझी परीक्षा फक्त पाच दिवसांवर आलेली होती. मधले आठ दिवस अभ्यासात अंतर पडलेलं होतं. प्रत्येक विषय एकदा तरी पुन्हा डोळ्याखालून घालायला हवा होता. अभ्यास करायला वेळ मिळाला नव्हता मनावर खूप ताण आला होता. दुपारी, रात्री वाचून वाचून माझे डोळे अगदी तारवटून गेले होते.

मी रिसीट आणायला शाळेत गेले. समोरून घोडके बाई येत होत्या. मला पाहताच त्या म्हणाल्या, ''अगं....''

पण मी त्यांना ठामपणाने म्हणाले, ''बाई, माझा अभ्यास होईल. परीक्षेपर्यंत अजून अकरा दिवस आहेत. मी परीक्षा देते. जेवढे विषय सुटतील तेवढं बरं...''

''ठीक आहे, कौतुक आहे तुझं, यशस्वी हो.'' असं म्हणत त्यांनी माझ्या डोक्यावर हात ठेवला. बाळाबद्दल, तब्येतीबद्दल विचारलं. त्यांच्या डोळ्यांत पाणी तरारलं होतं.

मी बाईंच्या पायाला हात लावून नमस्कार केला आणि बाहेर पडले.

आता फूफूनी एक नवाच वैताग सुरू केला. वाचायला घेतलं की पुस्तकच हिसकावून घेऊ लागल्या. ''जच्चा बाई, वाचने के नई, अक्याको लई तरास हुतय, बच्चे के अक्या जिगट हुतंई.'' बाकी सगळं काम मी करत होते ते चालत होतं आणि मी वाचताना ''अक्या जिगट हुतंई'' म्हणत पुळका यायला लागला. मी दुपारी मच्छरदाणीच्या आत आणि रात्री मधलं दार लावून दिव्याखाली वाचू लागले.

माझा परीक्षेचा नंबर नागोजीराव पाटणकर आणि काही विषयांचा नेहरू विद्यालयात असा होता. ऑक्टोबरची सहा तारीख उजाडली, प्रचंड हुरहुर वाटत होती, झोक्यावरून खाली येताना पोटात जसं होतं तसंच मला पहाटेपासून व्हायला लागलं, डोकं फार दुखत होतं, अंगात ताप भरू लागला पण परीक्षेला जायचंच हा निर्धार अटळ होता.

माझी अंघोळ उरकली, चहा-चपाती जात नव्हती तशीच खाल्ली. फक्त 'ह्यांना' सांगितलं. ''मेरी आज परीक्षा हाय, मैं दस बजे जानेवाली.''

फुफू, मा माजघरात होत्या. लगबगीनं बाहेर आल्या.

''क्या कने लगीया इने?'' मा नं ह्यांना प्रश्न केला.

''आज उसकी परीक्षा हाय उने चलीया.'' ह्यांनी उत्तर दिलं.

''हौर बच्चा? कौसा आनेवाली? रोने लग्या तो उसे कोन दूध पिलाने के, मैं हात लगाने की नई, वैसा रोते पडने दे.'' मा नं प्रश्न विचारून आपली भूमिकाच मांडली. ''ऐसा का देके नई, बाई हमीनं, बच्चे की माँ हाय क्या सैतानी? क्या प्यारबीर हाय क्या नई?'' फूफूनी आपल्या हनुवटीला हात लावत आणखीन प्रश्नांची पुस्ती जोडली. चेहऱ्यावर 'आता ही बाई पार वाया गेली....' असा भाव पसरला होता.

मी वाद घालतच नव्हते, आत्ताही गप्प बसले. मला दहाला जाण्याची घाई होती. मला काही ऐकू येत नाही असा माझा अविर्भाव ठेवणं त्या क्षणी जरूर होतं, ते मी केलं.

मी जरा शांत बसून बाळाला पाजलं. पुन्हा एकदा रिसीट, लिखाणाचं साहित्य व्यवस्थित बघून पिशवीत ठेवलं. जपून ठेवलेल्या पैशातले चाळीस रुपये होते, ते छोट्या पर्समध्ये ठेवून पर्स ब्लाऊजमध्ये ठेवली. रोज रिक्षाला लागणार होते. तेव्हा दीड रुपयानं रिक्षाचं मिटर सुरुवात होत असे.

अंगातला ताप बराच वाढला होता. अशक्तपणानं ताठ उभं राहणं जमेना. नंतर तीन तास बसायचं होतं, कमरेला नेटच लागेना, मग सहा वारी सुती साडी घेतली, दुप्पट घडी करून त्याचा पट्टा केला, एक नाडी घेतली आणि कमरेला तो पट्टा घट्ट गुंडाळला, त्यावर नाडी गुंडाळून बांधली त्यामुळं कमरेला जरा नेट आला. अगदीच लटकी पडल्यासारखी वाटत होती ते जरा कमी वाटू लागलं. त्यावर पांढरी, एकुलती एक जपून ठेवलेली माझी ब्रासोची साडी नेसली. पांढरा पोलका घातला, डोक्याला घट्ट रूमाल बांधून त्यावर पदर घेतला आणि अंगात स्वेटर घातला.

मनात अनेक भावनांचा कढ दाटून आला. आनंद, दु:ख अशा संमिश्र भावनांनी छातीत गलबलत होतं. आज माझी केवळ मॅट्रिकची परीक्षा नव्हती. तर ही परीक्षा माझं नशीब, नियती आणि माणसांनी चालवलेल्या अन्यायाशी मुकाबला करण्याची होती, ही परीक्षा होती माझ्या बुद्धीची, एका ध्येयाप्रत जाण्यासाठी उचललेलं हे माझं उंबरठ्याबाहेरचं पहिलं पाऊल होतं. या कसोटीला उतरले तरच माझ्यासाठी प्रकाशाची पुढची दारं उघडणार होती, मी ज्ञानप्राप्तीची वाट धरली, या ज्ञानप्रकाशात माझं भविष्य मला उजळून टाकायचं होतं, माझ्या आयुष्यातला अंधार या ज्ञानज्योतीनंच मला दूर सारायचा होता मी मनात म्हणाले, ''परमेश्वरा मला शक्ती दे.''

मी 'ह्यांच्या' पायाला हात लावला, फूफूच्या, मा च्या पायांना स्पर्श केला, सगळीच स्तब्ध होती. आपण हिला अडवू शकलो नाही, न भांडता हिनं आपलं तेच खरं केलं अशी हरल्याची भावना मात्र सर्वांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होती. मी आत जाऊन बाळाला पाहिलं, शांत झोपलं होतं, बरं झालं, नाहीतर पाय जड झाले असते. ''मैं जातीव.'' असं म्हणाले आणि घरातून बाहेर पाय टाकला.

किती वर्षानंतर मी विद्यार्थिनी म्हणून पुन्हा बेंचवर बसले होते. तापानं अंग थरथरत होतं. पण खूप आनंद वाटत होता. केव्हा एकदा बेल होते अशी उत्सुकता वाटत होती. मी बेंचची कडा घट्ट धरून शांत होण्याचा प्रयत्न करत होते.

आसपास काही मुलं-मुली माझ्या अवताराकडं बघून हसत होती. डोक्याला कापड, डोळ्यात काजळ, अंगभर, डोकीवर पदर, स्वेटर असा अवतार तर वेगळाच दिसत होता, शिवाय त्यांच्यात मोठीही दिसत होते. मी त्यांना नजरेआड करीत मन एकाग्र करण्याचा प्रयत्न करत होते.



एकदाची बेल झाली सुपरवायझर वर्गात आले, प्रश्नपत्रिका वाटल्या. मी थरथरत्या हातानं प्रश्नपत्रिका घेतली. आनंदाश्रूंनी डोळे पुन्हा पुन्हा भरून येत होते. मी प्रश्नपत्रिका वाचली, मला फार आनंद वाटला, मी अभ्यास केल्याचं सार्थक झालं असं वाटलं. पण लिहायला सुरुवात करते तर थरथरत्या बोटात मला नीट पेनही धरता येईना. मग थरथरणारा उजवा हात डाव्या हातानं धरला आणि लिहायचा प्रयत्न करत होते. मला कळलेच नाही माझी थरथर केव्हा थांबली, डावा हात कधी सुटला? जणू मी या जगात नव्हतेच. प्रश्न आणि त्याचं उत्तर यात मी पार हरवून गेले. सुपरवायझरही पेज क्रमांक बघून पुरवण्या देत होते. तीन तास संपले आणि पेपर संपल्याची घंटा झाली. मी भानावर आले. मान वर करून आसपास पाहिलं, माझं अंग घामानं भिजलेलं, तितकंच मनही आनंदानं ओथंबलेलं होतं. पहिला पेपर मराठीचा, अगदीच छान गेला. पेपरपूर्वी आलेला थकवा अगदी कमी वाटू लागला होता. तापही कमी झालेला. पहिलाच पेपर चांगला लिहिता. आला आता पुढच्या पेपरबद्दल मला विश्वास वाटू लागला. लिखाणाच्या सरावाचा फायदा झाला, सगळा पेपर कव्हर करता आला.

मी रिक्षानं घरी आले. बाळाला मा नं वरचं दूध पाजलं होतं. फूफू बाळाला मांडीवर घेऊन जोजवत होत्या. अगोदर हातपाय धुऊन मी बाळाला पाजायला घेतलं. नंतर जेवले आणि पुन्हा अभ्यासाला बसले. अन्वरखालानं कशीतरी धुणंभांडी केली होती. हावाखालानंही थोडी मदत केली होती. ती आमच्या शेजारीच राहत होती, तिला मी सांगितलं होतं, ''खाला, मेरी परीक्षा होय तका तू जरा काम कर.'' तिनं मला ''करतीवं, काळजी करू नको.'' म्हटलं होतं.


स्वयंपाक तेवढा मी करत होते, बहिणी मुलींचं करत होत्या. कामाचं व्यवधान बरंच कमी करून घेतलं. बाळाला रात्री आंघोळ घालत होते.

पुढचे सगळे पेपर अपेक्षेपेक्षा चांगले गेले. अतिशय मुद्देसूद, सविस्तर उत्तरे लिहिली, अभ्यासाचं चीज झालं होतं. आता मी निकालाची उत्कंठतेनं वाट पाहू लागले.

**(मेहता पब्लिशिंग हाऊसच्या आशा आपराद लिखित 'भोगले जे दुःख त्याला...' या पुस्तकातून)**


नवं कोरं

शब्द, वाक्प्रचार आणि म्हणी यांचे अर्थानुसार संकलन




अभिनव मराठी-मराठी-इंग्रजी

**पर्याय शब्दकोश**

लेखक - वि.शं. ठकार

पृष्ठसंख्या : ९७६ । किंमत : ₹६३०

चिवड्याचं चुकतं गणित
चकली टाकते मान
करंजीचा उकळत्या तेलात
तुटतो नेमका कान
लाडू रुसून होतो टणक
शेव मऊसूत



श्रीमती कमलाबाई ओगले


दिवाळसणाच्या फराळाशी
जमत नाही का सूत?

# रुचिरा

भाग १ व २


सुगरण 'रुचिरा'चा घ्या एकदा सल्ला
रोजचा स्वयंपाकही होईल दिवाळसणासारखा..

५२वी आवृत्ती




पृष्ठसंख्या : ३८८ । किंमत : ₹२२५

२३वी आवृत्ती




पृष्ठसंख्या : ३५६ । किंमत : ₹२७५



# शारदाताईंच्या अमोघ जिद्दीची कहाणी

- विलास पंढरी

*माणूस शिक्षण घेतो रोजगारासाठी आणि तेही ठराविक वयातच...अपवादाने काही व्यक्ती मोठ्या वयात शिक्षण घेतात हौस म्हणून...पण कला शाखेच्या पदवीधर असतानाही ३५व्या वर्षी एमबीबीएस होण्याचं स्वप्न पाहणाऱ्या आणि ते पूर्ण करणाऱ्या शारदाताई हे फार विरळा उदाहरण आहे...राजेंद्र मगर आणि आशा हडप या दोन व्यक्ती साध्या उपक्रमांतून सकारात्मक राहणाऱ्या...या तीन व्यक्तींचा हा परिचय*

माणसाचा जन्म होतो, तो शिकतो, सवरतो, नोकरी-धंदा करतो, संसार करतो आणि म्हातारपण येऊन यथावकाश हे जग सोडून जातो. बहुसंख्य माणसांचे हे जीवनचक्र; पण यापेक्षा वेगळी वाट स्वीकारणारेही काही कमी नाहीत. त्यांतील काही व्यक्ती उत्तुंग तर काही स्वतःहून आडवाट स्वीकारणाऱ्या, प्रसिद्धीपासून दूर राहणाऱ्याही अनेक आहेत. अशीच वेगळी वाट निवडणाऱ्या शारदाताई बापट, आपलं जीवन सन्मार्गी लावणारे राजेंद्र मगर आणि आशाताई हडप, या तीन व्यक्तिमत्त्वांची ओळख आपण करून घेणार आहोत.

पुण्याच्या शारदा बापट. जीवनात संकटं कुणावर येत नाहीत? संकटांशी जे लढतात, जिद्द दाखवतात त्यांना दैवही साथ देतं. संकटांशी लढायची जिद्द असेल तर अशक्य ते शक्य करता येतं. ध्येयवेड्या लोकांचं जीवनच वेगळं असतं. असंच काहीसं जीवन शारदाताईंचं असून, त्यातून कुणालाही प्रेरणा मिळेल असं आहे.

वयाच्या पस्तिसाव्या वर्षी एमबीबीएस होण्याचं स्वप्न त्यांनी पाहिलं. कला शाखेतून बारावी पास असल्याने, त्यांना आता बारावी सायन्सची परीक्षा द्यावी लागणार होती. अशी दुसऱ्यांदा बारावीची परीक्षा देता येते की नाही याबद्दल कोणत्याच महाविद्यालयाला माहीत नव्हते; पण अथक प्रयत्नांनी त्यांनी परीक्षेचा मार्ग शोधला. बेचाळिसाव्या वर्षी डॉक्टर ही पदवी, त्याच दरम्यान स्त्री असूनही मिळवलेला विमान चालविण्याचा परवाना, कायद्याचे घेतलेले शिक्षण आणि शेवटी दिलेली संगीताची परीक्षा, अशा अनेक क्षेत्रांत पारंगत असलेल्या डॉ. शारदा बापट यांची जीवनकहाणी चित्तथरारक आणि प्रेरणादायी आहे.

त्यांचा स्वतःचा आणि नवऱ्याचा असा दोघांचाही व्यवसाय उत्तम चालू होता. संसारही व्यवस्थित चालू होता. एक मुलगाही होता. त्यांच्या आईला असाध्य आजाराने अनेक वर्षे पछाडले होते. अनेक डॉक्टरांना दाखवूनही काहीही उपयोग होत नव्हता. आईवर उपचार करण्यासाठी स्वतःच डॉक्टर का होऊ नये हा अनेक वर्षे मनात येणारा विचार त्यांनी वयाच्या ३५व्या वर्षी बोलून दाखवला. अडचण आल्यावर तिच्यावर मात करण्यासाठी असे आगळेवेगळे करण्याचे विचार कधीतरी प्रत्येकाच्याच मनात येतात; पण त्याची अंमलबजावणी करण्यासाठी वेगळी वाट चोखाळणारे समाजासाठी दीपस्तंभ ठरतात. अशा विचारांना वेडेपणा म्हणणारेच जास्त भेटतात. त्याप्रमाणे सगळ्यांनी, अगदी नवऱ्यानेही शारदाताईंना वेड्यात काढले; पण त्यांनी जिद्द सोडली नाही.

त्यांच्या वडिलांचा मात्र पाठिंबा मिळाला. मेडिकलला जाण्यासाठी शास्त्र शाखेतून बारावी पास होणे आवश्यक होते. बारावी पास झाल्यावर मेडिकलला प्रवेश कधीही घेता येतो, हे कायदेशीर ज्ञान त्यांच्याकडे होते; पण एमबीबीएस होण्यासाठी वयोमर्यादा आहे का, हे समजण्यासाठी त्यांना पुण्याच्या बी. जे. मेडिकलच्या डीनना अनेक वेळा भेटावे लागले आणि तशी काही अट नसल्याचे पक्के कळल्यावरच बारावी सायन्सला प्रवेश मिळवण्यासाठी त्यांनी प्रयत्न सुरू केले. तेव्हा अशी दोनदा बारावीची परीक्षा देता येत नसल्याचे बोर्डाकडून त्यांना सांगण्यात आले; पण त्यांना ते पटले नाही. बोर्डाच्या वरिष्ठांना भेटून तशी परवानगी त्यांनी मिळवली.

त्यानंतर जिथून त्या पदवीधर झाल्या होत्या, त्या पुण्याच्या नामवंत कॉलेजमध्ये चौकशीसाठी गेल्यावर असे काही करता येत नसल्याचे सांगत कॉलेजने त्यांना उडवून लावले. निराश मनःस्थितीत त्या आपल्या पूर्वीच्या हुजूरपागा शाळेत गेल्या. तिथे मात्र त्यांना जिथून त्या बारावी पास झाल्या होत्या त्या कॉलेजचे ना हरकत प्रमाणपत्र आणल्यास प्रवेश देऊ, असे सांगितले. त्यांच्या कॉलेजने असं 'ना हरकत प्रमाणपत्र' देण्यासही नकार दिला. मग कॉलेजच्या प्राचार्यांनी मध्यस्थी केल्यावरच ते मिळाले आणि पुण्याच्या हुजूरपागा शाळेत त्यांनी प्रवेश घेतला. सायन्स साईड असल्याने कॉलेजला उपस्थित राहणे अनिवार्य होते. आपले वय ३५ म्हणजे शिक्षकांच्या वयाचे, तर बरोबरचे विद्यार्थी सोळा, सतरा वयाचे. जुळवून घ्यायला थोडेसे कठीण गेले; पण असाध्य रोगाशी झगडणाऱ्या आईसाठी डॉक्टर व्हायचे ठरवले होते. त्यासाठी बारावी सायन्सला प्रवेश घेतला; पण नियतीच्या मनात वेगळेच असावे. बारावीच्या वार्षिक परीक्षेच्या दोन आठवडे आधी शारदाताईंच्या आईचे निधन झाले. ताई प्रचंड निराश झाल्या.

आता पुढे जाण्यात अर्थ नाही, असा विचार करत असतानाच पतीने धीर दिला. परीक्षा देण्यासाठी प्रोत्साहित केले. अशा मनःस्थितीत परीक्षा देऊन ७५ टक्के गुणांनी त्या पास झाल्या. कुठलेही खासगी मेडिकल कॉलेज या वयात प्रवेश देण्यास तयार नव्हते; पण 'एक दार बंद झाले तर दुसरी दहा दारे उघडतात' या उक्तीचा प्रत्यय जिद्दी शारदाताईंना वेळोवेळी येत गेला. वाडिया कॉलेजला मेडिकल कॉलेज सुरू करण्यास परवानगी मिळाली व त्यांना प्रवेशही मिळाला. परत तिथे नवीन अडचण आली. क्लिनिकल अभ्यासक्रमाला मेडिकल कौन्सिलची परवानगी मिळाली नाही. त्यामुळे अभ्यासक्रमातील शेवटची दोन वर्षे फिलिपाइन्समध्ये जाऊन पूर्ण करावी लागणार होती. इलाज नव्हता.

ताई फिलिपाइन्सला गेल्या. पहिल्या वर्षी शनिवार-रविवार सुट्टी





**शारदा बापट**



**राजेंद्र मगर**

असायची. त्याचा उपयोग त्यांनी पायलट होण्यासाठी केला. सतत ज्ञानलालसा असलेल्या ताईंनी हा कोर्सही यशस्वीपणे पूर्ण केला. त्यासाठी आवश्यक असलेल्या शेवटच्या परीक्षेत जीवघेण्या संकटाला सामोरे जावे लागले. फ्लाइंग करत असताना अचानक हवामान खराब झाले. विमान भरकटले. आता जीवन संपले, अशी भीती मनात आली; पण धीर सोडला नाही. अशात आकाशात दोन ढगांमध्ये पोकळी निर्माण झाली. ट्रॅफिक कन्ट्रोलशी संपर्क झाला आणि सुरक्षित लॅन्डिंग करता आले.

फिलिपाईन्समधील शेवटचे वर्ष खूपच कठीण होते. वर्षातील पूर्ण ३६५ दिवस उपस्थिती आवश्यक होती. एकही सुट्टी नाही. शिवाय प्रत्येक तीन दिवसांनंतर ३६ तासांची हॉस्पिटल ड्यूटी करावी लागत होती. अशा रीतीने ताई डॉक्टर झाल्या. भारतात आल्यावर डिग्री ग्राह्य होण्यासाठी एक परीक्षा द्यावी लागते. ती दिली व पास झाल्यानंतर नियमानुसार रुबी हॉल क्लिनिकला एक वर्ष इंटर्नशिप केली. त्यातही वरिष्ठ डॉक्टरांबरोबर नवीन रिसर्च सुरू केला. वेळ मिळेल तेव्हा पियानोवादन सुरू केले. काही वर्ष मेडिकल प्रॅक्टिस केल्यावर आता हेल्थ केअरवर काम सुरू केले आहे. याशिवाय शाश्वत शेती हा प्रयोग सुरू केला आहे. एक हजार देशी झाडे लावली असून, ती नैसर्गिकरीत्या वाढवण्याचे ठरवले आहे. पुन्हा जोडू न शकणारा निसर्ग आपण सातत्याने संपवत आहोत, त्यामुळे आता समाजाने एकत्र येऊन तो पुन्हा जोडण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज डॉ. शारदा बापट व्यक्त करतात. निसर्गाची स्वतःची इको सिस्टिम असते. त्यावर अनेक घटक अवलंबून असतात; मात्र माणूस त्यात हस्तक्षेप करतो. त्यातून निसर्गाचा समतोल ढासळतो. त्यामुळे ही गोष्ट आपण सगळ्यांनी मिळून थांबवली पाहिजे, असे आवाहन त्या करतात.

राजेंद्र मगर हे माझे मित्र आहेत. ते एक उद्योजक असून, त्यांची स्वतःची कंपनी आहे. आपण व्यावसायिक, गेट टुगेदरसाठी चालणाऱ्या भिश्या पाहतो. पण मगर पुस्तक भिशी चालवतात. १५ सभासद आहेत. महिन्यातून ज्यांचा नंबर लागेल त्यांच्याकडे एकदा एकत्र येतात. प्रत्येकी शंभर रुपये असे १५००रुपये जमतात. नंबर लागलेल्या सभासदाने १५०० रुपयांची पुस्तकं आणायची, वाचायची व पुढील मीटिंगमध्ये त्यांतील महत्त्वाची माहिती सांगायची, असे साधारण स्वरूप असते. त्यामुळे सर्वांनाच वाचनाची आवड निर्माण झाली आहे व चारचौघात बोलण्याचीही सवय झाली आहे. शिवाय प्रत्येकाच्या घरी, विशेषतः मुलांनाही वाचनाची सवय लागली आहे. वर्षभरानंतर काही हवी असलेली पुस्तके सोडून सर्व पुस्तके सार्वजनिक वाचनालयाला दान केली जातात.

तिसरे उदाहरण आहे, आशा हडप यांचे. त्या शिक्षिका म्हणून निवृत्त झाल्या आहेत. त्यांना आदर्श शिक्षिका पुरस्कार, यशस्वी मुख्याध्यापिका पुरस्कारांसहित विविध पुरस्कार मिळाले आहेत. अनेक गरीब मुलांना शैक्षणिक साहित्य, कपड्यांची मदत असे सामाजिक कार्यही त्या करतात. आता त्यांचे वय ७५ आहे. दहा महिलांचा त्यांचा ग्रुप आहे. गेली दहा वर्षे त्या भजन, कीर्तन आणि मंगळागौरीचे कार्यक्रम करतात. अस्तंगत होत चाललेल्या धार्मिक व सामाजिक परंपरा जिवंत ठेवण्याचे, लोकांपर्यंत नेण्याचे महत्त्वपूर्ण कार्य हा ग्रुप करतो आहे. त्यातून अर्थार्जनही होतेच; पण अर्थार्जन हा मुख्य उद्देश नसल्याचे आशाताई सांगतात. मंगळागौरीच्या निमित्ताने खेळल्या जाणाऱ्या खेळांमुळे चांगला व्यायाम होतो. ग्रुपमधील बहुसंख्य महिला पन्नाशीच्या पुढील असून, या खेळांमुळे एकदम तंदुरुस्त आहेत.

माझ्या मुलांचाही जाता जाता उल्लेख करायला हरकत नाही. मुलगा इंजिनिअर असून, व्यावसायिक आहे. प्राण्यांबद्दल त्याला खूप प्रेम आहे. आजूबाजूला, रस्त्यावर जखमी झालेल्या कुत्र्या-मांजरांना तो घरी घेऊन येतो, उपचार करतो, आवश्यकता असेल तर डॉक्टरकडे घेऊन जातो. पक्षी व प्राण्यांसाठी त्याने पाण्याची सोय केली आहे. मुलगी आय. टी. कंपनीत कामाला असल्याने शनिवार-रविवार सुट्टी असली की बांधकामावर काम करणाऱ्या मजुरांच्या मुलांना ती दोन तास शिकवत असे. त्यांच्याकडे काही कागदपत्रे नसल्याने व पालकही निरुत्साही असल्याने शाळेत प्रवेश घेणे शक्य होत नसे. अशा अनेक मुलांना तिने मदत केली आहे. मजुरांनाही शिक्षणाचे महत्त्व समजावून सांगून त्यांच्यात जागृती निर्माण करीत असे. या मुलांत अनेक हुशार मुले असल्याचे मीही पाहिले आहे. मुलीच्या लग्नानंतर मात्र हे काम बंद पडले आहे.


शारदाताईंचे उदाहरण खूपच प्रेरक, जीवनात संकटांशी कसे लढावे सांगणारे आहे. अन्य उपक्रम छोटेसे असले तरी त्यांचंही वेगळं महत्त्व आहेच.

vilaspandhari@gmail.com



**आशा हडप यांचा ग्रुप मंगळागौरीचे खेळ सादर करताना**

## नवं कोरं




साहित्य क्षेत्रावर अचाट प्रभुत्व असणाऱ्या,
वसंत जोशी यांना भेटलेल्या
व्यासंगी व्यक्तिमत्त्वांचे जीवनसार...


### अशी माणसे येती

लेखक - वसंत जोशी

पृष्ठसंख्या : १४४
किंमत : ₹१९०

Book Available

---




मुंग्यांच्या वारूळासम जगणाऱ्या,
मातंग समाजाच्या विदारक जगण्याला
प्रकाशझोतात आणणारी सामाजिक कादंबरी


### वारूळ

लेखक - बाबाराव मुसळे

पृष्ठसंख्या : ४७२
किंमत : ₹५९५

Book Available

---




वाचकाला कोड्यात टाकणारा विलक्षण सस्पेन्स फॅक्टर
आणि भयनिर्मितीचं अफाट कौशल्य असणारा
मराठी गूढकथेचा नवा बाज...

### मगरडोह

लेखक - शशिकांत काळे

पृष्ठसंख्या : १७२
किंमत : ₹२००

Book Available



# दिव्यगुणी

**- सुधा मेनन आणि व्ही.आर.फिरोज**

*अपंगत्व हा एक शाप मानला जातो; पण त्या शापाचं उ:शापात रूपांतर करणारे काही अपंग आहेत. अशाच अपंगांच्या प्रेरणादायक कथा संकलित केल्या आहेत 'दिव्यगुणी' या पुस्तकात. यातील काही जणांनी अपंगत्वावर मात तर केलीच; पण समाजाचं ऋणही फेडलं. तर अशा समाजाचं ऋण फेडणाऱ्या या काही दिव्यगुणींच्या कार्याची ही ओळख...*

**अंकित जिंदाल** (वयाच्या चौदाव्या वर्षी अंकितला रेटिन्टिस पिग्मेन्टोसा (दृष्टिपटलातील रंगाच्या ऱ्हासामुळे होणारा आनुवंशिक आजार) हा डोळ्यांचा दुर्मीळ आजार झाला. ९० टक्के दृष्टी त्याने गमावली आहे.)

सन २००७ मध्ये मी, रमा चारी आणि इतर दोघं-त्यातील एक साक्षी ब्रूटा, ज्या नॅशनल सेंटर फॉर प्रमोशन ऑफ एम्प्लॉयमेंट फॉर डिसेबल पर्सन (एनसीपी इडीपी) इथे रमांच्या सहकारी होत्या आणि दुसरी व्यक्ती विजय कृष्णस्वामी, माझा सहकारी, जो कानाने अधू आहे, आम्ही चौघांनी मिळून एक स्वयंसेवी संस्था स्थापन केली. डायव्हर्सिटी ॲन्ड इक्वल अपॉर्च्युनिटी सेंटर (डीइओसी), कामाच्या ठिकाणी सर्वसमावेशक वातावरणाची निर्मिती करणे, हाच या संस्थेचा उद्देश होता. कामाच्या ठिकाणी आमच्या वाट्याला येणाऱ्या निराशा, उपेक्षा आणि भेदभाव या साऱ्यांचा एक अपंग व्यक्ती म्हणून मीही अनुभव घेतला होता. यामुळेच कामाच्या ठिकाणचं वातावरण सर्वसमावेशक करण्यासाठी म्हणजेच आमच्यासाठी अनुकूल करण्यासाठी नेमकं काय करायला हवं ते मला माहीत होतं. माझ्या घरचे आणि मित्रमंडळी नेहमीच माझ्यासोबत खंबीरपणे उभे राहून मला आधार द्यायचे, यामुळेच तसं पाहिलं तर तुलनात्मकदृष्ट्या माझा प्रवास बराच सुसह्य झाला; पण मला कल्पना आहे की, बहुसंख्य अपंग व्यक्तींच्या बाबतीत असं होतंच असं नाही. माझ्या वाईट दिवसांमध्ये मला मदतीचा हात देऊन सावरणाऱ्या समाजासाठी मला काहीतरी करण्याची इच्छा होती. काही समविचारी लोकांसमवेत डीइओसी स्थापन करून काम करणे हा उत्तम मार्ग आहे. आम्ही ठरवलं की, औद्योगिक संस्था, अपंगांसाठी काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्था आणि अपंग व्यक्तींच्या प्रश्नाबाबत काम करणाऱ्या सल्लागार संस्था यांच्यामध्ये समन्वय साधणाऱ्या पुलाचे काम आम्ही करू शकतो. यानंतरच्या आयुष्यातील काही वर्षांचा हा काळ भावनिकदृष्ट्या खूपच समाधानकारक होता, कारण या कालावधीतच डीइओसी संस्था म्हणून विकसित झाली. अशी संस्था जिने कंपन्यांना सर्वसमावेशकता आणण्याकरता धोरणात्मक विकास करणे आणि समान संधीच्या धोरणाचे पुनरावलोकन करून ती मांडणे तसेच त्यांच्याकडून त्यांच्या सुलभ अंमलबजावणीचा अहवाल तयार करण्याबाबत सल्ला देणे आणि याबाबत प्रशिक्षण देणे यांसारखी महत्त्वाची कामे केली.

**हेलन केलर पुरस्कार स्वीकारताना अंकित जिंदाल**



आमच्या सुरुवातीच्या काही प्रकल्पांपैकी एक होता, संवाद प्रकल्प (प्रोजेक्ट कम्युनिकेट). यामध्ये आम्ही आयटी क्षेत्रातील माफ्सिस या कंपनीसोबत जोडले गेलो होतो. आम्ही त्यांना सांगितलं की, बेंगळुरुजवळच्या शहरांमधून आम्ही ४० अपंग व्यक्तींना दोन महिन्यांचं निवासी प्रशिक्षण देऊ आणि काम करण्यायोग्य बनवू. साठ दिवसांच्या प्रशिक्षणानंतर माफ्सिस कंपनीने ३८ जणांना बिझनेस प्रोसेस एक्झिक्युटिव्ह म्हणून नेमलं. बाकी दोघं स्वत:च गहाळ झाले. याच प्रकाराने अजून तीन बॅचना प्रशिक्षण दिल्यानंतर आम्ही आमचं लक्ष प्रशिक्षक तयार करण्यावर केंद्रित केलं. अपंगांसाठी काम करणाऱ्या बऱ्याचशा संस्थांना याबाबत तयार केलं. आम्ही माफ्सिसच्या सहयोगाने 'ट्रेन द ट्रेनर' (प्रशिक्षकांना प्रशिक्षित करा) हा प्रशिक्षण कार्यक्रम तयार केला आणि त्यापुढे हा प्रशिक्षण कार्यक्रम राबवण्याकरता सामाजिक संस्थेकडे सुपुर्द केला.

दरम्यानच्या काळात डीइओसीला असं जाणवलं की, अपंगांच्या रोजगारासंदर्भात केवळ कंपन्यांनाच नाही तर स्वयंसेवी संस्थांनासुद्धा पुरेशी माहिती नसते. सन २००७ मध्ये डीइओसीने भारतीय औद्योगिक क्षेत्रासोबत एका प्रकल्पावर काम सुरू केलं; यामध्ये भारतातील औद्योगिक क्षेत्रं अधिक सर्वसमावेशक आणि संवेदनशील कशी करता येतील याबाबत जागृतीचा कार्यक्रम हाती घेतला. 'व्हॅल्यूज रूट टू बिझनेस सक्सेस : द व्हाय ॲन्ड हाऊ ऑफ एम्प्लॉइंग पर्सन्स विथ डिसॅबिलिटीज' या नावाचं अपंग व्यक्तींना कामावर ठेवण्याबाबतचे सर्व तपशील असलेलं भारतातील पहिलं हॅन्डबुक तयार केलं. माझ्या जीवनप्रवासातला या पुस्तकाच्या सहलेखनाचा हा अनुभव मी अगदी जपून ठेवलाय. यासाठी दोन वर्षे अथक मेहनत घ्यावी लागली, या क्षेत्रात काम करणारे अनेक तज्ज्ञ आणि संस्थांशी समन्वय साधला; पण त्यासाठी केलेली मेहनत सार्थकी लागली; कारण ज्यांना अपंग व्यक्तींना रोजगार द्यायचा आहे, त्यांच्यासाठी या एकाच पुस्तकात सर्व संदर्भ उपलब्ध आहेत.

**अश्विन कार्तिक**

जन्मत:च प्रमस्तिष्क घात- चारही अंग अपंग (सेरेब्रल पाल्सी-क्वाड्रिप्लेजिक) आजार.

माझं स्वप्न पूर्ण करण्यासाठी मला ज्यांनी मदत केली आणि ते घडवून आणलं, अशा सहृदय लोकांना मी कधीच विसरणार नाही. जर आई आणि भारत नसते व त्यांचा माझ्यावर विश्वास नसता तर आज मी जिथं पोहोचलोय तिथे कधीच पोहोचलो नसतो. माझे वडील वारले तेव्हा आईने नोकरी करायला सुरुवात केली कारण तिला तिच्या दोन मुलांना वाढवायचं होतं. तोपर्यंत ती पूर्णवेळ गृहिणी होती, त्यानंतर मात्र तिने गृहिणीची तसेच कर्तव्यदक्ष व्यावसायिक अशा दोन्ही भूमिका अगदी व्यवस्थित पार पाडल्या. जर भारत माझ्या आयुष्यात आला नसता तर माझं आयुष्य असं नसतं. बहुतेक लोक इतरांसाठी त्यांचा एक क्षणदेखील देणार नाहीत; पण भारतने माझा अभ्यासक्रम पूर्ण व्हावा म्हणून बारावीनंतर चार वर्षे स्वत:च्या शिक्षणालाच स्थगित करून टाकलं आणि

आम्ही राहत असलेल्या चिकमंगळूर या आमच्या छोट्याशा शहरात माझी सावली बनून राहिला. इंजिनिअरिंगच्या पहिल्या वर्षी तो मला माझ्या वर्गात घेऊन जायचा आणि स्वत: वर्गाबाहेर उभं राहून टिपणं काढायचा कारण मला टिपणं काढणं शक्य नव्हतं. मला इंजिनिअरिंगच्या अभ्यासक्रमातला ड्रॉइंग हा विषय जमत नाही म्हणून मी दु:खी असताना, तो विषय शिकवणाऱ्या सरांनी मला त्यांच्या पंखाखाली घेतलं. मला ड्रॉइंगची संकल्पना व्यवस्थित समजावी म्हणून त्यांनी जास्तीचा वेळ दिला. एकदा मला ते कसं करायचं ते समजलं तेव्हा सर म्हणाले की, आता तू हेच भारतला शिकव म्हणजे परीक्षेच्या वेळी तुझा लेखनिक म्हणून तो ते बरोबर करू शकेल. मला आठवतं की, मी माझ्या डोक्यात तयार असल्याबरहुकूम ड्रॉइंग काढून होत नाही तोपर्यंत भारतला, अगदी मध्यरात्र झाली तरीही मी झोपू द्यायचो नाही!

**जॉर्ज अब्राहम**

दृष्टी अधू

सन २००२ मध्ये मी स्कोअर (सोसायटी फॉर कम्युनिकेशन ॲन्ड रिसर्च) म्हणजेच दळणवळण आणि संशोधन संस्था स्थापन केली. ही स्वंयसेवी संस्था अंधांसाठी विविध प्रकल्प राबवण्यासाठी कटिबद्ध आहे जेणे करून अंधांना विकसित होण्याची, पुनर्वसनाची आणि समाजात सामावण्याची संधी प्राप्त होईल.

आपल्या देशात दृष्टीने अधू असलेल्यांकडे नेहमी दयेने पाहिलं जातं आणि त्यांना दान दिलं जातं. त्यांच्या क्षमता, कौशल्ये पाहण्याऐवजी त्यांच्या मर्यादांकडे पाहिलं जातं, हे दु:खद आहे. देशाच्या विकासात हातभार लावण्याची क्षमता आणि सामर्थ्य असलेले मनुष्यबळ म्हणून पाहण्याऐवजी बरेचसे लोक त्यांना जबाबदारी म्हणून पाहतात आणि समाजाच्या मुख्य प्रवाहापासून त्यांना अलिप्त ठेवलं जातं. मी जेव्हा स्कोअर संस्था स्थापन केली तेव्हा सुरुवातीला अंधत्वाबद्दलची ही विचारसरणी बदलायची होती आणि त्यातूनच पुढे 'आयवे' प्रकल्पाचा उदय झाला. या अंतर्गत अंधत्वासह आयुष्य जगतानाची सर्व माहिती या एकाच ठिकाणी उपलब्ध करून दिलेली आहे. यामध्ये अंधांना समर्पित हेल्पलाइन, रेडिओ कार्यक्रम, वेबसाइट, एसएमएस सूचना, कार्यशाळा आणि ऑडिओ बुक (बोलकी पुस्तकं) या सर्वांची सुरुवात केलेली आहे.

भारतामध्ये १६ दशलक्षाहून अधिक अंध आणि २८ दशलक्षाहून अधिक अधू दृष्टी असलेले लोक आहेत. ज्यांना शक्यतो अलिप्त ठेवलं जातं. आयवे त्यांच्या समान अधिकार, जबाबदाऱ्या आणि समान संधीकरता कार्य करत आहे, जेणे करून त्यांनाही सुखासमाधानाने, स्वावलंबी, आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या निर्मितीक्षम जीवन जगता येईल.

आम्ही दररोज दृष्टीने अधू असलेल्यांच्या बाबतीतला पक्षपात कमी करण्याचा प्रयत्न करतोय. त्यांना ज्ञान आणि माहितीने सक्षम करण्यासाठीही प्रयत्नशील आहोत, जेणे करून त्यांना मानाने जीवन जगता येईल आणि त्याच बरोबर ते समाजाचा जबाबदार घटक बनतील. आयवेकडे दररोज त्रासलेल्या अंधांच्या येणारे फोन तसेच ई-मेलची संख्या ऐकून तुम्हाला आश्चर्य वाटेल. या व्यक्तींना आम्ही आमच्या परीने उत्तम समुपदेशन आणि मार्गदर्शन करतो.



जॉर्ज अब्राहम

परंतु हजारो अंध आपल्या जीवनात काहीतरी अधिक मिळवण्यासाठी प्रेरित आणि उत्साहित आहेत, हेही तितकंच खरं आहे. देवाकडून विकलांगता मिळते; परंतु अपंगत्व मानवाकडून दिलं जातं. आपली स्वप्नं प्रत्यक्षात आणण्याकरता विकलांगतेला अडथळा होऊ द्यायचा की नाही, हे सर्वस्वी आपल्यावर अवलंबून असतं. 'आयवे'मध्ये आमच्या कामाचा भाग म्हणून आम्ही विविध भागधारक जसे की नियोजन आयोग आणि शासन यांना सल्ले देतो आणि त्यांच्यामध्ये जाणीव जागृती करतो. जेणे करून लोकांचा अंधांकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलेल. जेव्हा आपण विकलांग व्यक्ती देशाचा सक्षम स्रोत आहेत असं बोलण्यास सुरुवात करू तेव्हा शासन, नियोजन आयोग, मंत्रालय आणि अगदी पालकसुद्धा आपल्या पाल्यात गुंतवणूक करण्यास सुरुवात करतील. जेव्हा तुम्ही लोकांमध्ये गुंतवणूक करता तेव्हा मूळ अपेक्षा परतावा मिळण्याची असते; पण तेच तुम्ही जेव्हा दान देता तेव्हा तुम्ही कोणत्याही प्रकारच्या परताव्याची अपेक्षा करत नाही. बहुतांश लोकांना या परताव्याच्या अपेक्षांचं मूल्य लक्षातच नाही आणि सर्वसाधारण लोकांची वृत्ती असते की, शेवटी तो आंधळा आहे, तो काय करू शकेल? हे बदललंच पाहिजे.

अंध काहीच करू शकत नाही, हा अंधविश्वास वा गैरसमज बदलण्यासाठी आम्ही एक प्रकल्प केला, यशस्वी अंध व्यक्तींबद्दलची 'नजर या नजरिया' या नावाची १६ भागांची मालिका दूरदर्शनवर सादर केली. प्रत्येक भागाच्या प्रक्षेपणानंतर आमच्यावर ई-मेल आणि फोन कॉलचा वर्षाव झाला. प्रत्येकाचं म्हणणं होतं की, अंध व्यक्ती त्यांच्या आयुष्यात इतक्या असामान्य गोष्टी करू शकतात हे पाहून आश्चर्य वाटलं.

आता स्कोअर आणि आयवे या दोन्ही संस्था व्यवस्थित स्थापन झाल्या आहेत आणि त्यांचे कामकाज सुरळीत सुरू आहे; तेव्हा मला आयुष्यात मी आणखी काहीतरी केलं पाहिजे, असं वाटायला लागलंय. संस्था स्थापन करणं आणि त्या व्यवस्थित चालवणं, कर्मचाऱ्यांचे वेतन आदी सर्व गोष्टींसाठी निधी उभारणं या सर्व कामांमध्ये मी बरीच वर्षे अडकून पडलो होतो; पण आता मला जाणवतंय की, या सर्वांमध्ये अडकून पडल्याने इतर क्षेत्रांत मला जे काही करायचं होतं त्यातल्या निम्म्या गोष्टी करता आल्या नाहीत.

**जावेद अबिदि**

(जन्मत:च कमरेजवळ गाठ होती. काही वर्षांनी त्या गाठीचं

ऑपरेशन केल्यावर जावेदना वयाच्या १५व्या वर्षी व्हीलचेअर वापरायला सुरुवात करावी लागली.)

सन १९९२ ते १९९७ दरम्यान मी राजीव गांधी फाउंडेशनमध्ये सेवेत होतो. तोपर्यंत कायद्याने अपंगांसाठी सार्वजनिक क्षेत्रात रोजगार मिळणे शक्य झाले होते; परंतु झपाट्याने विकसित होणाऱ्या खासगी क्षेत्रात अशी काही व्यवस्थाच उपलब्ध नव्हती. त्यानंतर खासगी क्षेत्राशी समन्वय साधून, त्यांना प्रोत्साहन देऊन अपंगांना रोजगार मिळवून देण्यावर लक्ष केंद्रित करणारी तसेच त्यांच्यावर लक्ष ठेवून असणाऱ्या संस्थेची कल्पना पुढे आली. अशा प्रकारे नॅशनल सेंटर फॉर प्रमोशन ऑफ एम्प्लॉयमेंट फॉर डिसेबल पीपल (एनसीपीइडीपी) या संस्थेचा जन्म झाला.

एनसीपीइडीपी संस्था १९९७ मध्ये स्वतंत्र संस्था म्हणून स्थापन झाली. या संस्थेला पहिली दोन वर्षे फाउंडेशनकडून वित्तपुरवठा होईल आणि त्यानंतर मात्र ती स्वतंत्रपणे वाढेल असं ठरलं. श्रीमती सोनिया गांधी या कामाबद्दल इतक्या कटिबद्ध होत्या की, त्यांनी या संस्थेचं पहिलं अध्यक्षपद स्वीकारण्याचं मान्य केलं. मीसुद्धा संस्थापक विश्वस्तांपैकी एक होतो; पण १९९७ मध्ये मी कार्यकारी संचालक म्हणून सूत्रं हाती घेतली. हा १७ वर्षांचा प्रदीर्घ प्रवास असून संघर्ष, विजय आणि काही पराभव यांनी तो खचून भरलेला आहे. जरी अनंत अडचणी आल्या तरी हा प्रवास महत्त्वपूर्ण आहे. या दरम्यान आम्ही हाती घेतलेल्या कामाचा बराचसा भाग म्हणजे शासकीय धोरणांच्या चौकटीमधील त्रुटी शोधायच्या आणि अपंगांना या देशात त्यांचे अधिकार मिळावेत म्हणून शासकीय धोरणांमध्ये योग्य ते बदल घडवून आणायचे हा होता.

आम्ही शासकीय अधिकारी, उद्योग नेतृत्व आणि देशातील कानाकोपऱ्यांतील अपंगांचे विविध संघ यांच्यासोबत संबंध प्रस्थापित करून एनसीपीइडीपीला वाढवलं. प्रत्येक टप्प्यावर अपंगांच्या क्षेत्रात ज्या प्राप्ती झाल्या त्यासाठी त्यांनी अत्यंत महत्त्वाची भूमिका पार पाडली आहे. आमचं लक्ष केंद्रित ठेवणं अत्यावश्यक होतं म्हणून आम्ही ठरवलं की, संयुक्त राष्ट्रसंघाने घोषित केलेल्या अपंग दिनी म्हणजेच ३ डिसेंबरला अपंग व्यक्तींचं यश साजरं करायचं आणि भविष्यातील वाटचालीची कार्यक्रमपत्रिका निश्चित करायची. व्यक्ती आणि संस्थांना त्यांच्या अपंगांच्या प्रगतीसाठी त्यांनी दिलेल्या योगदानाचा गौरव करण्यासाठी एनसीपीइडीपी हेलन केलर पुरस्कार देण्यात येतो. हा पुरस्कार केवळ माझ्यासाठीच नाही तर या क्षेत्रात काम करणाऱ्यांसाठी आनंदाचा स्रोत आहे.

दरम्यानच्या काळात १९९५चा कायदा या १५ वर्षांच्या कालावधीनंतर अनावश्यक ठरला आहे. युपीए सरकारच्या कार्यकालावधीमध्ये हा जुना कायदा देशाच्या आत्ताच्या परिस्थितीमध्ये अपंगांसाठी काहीही उपयोगाचा नाही असं सांगितलं.

मंत्र्यांना हे पटवून देण्यासाठी सात महिने लागले. त्यानंतर अभ्यास करण्याकरता एक समिती नेमण्यात आली; या समितीने नवीन मसुदा तयार करण्यासाठी दोन वर्षे घेतली. त्यानंतर सरकारने मसुद्याला अंतिम स्वरूप देण्यासाठी आणखी एक वर्ष घेतलं आणि मग ते सल्ला-मसलतीसाठी विविध मंत्रालये तसेच राज्यांमध्ये पाठवलं. अपंगांसंबंधित



**जावेद अबिदी**

नवीन कायदा आता कॅबिनेटसमोर प्रलंबित आहे आणि तिथे मान्यता मिळाल्यावर तो संसदेत जाईल.

या संपूर्ण प्रक्रियेमध्ये एनसीपीइडीपीचा सुरुवातीपासून म्हणजे समितीचे सदस्य होणं, कागदपत्रं सादर करणं, देशभर विचारविनिमय घडवून आणणं, आमच्या स्वत:च्या ज्ञानाचा पाया विस्तारणं आणि मानवी दृष्टिकोनातून जितक्या आग्रहीपणे मुद्दे मांडणे शक्य आहे तितक्या आग्रहाने मांडणं, या सर्वांमध्ये अगदी जवळून सहभाग आहे; परंतु इतकी सारी मेहनत घेऊनही कधी कामं होतात तर कधी नाही. संयुक्त राष्ट्रसंघाचे अपंग व्यक्तींच्या अधिकाराबाबतचे संकेत अंगीकारणारा भारत हा सातवा देश आहे. पहिल्या काही महत्त्वाच्या आणि जबाबदार देशांपैकी एक आणि आता आपले हे आंतरराष्ट्रीय दायित्व आहे. तरीही ही बाब स्पष्ट करणारी धोरणं आवश्यकच आहेत. जेणे करून कुठेही कच्चा दुवा राहणार नाही. त्याच बरोबर सर्वसमावेशक कायदे आणि धोरणे काही मर्यादेपर्यंतच चांगले असतात; त्यानंतर विविध विभाग/मंत्रालयांमधून तळागाळापर्यंत कायद्याची कशा प्रकारे अंमलबजावणी होते हे पाहणं निकडीचं ठरतं. आतापर्यंत आमच्या अभ्यासात असं दिसून आलं आहे की, एकूण १६ मंत्रालयांचा अपंगांच्या जीवनावर थेट परिणाम होतो आणि आम्ही त्यांच्यासोबत काम करण्यास सुरुवात केली आहे. जेणे करून अपंगांच्या बाबतील धोरणांविषयी त्यांच्यात जाणीव जागृती करता येईल. जाणीव जागृतीची व्याख्याने, फलक मोहिमा किंवा उच्च पातळीवरील संमेलने, अधिवेशने इत्यादींनी जितका बदल घडून येणार नाही त्यापेक्षा अधिक कायदे आणि धोरणांमार्फत घडून येईल.

अपंगांच्या अधिकारांबाबत भारत अजूनही नवजात अर्भकाच्या पातळीवर आहे. आम्ही आत्ताशी कुठे अपंगत्वाकडे गांभीर्याने पाहायला सुरुवात केली आहे आणि सध्या माझी इतकीच इच्छा आहे की, अपंगांसाठीचा नवीन कायदा लवकरात लवकर मंजूर व्हावा. आपल्याला ५०-६० धोरणांची आवश्यकता आहे; असं झाल्यास खरोखरच आपल्याला अपंगांचं जीवनमान उंचावण्याची इच्छा असल्याचं आपल्या कृतीतून दिसून येईल.

अपंगांचा शासकीय जनगणनेमध्ये समावेश करून घेण्यासाठी

आम्हाला किती झगडावं लागलं, हे मला चांगलंच आठवतंय. कारण १९९० पर्यंतच्या आपल्या सर्व जनगणनेमध्ये अपंगांचा कधीच उल्लेखही केलेला नव्हता किंवा त्यांचं अस्तित्वच मान्य केलं गेलं नव्हतं. सन १९९८ मध्ये जनगणना समितीला आम्ही लेखी निवेदन दिलं की, याचा पुढील २००१ च्या जनगणनेत समावेश करण्यात यावा. पुढील जनगणनेत अपंगत्वाच्या प्रश्नाचा आम्ही समावेश करणार नाही असं उत्तर आल्यानं मी भयचकित झालो. सन २००० मध्ये आम्ही रस्त्यावर उतरून युद्धच पुकारलं, सातत्याने सहा महिने आम्ही आमच्या मागण्यांसाठी आवाज उठवला.

लवकरच या प्रश्नाचं राष्ट्रीय प्रश्नामध्ये रूपांतर झालं. संपादकीय लेख लिहिले गेले, मोर्चे काढले गेले आणि समस्या थेट गृहमंत्री एल. के. अडवाणी यांच्यापर्यंत जाऊन पोहोचली आणि त्यांचं म्हणणं जनगणना समितीला मान्य करावं लागलं. त्यानंतर जनगणनेसाठीची प्रश्नावली छापखान्यामध्ये जाण्यापूर्वी यावर तोडगा निघाला. अखेर अपंग लोक अस्तित्वात असून त्यांचा समावेश जनगणनेमध्ये केला पाहिजे हे सरकारला मान्य करावं लागलं!

हा अपंग चळवळीचा सर्वांत मोठा विजय होता. सन २००१ मध्ये जेव्हा जनगणनेची आकडेवारी समोर आली तेव्हा २.१ टक्के लोकसंख्या अपंग असल्याचं दिसून आलं. त्यानुसार भारतातील एकूण अपंग लोकसंख्या जेमतेम २१ लाख ठरली. आमच्या दृष्टीने हा आकडा फारच कमी होता. अखेर आम्हाला वाटलं की, भारतातील साधारण ५-६ टक्के लोक केवळ एक किंवा दोन बाबतींत अपंग आहेत; पण जनगणनेत त्या सर्वांचा समावेश अपंग म्हणून करण्यात आलेला नाही.

अर्थात यामुळे एक झालं की, यापुढे आम्ही अस्तित्वातच नाही असं काही सरकार भासवू शकत नव्हते. त्यानंतर पटापट घडामोडी घडायला लागल्या– नियोजन आयोग अपंगत्वाकडे वेगळ्या दृष्टिकोनातून पाहायला लागले. मागील दहा पंचवार्षिक योजनांमध्ये अपंगत्वाचा साधा उल्लेखही नव्हता! भारतातील सार्वजनिक ठिकाणे अपंगांकरता सोईची व्हावीत यासाठी अर्थमंत्रालयाने अधिकाधिक निधी उपलब्ध करून दिला. तरीसुद्धा ही प्रक्रिया पूर्ण होण्यास कित्येक दशकांचा कालावधी लागेल. अथक लढा दिल्यानंतरच अपंगत्वाच्या मुद्द्याला ११व्या व १२ व्या पंचवार्षिक योजनेमध्ये महत्त्व प्राप्त झालं आणि आमच्या संघर्षामुळे अपंग लोकांसाठी खूप जास्त स्रोत उपलब्ध झाले.

**मालथी होला**

**(१४ महिन्यांची असताना पोलिओमुळे मानेखालचं शरीर लुळं पडलं)**

काही वर्षांपूर्वी मी ठरवलं की, दररोज काही वेळ मी इतरांच्या सेवेसाठी देईन. अत्यंत हलाखीच्या परिस्थितीतही माझे बाबा नेहमी म्हणायचे की, तुम्ही कितीही गरीब असाल किंवा तुम्हाला कितीही शारीरिक समस्या असू देत शिक्षण ही एक अशी गोष्ट आहे जी तुम्हाला तुमच्या पायावर उभं राहण्यास मदत करू शकते. कुठेतरी माझ्या मनात विचार आला की, मी अपंग मुलांची देखभाल करायला हवी आणि त्यांना शिक्षण द्यायला हवं, जेणे करून त्यांच्या उपजीविकेसाठी त्यांना कुणावरही अवलंबून राहायला लागणार नाही.



**मालथी होला**

मला एकटीला हे सर्व जमेल याची खात्री नव्हती; पण माझा मित्र कृष्णा रेड्डीच्या रूपात मदत उपलब्ध होती. तो म्हणाला की, अगदी पहिल्या दिवसापासून तो या उपक्रमात माझी मदत करेल. इतर काही मित्रही पटकन धावत आले. मला काही कळण्याच्या आत 'मातृ फाउंडेशन' स्थापन झालं आणि २००५ मध्ये चालायलाही लागलं. केवळ आठ वर्षांच्या आत मी वीस मुलांची आई झाले, ही सर्व मुलं खेड्यांमधून आलेली आहेत, जिथं अपंग मुलं म्हणजे केवळ आर्थिक ओझं समजत नाहीत तर त्यांना शाप मानलं जातं.

जेमतेम आवक आणि खाणारी तोंडं भरमसाट; अशामध्ये मूल अपंग असेल तर त्यास झोपडीतला कैदी म्हणूनच वागवतात. कुणालाही त्याच्या मूलभूत गरजांकडे लक्ष देण्यासही वेळ नसतो आणि त्यांना काही शिकवण्यासाठी तर नसतोच नसतो. अशा परिस्थितीमध्ये जरी त्या मुलांमध्ये काही तल्लख बुद्धिमत्ता असली तरी वस्तुस्थितीच्या माऱ्यापुढे ती टिकाव धरू शकत नाही. मागील काही वर्षांपासून अशा मुलांना आम्ही आमच्या केंद्रावर घेऊन येतो. त्यांना शिकवतो व पोषक आहाराने, शिस्तीने आणि आत्मविश्वासाने त्यांचं संगोपन करतो, जेणे करून त्यांचा स्वाभिमान जागृत होईल. दिवसा ते सर्व मुख्य प्रवाहातील सर्वसाधारण शाळेमध्ये जातात आणि संध्याकाळी ते आम्ही त्यांच्यासाठी बांधलेल्या घरी येतात. सध्यातरी या होस्टेलवर पायाभूत सुविधा उपलब्ध करून दिलेल्या आहेत; परंतु कालांतराने मला त्यात त्यांच्यासाठी अधिकाधिक सोईसुविधा उपलब्ध करून द्यायच्या आहेत. त्यांच्या वयाच्या मुलांना हव्या असणाऱ्या सर्व गोष्टी द्यायच्या आहेत.

प्रत्येक पायरीवर आव्हाने आहेत कारण वीस मुलांना सांभाळण्यासाठी निधी उभारणं काही सोपं काम नाही. बँक मॅनेजर म्हणून मला मिळणारा पगार काही पुरत नाही; त्यामुळेच या मुलांसाठी भिकेचा कटोरा हातात घेऊन लोकांना भेटत राहणं हेच माझं आयुष्य झालंय. शासनाकडून आम्हाला कोणतीही मदत मिळत नाही कारण पोलिओ झालेल्या मुलांनी नियमानुसार त्यांच्या कुटुंबीयांसोबत राहणंच अपेक्षित आहे. यामुळेच माझी सर्व भिस्त वैयक्तिक दात्यांच्या औदार्यावरच असते. उदाहरण द्यायचे तर एका सहृदयी प्रेमळ कुटुंबाने जमिनीचे दोन तुकडे

दान केलेत आणि त्यावर मोठं मातृगृह उभं राहतंय. दुसरा एक मित्र आला अन् त्यानं आर्किटेक्टशी जोडून दिलं. ज्याच्या मदतीने अपंगांना सहजच वापरता येईल असं अपंग मैत्र जपणारं घर आम्ही बांधतो आहे. या प्रवासात मी बरीच कोडगी आणि लवचीक बनलेय; तसंही मुलांसाठी मी पैसा मागतच नाही तर वस्तू मागते जेणे करून त्यांना जीवनाच्या संघर्षात टिकून राहता येईल- तांदळाची गोणी, डाळ, साखर किंवा भाज्या इत्यादी. वर्षातून एकदा आम्हाला त्यांच्या शाळेची फी भरायची असते. माझं सुदैव असं की, माझ्या सोबत बँकेत काम करणारे सहकारी आणि बँकेचे ग्राहक मला या कामात मदत करतात. मी अविवाहित असल्याने मला इतर कोणत्याही आर्थिक जबाबदाऱ्या, बांधिलकी किंवा आर्थिक चिंता नसल्यामुळे माझा अर्धा पगार मी या मुलांची देखभाल करण्यासाठी खर्च करू शकते.

आपल्यापैकी प्रत्येकाचा जन्म काही खास कारणासाठी झालाय असा माझा विश्वास आहे. मला वाटतं, या मुलांना चांगलं जीवन देता यावं म्हणूनच माझा जन्म झाला आहे. चेन्नईमधील केंद्रातील कुटुंबीयांनी टाकून दिलेल्या मुलांची आठवण आजही माझ्या मनात आहे. मला वाटतं की, मला ज्या प्रकारे शक्य आहे त्या प्रकारे मी मुलांसाठी चांगलं जग निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे.

जमिनीवर रांगणारी अपंग मुलं पाहून उर्वरित जगाला सहानुभूती वाटत असेल तर मी त्याच्याशी समानभूत असते कारण मला माहीत आहे की, त्या मुलाला कोणत्या शारीरिक तसेच मानसिक दिव्यातून जावं लागत आहे. मी ते आयुष्य जगलेय आणि इतर कुणापेक्षाही मला त्यांचं दु:ख अधिक समजू शकतं. मी हे काम करायला घेतलं कारण मला वाटतं, मी त्यांना मोठं करू शकेन आणि ते कोणत्या सुंदर जगात जन्माला आले आहेत ते दाखवू शकेन. मला वाटतं की, उर्वरित जगासाठी त्यांचं जीवन उदाहरण ठरावं. मला जगाला सांगायचं आहे, आमच्याकडे पाहा आणि आमच्यासारखे राहू शकत नसाल तर किमान तसा प्रयत्न तरी करा.

जेव्हा मातृ संस्थेत आल्यामुळे या मुलांचं आयुष्य किती प्रभावित झालं आहे ते पाहते तेव्हा वाटतं, मागील काही वर्षांचा माझा प्रवास समाधानाचा झाला आहे. आमच्याकडे आलेल्या बऱ्याच मुलांना ठोस वैद्यकीय उपचारांची गरज होती आणि आम्ही त्यांच्यापैकी काहीजणांना थोडी तरी आत्मनिर्भरता यावी म्हणून कराव्या लागणाऱ्या अनेक शस्त्रक्रियांकरता निधी उभारू शकलो. यापैकी काहींना, अगदी हाताच्या बोटांवर मोजता येतील एवढ्यांना आम्ही प्रशिक्षण आणि शिक्षण देऊ शकलो, ज्यामुळे ते त्यांच्यापुरतं कमावू शकतात. जरी ती रक्कम फार मोठी नसली तरी त्यांना आता कुणावर अवलंबून राहण्याची आवश्यकता उरलेली नाही. आता आम्ही मातृ प्रकल्प पुढच्या टप्प्यात नेण्याची स्वप्न पाहतोय. व्यावसायिक प्रशिक्षणाची योजना तसेच सर्वसमावेशक शाळा सुरू करण्याचा मानस आहे. ज्यामुळे माझी मुलं मुख्य प्रवाहात येतील आणि त्यांच्या अव्यंग बांधवांनादेखील या थोड्याशा कमनशिबी भावंडांना समजून घेण्याची संधी निर्माण होईल व त्यांच्यात जाणीव जागृती होईल.

**सुनील देसाई (अपघातामुळे अपंगत्व)**

नऊ वर्षांपूर्वी माझ्या स्वत:च्या असहायतेतून जन्माला आलेली केअर टेकर (मदतनीस) ही संकल्पना आज गुजराथ राज्य तसेच संपूर्ण देशांमध्ये शेकडो लोकांना मदत करतेय आणि आशा देतेय. या संस्थेची सुरुवात मी वर्तमानपत्रामध्ये दिलेल्या छोट्याशा जाहिरातीने झाली. माझ्या वडिलांच्या वाढदिवसाच्या मुहूर्तावर, केअर टेकर म्हणून ज्यांना प्रशिक्षण हवं असेल त्यांनी संपर्क साधावा, असं आवाहन केलं होतं आणि प्रशिक्षणानंतर लगेचच काम मिळेल असंही लिहिलं होतं. इथं मला कबूल करावं लागेल की, जेवढ्यांचे अर्ज आले आणि जेवढे माझ्या घरी मुलाखतीसाठी आले, त्यातले सर्वच काही मला हवे तसे किंवा हव्या त्या प्रकारचे होते असं नाही. मी निवडलेल्या पहिल्या बॅचमधील महिला आणि पुरुषांमध्ये मला हवा तो सहानुभूती हा गुण होता. मला माझ्या स्वत:च्या अनुभवावरून माहीत होतं की, अपंग व्यक्तीच्या भावनांबद्दल, गरजांबद्दल संवेदनशील नसलेल्या व्यक्तीने त्यांची देखभाल करण्याइतकी दुसरी वाईट गोष्ट कोणतीही नाही. आमच्या जखमांच्या दु:खापेक्षा आपण आपल्या प्रेमाच्या माणसांवर ओझं आहोत या भावनेने जास्त दु:ख होतं.



सुनील देसाई

माझ्या मित्रांनी दिलेल्या तुटपुंज्या भांडवलाच्या आधाराने मी पुन्हा एकदा व्यवसायामध्ये उतरलो होतो. रोजगार हवा असलेल्या आणि त्यासाठी मेहनत करण्यास तयार असलेल्या डझनभर महिला आणि पुरुषांना कामावर ठेवलं होतं. माझी व्हीलचेअर म्हणजेच माझं कामाचं टेबल बनलं; मोबाइल फोनच्या मदतीने, हेडफोन आणि इअरप्लग यामुळे आलेले फोन घेणं शक्य झालं. मी माझ्या पुढच्या कारकिर्दीची सुरुवात करण्यास तयार होतो. यावेळी माझी पत्नी आणि वडील माझे कार्यकारी सहायक होते. मुलाखती घेण्यास मला मदत करत होते तसेच बाकी सर्व व्यवस्था पाहत होते. नवीन नेमणूक झालेल्या बॅचला प्रशिक्षण देत होते. मला वाटतं की, काळजी घेणारे प्रेमळ, सहानुभूती आणि सहसंवेदना समजणारे असायला हवेत. नवनियुक्त लोकांना हे गुण अंगी बाणवण्याचे महत्त्व समजावे म्हणून मी त्यांच्या सोबत सातत्याने खूप वेळ चर्चा करायचो, विचारविनिमय करायचो; जेणे करून त्यांना या गोष्टींचं महत्त्व

पटेल आणि ते हे गुण अंगीकारतील. अपंगांना कसं उचलायचं, अंघोळ कशी घालायची आणि त्याला/तिला कसं भरवायचं, त्याच बरोबरीने वेदना कमी करण्यासाठी किंवा चमक भरल्यास फिजिओथेरपी आणि ॲक्युप्रेशर कसं करायचं हे सारं शिकून ते तयार झाले की, आम्ही त्यांना रुग्णांची काळजी घेण्यासाठी पाठवायचो.

जेव्हा माझी खात्री झाली की, माझ्या कर्मचाऱ्यांची पहिली बॅच सर्व आवश्यक कौशल्यासहित तयार आहे तेव्हा मी वर्तमानपत्रात दुसरी जाहिरात दिली. यावेळी आम्ही अपंग आणि मुलांसाठी सेवा देणाऱ्या उद्योगामध्ये आहोत असं सांगितलं. मला कबूल केलंच पाहिजे की, प्रतिसादाकरता मीदेखील तयार नव्हतो. जाहिरात आल्यानंतर आमच्यावर फोन कॉल्सचा अक्षरश: पाऊस पडला, त्यामध्ये अमेरिकेमध्ये स्थायिक असलेल्या आणि ज्यांचे वृद्ध आई-वडील इथे असलेल्या लोकांचेही थेट अमेरिकेतून फोन आले, हे सर्व हाताळताना माझ्या पत्नीची दमछाक झाली. हे लोक असे होते की, ज्यांच्याकडे उत्तम नोकऱ्या होत्या आणि प्रचंड पैसा होता; परंतु भारतात येऊन म्हाताऱ्या आई-वडिलांची काळजी घेता येत नाही या अपराधीपणाच्या भावनेसह जगत होते. माझी ही सेवा अशा लोकांसाठी वरदान ठरली.

जेव्हा माझ्या सुरुवातीच्या ग्राहकांना समजलं की, मी स्वत: अपंग आहे तेव्हा त्यांना आमची सेवा कितपत कार्यक्षम असेल याबाबत शंका होती; परंतु जेव्हा मी त्यांना दाखवून दिलं की, मी स्वत: अपंग असल्यामुळेच मला त्यांच्या नेमक्या गरजा कळतात तेव्हा त्यांना ते पटलं. खरं पाहिलं तर या वास्तवामुळेच अशी सेवा पुरवणाऱ्या इतर संस्थांपेक्षा आम्ही वेगळे ठरतो. या अनेक वर्षांमध्ये एकाकडून दुसऱ्याला कळत गेल्याने झालेल्या प्रचारामुळे केअर टेकर खूप मोठं झालं आहे. एका समाधानी ग्राहकाने त्याच्या नातेवाईक अथवा मित्रमंडळीमध्ये कुणाला आपल्या घरातील अपंग किंवा मुलांची काळजी घेण्यासाठी कुणी हवं असेल तर आमच्याविषयी सांगणं साहजिक होतं. आज माझ्याकडे २५० काळजीवाहक असून, ते तेवढ्याच अपंग, वृद्ध वा मुलांची काळजी घेत आहेत. माझ्याकडील काळजीवाहकांची बँक मोठी होत आहे आणि आवश्यकतेप्रमाणे केव्हाही काळजी घेण्यास ती तयार आहे.

माझ्या अपघातानंतर जे काही घडलं त्यामुळे माझं आयुष्य आता संपलंय आणि मला कायमच परावलंबी व दु:खी जीवन जगावं लागणार असा विचार मी करत होतो, तर मग आताची ही काही वर्षे म्हणजे चमत्कारापेक्षा कमी नाहीत. माझ्या प्रेमळ कुटुंबीयांच्या सामर्थ्याने आणि एक-दोन व्हीलचेअरच्या मदतीने– ज्यातील एक माझ्या शरीराच्या आवश्यकतेनुसार बनवून घेतली आहे– मी नव्याने स्वत:चा शोध घेतला आणि माझ्या अस्तित्वाला नवीन अर्थ दिला. जर माझं अपघातापूर्वीचं आयुष्य केवळ स्वत:साठीच, स्वत:चीच सेवा करण्यासाठी होतं तर आत्ताचं आयुष्य खूप वेगळं आहे. माझ्या स्वत:च्या दु:खामुळे माझे डोळे उघडले आणि मला जगातील इतरांचंही दु:ख दिसू लागलं. आज मला कळून चुकलंय की, सर्वांत महत्त्वाची, अमूल्य गोष्ट कोणती असेल तर तुमच्या जिवलगांची साथ आणि सोबत. तुमच्या प्रगतीच्या किंवा अधोगतीच्या काळात कुणीही सोबत नसेल तर पैशाला काही अर्थ राहत नाही. बऱ्याचदा मला अशा लोकांचे फोन येतात, ज्यांच्याकडे अमाप पैसा



**सुरेश अडवाणी**


व संपत्ती आहे, ते आयुष्यभर जरी खर्च करत राहिले तरी संपवू शकणार नाहीत; पण त्यांच्याकडे वेळप्रसंगी हाक मारायला किंवा मन मोकळं करण्यासाठी कुणीही सोबत नाही. आज मला माझ्या ग्राहकांपर्यंत प्रत्यक्ष पोहोचल्याने समाधान मिळतं, मी ठरलेल्या दिवशी त्यांच्याशी गप्पा मारायला त्यांना भेटतो आणि त्यांचा कंटाळवाणा दिवस एकदम कसा बदलून जातो ते तुम्हाला सांगता येणार नाही. मी त्यांच्यासाठी आणि त्यांच्या परिवाराकरता फोनवर तर सतत उपलब्ध असतो. अपंग व्यक्तीची काळजी घेणं शारीरिक तसेच मानसिकदृष्ट्या थकवणारं असतं म्हणूनच मी त्यांच्या कुटुंबीयांशी बोलतो आणि रुग्णाची काळजी घेण्याच्या विविध पैलूंबद्दल त्यांचं समुपदेशन करतो.

**सुरेश अडवाणी**

माझं कामच माझा ध्यास असल्यामुळे निवृत्तीचा विचारसुद्धा माझ्या मनात येत नाही. कदाचित मी क्लिनिकमधून काम करणं बंद करेन; पण माझ्या ज्ञानाला नेहमीच मागणी असेल. मला एक वैद्यकीय शिक्षण संस्था किंवा मल्टिस्पेशालिटी रुग्णालय स्थापन करून माझ्या ज्ञानाचा चांगला उपयोग करून घ्यायचा आहे, ज्यामुळे समाजाला मदत होईल. ते स्वप्न याआधीच आकार घेतंय; केरळमधील ज्या गावात माझी पत्नी लहानाची मोठी झाली, त्या गावात २५० खाटांचं मल्टिस्पेशालिटी रुग्णालय बांधतोय. हे बोलणं थोडं आधीच होतंय पण मला वाटतं की, ते रुग्णालय त्या क्षेत्रातील पहिलं मल्टिस्पेशालिटी रुग्णालय असेल. त्याच्या जवळपासच वृद्धाश्रम बांधण्याचं स्वप्नही आम्ही पाहतोय.

**(मेहता पब्लिशिंग हाऊसच्या 'दिव्यगुणी' या सुधा मेनन आणि व्ही.आर.फिरोज लिखित आणि सुमिता बोरसे अनुवादित पुस्तकातून)**

## नवं कोरं





नितळ निरोगी त्वचेसाठी
आरोग्यदायी आहार

# रूप करा सुरूप

मूळ लेखक - जेसिका वू
अनुवाद - डॉ. मीना शेटे-संभू

पृष्ठसंख्या : ३७६
किंमत : ₹४६०

---




अंतर्मनातल्या वेदनांवरचा रामबाण उपाय..
मनावर उपचार करून आरोग्य सुधारण्याचा नामी मंत्र...


# स्वजाणिवेतून स्वास्थ्यप्राप्ती

मूळ लेखक - डॉ.न्यूटन कोन्दाविती
अनुवाद - डॉ.अश्विनी घैसास

पृष्ठसंख्या : १२८
किंमत : ₹१९५

Book Available

---




कपाळावर आठी नको...
मनावर नको ताण...
आनंदाचा मंत्र देईल
'आनंदतरंग'चं पानन्पान




मूळ लेखक - ग्रेचेन रुबिन
अनुवाद - अश्विनी तापीकर-कंठी

पृष्ठसंख्या : ३२०
किंमत : ₹३५०

Book Available



# अण्णा हजारे

- संपादन : प्रदीप ठाकूर/पूजा राणा

*भ्रष्टाचाराविषयी सामान्य माणसं बोलत असतात. निषेधही व्यक्त करतात; पण भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी पावलं उचलली ती अण्णा हजारे यांनी. भ्रष्टाचार निर्मूलनासाठी त्यांनी केलेले प्रयत्न आणि त्या प्रयत्नांचं फलित, यावर प्रकाश टाकला गेला आहे, 'अण्णा हजारे' या पुस्तकातून. त्यातील हे एक महत्त्वपूर्ण प्रकरण...*

## अण्णांचा भ्रष्टाचारविरोधी अविरत लढा

अण्णा हजारे अतिशय साधे असून त्यांचे आयुष्याबाबतचे तत्त्वज्ञानही साधे आहे. मात्र त्यांनी मिळवलेले यश साधे नाही. त्यांचे कामच इतके बोलते की, आणखी खुलासा करण्याची गरजच पडत नाही. मात्र अण्णा सतत खुलासा करीत असतात. त्यांच्या समाजसेवी कार्याबद्दल अण्णांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. यामध्ये रॅमन मॅगसेसे पुरस्कार, पद्मश्री, पद्मभूषण, कृषिभूषण तसेच इंदिरा प्रियदर्शनी वृक्षमित्र पुरस्काराचा समावेश आहे. अमेरिकेतील 'केअर इंटरनॅशनल' आणि दक्षिण कोरियातील 'ट्रान्स्परन्सी इंटरनॅशनल' या मानाच्या संस्थांनीही अण्णांचा गौरव केला आहे.

### अण्णांचे व्यक्तिगत स्पष्टीकरण

वेगवेगळ्या वेळी प्रसारमाध्यमांशी बोलताना अण्णांनी स्वत:विषयी केलेले स्पष्टीकरण थोडक्यात येथे उद्धृत केले आहे :

'माझ्यासाठी काहीही काळे आणि गोरे नाही. एक तर ते काळे आहे किंवा गोरे. भ्रष्टाचाराविरुद्ध मी दिलेल्या लढ्यामुळे महाराष्ट्रातील हजारो नागरिकांच्या हृदयात मला स्थान मिळाले आहे. देशातही अन्यत्र हे स्थान मला लाभले आहे.'

'अलेक्झांडर द ग्रेटसारखा जगज्जेतासुद्धा मृत्यूनंतर स्वर्गात जाताना स्वत:समवेत काही घेऊन जाऊ शकला नाही. असे असताना संपत्ती मिळविण्याची एवढी लालसा कशासाठी? शेवटी जीवन म्हणजे तरी नक्की काय? दुसऱ्यांशी चांगले वागणे. त्यांच्या कामी येणे. खरे पाहता सेवेतही मोठा आनंद आहे. साठच्या दशकात हा संदेश माझ्या मनात खोलवर रुजला गेला, आणि मला सतत प्रेरणा देत गेला. मी कधीही माघार घेणार नाही. देशवासियांसाठी कोणताही त्याग करण्यासाठी मी केव्हाही तयार आहे. माझे जीवन देशवासियांसाठी समर्पित आहे. भ्रष्टाचाराशी मुकाबला करणे, हेच माझे ध्येय आहे. हाच माझा मुख्य कार्यक्रम आहे. माझे ध्येय निश्चित आहे आणि भ्रष्टाचाराशी लढा देण्यासाठी योग्य प्रकारे कार्यक्रमाची आखणीही केलेली आहे.'

'भ्रष्टाचाराच्या मुद्द्यांमुळे राजकीय धुरीणांशी कायम संघर्ष करताना आपण मला पाहिले. असे असूनही मला आणखी बदल घडवायचे आहेत. शिक्षण व्यवस्थेत बदल झाल्यास मुलाला आपोआपच चांगल्या वातावरणात वाढण्यासाठी, फुलण्यासाठी मदत होईल. डोनेशनच्या माध्यमातून शाळा व महाविद्यालये लाच स्वीकारत असतील, तर मुलांकडून तुम्ही कशाची अपेक्षा ठेवणार? कोणत्या मार्गाचा ते अवलंब करतील? गोपनीय कायद्याचे हत्यार देशात कायम वापरले गेले. सरकारला जे काही लपवायचे आहे, ते याच्या नावाखाली लपविण्यात आले. माझी हा कायदा मोडीत काढण्याची इच्छा आहे. माहिती मिळविण्याचा अधिकार हा प्रत्येक नागरिकाचा मूलभूत अधिकार आहे. मात्र हा केवळ कागदावरच राहिला आहे. का? माहिती मिळवण्यासाठी आपल्याला निश्चित कालमर्यादा आखावी लागेल. गावपातळीवर आणखी अधिकार बहाल करावेत, या मताचा मी आहे.'

'सत्तेच्या गल्ल्या या भ्रष्टाचारावरच पोसल्या गेल्या आहेत. देशाची राजधानी दिल्ली यात अग्रक्रमावर आहे. भ्रष्टाचाराविरुद्ध लढ्यासाठी लोकांना एकत्र करण्यास वेळ लागेल. मात्र आम्ही त्या दिशेने काम करीत आहोत. देशाचे माजी निवडणूक आयुक्त टी. एन. शेषन यांनी मोठ्या प्रमाणावर हे काम केले. मात्र मधेच त्यांचे नियंत्रण सुटले. राजकारणात गेल्याने त्यांच्या आधीच्या उत्तुंग प्रतिमेला तडा गेला. मी राजकारणात प्रवेश करावा यासाठी काँग्रेस, भाजप, शिवसेना आणि राजकीय पक्षांनी अनेकदा माझ्याशी संपर्क साधून मला आवाहन केले. मी मात्र माझ्या भूमिकेवर खंबीर राहिलो. अनेक वर्षांपूर्वीच मी राजकारणात प्रवेश न करण्याबाबत माझे मन तयार केले होते. आताची स्थिती आणखी बिकट आहे. स्वच्छ प्रतिमेच्या लोकांनी राजकारणात प्रवेश करण्याची गरज आहे.'

'प्रसिद्धिलोलूप असल्याचा माझ्यावर आरोप करण्यात येतो. माझ्यावर विश्वास ठेवा, असा जर मी असतो तर मलाच वेदना झाल्या असत्या. गीतेची शिकवण मी आचरणात आणतो आणि कमी काळात मिळालेली गोष्ट कधीही टिकत नाही. उपयोगाला येत नाही, हे मला चांगले ठाऊक आहे. जातींबाबत मी विशेष जागरूक असतो, असाही माझ्यावर आरोप होतो. हा आरोपसुद्धा चुकीचा आहे.'

'भ्रष्टाचाराबाबत सध्याच एवढे का बोलले जातेय, असे लोक मला कायम विचारतात. मला वाटते, प्रत्येक गोष्टीला एक मर्यादा असते. लोकांनी पुरेसे सहन केले आहे आणि त्यांचा संयम आता सुटत चालला आहे. सामान्य माणसाचे जगणे दिवसेंदिवस कठीण बनत चालले आहे.'

'प्रजासत्ताक देशात खरी सत्ता ही लोकांकडे असते हेच लोकांना का समजत नाही, याचेच मला आश्चर्य वाटते. मात्र सत्ता ही राजकारणी आणि नोकरशहांकडे गेली आहे. खरे तर ते जनतेचे सेवक आहेत. हा किती मोठा विरोधाभास आहे! त्यामुळे आमच्यातील शत्रूशी मुकाबला करण्यासाठी आम्ही काय करतो? मला वाटते, आणखी एका स्वातंत्र्यलढ्याची देशाला गरज आहे आणि या लढ्यात सहभागी होताना लोकांना प्रसंगी कारागृहात जाण्याची तयारी ठेवावी लागेल, स्वत:चे जीवन समर्पित करावे लागेल. ब्रिटिशांना हुसकावून लावण्यासाठी जे केले तेच आता पुन्हा करावे लागेल.'

'माझ्यासाठी हा पुनर्जन्म आहे. १९६५मध्ये पाकिस्तानशी युद्ध झाले तेव्हा मी लष्करात होतो. खेमकरण येथे सीमेवर पाकिस्तानच्या हल्ल्यात माझे सर्व सहकारी शहीद झाले. मी एकटाच वाचलो. नंतर दिल्ली रेल्वेस्थानकावर स्वामी विवेकानंदांचे पुस्तक मी विकत घेतले. जीवनाकडे पाहण्याचा माझा सारा दृष्टिकोन या पुस्तकामुळे बदलून गेला. त्यानंतर दशकाने मी स्वेच्छानिवृत्ती घेतली आणि तेव्हापासून हा लढा सुरूच आहे....'

### महाराष्ट्रातील भ्रष्टाचारविरोधी निदर्शने

१९८५-८६मध्ये राज्यातील विजेची स्थिती अतिशय गंभीर बनली होती. विहिरीत पुरेसे पाणी असतानाही केवळ पंप चालविण्यासाठी पुरेसे व्होल्टेज नसल्याने शेतकरी विहिरीतून पाणी उपसा करू शकत नव्हते. अनियमित वीजपुरवठ्यामुळे मोटारी जळत होत्या आणि पिकांवर विपरीत परिणाम होत होता. सततचा पाठपुरावा करूनही सरकारकडून अजिबात प्रतिसाद मिळत नव्हता.

२८ नोव्हेंबर १९८९ रोजी भरपाईच्या मागणीसाठी अण्णा हजारे



यांनी उपोषण सुरू केले. आठ दिवसांच्या उपोषणानंतर अण्णांची प्रकृती चिंताजनक बनली आणि त्यांना अहमदनगरच्या सरकारी रुग्णालयात दाखल करण्यात आले. यानंतरही उपोषणाला कोणताही प्रतिसाद मिळत नसल्याचे पाहून आजूबाजूचे शेतकरी प्रक्षुब्ध झाले. तीन तहसील क्षेत्रातील शेतकऱ्यांनी रास्ता रोको आंदोलन सुरू केले. आंदोलनाने चुकीचे वळण होऊ नये, यासाठी हजारे यांनी रुग्णालयातूनच शांततेचे आवाहन केले. आंदोलनकर्त्यांनी राष्ट्रीय संपत्तीचे नुकसान करू नये, प्रवाशांना कोणतीही इजा पोहोचवू नये आणि शांततेत आंदोलन करावे असे आवाहन केले.

शेतकऱ्यांनी पुकारलेल्या आंदोलनाला तुफान प्रतिसाद मिळाला. एवढा प्रतिसाद मिळेल अशी अपेक्षा पोलिसांना तसेच खुद्द सरकारलाही नव्हती. निदर्शनामध्ये दहा हजारांहून अधिक पुरुष तर सुमारे बाराशे महिला सहभागी झाल्या. आंदोलनकर्त्यांना आवरण्यासाठी पुरेसा पोलीस बंदोबस्त नव्हता. पोलिसांनी आम्हाला अटक करून कारागृहात न्यावे अशी भूमिका आंदोलनकर्त्यांनी घेतली. मात्र पोलिसांकडे त्यांना नेण्यासाठी पुरेशी व्यवस्थाही नव्हती. पोलिसांनी रस्त्यावरील अडथळे दूर करण्याचा प्रयत्न सुरू केला. वाहतुकीसाठी रस्ता रिकामा करण्याच्या प्रयत्नात पोलीस व आंदोलनकर्त्यांमध्ये झटापट सुरू झाली. पोलिसांनी निदर्शकांवर लाठीमार केला.

यामुळे चिडलेल्या आंदोलनकर्त्यांनी पोलिसांवर दगडफेक केली. परिस्थिती नियंत्रणाबाहेर गेली. पोलिसांची अतिरिक्त कुमक मागविण्यात आली. पोलिसांनी निदर्शकांवर गोळीबार केला. यामध्ये चार शेतकऱ्यांचा जागीच मृत्यू झाला, तर सात शेतकरी गंभीर जखमी झाले. रुग्णालयात हे वृत्त ऐकून अण्णा अतिशय व्यथित झाले. सरकारला जागे करण्यासाठी हे आंदोलन केल्याने कोणाला बाधा येता कामा नये, असे त्यांचे मत होते. या उपोषणातच आपले जीवन संपविण्याचा निर्णय त्यांनी घेतला. मात्र सरकारमधील ज्येष्ठ अधिकारी आणि मंत्र्यांनी त्यांचे मन वळविण्याचा कसोशीने प्रयत्न केला. आंदोलन जर पुढे सुरू राहिले, तर यात आणखी शेतकऱ्यांचा बळी जाईल, अशी त्यांना भीती होती. अखेर निष्पाप शेतकऱ्यांचे जीव वाचविण्यासाठी अण्णांनी आपले उपोषण मागे घेतले.

**आदर्श गाव योजना**

गांधीजींच्या स्वप्नातील आदर्श खेड्याची संकल्पना आपल्या समर्पित कार्याद्वारे अण्णा हजारे यांनी राळेगणसिद्धीमध्ये प्रत्यक्षात आणली. भारत छोडो आंदोलनाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षाचे निमित्त साधून राज्यातील प्रत्येक तालुक्यात राळेगणसिद्धीसारखे आदर्श गाव विकसित करावे, असे ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक दिवंगत अच्युतराव पटवर्धन यांनी सुचविले. सरकारने त्यांची ही सूचना तत्काळ स्वीकारली आणि 'आदर्श गाव योजना' अंमलात आणण्याची घोषणा केली. त्यांच्याच नेतृत्वाखाली या योजनेचा प्रारंभ झाला. त्यांनी संपूर्ण महाराष्ट्राचा दौरा केला आणि या योजनेसाठी तीनशे गावांची निवड केली.

**भ्रष्टाचारविरोधी चळवळ**

भ्रष्टाचाराविरुद्ध लढा देण्यासाठी अण्णा हजारे यांनी १९९१मध्ये राळेगणसिद्धी येथे भ्रष्टाचारविरोधी जनआंदोलनाची सुरुवात केली. याच वर्षी टिंबर मार्केटमधील व्यापाऱ्यांशी संगनमत केल्याच्या आरोपावरून चाळीस वनाधिकाऱ्यांविरुद्ध अण्णांनी आंदोलन सुरू केले. यामुळे या अधिकाऱ्यांच्या बदल्या झाल्या. काहींना निलंबित करण्यात आले.

'वसंतराव नाईक भटक्या-विमुक्त जमाती विकास मंच' आणि 'महात्मा फुले मागासवर्गीय विकास मंडळ' यांच्याकडून यंत्रमाग खरेदी करताना अपहार झाल्याचा आरोप करून अण्णा हजारे यांनी मे १९९७मध्ये आंदोलन केले. या संस्था राज्याचे तेव्हाचे

समाजकल्याणमंत्री शिवसेनेचे बबनराव घोलप यांच्या थेट अधिपत्याखाली होत्या. १९९५मध्ये राज्यात शिवसेना-भाजप युतीची सत्ता आल्यानंतर या संस्थांचे संचालक मंडळ बरखास्त करण्यात आले होते. घोलप यांच्या पत्नी शशिकला यांनी नाशिकमध्ये एप्रिल ते सप्टेंबर १९९६ या काळात मोठ्या प्रमाणावर खरेदी केलेल्या जमिनीचा मुद्दाही हजारे यांनी उपस्थित केला. त्यांनी आपल्या आरोपाच्या पुष्ट्यर्थ उपलब्ध असलेले कागदोपत्री पुरावे महाराष्ट्राचे तत्कालीन राज्यपाल पी. सी. अॅलेक्झांडर यांच्याकडे सुपूर्द केले.

भ्रष्टाचाराचे आरोप केल्याप्रकरणी घोलप यांनी ४ नोव्हेंबर १९९७ला हजारे यांच्याविरुद्ध अब्रूनुकसानीचा दावा दाखल केला. यावरून त्यांना एप्रिल १९९८मध्ये अटक करण्यात आली आणि पाच हजार रुपयांच्या जामिनावर त्यांची मुक्तता करण्यात आली. मुंबईच्या न्यायालयाने तीन महिन्यांच्या साध्या कैदेची शिक्षा सुनावल्यानंतर ९ सप्टेंबर १९९८ रोजी अण्णांची रवानगी येरवडा कारागृहात करण्यात आली. या शिक्षेमुळे राज्यातील सामाजिक क्षेत्रातील सर्व कार्यकर्त्यांना त्या वेळी फार मोठा धक्काच बसला. भाजप, शिवसेना वगळता सर्व राजकीय पक्षांचे नेते अण्णांच्या पाठीशी उभे राहिले. त्यानंतर जनमताच्या रेट्यामुळे तसेच लोकांच्या विरोधामुळे महाराष्ट्र सरकारने तुरुंगातून त्यांची सुटका करावी असा आदेश काढला. सुटकेनंतर अण्णांनी तत्कालीन मुख्यमंत्री मनोहर जोशी यांना पत्र पाठविले आणि आवामी मर्चंट बँकेतील गैरव्यवहारातील सहभागाबद्दल घोलप यांना मंत्रिपदावरून काढावे अशी मागणी केली. अखेर २७ एप्रिल १९९९ रोजी घोलप यांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिला.

२००३मध्ये हजारे यांनी काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस आघाडीच्या सरकारमधील चार मंत्र्यांविरुद्ध भ्रष्टाचाराचे आरोप केले. हे चारही मंत्री राष्ट्रवादी काँग्रेसचेच होते. ९ ऑगस्ट २००३ रोजी अण्णांनी आमरण उपोषण सुरू केले. हजारे यांनी केलेल्या आरोपांची चौकशी करण्यासाठी तत्कालीन मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी माजी न्यायाधीश पी. बी. सावंत यांच्या नेतृत्वाखाली एक सदस्यीय आयोगाची स्थापना केली. त्यानंतर १७ ऑगस्ट २००३ रोजी अण्णांनी उपोषण सोडले. २३ फेब्रुवारी २००५ रोजी पी. बी. सावंत यांच्या आयोगाने आपला अहवाल सादर केला. यामध्ये त्यांनी सुरेश जैन, पद्मसिंह पाटील आणि नबाब मलिक यांची नावे होती. विजयकुमार गावीत यांना अहवालात दोषमुक्त ठरविण्यात आले. मार्च २००५मध्ये सुरेश जैन व नबाब मलिक यांनी मंत्रिपदाचे राजीनामे दिले.

## माहितीच्या अधिकारासाठी चळवळ

सन २०००च्या प्रारंभी अण्णा हजारे यांनी महाराष्ट्रात केलेल्या आंदोलनामुळे आधीचा कुचकामी कायदा रद्द करून नवीन प्रभावी असा माहितीच्या अधिकाराचा कायदा करणे, महाराष्ट्र सरकारला भाग पडले. पुढे केंद्र सरकारने जेव्हा २००५मध्ये माहितीच्या अधिकाराचा कायदा (आरटीआय) केला, तेव्हा महाराष्ट्रातील कायद्याचाच मूळ आधार घेण्यात आला. इतका महाराष्ट्रातील कायदा प्रभावी होता.

नागरिकांना माहितीचा अधिकार मिळावा यासाठी अण्णा हजारे यांनी सलग अकरा वर्षे लढा दिला. ग्रामसभांना जादा अधिकार द्यावेत, शासकीय अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे नियमितीकरण करावे, लाल फितीचा कारभार संपुष्टात आणावा यासाठी अण्णांनी हा लढा दिला.

* महाराष्ट्रात ११ मार्च १९९५ला शिवसेना-भाजप युतीचे सरकार सत्तेवर आले. त्यानंतर अण्णांनी भ्रष्टाचार निपटून काढण्यासाठी काय पावले उचलता येतील यासाठी सरकारशी चर्चा सुरू केली. त्यांनी सरकारला जवळजवळ पंधरा वेळा पत्रे लिहिली आणि अनेकदा बैठका घेतल्या.

* भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी माहितीच्या अधिकाराचा कायदा करावा अशी मागणी करणारे पत्र त्यांनी सरकारला १२ जानेवारी १९९८ला लिहिले.

* अनेकदा पत्रे लिहून, चर्चा करूनही सरकारने त्यांच्या मागण्यांकडे साफ दुर्लक्ष केले. त्यामुळे अण्णांनी मुंबईच्या आझाद मैदानावर ६ एप्रिल १९९५ रोजी धरणे धरले.

* त्यांनी पुन्हा ६ एप्रिल १९९८ ते २ ऑगस्ट १९९९ या काळात माहितीच्या अधिकाराचा कायदा करावा, यासाठी सरकारला दहा वेळा पत्रे पाठविली. दरम्यानच्या काळात राज्यात काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेसचे सरकार सत्तेवर आले.

* या कायद्याच्या आग्रही मागणीसाठी त्यांनी नव्या सरकारशी पाच वेळा संवाद साधला. त्यांना स्मरण करून दिले. सरकारकडून प्रतिसाद न मिळाल्याने ६ एप्रिल २००० रोजी सरकारला पत्र पाठवून इशारा दिला. एक मेपासून राज्यात सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांपुढे धरणे धरण्यात येईल तसेच वीस मेपासून आपण उपोषणाला बसू असे या पत्रात नमूद करण्यात आले होते.

* ठरल्यानुसार दोन मेपासून राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांपुढे धरणे आंदोलन सुरू झाले. केंद्र सरकारने लोकसभेत माहिती तंत्रज्ञान विधेयक संमत केल्याने उपोषण पुढे ढकलण्यात आले.

* सरकारशी त्यांनी सतत संपर्क कायम ठेवला. सरकारला तब्बल चौदा पत्रे लिहिली आणि अनेक बैठका घेतल्या. यामध्ये एक वर्ष निघून गेले.

* सरकारने हा कायदा न केल्यास एक मेपासून मौनव्रत आंदोलन सुरू करणार असल्याचा इशारा त्यांनी १ मार्च २००१ला पत्राद्वारे सरकारला दिला. तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी आपल्या सहकारी मंत्र्यांशी चर्चा करून विधिमंडळाच्या येत्या अधिवेशनात विधेयक संमत करू असे आश्वासन दिले.

* मुख्यमंत्र्यांच्या आश्वासनानंतर एक्याऐंशी दिवस तसेच गेले. अण्णांचा सरकारशी संवाद सुरूच होता. त्यांनी पुन्हा सरकारला पत्र लिहिले आणि राळेगणसिद्धीत ९ ऑगस्ट २००१ पासून मौनव्रत आंदोलन सुरू करणार असल्याचे स्पष्ट केले.

* इशाऱ्याप्रमाणे नऊ ऑगस्टला त्यांनी मौन आंदोलन सुरू केले. त्याच दिवशी साऱ्या राज्यभर लोकांनी निदर्शने सुरू केली.

* चार दिवसांच्या मौनानंतर तत्कालीन कायदा व न्यायमंत्री विलासकाका उंडाळकर अण्णांशी चर्चा करण्यासाठी राळेगणसिद्धीत दाखल झाले. त्यांनी मुख्यमंत्री व मुख्य सचिवांशी दूरध्वनीवरून रुजवात घालून दिली. त्यांच्या आश्वासनानंतर अण्णांनी मौन सोडले.

* त्यानंतर एक वर्ष एक महिना उलटून गेला. सरकारला पंधरा पत्रे

लिहून झाली. तरीही सरकारने कोणतीच कृती केली नाही. त्यामुळे अण्णांनी पुन्हा २१ सप्टेंबर २००२पासून मौन सुरू केले. पाच दिवसानंतर आर. आर. पाटील, दिलीप वळसेपाटील, शिवाजीराव मोघे, शिवाजीराव कर्डिले हे सरकारचे चार मंत्री अण्णांशी चर्चा करण्यासाठी राळेगणमध्ये दाखल झाले. मुख्यमंत्री व मुख्य सचिवांकडून लेखी आश्वासन मिळाल्यानंतर त्यांनी आपले आंदोलन थांबविले.

* मुंबईत ३० ऑक्टोबर २००२ रोजी सरकार व अण्णा हजारे यांची बैठक झाली. बैठकीत स्वत: मुख्यमंत्री, मुख्य सचिव, अन्य मंत्री व वरिष्ठ अधिकारी सहभागी झाले. पुन्हा आश्वासन देण्यात आले.

* मात्र सरकारने आपले आश्वासन पाळले नाही. अण्णांनी पुन्हा वीस फेब्रुवारीस मुंबईत आंदोलन करण्याचा इशारा एकवीस जानेवारीस दिला.

* दरम्यानच्या काळात राज्याचे मुख्यमंत्री बदलले. यावर इतर मंत्री व अधिकाऱ्यांशी चर्चा करून निश्चित कालमर्यादेत तोडगा काढण्यात येईल, असे आश्वासन नवे मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी हजारे यांना दिले. त्यामुळे अण्णांनी आंदोलन पुढे ढकलले.

* सतरा फेब्रुवारीला मंत्रालयात उच्चस्तरीय बैठक झाली. त्यात मुख्यमंत्र्यांनी योग्य ती पावले उचलण्याचे आश्वासन दिले.

* आपला शब्द पाळण्यात सरकारला अपयश आल्यानंतर अण्णांनी ९ ऑगस्ट २००३पासून मुंबईत उपोषण करण्याची घोषणा केली.

* अखेर ९ ऑगस्ट २००३ रोजी अण्णा मुंबईतील आझाद मैदानावर उपोषणास बसले. त्यांना पाठिंबा देण्यासाठी राज्यभरातून हजारो लोक आझाद मैदानावर गोळा झाले. त्याच वेळी जिल्ह्याच्या ठिकाणी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने सुरू झाली. या सर्वांमुळे सरकारवर प्रचंड दबाव वाढला. हा कायदा संमत न झाल्यास सरकार पडेल की काय, अशी भीती निर्माण झाली. सरतेशेवटी अण्णांच्या उपोषणाच्या बाराव्या दिवशी भारताच्या राष्ट्रपतींनी या विधेयकावर स्वाक्षरी केली आणि २००२पासून कायदा लागू होईल अशी घोषणा केली. ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तुकारामदादा गीताचार्य यांच्या हस्ते सरबत घेऊन अण्णांनी आपले उपोषण सोडले.

* महाराष्ट्रात २००२पासून माहितीच्या अधिकाराचा कायदा अस्तित्वात आला. अण्णांच्या शक्तीमुळेच हाच कायदा पुढे साऱ्या देशभर अंमलात आला.

* याचप्रमाणे ग्रामसभांना जादा अधिकार देणारा कायदा तसेच लाल फितीला आळा घालणारा कायदाही पुढे सरकारने संमत केला.

माहिती मिळविण्याचा अधिकार असायलाच हवा या मागणीसाठीची मोहीम सर्वप्रथम महाराष्ट्रात सुरू झाली. लोकप्रतिनिधी आणि सनदी किंवा सरकारी अधिकारी हे जनतेचे सेवक आहेत. महाराष्ट्रातील जनताच जनतेच्या पैशाची खरी मालक आहे. त्यामुळे हा सार्वजनिक पैसा किती व कशाप्रकारे खर्च केला जातो हे लोकप्रतिनिधी व अधिकाऱ्यांना विचारण्याचा नागरिकांना हक्कच आहे. माहितीच्या अधिकाराचा कायदा असायला हवा असे अण्णा हजारे यांनी निक्षून सांगितले. यासदंर्भात १९९७मध्ये आझाद मैदानावर पहिला मेळावा घेण्यात आला. राज्य सरकार केवळ आश्वासने देत राहिले मात्र विधानसभांच्या अनेक अधिवेशनांत कोणतीही कृती करण्यात आली नाही. अण्णांनी धरणे, मोर्चे, मौन, उपोषण अशा विविध प्रकारे अनेकदा आंदोलने केली. लोकांमध्ये जागरुकता निर्माण करण्यासाठी त्यांनी राज्यभर दौरे केले. अनेक गावांत जाहीर सभांचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी विशेष कार्यक्रम आयोजण्यात आले. पोस्टर, बॅनर्स छापून ती हजारो लोकांना वाटण्यात आली. यामुळे माहिती मिळविण्याच्या मूलभूत अधिकारांबाबत लोकांमध्ये कमालीची जागरूकता निर्माण झाली.

सरकारने अनेकदा आश्वासने दिली, पण ती कधीच पाळली नाहीत. आपल्या सत्तेचे विकेंद्रीकरण व्हावे आणि लोकांच्या हाती सत्ता द्यावी असे कोणत्याही सरकारला मुळीच वाटत नाही. सत्तेच्या विकेंद्रीकरणामुळे आपले महत्त्व कमी होईल, प्रतिष्ठा व आदरही यामुळे कमी होईल असे अनेक राजकीय नेत्यांना वाटत असते, त्यामुळे माहितीच्या अधिकाराचा कायदा करण्याबाबत सरकार नाखूशच होते.

अखेर 'करो या मरो'च्या उत्साहाने, प्रेरणेने मुंबईतील आझाद मैदानात ९ ऑगस्ट २००३ रोजी अण्णा हजारे यांनी आमरण उपोषण सुरू केले. सरकारने कायदा संमत करेपर्यंत उपोषण न सोडण्याचा निश्चय त्यांनी केला. प्रसंगी जनतेच्या हक्कासाठी जीवनाचा त्याग करू मात्र उपोषण सोडणार नाही, असे त्यांनी ठरवले. अण्णांचा मनोरथ पक्का आहे आणि ते आपल्या 'करो या मरो' या हट्टापासून मागे हटणार नाहीत, हे सरकारला उमगले. उपोषणाच्या बाराव्या दिवशी महाराष्ट्र सरकारने राष्ट्रपतींच्या स्वाक्षरीने विधेयक आणले आणि महाराष्ट्रात माहितीच्या अधिकाराचा कायदा अस्तित्वात आला. लोकशाही सदृढ करण्याच्या दृष्टीने 'माहितीच्या अधिकाराचा कायदा' हे क्रांतिकारी पाऊल असल्याचे मानले जाते.

या कायद्यामुळे प्रशासनात पारदर्शकता आली. आता सामान्य माणसाला अगदी नाममात्र दरात दहा ते वीस रुपये आकारून माहिती मिळू शकते. यामुळे चांगला प्रशासकीय कारभार व सुदृढ लोकशाहीचा मार्ग खऱ्या अर्थाने मोकळा झाला.

जर हा कायदा प्रत्येक गावात आणि घराघरात जाऊन पोहोचला, तर भ्रष्टाचाराला ऐंशी ते पंच्याऐंशी टक्क्यांपर्यंत आळा घालण्याची क्षमता या कायद्यामध्ये आहे. यापूर्वी भ्रष्टाचारामुळे दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रमातील केवळ दहा टक्के रक्कम प्रत्यक्ष लाभार्थींपर्यंत पोहोचत असे. उर्वरित रक्कम भ्रष्ट अधिकारी आणि राजकारण्यांच्या खिशात जात असे. आता माहितीच्या अधिकार कायद्यामुळे गरीब ग्रामस्थांना विकासप्रक्रियेतील त्यांचा वाटा मिळू लागला आहे. या कायद्यानंतर प्रकल्पांच्या कामाचा दर्जा सुधारण्यास प्रारंभ झाला आहे.

**माहितीच्या अधिकार कायद्यातील दुरुस्ती केंद्र सरकारने थांबवली**

माहिती अधिकाराचा कायदा करून सरकारने अठ्ठावन वर्षांच्या स्वातंत्र्यानंतर सकारात्मक पाऊल उचलले. मात्र या कायद्यामध्ये भ्रष्टाचाराला लगाम घालण्याची ताकद असल्याचे लक्षात येताच काही राजकीय नेते सावध झाले. आपल्या भ्रष्टाचाराच्या मार्गात हा कायदा अडसर ठरणार अशी भीती त्यांना सतावू लागली. पंतप्रधान मनमोहनसिंग यांच्या सरकारने पूर्वीच्या कायद्यात दुरुस्ती करण्यासाठी संसदेसमोर विधेयक ठेवले. जनतेला तब्बल अठ्ठावन वर्षांच्या

स्वातंत्र्यानंतर तसेच मोठ्या लढ्यानंतर या कायद्याद्वारे अधिकार प्राप्त झाले होते. प्रस्तावित दुरुस्तीमुळे कायद्याचा मूळ हेतूच नाहीसा होत होता. या प्रस्तावित दुरुस्तींच्या निषेधार्थ अण्णा हजारे यांनी आळंदी येथे आमरण उपोषण सुरू केले.

त्यांचे उपोषण सुरू होताच केवळ दोन दिवसांत महाराष्ट्राच्या विविध भागातील लोकांनी त्यांना पाठिंबा देण्यासाठी निदर्शने सुरू केली. ही निदर्शने त्यांनी स्वत:हून उत्फूर्तपणे सुरू केली होती. लोकांनी नऊ ठिकाणी रेल रोको आंदोलन केले. हळूहळू आंदोलनाचे लोण देशाच्या इतर भागात पसरू लागले. अमेरिकेत स्थायिक झालेल्या भारतीयांनीही लाक्षणिक उपोषण करून पाठिंबा दिला. देशात आणि देशाबाहेरही अण्णांना वाढता पाठिंबा मिळत असल्याचे पाहून पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी आपल्या एका मंत्र्याला विशेष दूत म्हणून आळंदीला पाठविले. सध्याच्या माहिती अधिकाराच्या कायद्यात केंद्र सरकार दुरुस्ती करणार नाही, असे आश्वासन देत पंतप्रधानांनी अण्णांना उपोषण सोडण्याचे आवाहन केले. त्यांच्या आवाहनानंतर अण्णांनी नवव्या दिवशी आपले उपोषण सोडले. सुदैवाने माहिती अधिकाराच्या कायद्यातील प्रस्तावित दुरुस्त्या करण्याची कल्पना सरकारने सोडून दिली.

### बदल्यांच्या नियमनाचा कायदा

सरकारी अधिकाऱ्यांच्या बदल्यांबाबत सरकारचे कोणतेही निश्चित असे धोरण नव्हते. राजकीय नेते किंवा लोकप्रतिनिधी आणि वरिष्ठ सनदी अधिकारी सरकारी नोकरांची बदली मनाप्रमाणे करीत असत. बदली करण्याच्या अधिकाराचा मोठ्या प्रमाणात गैरवापर केला जात असे. या बदल्या करताना कायम मोठ्या प्रमाणात पैशांची देवाण-घेवाण होत असे. त्यामुळे बदल्या हा लाच देण्या-घेण्याचा मूळ स्रोतच बनला होता.

समजा लोकप्रतिनिधी आपल्या नातेवाइकास किंवा विश्वासू व्यक्तीला एखाद्या महत्त्वाच्या पदावर बसवू इच्छित असेल आणि समजा त्या पदावर कोणीतरी प्रामाणिक अधिकारी असेल, तर राजकारणी आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करीत असे. लोकप्रतिनिधी प्रामाणिक अधिकाऱ्याची कारण नसताना त्या पदावरून बदली करीत असे. तेथे रिक्त जागा निर्माण झाली की, त्या पदावर आपल्या माणसाची नियुक्ती केली जात असे. प्रामाणिक अधिकाऱ्यावर यामुळे घोर अन्याय होत असे.

या प्रकारच्या अन्यायाला आळा घालण्यासाठी अण्णांनी चळवळ सुरू केली. कोणत्याही लोकप्रतिनिधीला तसेच वरिष्ठाला कोणाचीही किमान तीन वर्षे त्या पदावर काम होईपर्यंत बदली करता येणार नाही अशा प्रकारचा कायदा करावा अशी मागणी अण्णांनी केली. त्याचप्रमाणे कोणताही अधिकारी एकाच पदावर तीन वर्षांहून अधिक काळ राहणार नाही. स्थानिक खासदार, आमदार, मंत्री तसेच वरिष्ठ सनदी अधिकाऱ्यांनी या कायद्याला कडाडून विरोध केला. कारण त्यामुळे या सर्वांच्या मतलबाला आडकाठी येत होती. मात्र अखेर हा कायदा झालाच. या कायद्यामुळे प्रामाणिक अधिकाऱ्यांना थोडेसे हायसे वाटू लागले आणि बदल्यांमुळे होणारा भ्रष्टाचारही प्रचंड प्रमाणात कमी झाला.

### ग्रामसभांना जादा अधिकार

भारतीय लोकशाही व्यवस्थेत ज्याप्रमाणे केंद्रात लोकसभा व राज्यात विधानसभा आहे, तशी गावात ग्रामसभा ही जणू संसदच असते. लोकशाही व्यवस्थेत ग्रामसभा हीच सर्वोच्च आहे. भारतीय राज्यघटनेनुसार कोणतीही अठरा वर्षांवरील व्यक्ती ग्रामसभेची आपोआप सदस्य होते. अठरा वर्षांवरील गावचे नागरिक जे मतदार आहेत, ते ग्रामसभेचे सदस्य असतात. लोकसभा किंवा विधानसभेप्रमाणे ग्रामसभा निवडण्यासाठी निवडणूक होत नाही. त्या अर्थाने ग्रामसभा ही स्वतंत्र व सार्वभौम असते. ग्रामसभेचे सदस्य मतदार या नात्याने लोकसभा व विधानसभा निवडणुकीत आपले खासदार व आमदार निवडतात. अशाप्रमाणे ग्रामसभा ही लोकसभा व विधानसभेची जणू माताच आहे. केंद्रात किंवा राज्यात कोठेही सरकारच्या मंत्र्यांना कोणताही विकासकार्यक्रम आखताना लोकसभेला अथवा विधानसभेला विश्वासात घ्यावेच लागते. त्याचप्रमाणे गावपातळीवर निवडून आलेल्या सदस्यांनी म्हणजेच ग्रामपंचायतीने गावातील विकासयोजनांबाबत ग्रामसभेला विश्वासात घेण्याची आवश्यकता आहे.

ग्रामसभेला जादा अधिकार द्यावेत या मागणीसाठी सात वर्षे जनआंदोलन करण्यात आले. अखेर महाराष्ट्र सरकारने ग्रामसभेला जादा अधिकार देण्याचा कायदा संमत केला. सरकारकडून विविध योजनांसाठी मिळणारा निधी खर्च करण्यापूर्वी आता ग्रामपंचायतीला ग्रामसभेची परवानगी घेणे आता बंधनकारक करण्यात आले आहे. ग्रामसभेला अंधारात ठेवून ग्रामपंचायतीने पैसे खर्च केल्यास ग्रामस्थ (किमान वीस टक्के मतदार) या खर्चाच्या चौकशीसाठी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारिणी अधिकाऱ्याकडे दाद मागू शकतात. या तक्रारीची चौकशी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने महिन्याभरात करणे आवश्यक आहे. या चौकशीत ग्रामपंचायतीने ग्रामसभेच्या परवानगीशिवाय निधी खर्च केल्याचे निष्पन्न झाल्यास कायदेशीर कारवाई करण्याची शिफारस ते विभागीय आयुक्तांकडे करू शकतात. त्यानुसार गावचे सरपंच, उपसरपंच आणि ग्रामसेवकांना बडतर्फ करण्याचे अधिकार विभागीय आयुक्तांना या कायद्यानुसार बहाल करण्यात आले आहेत.

या कायद्यामुळे ग्रामविकास योजनांच्या अंमलबजावणीत मोठ्या प्रमाणावर पारदर्शकता आली आहे, आणि भ्रष्टाचारालासुद्धा मोठ्या प्रमाणवर चाप बसला. प्रत्येक नागरिकाला आपला लोकप्रतिनिधी निवडण्याचा अधिकार आहे. त्याचप्रमाणे प्रत्येक नागरिकाला निवडून गेलेल्या लोकप्रतिनिधीला परत बोलाविण्याचा अधिकार असायला हवा. या कायद्याने ग्रामस्थांना हा अधिकार मिळाला आहे. अधिक खुल्या व लोकाभिमुख लोकशाहीचे हे लक्षण आहे. विकासयोजनांत आणखी पारदर्शकता आणण्यासाठी या कायद्याचा कसा उपयोग करता येईल, याचे मार्गदर्शन लोकांना व पुढील पिढीला करण्याची नितांत आवश्यकता आहे. याद्वारे त्यांच्यात जागरूकता निर्माण करायला हवी.

**(मेहता पब्लिशिंग हाऊसच्या 'अण्णा हजारे' या प्रदीप ठाकूर/पूजा राणा संपादित आणि धनंजय बिजले अनुवादित पुस्तकातून)**



# चाकाची खुर्ची

**- नसीमा हुरजूक**

*आयुष्यात अनेक कटू प्रसंग-स्वप्नभंग माझ्या वाट्याला आले, तरी स्वप्न बघायची माझी खोड कमी होत नाही. स्वप्न दिसण्याचं बंद होणं म्हणजे मृत्यू असं मला वाटतं. बाबा आमटे म्हणतात, की भान ठेवून स्वप्नं बघावीत आणि ती प्रत्यक्षात आणण्यासाठी बेभानपणे कामं करावीत. हाच माझ्यापुढचा आदर्श आहे..आमचं उद्याचं स्वप्न आहे, अपंग व सुदृढ एकमेकांच्या मदतीनं एकाच शिक्षणसंस्थेत जीवनोपयोगी शिक्षण घेत आहेत. आदर्श अशा प्रशिक्षण केंद्रात संशोधित स्वरूपात अपंगांसाठी अधिक उपयुक्त, अधिक सोयीस्कर कृत्रिम साधनं अपंग तंत्रज्ञ बनवित आहेत. अनाथ, अपंग मुलांसाठी घरकुल उभं राहत आहे. सर्वसामान्यांप्रमाणे विवाह करून अपंग व्यक्ती सुखासमाधानानं जीवन व्यतीत करीत आहेत. एक.. दोन.. अन् अनेक.. शेवटी 'आकांक्षांपुढती गगन ठेंगणे-आमच्याही,' हेच खरं. अशी अनेक स्वप्नं आजही क्षितिजापल्याडच आहेत. त्यांच्या पाठीमागे मी धावतच राहणार आहे - माझ्या चाकाच्या खुर्चीच्या साहाय्यानं!*

‘बाबा गेल्यापासून ते नेहमी आम्हाला जे सांगत, ते आठवत असे, ‘खुदी को कर बुलंद इतना की खुदा बंदे से पूछे, बोल तेरी रजा क्या है? (स्वत:ला इतकं सामर्थ्यवान बनव, की देवानं स्वत: भक्ताला विचारावं, सांग, तुला काय हवं आहे?) इच्छा खूप होती स्वत:ला सामर्थ्यवान बनवण्याची. पण मार्ग सापडत नव्हता. कुमठ्याहून कोल्हापूरला परतल्यावर रात्री अकरा-अकरापर्यंत आकाशातले चंद्र-तारे पाहत पुढे काय, हा विचार करीत राहायची. त्यावेळी अरुणाचे ‘बाबा’ ‘माझे बाबा’ बनले. त्यांनी मला त्यांच्या गाडीतून फिरायला नेणं, बाहेर खाऊ घालणं सुरू केलं. मैत्रिणी, भाऊ, बहिणी सिनेमाला, बागेत नेऊ लागल्या. सूर्यप्रकाश, वारा, गर्दी यात किती सुख असतं, हे एक वर्ष रात्रंदिवस बिछान्याला खिळून छताचे वासे मोजल्यानंतरच समजू शकतं.

ते १९७० साल होतं. अरुणाच्या बाबांनी एके दिवशी माझी भेट बाबूकाका दिवाणांशी घडवली. त्यांनी अंध रमाकाकींच्या घरी मला नेलं. लाल परदेशी गाडीतून बाबूकाका आले. ड्रायव्हिंग सिटवर बसलेले. गाडी थांबली आणि लहानशी व्हीलचेअर काढली गेली. प्रसन्न हसत बाबूकाका त्या व्हीलचेअरवरून माझ्यापर्यंत आले. ते काय बोलले ते काही आठवत नाही, पण व्हीलचेअरवरचा माणूस इतका दिलखुलास हसू शकतो, मोठ्या कारखान्याच्या गोष्टी, विमानानं प्रवास, सर्व कल्पनेपलीकडचं होतं. ‘खुदी को कर बुलंद इतना’ मधील ‘बुलंद माणूस’ मला भेटला होता. मला शिक्षण कसं पूर्ण करावं, खेळांच्या स्पर्धेत भाग घ्यावा, स्वत: स्वावलंबी बनून कोल्हापूरमधील इतर अपंगांसाठी काही कार्य करणं किती गरजेचं आहे, हे ते सांगत होते. तो दिवस कोणता होता आठवत नाही, पण त्या दिवशी माझं अपंगत्व आटोक्यात आल्यासारखं वाटलं. काही काळ तर मी व्हीलचेअरमध्ये आहे, हेच विसरले होते. त्याचवर्षी मी शिक्षणाला सुरुवात केली. बाबूकाकांच्या आयुष्यावर लिहिलेली ‘माणूस मोठा जिद्दीचा’ ही कादंबरी वाचली. त्यावेळी मी प्रभावीत झाले होते, ती मा. पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या सोबतचा बाबूकाकांचा फोटो पाहून आणि पंतप्रधानांकडून त्यांना मिळालेल्या त्यांच्या हस्ताक्षरातील शुभेच्छा पाहून.

**महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री मनोहर जोशी यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारताना**



रेहानानं कोणाचंही न ऐकता कॉलेज सोडून शॉर्टहँड टायपिंग केलं आणि नोकरीसाठी लेखी परीक्षा दिल्या. इन्कमटॅक्स आणि सेंट्रज एक्साईजचा कॉल एकाच वेळी आला. मुलीला नोकरीला लावून तिची कमाई खाणार नाही, हा आईचा हट्ट. पण परिस्थिती, मामा आणि पाटीलकाकांमुळे आईनं नमतं घेतलं. रेहानानं नोकरीबरोबर बी. ए. चा घरी अभ्यास करून परीक्षा दिली. ती चांगल्या गुणांनी पास झाली. मी काही न बोलताही तिनं मलाही शिकण्याची इच्छा आहे, हे ओळखलं आणि विद्यापीठाला माझ्यातर्फे पत्र पाठवलं. विद्यापीठातून उत्तर आलं, विवाहित, नोकरी करणारे अथवा महाराष्ट्राबाहेरील विद्यार्थ्यांनाच बहि:स्थ विद्यार्थी म्हणून परीक्षा देता येते. कॉलेजला जाऊन परीक्षा देणं अशक्य आणि बहि:स्थ म्हणून नकार. खूप वाईट वाटलं.

बाबूकाकांना ही शिक्षणातील अडचण सांगताच त्यांनी गोखले कॉलेजचे प्रिन्सिपॉल एम. आर. देसाई यांना भेटण्याचा सल्ला दिला. एम. आर. यांची मुलगी लीना माझी वर्गमैत्रीण. तिला अरुणानं निरोप देताच एम. आर. स्वत: आमच्या घरी आले. अजीजला सोबत घेऊन त्याच दिवशी बुक बँकेतून सर्व पुस्तकं पाठवली. दिवाळीत बाबूकाका भेटले. त्यानंतर १५-२० दिवसांत एम. आर. भेटले. परीक्षेला अडीच महिने होते. तीन वर्षांचा गॅप आणि एम. आर. म्हणत होते, जूनपासून तुझी प्रेझेंटी कॉलेजमध्ये मांडली आहे. जोरात अभ्यास कर. खात्री नव्हती, पण अभ्यासाला लागले. पुस्तक वाचणं, नोट्स काढणं आणि त्या वाचणं. रात्री अंधारात अंगणात बसणं कमी झालं. झोप लागू लागली.

परीक्षेला जाताना मनात प्रचंड धाकधूक. रात्री स्वप्न पडायचं, मी टॅक्सीनं गेले आणि व्हीलचेअर घरीच राहिली. परीक्षेला जाताना सोबत अजीज, मैत्रीण, बहीण सोबत येत. टॅक्सीत दोन-तीनदा तरी मी विचारायची, डिकीत व्हीलचेअर आहे ना? माझा नंबर काही पेपर्सना नवीन राजाराम कॉलेजला तळमजल्यावर होता, तर काही पेपर्सना वर होता.

पेपर सुरू झाल्यावर मी लिहिण्यात गुंग असताना परीक्षक व्हीलचेअर बघून माझ्या जवळ येत आणि मला वैयक्तिक प्रश्न विचारीत, ‘कधी झालं?’ ‘कसं झालं?’ प्रश्नांबद्दल माझी तक्रार नसे. पण चुकीच्या वेळी ते विचारत होते. शेवटी तिसऱ्या पेपरला वैतागून मी बोलले, ‘‘कृपया, पेपर संपल्यावर माझी सर्व हकीकत दिली तर चालेल का?’’

एका परीक्षकानं तर मला स्टाफरूममध्ये बसून पेपर लिहायला लावला. पण तेव्हा मनावर प्रचंड दडपण आलं होतं, कॉलेजच्या स्टाफरूममध्ये पेपर लिहिताना. परीक्षा तर दिली, पण यशाची खात्री नव्हती. पण सुदैवानं इंग्लिशसहित सर्व विषयांत मी पास झाले. बाबूकाकांचं शाबासकीचं पत्र, सर्व नातेवाईक, मैत्रिणींनी केलेलं अभिनंदन, त्यामुळे उत्साह वाढला आणि दुसऱ्या वर्षीचा अभ्यास वर्षभरात निवांतपणे केला. त्यावर्षी गोखले कॉलेजला नंबर आला. कधीही न बघितलेलं ते माझं कॉलेज होतं. एम. आर. आणि इतर प्राध्यापकांनी येऊन चौकशी केली. मधल्या सुट्टीत चहा, खाणं सर्व लाड करून घेतले. बी. ए. ला ऑनर्स मिळाला आणि खूप आनंद झाला. इतर

भावंडांप्रमाणे पदवीदानाचा गाऊन घालून फोटो काढून घेण्याची इच्छा होती. पण बोलून दाखवण्यास संकोच वाटला. पदवीदान समारंभाला पण काही कारणास्तव गेले नाही.

एकदा आई गावाला गेली होती. माझ्यापेक्षा दीड वर्षानं मोठी असलेली रेहाना नोकरी, स्वयंपाक, आणि माझी आंघोळ वगैरे सर्व कामं करीत होती. धाकटा भाऊ अजीज भांडी स्वच्छ करणं वगैरे कामात मदत करत होता. माझ्यापेक्षा आठ वर्षांनी लहान असलेली सर्वात धाकटी बहीण कौसर झाडलोट, बिछाने घालणं वगैरे कामं करीत होती. मी एकटीच बसून राहत असे आणि माझं मलाच अपराधी वाटत असे. कारण सर्वात जास्त मोकळा वेळ माझ्याच जवळ होता. अजीजला मी 'मलाही काम करावंसं वाटतं, स्वयंपाक करावासा वाटतो,' हे बोलले. त्यानं लागलीच माझी व्हीलचेअर स्वयंपाकघरात आणली. रेहाना ऑफिसमधून यायच्या आधी त्यानं हाताशी दिलेल्या साहित्यानं कमी उंचीच्या स्टूलावर ठेवून दिलेल्या स्टोव्हच्या सहाय्यानं मी व्हीलचेअरवरून पहिले पोहे केले. सर्वांनी खूप छान म्हणून खाल्ले. दुसऱ्याच दिवशी अजीज, रेहाना, कौसरनं मिळून स्वयंपाकघराची पूर्ण रचनाच बदलली. प्रत्येक डबा, भिंतीवरील, रॅकवरील साहित्य माझ्या हाताला येईल अशा उंचीवर ठेवलं आणि मी चपाती, भाजी, भात, आमटी करू लागले. हे सर्व करता येऊ लागल्याचा, बहीण-भावंडांच्या कामाचा भार हलका करू लागल्याचा आनंद काही औरच होता. मी भांडीसुद्धा घासू लागले.

नुकतीच घरी बसून बी.ए.ची परीक्षा दिली होती आणि 'स्वराज्य'मध्ये 'सुट्टीतील उपक्रम लेखन' स्पर्धेविषयी वाचलं. माझा हा स्वयंपाकातील अनुभव, आनंद मी लिहून पाठवला आणि काय आश्‍चर्य, एके दिवशी माझा प्रसिद्ध झालेला लेख घेऊन रेहाना घरी आली आणि सर्वांनी तो आनंद असाच गरम गरम पदार्थ करून खाण्यानं साजरा केला.

धाकट्या कौसरकडे बाबांच्या निधनानंतर सर्वांचंच खूप दुर्लक्ष झालं. प्रत्येक जण आपल्या दु:खात चूर आणि सर्वांचा राग तिच्यावर एकटीवर निघे. त्यामुळे हसरी, बोलकी कौशी एकदम मूक, गंभीर झाली. तिच्या शाळेतल्या एका शिक्षिकेनं एकदा तिच्याविषयी येऊन सांगितल्यावर सर्वांचे डोळे उघडले. कौसरला स्कॉलरशिपचे पैसे मिळाले होते. त्यातून लाल फ्रॉक विकत घ्यायचा म्हणून ते तिनं तसेच ठेवले होते. पण आई गावाला गेली होती आणि घरी अचानक पाहुणे आले. कोणाकडेच पैसे नव्हते. शेवटी कौसरच्या स्कॉलरशिपच्या पैशानं पाहुण्यांचा पाहुणचार केला. कौसरनं हसत पैसे दिले. पण आई आल्यावर आईला तिच्या दप्तरात लाल फ्रॉकवर तिनं लिहिलेली कविता मिळाली. रेहानाचा पगार होताच रेहानानं प्रथम तिला लाल फ्रॉक आणून चकित केलं.

कुटुंबीयांच्या प्रेमळ सहकार्यामुळे घरच्या मशीनला हातानं फिरवता येणारं हँडल बसवण्यात आलं आणि दिवसातला बराच वेळ मी मशीनवर बसू लागले. भाऊ नोकरीसाठी परदेशात गेल्यावर याच मशीनला मोटर बसवली. या तीस वर्षांत सुखदु:खाचे अनेक प्रसंग आले. पण हिम्मत खचण्याऐवजी चिकाटी वाढतच गेली.

बाबूकाका दर दोन वर्षांनी कोल्हापूरला आपल्या जन्मगावी येत. सर्व ओळखीच्या अपंग व्यक्तींना एकत्रित करत. त्यांना अपंग सहय्यकाचं कार्य सुरू करण्यास सांगत. त्यांच्यासोबत त्यांच्या हँड कंट्रोल गाडीतून



फिरताना, त्यांचं भाषण ऐकताना मन रोमांचित होत असे. अतिशय आनंदात ते दिवस जात. तोपर्यंत इतर अपंगांच्या सुखदु:खाचा विचार मनात कधी आलाच नव्हता. बाबूकाकांचं भाषण ऐकताना लक्षात आलं, की आपल्या गावात, महाराष्ट्रात, भारतात असंख्य अपंग आपल्यापेक्षा वाईट परिस्थितीत जगत आहेत. त्यांच्यासाठी आपण बाबूकाकांप्रमाणे कार्य करायचं, असा मी निश्‍चय केला. १९७२ मध्ये ते असताना एक संस्था स्थापन केली. नावही बाबूकाकांच्या मतानं नक्की केलं. 'अपंग साहाय्यक संस्था.' या संस्थेचं कार्य सुरू करण्यापूर्वी बाबूकाकांनी बेंगलोरला त्यांची संस्था बघायला बोलावलं. जाण्यायेण्याचा खर्च श्री. दत्ता बाळ यांनी दिला.

बाबूकाका भेटण्यापूर्वी मी घराबाहेर पडताना अंगाखाली बेडशीटच्या घड्या ठेवत असे. नंतर त्यात सुधारणा करून चौकोनी उशीचा अभ्रा शिवून त्यात दोन बेडशीट आणि दोहोंच्या मध्ये प्लास्टिक ठेवू लागले. एक बाजू भिजल्यावर दुसऱ्या बाजूनं ठेवायचे. अशा अवस्थेत कोल्हापूर, बेंगलोर इतक्या लांबचा प्रवास कसा करायचा हा प्रश्‍न पडला. मग साधा कॅथेटर बसवून गेले. पण वाटेत रेल्वेतच कॅथेटर निघाला. सोबत मावशी राहीला आणि अजीज होते. त्यांनी धीर दिला. बेंगलोरला बाबूकाका मार्ग





**संस्थेतील मुलांसोबतचे काही क्षण**

दाखवतील, या आशेनं धैर्य खचू दिलं नाही. पोट साफ होण्यासाठीही मला गोळ्या आणि त्याचाही परिणाम होत नाही म्हणून एनिमा घ्यावा लागत होता.

एनिमाची रिॲक्शन येऊन मोठमोठ्या गांधी सर्व शरीरभर उठायच्या. त्यासाठी दोन वेळा दवाखान्यात न्यावं लागलं होतं.

बेंगलोरला बाबूकाकांनी स्वत:च्या मुलीची काळजी घ्यावी, त्याप्रमाणे त्वरित दवाखान्यात नेलं आणि नवीन प्रकारचा 'फॉलीस कॅथेटर' बसवला. (१९७२) आणि जादूची कांडी फिरवल्याप्रमाणे माझं कपडे भिजणं थांबलं. मन आनंदानं इतकं मोहरलं की मी तिथल्या अपंग क्रीडा स्पर्धेत भाग घेतला आणि चॅम्पियन ठरले. शाळा- कॉलेजच्या वेळच्या क्रीडा व नाचामधील माझ्या अनुभवांसंबंधी १९६७ नंतर प्रथमच मी अनेक ठिकाणांहून आलेल्या माझ्या अपंग मैत्रिणींना सांगितलं. एरवी मी चालत असतानाच्या माझ्या नाचाचा, खेळाचा कोणी उल्लेख केला तरी माझे डोळे भरून यायचे.


१९७२-७३ मध्ये झालेल्या या क्रीडा स्पर्धेच्या मैदानावर एक गोष्ट जाणवली ती ही, की माझ्यासारखी स्पर्शज्ञान गमावलेली, लघवी-संडासचा त्रास असलेली कोणी स्त्री त्यात नव्हती. माझ्यासारख्या स्थितीत असलेले आर्मीचे अनेक जवान मात्र होते. पुढे १९९६ मध्ये मुंबईला, पॅराप्लेजिक स्त्रीनं कसं जगावं यावर माझं भाषण ठेवू, असं तिथल्या संचालकांनी सांगितल्यामुळे मी लागलीच होकार दिला. पण ज्यांना शिकवायचं त्यांची संख्या मोजायला सांगितली, तर सर्वजणी पोलिओ झालेल्या होत्या. स्पर्शज्ञान गेलेल्या माझ्यासारख्या एकीनंही आपलं घर, गाव सोडून क्रीडा-स्पर्धेतील आनंद घेण्याचं धाडस केलं नव्हतं. याचं कारण एकच. अपुरं प्रशिक्षण आणि समाजात वावरायची भीती! हे लिहिण्याचं कारण असं, की २६ वर्षांपूर्वी पॅराप्लेजिक स्त्री जशी घराच्या चार भिंतीतच संपून जात होती, तशीच ती आजही आहे आणि हे बदलायला हवं आहे.

हे लिहिताना न शिकलेली, जखमांनी भरलेली आणि बिछाना खराब होतो म्हणून लाकडी दिवाणावर, पोत्यावर झोपून क्रोशाचे रुमाल विणणारी अशिक्षित अनिता राणे आणि पदवीधर असून खेड्यात जमिनीवर पोत्यावर झोपणारी सुशीला डोळ्यांसमोर येत आहेत. दोघींना इथे कोल्हापुरात आणून माझ्यासारखं स्वावलंबी बनवण्याचा प्रयत्न केला, पण दोघींच्याही पालकांनी साथ दिली नाही.

बेंगलोरला बाबूकाकांच्या सहवासात बारा दिवस-रात्री राहिले. त्यांचं खऱ्या अर्थानं जगणं जवळून पाहिलं आणि माझं आयुष्य बदलून गेलं. बाबूकाकांइतकं प्रेम, भक्ती, माया मी कोणावर करू शकले नाही. आजही मला बाबूकाका सर्वात प्रिय आहेत. त्यांनी मला डाव्या हातात सर्जिकल हॅंडग्लोव्हज् घालून स्वत:चं पोट कसं साफ करायचं, हे सांगितलं. सुरुवातीला मला खूपच त्रास झाला. आपल्याला हे जमणारच नाही, असं वाटलं. पण हळूहळू जमू लागलं आणि ज्याच्यामुळे मरण हवंसं वाटत होतं, तो त्रास नाहीसा झाला. रोज सकाळी उठल्या उठल्या पोट साफ होऊ लागलं. दिवसभर कुठे जाताना, काम करताना कपडे खराब व्हायची भीती वाटायची, ती वाटेनाशी झाली. कामात, अभ्यासात मन एकाग्र होऊ लागलं. बेंगलोरहून परत येताना बाबूकाकांनी सुंदर साडी दिली. स्टेशनवर सोडायला ते आले, तेव्हा त्यांचे ओलावलेले डोळे बघितले आणि वाटलं, किती एकटे आहेत बाबूकाका! आपण त्यांची मुलगी होऊन त्यांच्याजवळ राहून त्यांना चांगलं खाऊपिऊ घालावं. इतरांसाठी ते पहाटेपासून रात्री उशिरापर्यंत काम करतात. बाहेरून आणलेला डबा खातात. आम्ही असताना आमच्या खोलीतच नाश्ता बनवत होतो. त्यांच्या खोलीशेजारीच, वर्कशॉपला लागून आम्हाला खोली दिली होती. बाबूकाकांचं ऑफिस, वर्कशॉप बघितलं आणि वाटलं, आपल्याला असं कार्य कोल्हापूर येथे करण्यास बाबूकाका सांगत आहेत. पण आपली इतकी योग्यता कुठे आहे?

बाबूकाकांनी सर्व अडचणींवर मात करून कसं जगावं हे जसं मला शिकवलं, तसं ज्या हॉस्पिटलमधून डिस्चार्ज घेऊन पेशंटस् बाहेर पडतात तिथे का शिकवलं जात नाही? आजही मी अनेक डॉक्टर्सना विनंती करते, की हे शिकवा, ट्रेनिंग द्या आणि मग पेशंटला घरी पाठवा किंवा सुदैवानं आता आमच्या संस्थेकडे सर्व सुविधा आहेत; तेव्हा आमच्या संस्थेकडे अशा ट्रेनिंगसाठी पाठवा.

**(मेहता पब्लिशिंग हाऊसच्या 'चाकाची खुर्ची' या नसीमा हुरजूक लिखित पुस्तकातून)**



# खाली जमीन, वर आकाश

- डॉ. सुनीलकुमार लवटे

*लहानपणी मला प्रश्नांची विलक्षण ॲलर्जी होती. छोटे प्रश्न मोठा थरकाप उडवायचे. तसे ते प्रश्न काही यक्षप्रश्न नव्हते. साधे, सोपे, सहज प्रश्न...*

*तुझं नाव काय?*

*तुझे आई-वडील?*

*गाव कुठलं?*

*तू कुणापैकी?*

*तुझ्या ओळखीचं कोणी आहे का?*

*तुम्ही विश्वास ठेवा अथवा ठेवू नका, पण या प्रश्नांची उत्तरं माझ्याकडे त्यावेळी नसायची. प्रश्नकर्ते मला निरुत्तर पाहून अचंबित व्हायचे. मी मात्र गोंधळलेला, गांगरलेला असायचो. हे प्रश्न तुमच्या जमिनीतले होते. मला तुम्ही निश्प्रश्न जमीन आणि निरभ्र आकाश दिलं होतं. कुमारीमातेच्या पोटी जन्मलेल्या मला या प्रश्नांची उत्तरं उगवण्यासाठीची जमीन तुम्ही मला कुठं दिली होती?*

मी ज्या कोल्हापूरच्या रिमांड होममध्ये होतो, ते रिमांड होम संस्थानिक काळात 'पद्माळा रेसकोर्स' नावाने परिचित असलेल्या परिसरात होते. जुन्या रेसकोर्सच्या घोड्यांच्या पागेतच ते सुरू झाले होते. शेजारी असणाऱ्या रेसकोर्सचे तिकीट घर, बँड स्टँड, रॉयल गॅलरी, एक्कावन ठाणी, साठमारी, हुजुरपागा अशा इतिहासाच्या खुणा मिरवणाऱ्या जुन्या-पुराण्या वास्तूंनी हा परिसर रोमांचित होता. पैकी एका घोड्यांच्या पागेत व माहुतादी मंडळींच्या निवासात रिमांड होम सुरू झालेलं. शेजारच्या तिकीट घराजवळच्या रॉयल स्टँड, बँड स्टँड परिसरात आता जनावरांचा दवाखाना सुरू झाला आहे. राधाकृष्ण मंदिराची पागा अनाथाश्रमाला देण्यात आलेली होती. हुजुरपागेत मुली-महिला राहायच्या. ब्रिटीश रेसिडेंटचानिवास असलेला शिलेदार वाडाही (आनंदीबाई वाडा) आश्रमास मिळालेला. तिकडं एक्कावन ठाणा परिसरात प्रिंस शिवाजी बोर्डिंग सुरू झालं. आर्य समाजाला थट्टी म्हणून ओळखली जाणारी वास्तू व परिसर देण्यात आला होता. शेजारी चित्रतपस्वी भालजी पेंढारकरांचा जयप्रभा स्टुडिओ मराठी चित्रपटाचा साक्षीदार म्हणून सतत गजबजलेला व प्रकाशमान असायचा. थोडं पुढं गेलं की साठमारी होती. आता या साऱ्या वास्तूत वंचित-उपेक्षितांचे संगोपन, शिक्षण करणाऱ्या संस्था कार्यरत होत्या. ही राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या दूरदृष्टीनी साकारलेली नवी समाजसृष्टी होती.

जून १९५९ च्या सुमारास आर्य समाजाने थट्टीत चालवलेल्या शाहू दयानंद मोफत मराठी शाळेत रिमांड होमच्या इतर मुलांबरोबर मी जाऊ लागलो. या शाळेत शेजारच्या मंडलिक वसाहत, जवाहरनगर, सुभाषनगर वस्तीतील प्रामुख्याने ढोर, चांभार वर्गातील मुले येत. आर्य समाजाचं एक वसतिगृह शाळेच्या परिसरात होतं. इथंही प्रामुख्याने हरिजन व मराठा समाजातील अत्यंत गरीब विद्यार्थी राहत. पोती, घोंगडीवर झोपणारी ही मुलं आम्हाला अकारण जवळची वाटायची. शाळेच्या परिसरात एक डेरेदार बकुळीचं झाड होतं. त्या झाडात मातृत्व भरलेलं सतत मला जाणवायचं. बालपणाच्या त्या एकलकोंड्या काळात .... या बकुळीच्या भोवती पडलेली फुले वेचत-हुंगत चार वर्ष कशी गेली ते समजलं सुध्दा नाही. शाळेच्या मागील बाजूस त्यावेळी ऊस, शेंगांची शेती होती. घरातून येणारी शाळेतील मुले मधल्या सुट्टीत जेवणाचा डबा आणायची. बरीचशी मुले घरीच जेवायला जात असत. रिमांड होम एक वेळची सकाळची गव्हाची कांजी (पेज) व दोन वेळचं जेवण एवढ्यावरच आमची गुजराण करायचा. मधल्या सुट्टीत ऊस, गूळ, शेंगेचा फराळ ठरलेला. नाही म्हणायला कधी तरी अरुण कसबेकर, अनिल घाटगे, शंकर वाडकर, शिवाजी पाटीलसारखी सहृदय मित्रमंडळी घासातला घास द्यायची. खिशातून आमच्यासाठी घरातून चोरून भाकरी आणणारे हे मित्र आज भेटले की पूर्वस्मृतींनी गलबलायला होतं. बाकी विद्यार्थी-शिक्षकांनी घेरलेल्या या आर्यांच्या शाळेत आम्ही रिमांड होमची मुलं अनार्य होतो, अस्पृश्य होतो!

वर्गात साधी खोडरबरची चोरी झाली तरी आमची झडती प्रथम घेतली जायची. आम्ही रिमांड होमची मुलं म्हणजे चोर अशी ठाम समजूत शिक्षकांसह साऱ्या विद्यार्थ्यांची असायची. शाळेत येणारी अधिकांश रिमांड होमची मुलं अनाथ, निराधार, दारिद्र्याने पिचल्यानेच आलेली असायची. बऱ्याचदा नंतर बाहेरच्या मुलांतच चोर (छुपा रुस्तम!) निघायचा. पण प्रथम आरोपपत्र (एफ.आय.आर.) मात्र आमच्यावरच दाखल व्हायचं! हा सारा व्यवहार रिमांड होमबद्दल समाजमनात असलेल्या प्रतिमेचा अभिन्न भाग होता.

पंढपूरच्या शाळेप्रमाणे इथं पण रिमांड होमच्या मुलांना स्वतंत्र नसलं तरी एकाबाजूला बसवलं जायचं. आमच्या मुलांत दंगा करणारी, अभ्यास न करणारी, तास चुकवणारी मुलं नव्हती असे नाही, पण ती अपवाद असायची. शाळेत परीक्षेबरोबर खेळात रिमांड होमचीच मुले आघाडीवर असायची.

खेळावरून आठवलं, मी सहावीत असताना शालेय शहर क्रीडा स्पर्धेत माझा गोळाफेकमध्ये चक्क पहिला नंबर आला होता. मैदानावर माईकवरून 'बारा वर्षांखालील गोळाफेक -प्रथम क्रमांक .... सुनील श्रीपाद लवटे-शाहू दयानंद मोफत मराठी शाळा' अशी अनाऊंसमेंट ऐकून माझ्या आश्चर्यास पारावार राहिला नव्हता. नंतर कळालं की गुरुजींनी माझ्या नावावर गोरख गडाख या आमच्या वर्गातील थोराड मुलाला खेळवलं होतं. बक्षीस समारंभानंतर गुरुजींनी बक्षिसाचा पेला गडाखला व प्रशस्तीपत्र मला देऊन 'तेरी भी चुप .... मेरी भी' केली होती. माझ्या आजवरच्या आयुष्यातील क्रीडांगणावरील हा माझा पहिला व शेवटचा पराक्रम होता! याचे सारे श्रेय त्या द्रष्ट्या गुरुजींनाच द्यावे लागेल ना? मला द्रोणाचार्य समजले ते या क्षणीच.

इथं मी चौथीत दाखल झालो. गुजर गुरुजी आमचे वर्गशिक्षक होते. आमच्या छोट्या बोळीवजा वर्गात चांगली पन्नासभर मुलं कोंबलेली असायची. रिमांड होमचे म्हणून आम्ही शेवटच्या ओळीत बसायचो. शेवटची ओळ आमचं 'अढळपद'होतं खरं! इथेच गुळवणी गुरुजी आम्हाला चित्रकला शिकवायला भेटले. मारकुटे होते ते. रिमांड होममधून कधी-कधी ड्रॉइंगचे ताव मिळत नसत. त्यांना दया-माया नव्हती. उभी पट्टी मारायचा त्यांचा स्वत:चा असा शिरस्ता होता. त्याच्या लेखी सब घोडे बाराटक्के होते.

पाचवीत मात्र आम्हास श्याम सौंदलगे नावाचे एक कनवाळू शिक्षक भेटले. एकच वर्ष ते शाळेत होते. मी आज हिंदीचा प्राध्यापक, लेखक, समीक्षक, अनुवादक, म्हणून मिरवतो खरा. पण हिंदीतील पहिलं 'मैं -हूँ, हम हैं' शिकवलं ते सौंदलगे सरांनी. अत्यंत हळू आवाजात, प्रेमाने, मन:पूर्वक शिकवणाऱ्या या सरांच्या वर्गात नेहमी शांतता असायची. मला शिकायची पहिली गोडी सौंदलगे सरांमुळे लागली. परवा हे लक्षात ठेवून मी तब्बल चाळीस वर्षांनी सौंदलगे सरांना शोधून भेटलो तेव्हा ते भरून पावले व मी कृतज्ञ! कृतकृत्य!!

सहावीत जाधव सर शिकवायचे. इंग्रजी शिकवण्यात त्यांचा हातखंडा होता. आम्हाला गणिताची गोडी त्यांनीच लावली. सातवीत वर्गशिक्षक असणारे ग.चि. सांगावकर 'गुरुजी' पठडीतील शिक्षक! देव माणूस!! मुलं त्यांना ऐकायची नाहीत पण खरं शिकवणं त्यांचंच होतं. मराठी व्याकरण त्यांच्या घरी पाणी भरायचं! साधे व्ह.फा. (व्हर्नाक्युलर फायनल) झालेले. मोठे होईपर्यंत ही 'व्ह.फा.' ची वर्गातील त्यांच्या नावाखालची डिग्री मला बेचैन करीत होती. ती डिग्री मला त्यावेळी



आजच्या पीएच्.डी. सारखी वाटायची, ती त्यांच्या शिकवण्याच्या तळमळीमुळे.

मुतगी सर आमचे मुख्याध्यापक होते. लहानपणी आम्ही त्यांना घाबरायचो. मोठेपणीच्या त्यांच्या संपर्कात मला त्यांच्यातील कुशल प्रशासकाच्या कितीतरी पाऊलखुणा आढळल्या. करजगार बाईंनी आम्हास कधी शिकवलं नाही. पण जाता येता त्यांचं 'शोनू' म्हणून गालगुच्चा घेणं मला वाळवंटातील हिरवळीप्रमाणे सुखद वाटायचं!

दत्ता भोसले, भानुदास जोशी, बाबरे, अवघडे, देवकाते, मुलाणी, धायजी, अभय अशी संस्थेतील मुले माझ्या वर्गात होती. चौथीपासून अकरावीपर्यंतच्या प्रवासात या सवंगड्यांनी मला मैत्रीचं अभय कवच दिलं. त्या अभेद्य कवचात मी माझं अशक्तपण नेहमी सुरक्षित अनुभवलं! रिमांड होमच्या मुलांत एकी असायची. कुणाच्या केसाला धक्का लावायचं धाडस बाहेरची मुलं करत नसत. तसा प्रयत्न कुणी केला तर त्याचं खरं नसायचं.

शाळेतल्या रिकाम्या वेळात जयप्रभा स्टुडिओची शूटिंग्ज पाहणं आम्हा सर्वांचा आवडता छंद होऊन बसलेला होता. सिनेमा पाहायला मिळणं हा कपिलाषष्टीचा योग असल्यानं वारंवार होणारी शूटिंग्ज आम्हाला पर्वणी वाटायची. 'सलामी', 'वरदक्षिणा', 'तांबडी माती', सारख्या चित्रपटांची शूटिंग्ज त्याकाळात आम्ही पाहिली होती. चंद्रकांत, सूर्यकांत, उषा किरण, रमेश देव, जयश्री गडकर, राजा परांजपे, धुमाळ, शरद तळवलकर प्रभृती कलाकारांना तर आम्ही नित्य पाहत असू. काही चित्रपटांच्या गर्दीच्या दृष्यात आमच्यावर फिरवलेला कॅमेरा सुखद शिडकावा करायचा. या काळात तुटलेली फिल्म रिळे साठवायचा मला छंद होता. वर्गाच्या मागे कितीतरी फिल्मचे तुकडे पडलेले असायचे. ते तुकडे गुंडाळत, न्याहाळत मी माझं आयुष्य धुंडाळत होतो.

याच काळात शंकर अण्णा भालकर नावाच्या व्यवसायाने परीट असलेल्या एका मातृहृदयी माणसाशी आमची गाठ पडली, नि आयुष्याचं अनाथपण धुऊन गेलं. आम्ही त्यांना 'शंकरदादा' म्हणत असू. शंकरदादा आमच्या पंढरपूरच्या आश्रमातील वामनराव व लीलाबाई घोडके या धोबी दांपत्याचे नातेवाईक. पंढरपूरच्या आश्रमातली मुलं कोल्हापूरला आल्याचं त्यांना प्रसंगाने कळाले नि ते भेटायला आले. आजही त्यांचं भेटणं अखंड सुरू आहे. रिमांड होममध्ये मंगळवार हा पालक भेटीचा दिवस असायचा. ज्या मुलांचे पालक असत, ती मुले डोळ्यांत जीव ओतून मंगळवारची वाट पाहत असायची. आमच्यासारख्या पालक नसलेल्या अनाथ, मुलांना मंगळवार 'अमंगळ' होता. अशा दिवसात शंकरदादा पंढरपूरहून आलेल्या आम्हा आठ जणांचे पालक म्हणून न चुकता येत. येताना न विसरता खाऊ आणत. आम्ही लहान होतो. आमचे आठवडाभराचे कपडे घेऊन जायचे आणि पुढच्या मंगळवारी भट्टी, इस्त्री करून आणायचे. दादांनी दहा वर्षे या क्रमात कधी खंड पडू दिला नाही. सणवार असेल तर मटण, पुरणाचं जेवण घेऊन शाळेत मधल्या सुट्टीत यायचे. यल्लमाच्या ओढ्यावर नेऊन ते चोरून आम्हास खायला घालत. त्यावेळी पालकांना शाळेत परस्पर भेटण्यास रिमांड होमची परवानगी नसायची. दिवाळी-मे महिन्याच्या सुट्टीत पंढरपूरला जाता-येता दादांच्या घरी आमचा मुक्काम ठरलेला असायचा. त्या काळात आम्ही साऱ्या परीट गल्लीचे पाहुणे असायचो. आबा, काकू, रतनताई, एकनाथदादा, नामदेव, वहिनी सर्वांनी लावलेला जीव-केवळ त्यावरच रिमांड होमचं ते तुरुंगी आयुष्य तरून गेलं .... अन्यथा मीपण एक पाकीटमार, चप्पलचोर म्हणून 'Wanted' झालो असतो ...आमच्याबरोबरची दसऱ्या, हरण्या, लाल्यासारखी मुलं आठवतात.... मग दादांच्या आधाराचा 'वड' किती पक्का, मजबूत होता हे लक्षात येतं....

दादा आमची हरएक मदत करायचे. त्यावेळी पंढरपूरला असणाऱ्या सांभाळलेल्या आईस पत्र लिहावंसं वाटायचं. संस्थेत पत्रं लिहायला मज्जाव होता. दादा चोरून कार्ड आणून द्यायचे. लिहून त्यांच्याकडे दिले की ते पोष्टात टाकत. आता आमचा पत्ता C/o श्री.शंकर भालकर, १८२५, परीट गल्ली, शनिवार पेठ, कोल्हापूर असाच होऊन गेला होता. घरच्या पत्त्यावर आलेली पत्रं ही दादा गुपचुप आणून देत.


रिमांड होममध्ये आजारी पडलं की पंचौषधी ठरलेली.आयोडीन, खोकल्याचं लाल औषध, ए.पी.सी.च्या गोळ्या, सोडामिंट, नि ॲस्टोकॅल्शियम. डॉक्टर शिंदे आमचे सर्व आजार या पंचौषधीत जेरबंद करीत. मी त्यांना मदत करत असायचो. कंपौंडर म्हणून. मला पुढे-पुढे आपण डॉक्टर असल्यासारखं वाटू लागलं. डॉक्टर व्हावं असं वाटायचं. पण त्यावेळी रिमांड होमची मुलं कॉलेजला पाठवायचा रिवाज नव्हता. अन्यथा झालोही असतो .... मी 'Doctor of Bottles' नाही झालो तरी पुढे 'Doctor of Books' झालो खरा! त्यांची प्राथमिक बीजं आज मला या उमेदवारीत आढळतात.... दादा त्या काळात औषधंही आणून देत.

त्यावेळी वारंवार माझ्या छातीत दुखायचं.... पण कधी X-Ray नं तपासणी झाली नाही. पुढं मी क्षयग्रस्त झालो.... सहा महिने मला पडून राहावं लागलं.... रिमांड होमच्या काळात लक्ष गेलं असतं तर.... पण तिथं त्यावेळी 'घर की मुर्गी दाल बराबर' असाच सारा मामला होता.

शाहू दयानंद मोफत मराठी शाळेतच मी पहिली स्काऊटची शपथ (दीक्षा) घेतली. सामुदायिक जीवनाचे प्राथमिक धडे या शाळेनेच मला शिकवले. येथील डी.टी. मालक साहेब यांच्यामुळे सफाई, शिस्त, नीटनेटकेपणा माझ्या अंगी बाणला. ते येता जाता रस्त्यावरील पडलेले दगड वेचत. लहानपणी मला ते वेडे वाटत. आता लक्षात येतं.... आम्ही सर्व मुलं अनवाणी होतो.... त्यांच्या प्रत्येक दगड वेचण्यात आमची काळजीच वेचली जायची. त्यांनी शिकवलेल्या आर्य समाज मंत्राने मला 'शांति-संस्कार' दिला. शाळेत आम्ही रोज प्रार्थनेपूर्वी 'ॐ शांति, श्यामा शांति दे' श्लोक म्हणत असू. अत्यंत घाईत म्हटला जाणारा तो श्लोक.... त्या स्वरांची आवर्तनं आजही माझ्या कानात घुमत असल्याचा भास होतो. आर्य समाजाच्या मंत्रोच्चाराने भारलेल्या या भूमीत आमचं अनार्यपण, अनाथपण अलगपणे अलगद पोसलं गेलं.... अगदी अजाणतेपणी.... त्या दिवसांच्या अनेक जखमा आजही घर करून आहेत.... जेवणाच्या अनेक सुट्ट्या हौदाचं पाणी पिऊन काढल्याचं चांगलं लक्षात आहे .... विस्तीर्ण मैदानाच्या काठी असलेल्या विशाल विहिरीच्या काठावर मी कितीतरी दिवस एकटा बसून माझ्या भविष्यलक्ष्यी स्वप्नांची प्रतिबिंबं न्याहाळत घालावले होते.... त्या विहिरीवर वेळोवेळी रडत एकांतात काढलेल्या त्या सुट्ट्या.... त्यावेळी विहीर आपल्याच अश्रूनं भरल्याचा मला भास व्हायचा .... त्यातूनच कधीकाळी काही बनण्याचा ध्यास अंकुरला असावा असं आज मागं वळून पाहताना ध्यानी येतं.

**(मेहता पब्लिशिंग हाऊसच्या 'खाली जमीन वर आकाश' या डॉ. सुनीलकुमार लवटे लिखित पुस्तकातून)**


**नवं कोरं**




मनाच्या सैरभैर अवस्थेतही अंतर्मनाचा अंतर्वेध घ्यायला लावणारं आणि 'शमन्स' जमातीमधील आध्यात्मिक उन्नतीची शिकवण रुजवणारं..
सत्यघटनेवर आधारित कथन..

प्र ति रू प

मूळ लेखक - प्रिया कुमार
अनुवाद - स्वाती काळे

पृष्ठसंख्या : १५६
किंमत : ₹१९५



थोडं वास्तव, थोडी कल्पना... या दोन्हींचं मिश्रण असलेल्या आगळ्यावेगळ्या वैशिष्ट्यपूर्ण कथा...

लेखक - कल्याणीरमण बेन्नुरवार


तरंग

पृष्ठसंख्या : २०८
किंमत : ₹२५०

Book Available

# वुइ आर पुअर बट सो मेनी

- इला भट्ट



*गिरधरनगरामधली दहीबेन आणि रायखाडमधली चंचलबेन ह्या दोन कचरा गोळा करणाऱ्या स्त्रिया १९८० सालच्या उन्हाळ्यात मला त्यांच्या वस्तीत घेऊन गेल्या. दुपारच्या वेळेस कचरा गोळा करणाऱ्या स्त्रिया घरी येऊन कचऱ्याची छाननी करत असतात. ती वेळ गाठून आम्ही त्यांना एकत्र करून त्यांची सभा घेतली. स्त्रिया मोकळेपणानं आणि निर्भीडपणे बोलत होत्या. आपापसातले मतभेद विसरून त्या नव्याचं स्वागत करायला सिद्ध झालेल्या होत्या. त्यांच्या समाजात ही बातमी इतकी झपाट्यानं पसरली की, वर्षभरात त्यातल्या अनेक जणी 'सेवा'च्या सदस्य बनल्या. चंचलबेन त्यांचं नेतृत्व करत होती. आता मला रंजनबेन नावाची नवी सहकारीसुद्धा मिळाली होती. शहराच्या इतर भागांतल्या कचरा वेचणाऱ्या महिलांना ती एकत्र आणत होती.*

१९७०च्या दशकाच्या अखेरीस गुजरात विश्वविद्यालयात अंजना दवे नावाची विद्यार्थिनी शिकत होती. सरकारतर्फे राबवल्या जाणाऱ्या 'कामगार कल्याण योजनां'संदर्भातल्या प्रश्नांबद्दल तिला आत्मीयता वाटत होती. तिनं या संदर्भात माझी भेट घेतली. अहमदाबादमधल्या कचरा गोळा करणाऱ्यांकडे मी तिचं लक्ष वेधून घेतलं. ह्या साऱ्या गरीब कामकारी महिला असूनही सरकारच्या 'कामगार-कल्याण योजनां'पासून त्यांना काहीही लाभ होत नव्हता; कारण त्या कुण्या मालकासाठी काम करत नसून स्वत:च्या व्यवसायात होत्या. त्यांचं काम आणि व्यवसाय याच्याशी 'सेवा'ची नुकतीच कुठे ओळख होऊ लागलेली होती. त्यांच्याबद्दलच्या आमच्या प्रयत्नांसाठी मदत करण्याची इच्छा ह्या विद्यार्थिनीनं दर्शवली. तिच्या मार्गदर्शनाखाली 'सेवा'नं अहमदाबादमधल्या कचरा गोळा करणाऱ्यांबद्दल विशेष माहिती जमा केली. ह्या माहितीच्या जोरावर अंजनाला एम. ए.ची पदवी मिळाली आणि 'सेवा'ला त्यांच्या व्यवसायाबद्दल सखोल माहिती गोळा करता आली.

अंजनानं गोळा केलेल्या माहितीनुसार१ कचरा गोळा करणाऱ्या स्त्रियांचं उत्पन्न अतिशय कमी होतं. त्यांना महिन्याकाठी २०० रुपयांहूनही कमी आमदनी मिळत असे. कचरा गोळा करणाऱ्या ९०टक्के स्त्रिया झापेडपट्टीत राहत असत. त्यांच्या कुटुंबात सरासरी सहा माणसं असत. त्यांची अर्धीअधिक मुलं शाळेत जातच नसत. १८टक्के कुटुंबात फक्त घरातली स्त्री ही एकमेव मिळवती व्यक्ती असे. ह्यातल्या बहुतेक स्त्रिया मालकीची जमीन नसलेल्या ग्रामीण कारागीर जमातीतल्या होत्या. ही कारागिरांची जमात दोन पिढ्यांपूर्वी खेड्यांमध्ये विणकर, मोची किंवा कातड्याच्या वस्तू बनवणं अशा व्यवसायात होती. पूर्वापार सवर्णांकडून ह्या दलितांचा छळ होत आलेला होता. गरिबीला कंटाळून त्यांनी आपापली खेडी सोडून कापडधंद्याचं केंद्र असलेलं अहमदाबाद गाठलं होतं आणि झोपडपट्टीत घरं मिळवून त्यांनी नोकऱ्या शोधायला सुरुवात केली होती.

कचरा गोळा करणं हे धोक्याचं काम होतं. उघड्या हातानं सतत ॲसिडच्या बाटल्या, इलेक्ट्रिकल वायर्स, खिळे, काचा, घाणेरडे कागद आणि कापडं हाताळल्यामुळे त्यांना विविध प्रकारचे जंतुसंसर्ग होत असत. त्वचारोग, इसब, दमा या त्यांच्या नेहमीच्या तक्रारी होत्या. त्याचप्रमाणे सततची पाठदुखी, पाय, खांदे आणि मान अवघडणं आणि दुखणं असे त्रास त्यांना होत असत. नुकताच एका कचरा गोळा करणारीच्या हातात एका बॉम्बचा विस्फोट होऊन तिचा हातच छिन्नविच्छिन्न झाला. ''धुळीत चाचपडणाऱ्यांचं आयुष्यसुद्धा धुळीसारखंच (मातिमोल) असतं,'' असा विलाप धूलिबेननं केला होता. तिचं बिचारीचं नावही तेच होतं! कचरा गोळा करणाऱ्या बऱ्याचशा स्त्रिया दलित समाजाच्या असतात आणि त्यांचं कामसुद्धा हलक्या दर्जाचं असतं. त्यामुळे आपण क:पदार्थ आहोत, असं त्यांना वाटू लागतं.

त्यांनी गोळा केलेल्या, पुनर्वापराजोग्या वस्तूंच्या किमती दर महिन्याला बदलत असतात; त्या किमती शहराच्या वेगवेगळ्या विभागांत वेगवेगळ्या असतात. आणि व्यापारी लहर येईल ती किंमत देत असतो. शिवाय परदेशातून आयात केलेल्या भंगार मालाच्या पुरवठ्याप्रमाणे स्थानिक भंगारच्या किमतीसुद्धा वरखाली होत असतात, परंतु भंगाराचा व्यापारी जी किंमत देईल, त्याचा स्वीकार या स्त्रिया निमूटपणे करतात.

आज रद्दी पेपरचा भाव किलोला साडेतीन रुपये आहे, पुठ्ठ्याच्या खोक्यांना किलोमागे अडीच रुपये मिळतात. जाड प्लास्टिकच्या पिशव्यांना किलोला पाच रुपये, लोखंडी भंगार मालाला किलोमागे चार रुपये. केसांना किलोमागे शंभर रुपये मिळतात. पाण्याच्या बाटल्यांचं प्लास्टिक किलोमागे दोन रुपये भावानं विकलं जातं. बाटल्यांना किलोमागे ५ ते ३५ रुपये मिळतात; कारण याच बाटल्या साध्या नळाच्या पाण्यानं भरून त्या मिनरल वॉटर म्हणून विकायचा धंदा तेजीत चालला आहे. पूर्वी कचऱ्यात कागदांचं प्रमाण भरपूर असे. आता कागदांची जागा प्लास्टिकनं घेतलेली आहे. २००१मध्ये या स्त्रियांना महिन्याकाठी ५०० रुपये कमाई होत होती. १९७९मध्ये त्यांना दोनशे रुपये महिना कमाई होत होती. हे दोनही आकडे अगदी नगण्य म्हटले पाहिजेत!

गिरधरनगरामधली दहीबेन आणि रायखाडमधली चंचलबेन या दोन कचरा गोळा करणाऱ्या स्त्रिया १९८० सालच्या उन्हाळ्यात मला त्यांच्या वस्तीत घेऊन गेल्या. दुपारच्या वेळेस कचरा गोळा करणाऱ्या स्त्रिया घरी येऊन कचऱ्याची छाननी करत असतात. ती वेळ गाठून आम्ही त्यांना एकत्र करून त्यांची सभा घेतली. स्त्रिया मोकळेपणानं आणि निर्भीडपणे बोलत होत्या. आपापसातले मतभेद विसरून त्या नव्याचं स्वागत करायला सिद्ध झालेल्या होत्या. त्यांच्या समाजात ही बातमी इतकी झपाट्यानं पसरली की, वर्षभरात त्यातल्या अनेक जणी 'सेवा'च्या सदस्य बनल्या. चंचलबेन त्यांचं नेतृत्व करत होती. आता मला रंजनबेन नावाची नवी सहकारीसुद्धा मिळाली होती. शहराच्या इतर भागांतल्या कचरा वेचणाऱ्या महिलांना ती एकत्र आणत होती.

त्यांची संघटना स्थापन करण्याची जबाबदारी आम्ही अंजनावर सोपवली होती. हे काम तिनं मनापासून केलं. सरकारी मजूर अधिकारी (गव्हर्न्मेन्ट लेबर ऑफिसर) म्हणून अंजनाची नियुक्ती झाल्यावर तिला 'सेवा' सोडणं भाग पडलं. तिला गमावणं हा 'सेवा'चा तोटा असला, तरी कामगारांकडे बघणाऱ्या सरकारी अधिकाऱ्यांमध्ये आमच्या वतीनं बोलणारी एक व्यक्ती लाभली, ही आमच्या संस्थेच्या दृष्टीनं मोठी फायद्याची गोष्टच ठरली.

कापड गिरण्यांशी TLAचे घनिष्ठ संबंध होते. त्याचा फायदा घेऊन, गिरण्यांमधल्या व्यवस्थापनाला पटवून 'सेवा'नं कचरा उचलणाऱ्या महिलांना गिरण्यांमधल्या जमिनींवरचे आणि ऑफिसांमधले कागद आणि इतर टाकाऊ जिन्नस थेट गोळा करण्याची परवानगी मिळवून दिली. ह्या स्त्रियांनी आत येण्याला गिरण्यांतल्या मॅनेजर्सनी आक्षेप घेतला नसला, तरी प्रत्यक्षात ही परवानगी वापरण्यात खूपच अडचणी आल्या. आमच्या लक्षात आलं की, गिरण्यांमधले काही मजूर आणि त्यांचे मुकादम यांची कचरा गोळा करणारी एक टोळी यापूर्वीच अस्तित्वात होती. आपला मलिदा जातोय असं पाहून त्यांनी जोरदार विरोध केला. जरी 'सेवा'ची सरशी होऊन 'सेवा'च्या सदस्य असलेल्या कचरा उचलणाऱ्या स्त्रियांना सरतेशेवटी प्रवेश मिळाला, तरी आम्ही एक महत्त्वाचा धडा शिकलो आणि आर्थिक हितसंबंध गुंतलेले लोक कशी छुपी लढत देऊ शकतात या अनुभवाची खूणगाठ आम्ही मनाशी बांधली.



काही थोडक्या स्त्रियांना या परवानगीचा फायदा झाला; पण उरलेल्यांचं काय? ऑफिसांमधून कचरा गोळा करता यावा अशी मागणी इतर सदस्यसुद्धा जोरदारपणे करू लागल्या होत्या; परंतु १९८०पर्यंत गिरण्या हळूहळू डबघाईला येऊ लागल्या होत्या आणि त्यांचं उत्पादन कमी कमी होत चाललं होतं. त्यामुळे गिरण्यांमधून गोळा करता येण्याजोगा टाकाऊ मालसुद्धा कमी होऊ लागला होता. गिरणी मालकांच्या म्हणण्याप्रमाणे उत्पादनासाठी होणाऱ्या खर्चात खूप वाढ झाल्यामुळे गिरण्या डबघाईला आलेल्या होत्या. इतरांचं म्हणणं होतं की, यामागची कारणं अधिक गुंतागुंतीची होती आणि गिरणीमालकांनी आधुनिक यंत्रसामग्री आणण्यात पैसा गुंतवणं टाळल्याचा हा परिणाम होता; कारण काहीही असो! १९९०पर्यंत साठ गिरण्या पूर्णपणे बंद पडल्या आणि सव्वा लाख गिरणी कामगार बेकार झाले. जवळजवळ सर्व कामगार पुरुषच होते.

कामासाठीची स्पर्धा जीवघेणी झालेली होती आणि फार थोड्या नोकऱ्या दृष्टिपथात होत्या. त्यामुळे आमच्या सदस्य असलेल्या स्त्रियांचे नवरे रिकामटेकडेपणे त्यांच्या घराच्या दारात बसून विड्या फुंकताना नजरेस पडू लागले. लवकरच कोणत्यातरी कारखान्यात नवी नोकरी मिळेल अशी आशा करत ही माणसं रिकामपणी घरी बसू लागली. त्यामुळे घरच्यांच्या मुखी घास घालण्याची जबाबदारी घरातल्या स्त्रीच्या शिरावर आली. ज्यांच्यापाशी भांडवल किंवा अंगी कोणतंही विशेष कौशल्य नव्हतं, अशा गरीब स्त्रिया कचरा गोळा करू लागल्या. चंचलाबेन म्हणाली, ''कचरा गोळा करणं हेच आमचं प्राक्तन असलं, तर ते आम्ही निमूटपणे स्वीकारू; परंतु कचऱ्यासाठी कमी किंमत दिलेली आम्ही खपवून घेणार नाही. आम्ही योग्य किमतीसाठी लढा देऊ!''

**(मेहता पब्लिशिंग हाऊसच्या 'वुइ आर पुअर बट सो मेनी' या इला भट्ट लिखित आणि सुनीति काणे अनुवादित पुस्तकातून)**



आमच्या पुस्तकांविषयी आणि नवीन योजनांविषयी जाणून घेण्यासाठी

**सर्व ग्रंथालयांना नम्र विनंती**

कृपया आपला संपूर्ण पत्ता (तालुका, जिल्हा, पिनकोडसहित), मेल-आयडी, फोन नंबर, मोबाईल नंबर ही माहिती आमच्या खालील व्हॉट्स अप नंबरवर कळवावी.

९४२०५९४६६५

## नवं कोरं




मृत्युशय्येवरही जगण्यातली सकारात्मकता
अधोरेखित करणारं आणि मृत्युशय्येवरच
लिहिलं गेलेलं फिलिप गूल्ड
यांचं स्फूर्तिदायी आत्मकथन

# आयुष्याचा अंतिम संस्कार

मूळ लेखक - फिलिप गूल्ड
अनुवाद - डॉ. अजेय हर्डीकर

पृष्ठसंख्या : १४४
किंमत : ₹१८०

---



लेखिका सरस्वतीबाई राजवाडे यांचं चरित्र
म्हणजे जीवनभर प्रेमाचा शोध घेत, एकाकी जगत
एकान्ताकडे वळलेल्या एका जिवाची कथा !


# अशीच काही पानं..

संपादन आणि शब्दांकन - वैदेही
अनुवाद - उमा कुलकर्णी

पृष्ठसंख्या : ९६
किंमत : ₹१३०

Book Available

---




टीनएज अवस्थेकडे पाहण्याचा
एक मोहक आणि नवा दृष्टिकोन

# टीनएजर्स

लेखक - डेव्हिड बेनब्रिज
अनुवाद - डॉ. अस्मी अच्युते

पृष्ठसंख्या : २६८
किंमत : ₹३५०

# दिनविशेष

## १६ ऑक्टोबर ते १५ डिसेंबर २०१९ दरम्यानचा दिनविशेष

## दिनविशेषानिमित्त पुस्तकसंचावर ५० टक्क्यांपर्यंत सूट

**खालील संचांवर १६ ते ३१ ऑक्टोबर दरम्यान खास सवलत**

**२१ ऑक्टोबर - सर आल्फ्रेड नोबेल यांचा जन्मदिन**
'नोबेल ललना भाग १', 'नोबेल ललना भाग २'
या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ३१५/- । सवलत किंमत १९९/-**

**२१ ऑक्टोबर - पॉल विल्सन यांचा जन्मदिन**
'शांततेनं काम करा!' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २४०/- । सवलत किंमत १४९/-**

**२३ ऑक्टोबर - मायकेल क्रायटन यांचा जन्मदिन**
नेक्स्ट, पायरेट लॅटिट्यूड्स, प्रे (सावज), स्टेट ऑफ फिअर, मायक्रो, डिस्क्लोजर या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत २३००/- ।**
**सवलत किंमत १३९९/-**

**२३ ऑक्टोबर - अरविंद अडिगा यांचा जन्मदिन**
'द व्हाईट टायगर' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २९५/- । सवलत किंमत १९९/-**

**२४ ऑक्टोबर - आर. के. लक्ष्मण यांचा जन्मदिन**
'कसं बोललात!' - भाग १ ते ७
या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ६९५/- । सवलत किंमत ३९९/-**

**२६ ऑक्टोबर - हिलरी क्लिंटन यांचा जन्मदिन**
'लिव्हिंग हिस्ट्री' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ४९५/- । सवलत किंमत ३२९/-**

**२७ ऑक्टोबर - ॲरन राल्स्टन यांचा जन्मदिन**
'ते १२७ तास!' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ३६०/- । सवलत किंमत २४९/-**

**२९ ऑक्टोबर - ली चाइल्ड यांचा जन्मदिन**
'नथिंग टू लूज', 'वन शॉट'
या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ६९०/- । सवलत किंमत ३९९/-**

**३० ऑक्टोबर - डेव्हिड बेनब्रिज यांचा जन्मदिन**
'टीनएजर्स' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ३५०/- । सवलत किंमत २२९/-**

**खालील संचांवर १ ते १५ नोव्हेंबर दरम्यान खास सवलत**

**२ नोव्हेंबर - कविता भालेराव यांचा जन्मदिन**
'तंत्रज्ञानाची मुळाक्षरे भाग - १', 'तंत्रज्ञानाची मुळाक्षरे भाग - २' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ३००/- । सवलत किंमत १९९/-**

**२ नोव्हेंबर - अरुण शौरी यांचा जन्मदिन**
'गव्हर्नन्स', 'हे सर्व आपल्याला कोठे नेणार?', 'कळेल का 'त्याला' आईचं मन?', 'मागील पानावरून... मागेच'!, 'द पार्लमेन्टरी सिस्टिम', 'वाळवीग्रस्त वृक्षाला पोलादी कुंपण वाचवेल का?', 'ख्यातनाम इतिहासकार'
या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत २८००/- ।**
**सवलत किंमत १५९९/-**

**२ नोव्हेंबर - ल्यूसी हॉकिंग यांचा जन्मदिन**
'जॉर्ज ॲन्ड द बिग बँग', 'जॉर्जेस कॉस्मिक ट्रेझर हंट', 'जॉर्जेस सिक्रेट की टू द युनिव्हर्स'
या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत १४८५/- । सवलत किंमत ९९९/-**

**५ नोव्हेंबर - डॉ. अतुल गवांदे यांचा जन्मदिन**
'बीइंग मॉर्टल', 'बेटर', 'जीव जिथे गुंतलेला...', 'यशप्राप्तीचा जाहीरनामा!' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत १०९०/- । सवलत किंमत ७४९/-**

**६ नोव्हेंबर - श्याम भुर्के यांचा जन्मदिन**
आनंदाचं पासबुक, गोष्टींचं एटीएम, खुमासदार अत्रे, मंत्र श्रीमंतीचा, पु.ल. : एक आनंदयात्रा, पुणं एक साठवण, सभेत कसे बोलावे, द माइंड जिम, द स्टार प्रिन्सिपल, द माइंड जिम रिलेशनशिप्स या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत १९६०/- ।**
**सवलत किंमत ११९९/-**

**६ नोव्हेंबर - संजय ढोले यांचा जन्मदिन**
'अंतराळातील मृत्यू', 'अश्मजीव', 'डिंभक', 'प्रेमाचा रेणू', 'संकरित' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत १०२५/- । सवलत किंमत ५९९/-**

**६ नोव्हेंबर - रत्नावली दातार यांचा जन्मदिन**
'सुखद बालसंगोपन', 'सुखद मातृत्व', 'सुखद वृद्धत्व' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ३२५/- । सवलत किंमत १९९/-**

**७ नोव्हेंबर - जागतिक कर्करोग जागरूकता दिन**
'Cancer Care & Mysteries & Yoga', 'कॅन्सर रोखू या एका सजग जीवनशैलीसह', 'इट्स नॉट अबाउट द बाइक', 'द जॉय ऑफ कॅन्सर', 'आयुष्याचा अंतिम संस्कार' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ११९०/- । सवलत किंमत ७४९/-**

**११ नोव्हेंबर - सुरेखा शहा यांचा जन्मदिन**
'थेंबभर पाणी अनंत आकाश' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २८०/- । सवलत किंमत १७९/-**

**१२ नोव्हेंबर - ख्रिस्तोफर रिच यांचा जन्मदिन**
'रुल्स ऑफ डिसेप्शन' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ४८०/- । सवलत किंमत २९९/-**

**१३ नोव्हेंबर - ना. रा. वडनप यांचा जन्मदिन**
'बुद्धिबळाचा ओनामा', 'सुसंघटित मारा', 'चतुरंग (बुद्धिबळातील) सापळे,' 'बुद्धिबळाचा श्रीगणेशा', 'बुद्धिबळ शिका' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ७९५/- । सवलत किंमत ४९९/-**

**१४ नोव्हेंबर - बालदिन**
**संच १ -** अस्वलाची शेपटी आणि गडबड गोष्टी, सिंड्रेला आणि इतर कथा, गंपू-चिंपू आणि इतर कथा, गर्विष्ठ घोडा आणि मस्त मस्त गोष्टी, घड्याळातील कोकिळा आणि गडबड गोष्टी, घारीची चलाखी आणि मस्त मस्त गोष्टी, जादूचं खीरपात्र आणि इतर कथा, खट्याळ खलाशी आणि गडबड गोष्टी, मैत्रीचे मोल आणि इतर कथा, समादचा वाळवंटातील आणि रानातील फेरफटका, शिकारी बनला शिकार, हनुमान, मोठ्यांच्या छोट्या गोष्टी, रमज्या-गमज्या आणि जम्मत गोष्टी, ठकूबाई ठेंगे आणि जम्मत गोष्टी, बुटुकबैंगण विसरभोळे आणि जम्मत गोष्टी, कसोटी आणि इतर कथा, सत्त्वपरीक्षा आणि इतर कथा, बुद्धिरामाचा न्याय आणि चातुर्य कथा, प्रधानाची निवड आणि चातुर्य कथा, इमानी मित्र आणि इतर गोष्टी, पंचरंगी खार आणि इतर गोष्टी, जांभळे आंबे आणि जंमत गोष्टी, एकमेका साह्य करू आणि इतर कथा, आजीचं घर आणि इतर कथा, खुलदाबादचा खजिना, दोस्ती या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत १७१०/- । सवलत किंमत ९९९/-**

**संच २ -** चित्रमय बोधकथा भाग १(३ पुस्तकांचा संच), चित्रमय रंगतदार कथा भाग १(४ पुस्तकांचा संच), चित्रमय रंगतदार कथा भाग २ (३ पुस्तकांचा संच), चित्रमय रंगतदार कथा भाग ३(४ पुस्तकांचा संच), चित्रमय रंगतदार कथा भाग ४ (४ पुस्तकांचा संच), चित्रमय रंगतदार कथा भाग ५(४ पुस्तकांचा संच), चित्रमय रंगतदार कथा भाग ६ (३ पुस्तकांचा संच), चित्रमय रंगतदार कथा भाग ७ (३ पुस्तकांचा संच), गोष्टी देशोदेशीच्या (३ पुस्तकांचा संच) या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत २०२०/- ।**
**सवलत किंमत ११९९/-**

**संच ३ -** गोष्टी डॉट कॉम आणि इतर बोधकथा भाग १, गोष्टी डॉट कॉम आणि इतर बोधकथा भाग २, गोष्टी डॉट कॉम आणि इतर बोधकथा भाग ३, निसर्ग आणि इतर गोष्टी, कांगारू देशीच्या गोष्टी (४ पुस्तकांचा संच), एल्मर मालिका (५ पुस्तकांचा संच), गंमत कोडी भाग १ ते ५ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत १८५५/- ।**
**सवलत किंमत १०९९/-**

**संच ४ -** फ्रँकलिन मालिका भाग १- (४ पुस्तकांचा संच), फ्रँकलिन मालिका भाग २-(३ पुस्तकांचा संच), फ्रँकलिन मालिका भाग ३ (३ पुस्तकांचा संच), फ्रँकलिन मालिका भाग ४ (३ पुस्तकांचा संच), फ्रँकलिन मालिका भाग ५ (३ पुस्तकांचा संच), फ्रँकलिन मालिका भाग ६ (३ पुस्तकांचा संच), फ्रँकलिन मालिका भाग ७ (३ पुस्तकांचा संच), फ्रँकलिन

मालिका भाग ८ (३ पुस्तकांचा संच), फ्रँकलिन मालिका भाग ९ (४ पुस्तकांचा संच) या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत १४५०/- । सवलत किंमत ८४९/-**

**संच ५ -** विक्रम वेताळ मालिका भाग १ (४ पुस्तकांचा एकत्रित संच), विक्रम वेताळ मालिका भाग २ (४ पुस्तकांचा एकत्रित संच), विक्रम वेताळ मालिका भाग ३ (४ पुस्तकांचा एकत्रित संच)
अकबर-बिरबल मालिका भाग १(४ पुस्तकांचा एकत्रित संच), अकबर-बिरबल मालिका भाग २ (५ पुस्तकांचा एकत्रित संच)), अकबर-बिरबल मालिका भाग ३ (५ पुस्तकांचा एकत्रित संच)
या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत १८००/- ।**
**सवलत किंमत १०४९/-**

**संच ६ -** बंटू बसला ढगात आणि इतर कथा (२ पुस्तकांचा संच), ससोबा-हसोबा मालिका भाग १, ससोबा-हसोबा मालिका भाग २, बब्बड मालिका भाग १, जंगल जंमत मालिका भाग १, जंगल जंमत मालिका भाग २ या पुस्तकांच्या संचांवर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत १४३०/- । सवलत किंमत ८४९/-**

**संच ७ -** तेनालीराम मालिका (१४ पुस्तकांचा संच), विज्ञान नवलाई, अस्थी, घरटे, सूर्यास्त, मध्यरात्र, यज्ञकुंड, सैनिकहो, तुमच्यासाठी..., अदान ॲन्ड ईव्हा
या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत १६२०/- । सवलत किंमत ९४९/-**

**संच ८ -** 'आपली सृष्टी' या मालिकेतील १० पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ११००/- । सवलत किंमत ६४९/-**

**संच ९ -** जातक कथा (४ पुस्तकांचा संच), पंचतंत्र (५ पुस्तकांचा संच), हितोपदेश (४ पुस्तकांचा संच), शेक्सपिअर संच (२२ पुस्तकांचा संच) या संचांवर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत २३००/- ।**
**सवलत किंमत १३९९/-**

**संच १० -** शेवडे गुरुजींचा २१ पुस्तकांच्या (चरित्रमालिका) संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत २०८०/- ।**
**सवलत किंमत ११९९/-**

**१४ नोव्हेंबर - जागतिक मधुमेह दिन**
'चला जाणून घेऊ या ! मधुमेह', 'मधुमेह एक आव्हान' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १४९/-**

**१५ नोव्हेंबर - संजय राऊत यांचा जन्मदिन**
'एकवचनी भाग १ आणि २'
या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ८९५/- । सवलत किंमत ५९९/-**

**खालील संचांवर १६ ते ३० नोव्हेंबर दरम्यान खास सवलत**

**१७ नोव्हेंबर - रत्नाकर मतकरी यांचा जन्मदिन**
रत्नाकर मतकरी लिखित १४ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत २२०५/- ।**
**सवलत किंमत १५४९/-**

**१७ नोव्हेंबर - मोहना जोगळेकर यांचा जन्मदिन**
'रिक्त' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १६९/-**

**२१ नोव्हेंबर - मंजुश्री गोखले यांचा जन्मदिन**
मंजुश्री गोखले लिखित ६ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत १७८५/- ।**
**सवलत किंमत १२९९/-**

**२४ नोव्हेंबर - डेल कार्नेगी यांचा जन्मदिन**
डेल कार्नेगी लिखित ३ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ६००/- । सवलत किंमत ३९९/-**

**२४ नोव्हेंबर - अरुंधती रॉय यांचा जन्मदिन**
'द गॉड ऑफ स्मॉल थिंग्ज' पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ३९५/- । सवलत किंमत २४९/-**

**२४ नोव्हेंबर - सुधीर गाडगीळ यांचा जन्मदिन**
'लाइफ-स्टाइल' पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत १५०/- । सवलत किंमत ९९/-**

**२६ नोव्हेंबर - वीणा देव यांचा जन्मदिन**
'स्वान्सीतील दिवस' पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ३९५/- । सवलत किंमत २४९/-**

**२६ नोव्हेंबर - अनंत भोयर यांचा जन्मदिन**
'आभाळझुंज', 'हराळी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ५४०/- । सवलत किंमत ३२९/-**

**२८ नोव्हेंबर - विश्वास पाटील यांचा जन्मदिन**
विश्वास पाटील लिखित ५ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत १९७०/- ।**
**सवलत किंमत १४९९/-**

**२८ नोव्हेंबर - किम्बर्ली किर्बर्जर यांचा जन्मदिन**
किम्बर्ली किर्बर्जर लिखित ३ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ५५५/- । सवलत किंमत ३४९/-**

**३० नोव्हेंबर - आनंद यादव यांचा जन्मदिन**
आनंद यादव लिखित ३३ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ५९५०/- ।**
**सवलत किंमत ४२९९/-**

**३० नोव्हेंबर - योजना यादव यांचा जन्मदिन**
'मरी मरी जाय सरीर' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत १४०/- । सवलत किंमत ९९/-**

**३० नोव्हेंबर - संजीव परळीकर यांचा जन्मदिन**
संजीव परळीकर लिखित ८ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ८३५/- । सवलत किंमत ५४९/-**
**३० ३० नोव्हेंबर - हॅरिएट लर्नर यांचा जन्मदिन**
हॅरिएट लर्नर लिखित ३ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ७००/- । सवलत किंमत ४९९/-**

**खालील संचांवर १ ते १५ डिसेंबर दरम्यान खास सवलत**

**४ डिसेंबर - निक व्होयचिच यांचा जन्मदिन**
'लाइफ विदाउट लिमिट्स' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २८०/- । सवलत किंमत १९९/-**

**११ डिसेंबर - ओशो यांचा जन्मदिन**
ओशो लिखित ३० पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ४९२५/- ।**
**सवलत किंमत ३२४९/-**

**१५ डिसेंबर - गीता फोगाट यांचा जन्मदिन**
'आखाडा' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २२०/- । सवलत किंमत १४९/-**

**१५ डिसेंबर - सुरेश पाटील यांचा जन्मदिन**
'दाह' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ४९५/- । सवलत किंमत ३४९/-**

**१५ डिसेंबर - ग्रेचेन रुबिन यांचा जन्मदिन**
'आनंदतरंग' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ३५०/- । सवलत किंमत २४९/-**

Find us on: facebook


https://www.facebook.com/mehta.publishinghouse

आमच्या लेखकांच्या जन्मदिनानिमित्त
तसेच दिनविशेषावर
आधारित विषयावरील पुस्तकसंचावर विशेष सवलत.
❖ किमतींमध्ये बदलाची शक्यता ❖

**अधिक माहितीसाठी संपर्क :** फोन : ०२०-२४४७६९२४ / २४४७५४६२
**Whats App No. ९४२०५९४६६५**
**website : www.mehtapublishinghouse.com**

नवं कोरं

शांतीचे नोबेल प्राइझ मिळवलेल्या मलालाचे पिता **झियाउद्दीन युसफझाई यांचे आत्मकथन**,
ज्यांनी स्त्रियांना स्वातंत्र्य, समता, सन्मान आणि शिक्षण मिळावे
म्हणून आयुष्य पणाला लावले...




## झियाउद्दीन युसफझाई । अनुवाद - डॉ. शुचिता नांदापूरकर-फडके

पृष्ठसंख्या : १४० । किंमत : ₹१९५

Book Available

आता रानात जाऊया...
आता डोंगरात जाऊया...
तिथं एक कोंब...
दोन कोंब...
कोंबच कोंब...
एक आपलं झाड,
त्याची तिथंच होणार वाढ...
खरखरीत मायाळू कडा,
त्याला झाडाचा पडलाय वेढा...
दगडाचं झाड विशाल,
त्यावर झाडाची एक मशाल...

-अभिनेते सयाजी शिंदे

तूच एकदा म्हणालास,
'प्रश्नांसोबत जगू नकोस
उत्तर शोधत जगता आलं पाहिजे.'
माझे प्रश्न राहू देत असेच अनुत्तरित
माझी उत्तरं मीच शोधून काढलीत.
आनंदवनच्या श्रमनगरीत
पाचशे रुग्णांचा सहस्रकर समूह
समृद्धीचा गोवर्धन उचलू शकला
तसा तो खेड्यापाड्यांत कसा उचलला जाईल
या प्रश्नाच्या प्रदीर्घ चिंतनातून
उत्स्फूर्त झालेले एक समाधान
मी तुमच्यापुढे मांडत आहे.

-थोर समाजसेवक बाबा आमटे

मेहता
पब्लिशिंग
हाऊस

१९४१, सदाशिव पेठ, बाजीराव रोड टेलिफोन भवनसमोर,
माडीवाले कॉलनी, पुणे ३०
फोन : ०२०-२४४७६९२४, २४४७५४६२,
२४४६०३१३, २४४६३०४८
Email: mmgj@mehtapublishinghouse.com
customercare@mehtapublishinghouse.com
Website: www.mehtapublishinghouse.com